30-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
NTK/ KTG/ D/ 10:00

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ. शी.** : पुणे शहराच्या सन 2007 ते 2027 या कालावधीसाठीच्या सुधारित विकास आराखड्यात नव्याने केलेले बदल

**मु. शी.** : पुणे शहराच्या सन 2007 ते 2027 या कालावधीसाठीच्या सुधारित विकास आराखड्यात नव्याने केलेले बदल यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री चंद्रकांत पाटील व रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहराच्या सन 2007 ते सन 2027 या कालावधीसाठीच्या सुधारित विकास आराखड्यात सार्वजनिक उपयोगितांच्या आरक्षणाचा अभाव असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येणे, कर्वेनगर येथील सर्व्हे क्रमांक 39/1 व 40/1, पर्वती फायनल प्लॉट नं.442/6, निबवेवाडी सर्व्हे क्र.673, 677, 678 इत्यादी अनेक ठिकाणची सार्वजनिक उपयोगाच्या वास्तुंसाठी असलेली आरक्षणे निवासी, मॉल्स इत्यादी वाणिज्यिक वापरासाठी करणे, मुंढवा शहरातील सर्व्हे क्र. 48-क येथील औद्यागिक क्षेत्र वगळून त्यास निवासी क्षेत्र करणे, सर्व्हे क्र.43 येथील वॉटर बॉडी क्षेत्र कमी करणे, सर्व्हे क्र.52 येथील बस बे आरक्षण रद्द करणे, सर्व्हे क्र.88, 87, 83, 84 आणि 92 येथील ग्रिन बॉडी क्षेत्र कमी करणे, अशाप्रकारे पुणे शहरात ठिकठिकाणी असलेली सार्वजनिक उपभोगाची आरक्षणे वगळून तेथे वाणिज्यिक स्वरूपाचे आरक्षण नवीन सुधारित आराखड्यान्वये करणे, सदर सुधारित विकास आराखडा बिल्डर धार्जिणे असून त्याचे प्रारूप तयार करताना हजारो कोटींचा भ्रष्टाचार झ ाला असल्याचे स्पष्ट होणे, परिणामी पुणे शहरातील नागरिकांमध्ये सदर सुधारित आराखड्याविषयी नाराजी व असंतोष असणे, सदर सुधारित विकास आराखड्याच्या अनुषंगाने विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक 25 जून, 2013 रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या सूचना व हरकतींची स्थानिक प्रशासनाने दखल न घेणे, याप्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एखाद्या शहराची कशी वाट लावावयाची त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे हा डी.पी.आहे.

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, एखाद्या शहराची वाट कशी लावावयाची या वाक्याने आपण सुरुवात केली आहे. आज आपण वाट लावू नये. आज आपण नीट वाट धरु.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या सरकारला नीट वाट दाखविण्याचे मी काम करीत आहे. पुणे शहराच्या सुधारित विकास आराखड्याला 87 हजार सूचना आलेल्या आहेत. या सभागृहाच्या माध्यमातून पुणेकर, एनजीओज व तेथील लोकप्रतिनिधी माध्यमे यांचे मनापासून अभिनंदन करतो. त्यांनी या डी.पी.साठी जागरुकता दाखविली आहे. लोकप्रतिनिधी कोणत्याही पक्षाचे असतील, पण त्यांनी या डी.पी.मध्ये असलेल्या चुका उघडपणे दाखविण्याचे काम केलेले आहे. या सभागृहाच्या माध्यमातून त्यांचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे.

सभापती महोदय, या डी.पी.मध्ये मनमानी करण्यात आलेली आहे. डी.पी.प्रशासनाने तयार केला आहे. त्यासंबंधी हजारोच्या संख्येने उपसूचना आलेल्या आहेत. या डी.पी.च्या माध्यमातून कोणाचे भोसल्यांशी संबंध आहेत, कोणाचे चोरडियांशी संबंध आहेत, कोणाचे गोयंकांशी संबंध आहेत, कोणाचे निबवेवाडी हिल टॉपशी संबंध आहेत, कोणाचे संगमशी संबंध आहेत, कोणाचे मुंडवाशी काय नाते आहे ते मला माहीत नाही. ए.सी.बी.ने प्रामाणिकपणे कोणत्या नगरसेवकांनी कोणती उपसूचना केली आहे हे जर जाहीर केले तर त्यातून सगळ्या भानगडी बाहेर पडतील. कोणाचे कोठे लागेबांधे आहेत ते समोर येईल. या डी.पी.ला मोठ्या प्रमाणात उपसूचना आल्या आहेत. बेकायदा प्रस्तावाद्वारे त्या आयुक्तांना अधिकार देऊन टाकले आहेत. त्यांना तसे अधिकार देता येतील काय ? त्यांना असे सांगण्यात आले आहे की, तुम्हाला योग्य वाटतील त्या उपसूचना ठेवा, अयोग्य वाटतील त्या काढून टाका. मंत्री महोदय या विषयाचा अभ्यास करुन आलेले असतील. अभ्यास केला नसेल तर नगरविकास विभागाकडे ट्यूशन्स घेण्यासाठी अनेकजण येतात, हेही मला चांगले माहीत आहे.

ही लक्षवेधी सूचना मांडत असताना माझा प्रामाणिकपणे हेतू हा आहे की, पुढील काळामध्ये शहरांची योग्य पध्दतीने नियोजन केले नाही, डी.पी.तयार करीत.........

4...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.विनोद तावडे.....

असताना बारीक सारीक गोष्टींचा विचार केला नाही तर राज्यातील सर्व शहरांमधील 50-52 टक्के नागरिकरण झाल्यामुळे ती बकाल होतील. त्याबाबत वेळीच नियोजन केले तर ठीक होईल. मंत्री महोदयांना मी असे विचारु इच्छितो की, आलेल्या उपसूचनांपैकी योग्य असतील त्या ठेवा, अयोग्य असतील त्या काढून टाकाव्या, याबाबत आयुक्तांना प्रस्तावाद्वारे अधिकार दिले आहेत, तो प्रस्ताव बेकायदेशीर आहे काय, असल्यास तो रद्द केला जाईल काय ?

सभापती महोदय, विकास आराखड्याची एक प्रक्रिया असते. महानगरपालिकेमार्फत या उपसूचनांची छाननी होईल. त्यावर विचार होईल. परंतु त्यामध्येच गडबड झालेली आहे. म्हणून 87 हजार उपसूचना नंतर शासनाकडे येतील. यामध्ये वेळ घालवून पुणे शहरातील बकालपणा वाढविण्यापेक्षा नियम 37(1) अनुसार शासनाने त्या उपसूचना थेट आपल्याकडे मागवून त्यासाठी एक विशेष समिती नेमावी. त्या डी.पी.साठी टास्क फोर्स नेमण्यासाठी सरकार पुढाकार घेऊन काही उपाययोजना करणार आहे काय की, त्या शहराची वाट लावण्यासाठी त्यांच्याच हातामध्ये त्या उपसूचना दिल्या जाणार आहेत ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उदय सामंत : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी पुणे शहराच्या डीपी प्लॅन संदर्भात 87 हजार हरकती आल्याचे सांगितले, ही वस्तुस्थिती आहे. दिनांक 25 जून 2013 या प्लॅनमध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भात पत्र दिलेले आहे. 87 हजार हरकतीच्या संदर्भात पार्श्वभूमी अशी आहे की नियम 451 खाली काही सदस्य शासनाकडे आलेले होते. जे काही प्रारुप जाहीर केलेले आहे ते योग्य आहे की अयोग्य आहे अशी शासनाकडे विचार केली. शासनाने या बाबतीत कोणताही हस्तक्षेप करावयाचा नाही असा निर्णय घेतला. या आलेल्या 87 हजार हरकती तशाच ठेवून शासन या प्लॅनला मान्यता देणार आहे अशातला भाग नाही. प्रारुप 28.3.2013 रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द करुन यासंदर्भात एक महिन्याच्या विहित मुदतीमध्ये हरकती मागविल्या होत्या. या हरकती नियोजन समितीकडे जातील. त्यानंतर त्यासंबंधीचा अहवाल महासभेकडे जाईल, त्यानंतर सदर प्रारुप विकास आराखड्यातील नियोजन प्रस्ताव संचालक, नगर रचना यांच्याकडे जाईल आणि त्यानंतर ते शासनाकडे येईल. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जे पत्र दिलेले आहे त्यासह या 87 हजार हरकतींचा विचार केला जाईल आणि त्यानंतर या डीपी प्लॅनला शासन मान्यता देईल.

आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत काय असा प्रश्न माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विचारला. मी सांगितले की, आयुक्त असतील, महासभा असेल किंवा नियोजन समिती असेल ते त्यांच्यास्तरावर निर्णय घेतील. त्यानंतर संचालक, नगर रचना हे निर्णय घेतील. त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार महाराष्ट्र शासनाला आहेत. सर्व हरकतींचा विचार करुन महाराष्ट्र शासन प्लॅन जाहीर करील.

श्री. विनोद तावडे : आलेल्या हरकती मधील ज्या हरकती योग्य वाटतील त्या ठेवाव्यात आणि अयोग्य वाटतील त्या काढून टाकाव्यात अशा प्रकारचे अधिकारी आयुक्तांना कायद्याने देता येतात काय ? असल्यास, हे अधिकार रद्द करण्यात येतील काय ?

श्री. उदय सामंत : उपसूचनांच्या बाबतीत मला सांगावयाचे आहे की, कर्वेनगर, पर्वती बिबवेवाडी आणि मुंढवा या तीन प्रकल्पांचा उल्लेख माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केला. 7 पैकी 6 सूचना टीपीओ मार्फत आलेल्या आहेत. एक उपसूचना आलेली आहे. या सूचनांची आयुक्तांमार्फत छाननी करण्यात येईल. त्या सूचना तशाच ठेवलेल्या असतील तर त्याबाबतीत महाराष्ट्र शासन विचार करील.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. जयदेव गायकवाड : माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेल्या उत्तराशी मी सहमत आहे. वर्तमानपत्र, मीडिया यांच्या मार्फत या विकास आराखडयांसंबंधीची चर्चा होत असल्यामुळे पुणेकर गोंधळून गेलेले आहेत. निश्चित काय चालले आहे हे त्यांना कळत नाही. लक्षवेधी सूचनेमध्ये ज्या भूखंडांचा निर्देश केलेला आहे ते भूखंड आधीच रिझर्व्हेशनमध्ये होते. त्यामुळे प्रशासनाने ते तसेच राखून ठेवलेले आहेत. हे भूखंड डीपी प्लॅनमध्ये निवासी केलेले नाहीत. उपसूचनेमध्ये ते तसे केले गेले असतील तर त्याबाबतीत नंतर चौकशी होणार आहे. माननीय मंत्री महोदय मुख्यमंत्र्यांशी बोलून जर कोठे चुकीचा बदल केला गेला असेल तर तो दुरुस्त करतील काय ?

श्रीमती दिप्ती चवधरी : हरकतींच्या सूचनांचे हिअरिंग होणार आहे. त्यासाठी नियोजन समिती तातडीने नेमण्यात येणार आहे काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, या नियोजन समितीमध्ये टाऊन प्लॅनिंगचे दोन आर्किटेक्ट आणि पर्यावरण विभागाचे एक अधिकारी यांचा समावेश असतो. नियाजन समिती तत्काळ नेमण्याच्या सूचना संबंधिताना देण्यात येतील आणि लवकरात लवकर ही समिती नेमली जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या विकास आराखडयाच्या निमित्ताने 87 हजार हरकती व सूचना आलेल्या आहेत. पुणेकर नागरिकांना दुसरे काही काम नाही म्हणून त्यांनी 87 हजार हरकती व सूचना दिल्यात अशातला भाग नाही. यात अनेक उपसूचना आलेल्या आहेत त्या पुणेकरांसाठी अतिशय घातक आहेत. दुसऱ्या काही नियमांची पळवाट काढून त्या उप सूचनांबद्दल सर्वसाधारण सभेने निर्णय घेऊ नये अशा प्रकारच्या सूचना शासनाकडून दिल्या जातील काय ? राज्याच्या नव्हे तर देशाच्या कोणत्याही शहरात इमारतीच्या कोठल्याही मजल्यावर हॉटेलला परवानगी दिली जाऊ शकत नाही. परंतु पुणे शहराच्या वकास आरखडयाच्या उपसूचनेमध्ये असे सूचविण्यात आले आहे की, आताच्या निवासी इमारतींमध्ये कोणत्याही मजल्यावर हॉटेल काढता येईल. यामुळे पुणे शहराची भविष्यात काय परिस्थिती होईल, या गोष्टीचा आपण विचार करु शकता. अशा समाज हितासाठी घातक असलेल्या घातक आहेत याचा अभ्यास नगरविकास विभागाने आत्ताच राज्य स्तरावर केला पाहिजे, अन्यथा पुणे शहरातील नागरिकांच्या हिताला बाधा येऊ शकते. म्हणून अशा उपसूचनांचा राज्य स्तरावर अभ्यास केला जाईल काय ? डी.सी.रुल आम्ही मराठीमध्ये उपलब्ध करुन देऊ असे आपल्या अगोदरचे सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री यांनी आम्हाला आश्वासन दिले आहे. या सभागृहातील भोळया, भाबडया सदस्यांनी तत्कालीन राज्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाचे स्वागत केले आणि त्यांचे अभिनंदनही केले आहे. मुंबई, पुणे या महानगरपालिकांमधील डी.सी.रुल मराठीत भाषेत उपलब्ध नाहीत. डी.सी.रुल मराठीत रुपांतरीत करुन त्या प्रती आम्हाला कधीपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येतील ? यासंबंधी समिती कधी पर्यंत नेमली जाईल ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले की, नियोजन समितीकडून महासभेकडे आल्यानंतर महासभेने कोणताही ठराव आणला तरी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केलेली सूचना प्रमाणे अखंड पुणेकरांचे हित डोळयासमोर ठेवूनच महाराष्ट्र शासन या संदर्भात निर्णय घेईल. पूर्वीच्या नगरविकास राज्यमंत्र्यांनी डी.सी.रुल मराठीत रुपांतरीत करुन

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत...

देण्याचे आश्वासन दिलेले आहे, त्यांचा शब्द पडणार नाही याची खबरदारी सध्याचा नगरविकास राज्यमंत्री म्हणून नक्की घेण्यात येईल. नगरविकास खाते माझ्याकडे आलेले आहे. पूर्वीच्या नगरविकास राज्यमंत्र्यांनी जे अभिवचन दिलेले आहे, ते अभिवचन पूर्ण करण्याची जबाबदारी माझी आहे आणि ते केले जाईल. नियोजन समितीची नियुक्ती सत्वर करण्याच्या सूचना माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून दिल्या जातील व त्यासाठी मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती करील. ती समितीची लवकरात लवकर नियुक्त करण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, अतिशय गंभीर विषयाच्या बाबतीत लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली आहे. ओपन लँन्ड आणि डेव्हलप लॅन्ड म्हणजे जी कन्स्ट्रक्शन होणारी जागा आणि ओपन लॅन्ड याचा या प्रपोज डी.पी.मध्ये कन्सल्टंटने काय रेशो ठेवलेला आहे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावी. सभापती महोदय, टाईम पिरियड हा खूप महत्वाचा आहे. 87 हजार हरकती व सूचना आलेल्या आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते म्हणाले की, या बाबतीत लवकर निर्णय घेतला गेला नाही तर पुणे शहराचा बकालपणा वाढत जाईल. काही डिलींग काही अंडर डिलींग, काही ट्रान्सफर, काही सेल होत जातील. 87 हजार हरकती व सूचना प्राप्त झालेल्या आहेत त्या संदर्भात सुनावणी घेण्यासाठी समिती नेमली जाणार आहे. या 87 हजार सुनावण्या किती कालावधीत पूर्ण होतील ? ओपन लॅन्ड आणि डेव्हलप लॅन्डचा रेशो काय आहे ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, कलम 30 अन्वये प्रारुप शासनाकडे मंजुरीसाठी यावयाचे आहे, त्याचा कालावधी मार्च, 2014 पर्यंत आहे. मार्च, 2014 मध्ये सदर प्रारुप शासनाकडे आल्यानंतर सहा महिन्यात झाले तर ठीक आहे, नाही तर अजून सहा महिने मुदतवाढ दिली जाते. मार्च, 2014 नंतर हे पूर्ण करावयाचे आहे. 15 मार्च, 2015 पर्यंत कोणत्याही परिस्थितीत 87 हजार हरकती व सूचना आलेल्या आहेत, त्यावर निर्णय घेण्याची कार्यवाही शासनाला करावीच लागेल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य ॲड.शेलार यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे, त्याची सध्या माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. सदर माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल.

3....



ABG/ KTG/ D/ प्रथम श्री.शिगम 10:10

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा प्लॅन 2007 मध्ये पूर्ण व्हावयास पाहिजे होता. माननीय राज्यमंत्री महोदय हे मार्च, 2015 ची भाषा करीत आहेत. मार्च, 2015 पर्यंत पुणे शहराची खूपच वाट लागेल. शासनाला प्रोसेस कमी करण्यासंबंधी कायद्याने अधिकार दिलेले आहेत. पुन्हा आपण वर करणारच आहात. मुळात खाली ज्यांनी घोटाळे केले याबाबतची तुम्हाला माहिती आहे...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 1.... श्री.विनोद तावडे....

पुन्हा तेच तेच उगाळत न बसता 8 ते 10 महिन्यांचा कालावधीत 87 हजार हरकतींबाबत हिअरिंग घ्यायचे आहे ते काम थेट राज्य स्तरावर केले तर हा कालावधी टाळता येईल आणि पुणे शहर सुध्दा अडचणीतून बाहेर येईल. त्याप्रमाणे शासनाकडून ॲक्शन घेण्यात येईल काय?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, या संदर्भात महानगरपालिकेने मार्च, 2015 पर्यंत शासनाकडे प्रस्ताव पाठवावयाचा आहे, त्यापूर्वी लवकरात लवकर तो प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना शासनाकडून पुणे महापालिकेला दिल्या जातील.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहराच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. प्रशासनाने जो विकास आराखडा तयार केला त्या संदर्भात जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. नकाशे व इतर तांत्रिक बाबी या कोणत्याही नागरिकांना समजू नयेत, त्या संदर्भात कोणी हरकत घेऊ नये अशा पध्दतीने विकास आराखड्याचे प्रारुप जाहीर करण्यात आले होते. हरकती व सूचना दाखल करण्यासाठी फक्त 30 दिवसांची मुदत देण्यात आली होती.

सभापती महोदय, मी राज्याच्या लोकप्रिय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. पुण्यातील लोकप्रतिनिधींनी त्यांची भेट घेऊन विकास आराखड्यातील त्रुटी निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी हरकती दाखल करण्यास 60 दिवसांपर्यंत मुदत वाढवून दिली. त्यामुळे पुण्यातील नागरिक, एनजीओ, सर्व राजकीय पक्षांचे कार्यकर्ते यांना हरकती नोंदविणे शक्य झाले. पुणेकरांच्या भावी पिढीच्या दृष्टीने हा विकास आराखडा अतिशय महत्वाचा असून यामध्ये अनेक आरक्षणे वगळली गेली आहेत, अनेक क्रीडांगणांची आरक्षणे वगळली गेली आहेत. पुणे शहराच्या इतिहासात असा विकास आराखडा तयार झाला नव्हता. माननीय मुख्यमंत्र्यांनी मुदत वाढवून दिल्यामुळे पुणेकरांना हायसे वाटले आहे.

सभापती महोदय, राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी सांगितले की, महापालिकेची महासभा निर्णय घेईल, नियोजन समिती गठीत केली जाईल त्यानंतर शासनाकडे प्रस्ताव आल्यानंतर शासन स्तरावर निर्णय घेतला जाईल. आज अशी स्थिती राहिलेली नाही. ज्याप्रमाणे 1987 मध्ये शासनाने पुणे शहराचा विकास आराखडा तयार केला होता त्याच पध्दतीने शासनाने या प्रकरणात हस्तक्षेप करावा. एमआरटीपी ॲक्टप्रमाणे विकास आराखडा करणे शक्य नसेल तर बीपीएमसी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 1.... श्री.मोहन जोशी....

ॲक्टप्रमाणे महापालिकेने मंजूर केलेला एखादा ठराव जनतेच्या हिताच्या विरोधात असेल तर शासनाला त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार आहे, त्या अधिकाराचा उपयोग करुन बीपीएमसी ॲक्टनुसार शासनाकडे प्रस्ताव प्राप्त करुन त्यात सुधारणा केली जाईल काय?

सभापती महोदय, पुणे शहरामध्ये ज्यावेळी नवीन गावांचा समावेश करण्यात आला त्यावेळी त्या गावांसाठी प्रारुप विकास आराखडा तयार झाला होता. पुणे शहरामध्ये तीन प्रारुप विकास आराखडे तयार झालेले आहेत. पुणे विकास आराखड्यांतर्गत टेकड्यांवरील आरक्षणे उठविण्यात आली आहेत. म्हणून बीपीएमसी ॲक्टनुसार शासन पुणे शहराचा प्रारुप विकास आराखडा मागवून घेऊन त्यात सुधारणा करणार आहे काय?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांशी या संदर्भात चर्चा करुन हा विकास आराखडा लवकरात लवकर कशा पध्दतीने मंजूर करता येईल या दृष्टीने पावले उचलली जातील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहामध्ये विभागाचे मंत्री हे शासनाच्या वतीने अधिकृतपणे उत्तर देत असतात. नगरविकास विभागाचा कार्यभार माननीय मुख्यमंत्र्यांकडे असल्यामुळे तातडीने निर्णय जाहीर करणे योग्य होणार नाही हे मला मान्य आहे. म्हणून माझी विनंती आहे की, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आणि माननीय मुख्यमंत्र्यांना शक्य होईल त्यावेळी ही लक्षवेधी सूचना पुन्हा चर्चेला घेण्यात यावी.

नंतर इ.1...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे तसेच सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा केली जाईल. वेळ पडल्यास पुण्याच्या डीपी संदर्भात माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्र्यांबरोबर एक बैठक लावून हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावला जाईल.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :मुंबई महानगरपालिकेने सन 2012-2013 या वर्षात पूर्व उपनगरातील रोडच्या कामांची निविदा उशिराने काढणे

**मु. शी.** :मुंबई महानगरपालिकेने सन 2012-2013 या वर्षात पूर्व उपनगरातील रोडच्या कामांची निविदा उशिराने काढणे यासंबंधी सर्वश्री चरणसिंग सप्रा, विनायक मेटे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चरणसिंग सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई महानगरपालिकेने मागील २०१२-१३ या वर्षात पूर्व उपनगरातील रोडच्या कामांची निविदा उशीराने काढणे, निविदेच्या प्रक्रियेत दोन कंत्राटदारांचे वाद निर्माण झाल्याने या निविदेला देण्यात आलेली स्थगिती, त्यामुळे पूर्व उपनगरातील रोडची कामे न होणे, परिणामी पूर्व उपनगरातील रोडवर सर्वत्र खड्डे पडलेले असून रोडची अवस्था अतिशय दयनीय झाली असणे, त्यामुळे नागरीकांची मोठ्या प्रमाणात होत असलेली गैरसोय, पालिका शासनाविरोधात जनमानसांत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. उदय सामंत ( नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेचा विषय अतिशय महत्वाचा आहे. जेव्हा केव्हा मुंबईत उपक्रम राबविले जातात त्यावेळेस नेहमी पूर्व उपनगराला वगळून पश्चिम उपनगराचे प्रथम नियोजन केले जाते. पूर्वी सुध्दा अशाच प्रकारे कामे झालेली आहेत. जेव्हा महानगरपालिकेच्या हॉस्पिटलची दुरुस्ती करण्याचा विषय निघाला होता त्यावेळेस पाच वर्षे अगोदर कुपर हॉस्पिटलची निवड करण्यात आली होती. पूर्व उपनगरमधील राजावाडी आणि एमटी अग्रवाल या हॉस्पिटलची अवस्था दयनीय असतांना सुध्दा त्यांना त्यामधून वगळण्यात आले होते. तसेच रस्त्यांच्या कामाच्या संदर्भातही तशीच परिस्थिती आहे. सन 2012-2013 या वर्षामध्ये रस्त्याची जी निविदा मागविण्यात आली होती त्यामध्ये सुध्दा पश्चिम उपनगराची निविदा पहिल्यांदा मागविण्यात आली,नंतर शहराची मागविण्यात आली परंतु पूर्व उपनगराची निविदा मागविण्याचे राहूनच गेले. पूर्व उपनगरात जी निविदा काढण्यात आली होती त्याबाबत उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "सदर निविदा एप्रिल महिन्यात काढण्यात आली आहे."

सभापती महोदय, खरे म्हणजे पूर्व उपनगराची निविदा नोव्हेंबर, डिसेंबर या महिन्यात काढण्यात येणार आहे. एका ठेकेदाराला काम दिल्यानंतर दुसरा ठेकेदार या कामाच्या संदर्भात कोर्टात गेला व त्याने 16 एप्रिल रोजी कोर्टाकडून स्थगिती आणली. दि. 16 एप्रिल रोजी स्थगिती मिळाल्यानंतर 3 महिन्यानंतरही महानगरपालिकेला जाग आली नाही. 3 महिन्यानंतर 19 जुलैला म्हणजे 10 दिवस अगोदर, भर पावसात जो एल टू ठेकेदार आहे त्याला काम दिले जावे असा निर्णय घेण्यात आला. एक तर निविदा उशिरा काढण्यात आल्यानंतर जुलै महिन्यात, भर पावसात एल टू ला काम देण्याचा निर्णय घेण्यात आला तो चुकीचा आहे. खरे म्हणजे पावसाळयात काम सुरु होऊ शकत नाही त्यामुळे एल टू ला जे काम देण्यात आले ते चुकीचे आहे.

सभापती महोदय, ऑक्टोबर महिन्याशिवाय या कामाला सुरुवात होऊ शकणार नाही म्हणून माझे असे म्हणणे आहे की, महानगरपालिकेने यासंदर्भात फेर निविदा काढावी किंवा फेर निविदा काढून जे ठेकेदार चांगले काम करतात त्यांना या रस्त्याचे काम दिले जावे. महावीर कंपनी ही एल टू आहे. या महावीर कंपनीने तीन महिन्यापूर्वी पेव्हर ब्लॉकचे काम निकृष्ट पध्दतीने केल्यामुळे तसेच तसेच या कंपनीने खोटे बिले सादर केल्यामुळे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी महावीर

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चरणसिंग सप्रा......

कंपनीला सहा महिन्यासाठी निलंबित केले होते तसेच या कंपनीवर फौजदारी गुन्हेही दाखल करण्यात आलेले आहेत. महावीर कंपनीवर फौजदारी गुन्हे दाखल झालेले असतांनाही त्याच कंपनीला म्हणजे एल टू कंपनीला, भर पावसाळयात जेव्हा कामाला सुरुवात होऊ शकत नाही असे असतांना कसे काय काम देण्यात आले, तसेच या संदर्भात फेर निविदा शासन मागविणार आहे काय ?

सभापती महोदय, पूर्व उपनगरात टेंडर काढले न गेल्यामुळे पूर्व उपनगरात रस्त्यांवर मोठ मोठे अनेक खड्डे पडलेले आहेत. सद्या पूर्ण मुंबईच्या रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. पूर्ण मुंबई खड्डेमय झालेली आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी असून मुंबईमध्ये मोठ मोठया व्यक्ती येत असतात. मागच्या आठवडयात अमेरिकेचे उप राष्ट्रपती तसेच त्यांची पत्नी मुंबईमध्ये आले होते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांना सांगू इच्छितो की, युएसए च्या उप राष्ट्रपती महोदयांशी संबंधित हा विषय नाही. जो मूळ प्रश्न आहे त्या विषयी आपण बोलावे.

श्री.चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, मला निरंजन समजून वेळ द्यावा.

**उप सभापती** : मी येथे कोणाला काहीही समजत नाही. माझ्या समोर सर्व समान आहेत.

श्री.चरणसिंग सप्रा : युएसएच्या उप राष्ट्रपतींच्या पत्नीने जाताना वाहिनीला सांगितले की, "It was a bumpy ride, I have ever seen in my life. Anyhow, it was a nice experience." अशा प्रकारे त्यांनी महापालिकेवर ताशेरे मारलेले आहेत. असे असताना आपण सर्व राज्यकर्ते काय चालले आहे हे बघत आहोत. मुंबईत पडलेल्या खड्डयांमुळे तीन लोकांचा मृत्यू झालेला आहे. तरी देखील आपण सर्वजण येथे मूकपणे बसलेलो आहोत. मी एक वर्षाभरापूर्वीच मुंबई महानगरपालिकेला लिहिले होते की, रोडच्या डिफेक्ट लायबलीटीचा पिरियड वाढवावा. डिफेक्ट लायबिलीटी वाढविण्याचा प्रस्ताव मी एक वर्ष अगोदरच दिला होता. डांबरी रस्त्याचा डिफेक्ट लायबिलीटीचा पिरियड हा 3 वर्षाचा आहे तो पाच वर्षाचा करण्यात यावा आणि सिमेंट कॉंक्रीट रोडचा डिफेक्ट लायबिलीटीचा पिरियड 5 वर्षावरून 10 वर्षे करण्यात यावा. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, शासन किंवा मुंबई महानगरपालिका डांबरी रस्त्यासाठी डिफेक्ट लायबिलीटी पिरियड 3 वर्षावरून 5 वर्षे करणार आहे काय आणि सिमेंट कॉंक्रीट रोडचा लायबिलीटी पिरियए 5 वर्षावरून 10 वर्ष करणार आहे काय ?

सभापती महोदय, मागच्या आठवड्यामध्ये माझा अनुक्रमांक 26 वर तारांकित प्रश्न होता. हा प्रश्न एका विशिष्ट रस्त्यासंबंधी विचारला होता. त्याला उत्तर देण्यात आले होते की, एसजीएस कंपनीनी पाहणी केलेली आहे म्हणून त्या कंत्राटदाराचे बिल थांबविण्यात येत नाही. त्या रोडवर भरपूर खड्डे पडलेले आहेत. एसजीएस कंपनी ही स्वीस कंपनी आहे. ही कंपनी परराष्ट्रीय असेल तर या कंपनीशी देखील कंत्राटदाराचे संगनमत झाले आहे, असा माझा आरोप आहे. ही एसजीएस कंपनी बरोबर निरीक्षण करीत नाही. यासाठी शासनाने आणखी काही उपाययोजना केली आहे काय किंवा शासन एसजीएसला पर्याय शोधणार आहे काय, असा माझा तिसरा प्रश्न आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, पूर्व उपनगरातील रस्त्याच्या संबंधातील अतिशय महत्त्वाची लक्षवेधी सूचना आहे. एक वस्तुस्थिती खरी आहे की, 107 रस्त्यांसाठी 168 कोटी रूपयांची निविदा मागविण्यात आली होती. या कामासाठी दोन निविदा आल्या होत्या. एक जे.कुमार कंपनीची आणि दुसरी महावीर कंपनीची निविदा होती. या टेंडरचे ओपनिंग उप मुख्य अभियंता यांच्याकडे झाले. त्यावेळी काही कालावधी जे.कुमार या कंपनीसाठी देण्यात आला. त्यांच्याच कार्यालयातून ते प्री क्लालीफाईड झाले नाहीत अशा प्रकारचे पत्र देखील दिले होते. हे प्रकरण ॲडिशनल कमिशनर यांच्याकडे गेल्यानंतर त्यांनी त्यांचे कागदपत्र मागवून घेतले. त्यांनी एल-1 व एल-2 कोण आहेत याची छाननी केली. त्यानंतर जे.कुमार कंपनीला पात्र ठरविण्यात आले. या कंपनीला पात्र ठरविल्यामुळे महावीर कंपनी कोर्टामध्ये गेली. कोर्टाने महानगरपालिकेला निर्देश दिले की, चांगल्या पद्धतीने निविदा प्रक्रिया करावी. त्यानंतर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी रि-टेंडरिंग करण्यासंबंधीचा प्रस्ताव ठेवला. महावीर कंपनीची निविदा 12.14 टक्के बिलो होती. या दराने काम करणारी ही कंपनी होती. तसेच असलेले खड्डे देखील भरून देण्याच्या अटीवर महानगरपालिका काम देणार होती. या महावीर कंपनीला अजूनही कुठल्याही प्रकारे 168 कोटी रूपयांचे काम देण्यात आलेले नाही. रि टेंडर झाले तर पुन्हा शासनावर किंवा मुंबई महानगरपालिकेवर बोजा पडू शकतो म्हणून त्यांचे निगोसिएशन सुरू होते. तेव्हा आयुक्तांनी सांगितले की, टेंडर कमिटीने याची छाननी करावी आणि निर्णय घ्यावा. आता टेंडर समितीने छाननी करून ते काम महावीर कंपनीला देता येते काय अशा प्रकारचा प्रस्ताव ॲडिशनल कमिशनरकडे ठेवला आहे. यावर ॲडिशनल कमिशनरनी कुठलाही निर्णय घेतलेला नाही. परंतु, रि टेंडर केले तर तो भार मुंबई महानगरपालिकेवर पडू शकतो याची छाननी करूनच महावीर कंपनीचा तो प्रस्ताव स्थायी समितीकडे नेला जाईल.

...............

यानंतर श्री.अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या लक्षवेधीच्या सूचनेमध्ये जो विषय आहे त्या विषयाच्या अनुषंगाने माननीय उच्च न्यायालयाने फटकारल्याच्या बातम्या सर्व वर्तमानपत्रात पहिल्या पानावर आल्या आहेत. मुंबई शहरामध्ये खड्डे पडण्याची कारणे काय आहेत ? या कामाची निविदा प्रक्रिया उशिराने सुरु करण्यात आली हे कारण सांगण्यात आले. परंतु माझ्या माहिती प्रमाणे या कामाची निविदा प्रक्रिया लवकर म्हणजे दिनांक 31 जानेवारीच्या दरम्यान सुरु झाली. केवळ जे.कुमार या ठेकेदाराला फेव्हर करण्याकरिता यंत्रणा वापरण्यात आली. त्याची निविदा पूर्तता करीत नसताना काही अधिकारी आणि पदाधिकारी यांनी जे.कुमार ठेकेदाराला फायदा होईल यासाठी यंत्रणा वापरली आणि त्या ठेकेदाराला बोगस कागदपत्रांच्या आधारे निविदा दिली. त्यामुळे दुसरी कंपनी त्या विरुध्द न्यायालयात गेली. हे प्रकरण न्यायालयात गेल्यामुळे रस्त्याच्या दुरुस्तीची कामे होऊ शकली नाहीत. माझ्याकडे माननीय उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. तेव्हा या प्रकरणी जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करणार काय ? तसेच जे.कुमार कंपनीला बॅकलिस्ट करणार काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेने प्री-मान्सून म्हणून या कामाची निविदा जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात काढावयास पाहिजे होती ही वस्तुस्थिती खरी आहे. परंतु मुंबई महानगरपालिकेने ही निविदा मे महिन्यात काढली. त्यामुळे रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत ही वस्तुस्थिती खरी आहे. जे.कुमार कंपनीस अपात्र ठरविल्यामुळे महावीर कंपनीस एल-2 म्हणून ठेका मिळावा म्हणून ती कंपनी न्यायालयात गेली. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, या प्रोसीजरमध्ये काही गैरप्रकार झाले. सन्माननीय सदस्यांनी उल्लेखिलेल्या बाबींची चौकशी करण्यात येईल आणि त्यामध्ये तथ्य आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, आपण येथे न्याय प्रविष्ट बाबींवर चर्चा करीत आहोत त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. माझे तीन स्पेसिफीक प्रश्न आहेत. महावीर कंपनीस काम देण्यासाठी टेंडर समितीने रिकमेन्डेशन केले. या कामासाठी तीन निविदा आल्या नसताना या निविदा ओपन कशा केल्या ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

तसेच एल-2 शी निगोशिएशन करण्याचे अधिकार टेंडर समितीला देण्यात आले. त्यास आयुक्तांची परवानगी होती काय ? सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, महावीर कंपनी या कंत्राटदाराला पेव्हर ब्लॉकच्या प्रकरणी काळ्या यादीत टाकण्यात आले होते. महोदय, मी गेल्या अधिवेशनात या विषयी नियम 93 अन्वयेची सूचना दिली होती. त्यावर शासनाने असे निवेदन केले होते की, महावीर कंपनीने नवी मुंबईमध्ये जे काम केले त्याबाबत त्यांनी बोगस प्रमाणपत्र सादर केले होते. त्यामुळे त्यांच्यावर क्रिमीनल केस दाखल करण्यात आली होती. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, ज्यांच्यावर क्रिमीनल केस दाखल करण्यात आली किंबहुना ज्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले होते त्या कंत्राटदाराला सजेस्ट केल्यामुळे टेंडर कमिटीवर आपण कारवाई करणार काय ? तसेच एसजीएस कन्सल्टंट यांना विना टेंडर कन्सलटंट नेमले. वास्तविक पाहता असीम गुप्ता यांनी टेंडर कमिटीला त्यांचे नाव रिकमेंड केले होते. त्यांनी टेंडर कमिटीसाठी कन्सलटंट सुध्दा बेकायदेशीरपणे नियुक्त केला. यातील तिसरा ठेकेदार सुध्दा काळ्या यादीतील आहेत. या तिन्ही गोष्टी अतिरिक्त आयुक्त श्री.असिम गुप्ता यांच्या शिफारशीमुळे झाल्या असल्यामुळे आपण त्याची चौकशी करणार काय ? तसेच अशा पध्दतीची कामे टेंडर कंडीशनमध्ये व्हायलेशन करुन जे अधिकारी करतात त्याचा मुंबईकरांना सामना करावा लागतो. त्यामुळे या बाबतची विशेष चौकशी पथकामार्फत चौकशी करणार काय ?

श्री.उदय सामंत : महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन टेंडर्सबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी सांगू इच्छितो की, या प्रकरणी दोन टेंडर्स आले होते. महानगरपालिकेमध्ये दोन टेंडर आले तर त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार उपायुक्तांना असतात. त्यानुसार त्यांनी निर्णय घेतला होता. एल-1 आणि एल-2 करण्याचे अधिकार किंवा ते परत समितीकडे पाठविण्याचे अधिकार आयुक्तांना असल्यामुळे त्यांच्या सूचनेनुसार एल-1 आणि एल-2 करताना अशा प्रकारचा निर्णय झाला आहे. महावीर कंपनीला पेव्हर ब्लॉक प्रकरणी सहा महिन्यांसाठी डी-बार करण्यात आले आहे. त्या निर्णयाविरोधात त्या कंपनीने उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाने कडक सूचना दिली की, या प्रकरणी जो पर्यंत पोलीस तपास होत नाही आणि पोलीस या कंपनीवर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत....

एखादी जबाबदारी फिक्स करीत नाही तो पर्यंत अशा प्रकारचा निर्णय घेणे उचित होणार नाही. मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महावीर कंपनीचा टेंडर समितीमध्ये अंतर्भाव झाला आहे. त्यांना कन्सलटंट म्हणून नेमण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा आणि ॲड.आशिष शेलार यांनी ज्या तक्रारी केल्या आहेत त्या तपासून पाहिल्या जातील. तपासणीनंतर त्यात तथ्य आढळून आले तर त्याची चौकशी केली जाईल. चौकशीमध्ये कोणी दोषी आढळून आले तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

**उप सभापती** : आताच माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांनी सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर दिलेले आहे. या निमित्ताने मी निदर्शनास आणून देतो की, रस्ते, कोर्ट आणि प्रशासन यामध्ये सर्वसामान्य जनता भरडली जाते. या निमित्ताने प्रश्न पडतो की, शासन असो वा प्रशासन असो ते कोर्ट चालविते की काय ? शासन किंवा प्रशासन ठेकेदारांसमोर झुकते म्हणून न्यायालयाला हस्तक्षेप करण्याची वेळ येते. या बाबत आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे.

मी आता जी बाब निदर्शनास आणून देतो ती माननीय राज्यमंत्र्यांच्या विभागाशी संबंधित नाही. ठाणे-मुंब्रा बायपासचे काम अटलांटा कंपनीने केले आहे. या पूर्वी देखील त्याच कंपनीच्या हलगर्जीपणामुळे एक अपघात झाला होता. त्यामध्ये बरीच माणसे दगावली होती. त्यावेळी आम्ही निदर्शनास आणून दिले होते की, त्या कंपनीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे त्या कंपनीला काळ्या यादीत टाकावे. परंतु आमची मागणी मान्य झाली नाही. आज त्या रस्त्याला पुन्हा भेग पडली आहे. अशा प्रकारच्या तक्रारी दर पावसाळ्यात होतात. हा विषय आपल्या विभागाशी संबंधित नसला तरी, अटलांटा कंत्राटदाराच्या बाबतीत मी शासनास स्पष्ट निर्देश देतो की, या कंपनीला ताबडतोब काळ्या यादीमध्ये टाकावे.

या लक्षवेधी सूचनेमध्ये दोन ठेकेदारांच्या बाबतीत उल्लेख आहे. महापालिका ही कंत्राटदार चालवितात की प्रशासन चालविते हा प्रश्न मला या निमित्ताने पडतो. लाखो मुंबईकर या रस्त्यांवरुन ये-जा करतात. त्यांची एवढी अवहेलना होत असेल तर त्या बाबत गंभीर दखल घेतली पाहिजे. मी आताच प्रशासनावर बोलणार नाही. परंतु या ठिकाणी जे.कुमार असो की महावीर कंपनी असो, जनतेचा पैसा घेऊन ते जर योग्य प्रकारे काम करणार नसतील किंवा दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे.

नंतर श्री.बरवड....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ...

कारण शेवटी मेरिटवर काम करणारे देखील लोक आहेत. त्या ठिकाणी जे रॅकेट काम करते त्यामध्ये प्रशासनाचे हात असतात, हे बरोबर नाही. या गोष्टीमध्ये कोठे तरी गांभीर्याने लक्ष घातले पाहिजे. हे जे 2 कंत्राटदार आहेत, ज्यांचा या ठिकाणी नामनिर्देश करण्यात आलेला आहे, त्या दोघांना काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करणार का हे मी आपल्याला सुस्पष्टपणे विचारत आहे.

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, जे.कुमार कंपनी किंवा महावीर कंपनी असेल ते जर मुंबईच्या लोकांच्या विरोधात काही गोष्टी करीत असतील तर त्याची सखोल चौकशी करण्यात येईल आणि वेळ पडल्यास चौकशीअंती जर काही गोष्टी निदर्शनास आल्या तर महापालिकेचे टेंडर रिटेंडर केले जाईल. डिफेक्ट लायबिलिटीचा मुद्दा महानगरपालिकेला सांगितलेला आहे. तो प्रस्ताव स्टँडींग टेक्निकल कमिटीसमोर ठेवला जाईल आणि आवश्यकता वाटल्यास त्या बाबतील देखील कारवाई केली जाईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे सांगितले ते किती दिवसात होणार ? कारण मुंबईच्या रस्त्यावरुन चालतांना नागरिकांना होणार त्रास, वाहनांना होणारा त्रास, लोकांमध्ये वाढलेले आजार, या सगळ्यामध्ये मुंबई महानगरपालिकेचे प्रशासन आणि त्या ठिकाणी बसलेली मंडळी दोषी आहेत, असे आपल्याला वाटत नाही का ? तसे आढळून आले तर ही महापालिका बरखास्त करणार का ?

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, मी मघाशी देखील सांगितले की, मुंबई महानगरपालिकेने काही कामे प्री-मान्सून वर्क म्हणून काढावयास पाहिजे होती आणि ती कामे फेब्रुवारीमध्येच काढावयास हवी होती. महापालिकेने ही कामे मे महिन्यामध्ये सुरु केल्यामुळे मुंबईकर जनतेला त्रास सोसावा लागतो. काही प्री-मान्सून कामे सुरु झाली असती तर मुंबईकरांना हा त्रास भोगावा लागला नसता आणि हायकोर्टाला देखील यामध्ये हस्तक्षेप करण्याची वेळ आली नसती. परंतु भविष्यामध्ये महानगरपालिका अशा पध्दतीने काम करु नये अशा स्पष्ट सूचना शासनाकडून महानगरपालिकेला दिल्या जातील.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेकरिता खुल्या प्रवर्गाच्या महिला उमेदवारांना 5 वर्षाची तसेच मागासवर्गीय महिला उमेदवारांना वयोमर्यादेत 10 वर्षाची सूट देण्याची होत असलेली मागणी

**मु.शी.** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेकरिता खुल्या प्रवर्गाच्या महिला उमेदवारांना 5 वर्षाची तसेच मागासवर्गीय महिला उमेदवारांना वयोमर्यादेत 10 वर्षाची सूट देण्याची होत असलेली मागणी यासंबंधी श्री. विनायक मेटे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विनायक मेटे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेकरिता राज्यात खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता असलेल्या 33 वर्षे वयोमर्यादेत त्यांना परीक्षा देणे शक्य होत नसल्यामुळे, या परीक्षेकरिता 30 टक्के आरक्षण देवून सुध्दा योग्य त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न होणे, मध्यप्रदेश व छत्तीसगड या राज्यांत राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देणाऱ्या महिला उमेदवारांना 10 वर्षाची सुट देण्यात येणे, राजस्थान व हरियाणा तसेच गुजरात या राज्यात देखील खुल्या प्रवर्गातील महिलांना 5 वर्षाची सूट देण्यात येणे, या सर्वबाबी विचारात घेऊन महाराष्ट्रातील महिला उमेदवारांची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने, खुल्या प्रवर्गाच्या महिलांना 5 वर्षाची तसेच मागासवर्गीय महिला उमेदवारांना 10 वर्षाची सूट देण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, ही अतिशय महत्वाची लक्षवेधी सूचना आहे. या पुरोगामी राज्याने जे महिला धोरण राबविण्यास सुरुवात केलेली आहे त्यालाच थोड्याफार प्रमाणात हरताळ फासण्याचे काम आपल्या शासनाच्या खात्याकडून होते ही दुर्दैवाची बाब आहे. आपले राज्य प्रगत आहे असे आपण म्हणतो आणि या प्रगत राज्यामध्ये महिलांना संधी देण्याकरिता आपण नोकरीमध्ये जे रिझर्वेशन ठेवलेले आहे यामध्ये मात्र त्यांच्यावर वयाच्या बाबतीत अन्याय केलेला आहे. या बाबतीत इतर राज्यांमध्ये मात्र त्यांनी आपल्यापेक्षा किती तरी चांगली भूमिका घेतलेली आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, आम्हाला माहिती घ्यावी लागेल. मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, हरियाणा, गुजरात या राज्यांच्या लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये महिला उमेदवारांना वयामध्ये सूट असल्याचा उल्लेख निवेदनामध्ये केला आहे परंतु या बाबतची माहिती घ्यावी लागेल आणि अभ्यास करावा लागेल असे म्हटले आहे. लहान मुलगा जरी नेटवर गेला तरी ताबडतोब एका मिनिटामध्ये त्याला माहिती मिळते. एवढ्या मोठ्या शासनाला माहिती मिळू शकत नाही का ? माझ्याकडे पूर्ण आकडेवारी आहे.

मी नेटवरुन गुजरात, हरियाणा, मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान या सर्व राज्यांची माहिती घेतलेली आहे. मध्यप्रदेशमध्ये आपल्यापेक्षा 10 वर्षाने जास्त म्हणजे 43 वर्षे वयोमर्यादा आहे. छत्तीसगडमध्ये 43 वर्षाची वयोमर्यादा आहे. राजस्थानमध्ये 38 वर्षाची वयोमर्यादा आहे. गुजरातमध्ये 38 वर्षाची वयोमर्यादा आहे, हरियाणामध्ये 38 वर्षाची वयोमर्यादा आहे. आपल्या पुरोगामी राज्यामध्ये 33 वर्षाची वयोमर्यादा ठेऊन महिलांवर अन्याय करण्याचे काम शासनाने चालविले आहे. या परिणाम म्हणून अनेक ठिकाणी महिलांना संधी मिळत नाही. गेल्या वर्षी एमपीएससीच्या परीक्षेमध्ये फक्त 8 टक्के महिला पास झालेल्या आहेत. याची आकडेवारी निवेदनामध्ये दिलेली आहे. श्री. येडेकर नावाचे एमपीएससीचे जे सदस्य आहेत

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

त्या महोदयांनी स्वत:ची बुध्दी वापरुन प्रत्येक विषयांमध्ये 45 गुण मिळाले तरच उमेदवार उत्तीर्ण होतील, अन्यथा अनुत्तीर्ण होतील असा जगामध्ये कोठेही नसलेला अजब शोध लावलेला आहे. त्यामुळे महिलांची भरती होण्याचे प्रमाण 8 टक्क्यांवर आलेले आहे. हे राज्य पुरोगामी आहे हे लक्षात घेऊन किमान शासन या वयोमर्यादेमध्ये 5 वर्षांनी वाढ करणार आहे काय ? तसेच एमपीएससीच्या त्या महाराजांनी लावलेल्या शोधामुळे महिलांना नोकऱ्यांमध्ये संधी मिळत नसल्यामुळे त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करणारे श्री.येडेकर महाशय आहेत. त्यामुळे त्यांना तत्काळ सदस्य पदावरुन निलंबित केले जाईल काय ? तसेच एकूण गुण 45 करणार काय ?

माझ्याकडे महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाचे दोन जी.आर.आहेत. 1997 व 2001 चे हे जी.आर.आहेत. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "जर महिला उमेदवार मिळाल्या नाहीत तर त्या जागा पुरुषवर्गामध्ये वर्ग कराव्यात." हा तर महिलांवरील प्रचंड अन्याय आहे. महिलांच्या जागांवर महिलांचीच भरती केली पाहिजे. त्या जागांवर पुरुषांना घेता कामा नये अशा प्रकारचे धोरण शासन स्वीकारील काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, 1997 पासून शासनाने शासकीय, निमशासकीय व अनुदानित संस्थांमध्ये महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ठेवलेले आहे. याच पध्दतीने एमपीएससीने धोरण अवलंबिलेले आहे. महिलांसाठी 30 टक्के जागा आरक्षित ठेवून महिलांना सक्षम करण्यासाठी हे शासन कटिबध्द आहे. महिलांच्या भरतीचे प्रमाण 8 टक्के आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. परंतु 2010 मध्ये 30.95 टक्के जागा महिलांना मिळाल्या आहेत. सन 2011-12 मध्ये 32.06 टक्के महिलांची भरती झाली होती, सन 2012 मध्ये 376 पदांपैकी 110 पदे महिलांसाठी आरक्षित होत्या. त्यासाठी 65,524 महिलांकडून अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी 6093 उमेदवार उत्तीर्ण झाले होते. त्यामध्ये 1470 महिला उमेदवार होत्या. येथपर्यंत हे प्रमाण बरोबर होते. मात्र मुख्य परीक्षेमध्ये केवळ 35 महिला उत्तीर्ण झाल्या. त्याचे प्रमाण 9.30 टक्के आहे. याचे कारण वयाशी संबंधित नाही. याचे कारण सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नामध्येच दडलेले आहे. आजपर्यंतच्या परीक्षा पध्दतीनुसार पूर्व परीक्षेत छाननी होत होती. त्यानंतर मुख्य परीक्षेमध्ये

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

प्रा.फौजिया खान......

उत्तीर्ण होतील त्यांच्या मेरिटप्रमाणे कटऑफ लिस्ट तयार केली जात होती. त्यामध्ये अडचण आली नाही.

सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले खरे आहे. परंतु प्रशासनामध्ये दर्जावाढ व्हावी, चांगले अधिकारी यावेत या हेतूने एमपीएससीने नवीन प्रयोग केला. प्रत्येक पेपरमध्ये 45 गुण मिळाले पाहिजेत असा नवीन नियम केला. त्याचबरोबर प्रश्नांची लेव्हलसुध्दा वाढविली आहे. तसेच नकारात्मक गुणांची पध्दत 4 : 1 असे गुण कापले जात होते. म्हणजे 4 चुका झाल्यावर 1 गुण कापला जात होता. आता 3 चुका झाल्यास 1 गुण कापला जात आहे. असा बदल करण्यात आलेला आहे. त्यामुळे महिलांचे भरतीचे प्रमाण कमी झालेले आहे. या मुख्य कारणामुळे आज तफावत दिसत आहे. एमपीएससीला शासनामार्फत निर्देश देण्यात येतील की, त्यांनी ताबडतोब पूर्वीची परीक्षा प्रक्रिया राबवावी.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 10:50

प्रा. फौजिया खान...

पूर्वीच्या पध्दतीप्रमाणे महिलांना 30 टक्के आरक्षण मिळत होते.

सन्माननीय सदस्यांनी वयाच्या संदर्भात प्रश्न विचारला. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी 33 वर्षे ही वयामर्यादा आहे. त्यांच्यासाठी 19 ते 33 वर्षे हा स्पॅन आहे. मागासवर्गीयांसाठी 19 ते 38 वर्षे असा स्पॅन आहे. शासकीय सेवेतील निवृत्तीचे वय 58 वर्षे आहे. त्यामुळे निदान 25 वर्षे तरी शासकीय सेवा करता आली पाहिजे. मागासवर्गीयांसाठी हा कालावधी 20 वर्षाचा आहे. त्यामुळे वय वाढविणे योग्य होणार नाही. जेव्हा या बाबतीत विश्लेषण करण्यात आले त्यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसणा-या महिलांचे सरासरी वय 25 वर्षे आणि पुरुषांचे सरासरी वय 26 वर्षे असल्याचे दिसून आले आणि ज्यांना रेकमेण्ड करण्यात आले त्यांचे सरासरी वय 28 वर्षे असल्याचे आढळून आले. त्यामुळे शासकीय सेवेत येण्यासाठी वयाची अडचण नाही. जुन्या परीक्षा पध्दतीमुळे अडचण निर्माण झालेली आहे. वय वाढविणे योग्य होणार नाही.

या ठिकाणी समांतर आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. समांतर आरक्षणाच्या पदांमध्ये त्या संवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर तो दुस-या संवर्गातून घेता येतो. आपल्या राज्यामध्ये समांतर आणि व्हर्टिकल असे 75 टक्के आरक्षण आहे. आपण या प्रमाणे निर्णय घेतला तर मोठी अडचण निर्माण होईल. यामुळे बॅकलॉग वाढेल, रिक्त पदांची संख्या वाढेल आणि त्याचा परिणाम प्रशासनावर होईल. आपण पूर्वीची परीक्षा पध्दती ठेवली तर कोणतीही अडचण येणार नाही.

डॉ. नीलम गो-हे : पूर्वीच्या परीक्षा पध्दतीची शिफारस करण्याचे शासनाने ठरविलेले आहे. परंतु गेल्या वर्षी ज्या मुलींची संधी हुकली त्याचे काय ? त्या मुलींची वयोमर्यादा उलटून गेलेली असल्यामुळे त्यांची संधी हुकलेली आहे. त्यामुळे त्या मुलींच्या बाबतीत शासन कोणता निर्णय घेणार आहे ? जेव्हा अधिकारी वर्ग अशा प्रकारे धोरणात्मक निर्णय घेतात त्यावेळी त्याचा वरिष्ठ अधिका-यांमार्फत आणि मंत्र्यामार्फत अभ्यास केला जात नाही काय ? मागील परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या, वेबसाईट क्रॅश झाली होती. व्हास्ट इंडिया या कंपनी मार्फत परीक्षा यंत्रणा राबविली गेली होती. याबाबतीत काय कारवाई केलेली आहे ? वय वाढविल्यामुळे अधिकाधिक महिलांना नोकरीच्या संधी मिळू शकतात हे महिला धोरणामध्ये नमूद केलेले आहे. तेव्हा याबाबतीत मंत्री महोदय सकारात्मक निर्णय घेतील काय ?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : मी सांगितले की, परीक्षेला बसलेल्या महिलांचे सरासरी वय 25 आहे. मोठ्या प्रमाणात महिला परीक्षेला बसत आहेत. तसेच महिला कोणत्याही बाबतीत कमी नाहीत. दहावी, बारावी आणि उच्च शिक्षणामध्ये महिला चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होत आहेत. महिला मेरिटोरियस आहेत. त्यांना फक्त प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसणा-या महिला उमेदवारांमध्ये गडचिरोली, धुळे, नंदूरबार या जिल्ह्यातील महिलांचे प्रमाण कमी असल्यामुळे त्यांना समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्याची योजना आखणे आवश्यक आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ MMP/ KTG/ D/ प्रथम श्री.देवदत्त 10:55

प्रा.फौजिया खान....

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "व्हास्ट इंडिया" कंपनी विरुध्द कोणती ॲक्शन घेण्यात आली असा प्रश्न विचारला आहे. त्या बाबतीत मी सांगू इच्छिते की, या कंपनी विरुध्द एफआयआर नोंदविला आहे. तसेच संबंधितांना अटक सुध्दा करण्यात झालेली आहे. या कंपनीकडून भविष्यात काम करुन घेतले जाणार नाही.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी चार महत्वाचे प्रश्न उपस्थित केले होते. त्यातील अर्ध्या प्रश्नांची उत्तरे दिली त्याबद्दल माननीय राज्य मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. माझे इतर प्रश्नाच्या बाबतीत उत्तर दिले गेले नाही. माझ्या प्रश्नांना त्यांनी पूर्णपणे उत्तर द्यावे. परंतु या ठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदयांनी एक विधान या ठिकाणी केले, ते विधान माझ्या दृष्टीने अतिशय गंभीर आहे. महिलांकरिता ज्या राखीव जागा ठेवलेल्या आहेत, त्या जागेसाठी महिला उमेदवार मिळाल्या नाहीत तर त्या जागा पुरुषांना दिल्या जातात. त्या जागा पुरुषांना देणे बंद केले तर मोठा गजहब निर्माण होऊ शकतो अशा प्रकारचे ते वाक्य आहे. याचा अर्थ असा होतो की, तुम्ही महिला धोरणाला हरताळच फासता आहात. तुम्ही महिला धोरणाच्या विरोधात वागता आहात, महिलांच्या विरोधात तुम्ही वागता आहात असा त्याचा सरळ सरळ अर्थ होतो. महिलांना ज्या राखीव जागा दिलेल्या आहेत. त्या जागा पुरुषांना देण्यामध्ये कोणती मोठी गंभीर समस्या निर्माण होऊ लागलेली आहे.

माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, महिला व बालकल्याण विभागाचा याबाबतीत 1997 व 2001 चा जी.आर.आहे. त्यातील विषय असा आहे की, महिला उमेदवार मिळाल्या नाहीत तर त्या जागा पुरुष या प्रवर्गात वर्ग कराव्यात. या बाबतीत काही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असेल तो तुम्ही घेऊ शकता. परंतु शासनाने 1997 व 2001 चा महिला बालविकास विभागाचा जी.आर.तातडीने रद्द करण्यात येईल काय ? आपल्याकडे साक्षरतेचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले आहे. तसे इतर राज्यातही साक्षरतेचे प्रमाण वाढलेले आहे. इतर राज्यात साक्षरतेचे प्रमाण 70 टक्के, 65 टक्के आहे. विद्यार्थिनींना वय वाढवून देण्याचे काम त्या त्या राज्य सरकारने केलेले आहे. तेथील विद्यार्थिनींना अधिकची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे. तशा प्रकारचा राज्य शासन निर्णय का घेत नाही ? महिला उमेदवारांसाठी पाच-दहा वर्षे वयोमर्यादा न वाढविता किमान 33 वर्षाऐवजी 35 वर्षे वयोमर्यादा ठेवण्याचा निर्णय घेण्यात येईल काय, तसेच महिला व बालविकास विभागाचे मी उल्लेखित केलेले जी.आर.रद्द करण्यात येतील काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. या ठिकाणी ज्या जी.आर.चा उल्लेख केला गेला, त्याबाबतीतही उत्तर दिलेले आहे. महिलांचेच आरक्षण समांतर नाही. अनेक दुसरे आरक्षण देखील समांतर आहे. आपण एका आरक्षणाच्या बाबतीत निर्णय घ्यावयाचे ठरविले तर उचित होणार नाही. या बाबतचा समावेश महिला धोरणात केलेला आहे. महिला धोरण लवकरच मंत्रिमंडळासमोर चर्चेला येणार आहे. प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यां करण्यासाठी त्या पदाचा दर्जा टिकविणे गरजेचे आहे. चांगले प्रशासन चालावे यासाठी दर्जा टिकविणे हे अतिशय महत्वाचे काम आहे. (अडथळा) कृपया सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्णपणे ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्य ज्या पध्दतीने माझ्या उत्तरात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत ते बरोबर नाही असे मला वाटते. सभापती महोदय, मला आपण संरक्षण द्यावे. या प्रश्नाच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री जे उत्तर देणार आहेत, तशाच प्रकारचे उत्तर मी देत आहे. या बाबतीत माननीय मुख्यमंत्री यांची जशी भूमिका आहे, तशीच भूमिका मी या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. या खात्याची मी राज्यमंत्री असल्याकारणानेच सभागृहात सदर प्रश्नांची उत्तरे देत आहे.

हा प्रश्न विचारण्यामागचा सन्माननीय सदस्यांचा हेतू असा आहे की, महिलांना 30 टक्के आरक्षण मिळाले पाहिजे. या बाबतीत मुख्य अडचणी काय येतात आणि त्या कशा पध्दतीने सोडवावयाच्या आहेत या बाबतीतील माहिती मी या ठिकाणी दिलेली आहे. लोकसेवा आयोगाला निर्णय घेण्याचा संविधानिक अधिकार असला तरी सुध्दा शासनातर्फे लोकसेवा आयोगाला शिफारस करण्यात येईल. आजपर्यंत जुन्या पध्दतीने 30 टक्के आरक्षण महिलांना प्राप्त झालेले आहे. त्याप्रमाणे आता सुध्दा महिलांना आरक्षण प्राप्त होऊ शकते. मुख्य हेतू असा आहे की, महिलांना आरक्षण मिळाले पाहिजे. त्याप्रमाणे शिफारस करण्यात येईल.

--

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : 1995 पूर्वीच्या अधिकृत झोपड्यांच्या खरेदी-विक्रीस मान्यता देणे

**मु. शी.** : 1995 पूर्वीच्या अधिकृत झोपड्यांच्या खरेदी-विक्रीस मान्यता देणे यासंबंधी श्री.रामदास कदम,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईमध्ये सन १९९५ पूर्वीपासून स्लम भागामधील असलेल्या अधिकृत झोपड्या, सन १९९५ नंतर अशा गरजू झोपडपट्टी धारकांनी अन्य गरजूंना त्याची झोपडी विकणे, मात्र झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये अशा सन १९९५ पूर्वीच्या झोपड्या अपात्र ठरविणे, या बाबत सभागृहामध्ये मुख्यमंत्र्यांनी अशा झोपडीधारकांना न्याय मिळवून देण्याचे दिलेले आश्वासन तथापि, त्याची अंमलबजावणी अद्यापपर्यंत झाली नसणे, त्यामुळे झोपडपट्टी वासियांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये सुधारणा करु इच्छितो. निवेदनाच्या शेवटी "या संदर्भात कलम 37(2) खाली अधिसूचना काढण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल." असे वाचावे.

लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 4.....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, 1995 च्या अधिकृत झोपड्या काही गरजू लोकांनी विकल्या, त्या झोपड्यांच्या मालकीबाबतचा हा प्रश्न आहे. निवेदनामध्ये म्हटले आहे की, ॲडव्होकेट जनरल आणि विधि तज्ज्ञांचे मत असे आहे की, हा निर्णय घेताना सर्वोच्च न्यायालय आणि अन्य न्यायालयांची परवानगी घ्यावी लागेल. आम्ही याबाबत पूर्तता करण्याचा प्रयत्न केला आहे. शेवटी म्हटले आहे की, याबाबतचा निर्णय लवकरात लवकर होणे अपेक्षित आहे. आम्ही स्वत: याबाबत पाठपुरावा करीत आहोत.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात आश्वासन देऊन चार महिने उलटून गेले आहेत. दुर्दैवाने आश्वासनाची पूर्तता अद्याप झालेली नाही. चार महिन्यापूर्वी या सदनामध्ये स्पष्टपणे आश्वासन दिले होते त्यानुसार संबंधित यंत्रणांकडून मत जाणून घेऊन किती दिवसात निर्णय घेतला जाईल?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत या बाबत सुस्पष्ट भूमिका मांडली आहे. 1995 नंतर अधिकृत झोपडीमध्ये राहणारी व्यक्ती असेल तर ट्रान्सफर पॉलिसीबाबत कलम 37(2) अंतर्गत कार्यवाही केली जाईल. त्या अनुषंगाने मी निवेदनामध्ये दुरुस्ती केलेली आहे. एका महिन्याच्या आत अधिसूचना काढण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांचे आणि आपले आभार मानतो. म्हाडाच्या जागेवर एसआरए योजना सुरु आहेत, त्यापैकी काही योजना म्हाडाच्या वतीने विकसित केल्या जात आहेत. परंतु तीन वर्षापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात स्थगिती दिली असल्यामुळे निर्णय प्रक्रिया थांबली आहे. काही एसआरए योजनांमध्ये परिशिष्ट 2 किंवा 3 दिलेले आहे. राजेंद्रनगर, बोरीवली (पूर्व) येथे 16 वर्षापासून लोक ट्रॅन्झीट कॅम्पमध्ये रहात आहेत. म्हाडा जर योजना राबवित असेल तर अनुमती देण्यात यावी, म्हाडा योजना राबविण्यास तयार नसेल तर ज्या योजनांबाबत परिशिष्ट 2 दिलेले आहे त्या योजना का थांबविण्यात आल्या आहेत? मी पाच वेळा हा विषय सभागृहात उपस्थित केलेला आहे. लवकरात लवकर निर्णय करु असे सांगितले गेले. म्हाडा स्वत: ज्या एसआरए योजना विकसित करणार आहे त्या वगळून उर्वरित योजनांची यादी जाहीर करुन त्यांना तातडीने परवानगी दिली जाईल काय?

..3..



SGB/ D/ D/ KTG/ MMP/ पूर्वी श्री.गिते 11:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, दिनांक 6 ऑगस्ट, 2013 रोजी प्राधिकरणात या बाबतच्या प्रस्तावावर विचार करण्यात येईल. विशेष करुन सचिवांना सूचना दिली जाईल. ही गोष्ट खरी आहे की, स्वत: म्हाडाकडून योजना विकसित केली जात नाही आणि दुसऱ्यांना विकास करण्याकरिता अनुमती दिली जात नाही. स्मल ॲक्ट आणि अधमेश तिवारी प्रकरणात कोर्टाची एक जज्जमेंट आहे. त्या संदर्भात प्राधिकरणात युक्तिवाद करण्यास प्रधान सचिवांना सूचना देऊन झोपडपट्टीवासियांचे प्रकल्प थांबता कामा नये या दृष्टीकोनातून प्राधिकरणामध्ये दिनांक 6 ऑगस्ट, 2013 रोजी तो विषय मांडण्यात येईल.

------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे-सातारा महामार्गावरील कात्रज बोगद्याजवळील परिसरात होत असलेली अनधिकृत बांधकामे

**मु. शी.** : पुणे-सातारा महामार्गावरील कात्रज बोगद्याजवळील परिसरात होत असलेली अनधिकृत बांधकामे यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूलमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"पुणे-सातारा महामार्गावर कात्रजच्या नव्या बोगद्याजवळील शिंदेवाडी येथे दिनांक ७ जून, २०१३ रोजी वा त्या सुमारास पाण्याच्या मोठ्या प्रहावात एक महिला व मुलगी वाहुन गेल्याची घडलेली घटना, त्या भागातील बुजवलेले ओढे, टेकड्यावर केलेली बेकायदेशीर बांधकामे आणि रस्त्यांची अर्धवट बांधकामे, यामुळे सदरची घटना घडल्याचा नागरिकांनी केलेला आरोप सदरच्या सफ्रॉन सिटी या प्रकल्पाला महाराष्ट्र राज्य वितरण महामंडळाने वीज उपलब्ध केली नसतानाही तेथील इमारतींना वीज मिळणे, अनधिकृत बांधकामांवर पावसात वाहून येणाऱ्या गाळ युक्त प्रवाहामुळे या लगतच्या सुमारे २०० एकर शेतजमीन नापिक होणे, तसेच ही टेकडी फोडताना गौण खनिज उत्खनात कायद्यांचे झालेले उल्लंघन, टेकड्यांवरील अनधिकृत खोदकामास व बांधकामास शिंदेवाडी ग्रामपंचायतीने मदत केली असल्याचे स्पष्ट होणे, जिल्हापरिषदेबरोबर महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी खाजगी वनीकरण क्षेत्रातील जमिनीचे एक एकरापेक्षा कमी आकाराचे भूखंड पाडून त्याची ७/१२ च्या उताऱ्यावर बेकायदा नोंदणी करण्यात आल्याचे वेल्हे तालुक्यातील वांगणी येथे निदर्शनास येणे, त्याचप्रकारे आंबेगाव पठारावरील ज्या इमारतींवर २ वर्षापूर्वी कारवाई झाली होती त्या ठिकाणी व त्या भोवती तशाच प्रकारच्या इमारती पुन्हा उभ्या राहणे, नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या हद्दीलगत कात्रज घाट व परिसरात होत असलेली अनधिकृत बांधकामे, या सर्व बाबींकडे प्रशासनाचे होत असलेले अक्ष्यम्य दुर्लक्ष, याबाबत तातडीने कारावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

..५..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

नंतर एन.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आतापर्यंत महाराष्ट्रात कात्रजचा घाट प्रसिध्द होता परंतु या शासनाने महाराष्ट्रातील जनतेला कात्रजचा घाट दाखवला आहे असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही. दि. 6 जून, 2013 रोजी सातारा जिल्हयातील शिंदेवाडी येथील हायवेवर पाण्याचा लोंढा आल्यामुळे या दुर्घनटनेत श्रीमती विशाखा वाडेकर व त्यांच्या छोटयाशा बाळाला आपला जीव गमवावा लागला आहे. कात्रजच्या हायवेवर तसेच टेकडयावर अनाधिकृत बांधकाम झाल्यामुळे त्या ठिकाणी मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी झाली व त्यामध्ये दोन मानवी जीव दगावले गेले. आजही अतिवृष्टी झाली तर या टेकडयांमध्ये धोका संभऊ शकतो. या विषयाच्या संदर्भात माझे अनेक प्रश्न आहेत परंतु वेळेअभावी मी केवळ 5/6 प्रश्न मांडणार आहे.

सभापती महोदय, या प्रश्नाला डेव्हलप करण्याची अजिबात गरज नाही तर डेव्हलपमेंटला खड्डयात नेणारा हा प्रश्न आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, एमआरटीपी ॲक्ट नुसार ग्रामीण भागात प्लॅनिंग ॲथोरिटी नसल्यामुळे ज्या ठिकाणी महानगरपालिकेची हद्द संपते त्यापुढील भागात किंवा त्या ठिकाणच्या टेकडया फोडणे, टेकडयांवर अनाधिकृत बांधकामे करणे या सर्व गोष्टी होत आहेत. गेल्या 20/25 वर्षापासून ग्रामीण भागासाठी प्लॅनिंग ॲथोरिटी महसूल विभागाने निर्धारित करावयास पाहिजे होती परंतु ती केलेली नाही. त्यामुळे ग्रामीण भागासाठी प्लॅनिंग ॲथोरिटी कधी पर्यंत नेमली जाणार आहे ? ग्रामीण महाराष्ट्रात जी संवेदनशील ठिकाण आहे त्या ठिकाणी आपण रेडझोन घोषित केलेला आहे काय ? शेकडो एकर जमिनीवर अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत व त्यासंदर्भात तहसीदारांमार्फत चौकशी सुरु आहे. यामध्ये ज्या जमिनी घेतल्या गेल्या त्यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांच्या पत्नीच्या नावाने या जमिनी घेतल्या गेल्या आहेत.

पोलीस अधिकाऱ्यांना कायद्याने जमीन विकत घेता येते. परंतु बाजार भावापेक्षा कमी दराने श्री. किसन राठोड यांच्याकडून अनेक मोठया अधिकाऱ्यांनी जमिनी विकत घेतलेल्या आहेत. या जमीन खरेदीमध्ये मंत्रालयातील एका अधिकाऱ्याचाही समावेश आहे. त्यामुळे यासंदर्भात तहसीलदाराकडून चौकशी करण्यापेक्षा यासंदर्भातील चौकशी आयएएस अधिकाऱ्यामार्फत केली जाणार आहे काय ? नॅशनल हायवे ॲथोरिटी व रिलायन्स इन्फ्रा यांच्या मध्ये जो करार झाला होता त्या कराराचे पालन रिलायन्स इन्फ्राने केलेले नाही. अनाधिकृत बांधकामांकडे कानाडोळा करण्यात आलेला आहे. त्यामुळे हायवेच्या देखरेखीसाठी ज्या ज्या कंपन्यांशी नॅशनल हायवेने



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सबकरार केलेले आहेत त्यांचे पुनर्विलोकन केले जाणार आहे काय ? पुनर्विलोकन केले नाही तर हा गोंधळ हायवेच्या बाजूने सुरु राहील. तसेच हा प्रश्न कोणाच्या कार्यकाळात झाला ? "कोण म्हणतो टक्का दिला" या नावाने मराठीत एक नाटक आले होते. त्या प्रमाणे "कोण म्हणतो टक्का दिला" या प्रमाणे जबाबदारी झटकण्याचे काम एकाकडून दुसऱ्याकडे सुरु आहे.

पुण्याचे उपजिल्हाधिकारी श्री. आर.के.गायकवाड यांच्या कार्यकाळात पुण्यामध्ये संपूर्ण बांधकामांना वारंवार स्थगिती घ्यावयाची व बांधकामे करत जायचे असा प्रकार सुरु होता. त्यामुळे आर.के.गायकवाड यांचे निलंबन केले जाणार आहे काय ? या प्रकरणातील श्री. राठोड यांना जामीन रद्द होता कामा नये तर त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. त्यामुळे मी या ठिकाणी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत त्यावर शासनाने सविस्तर निर्णय घेणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अनेक प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत. श्री. राठोड आजही जेलमध्येच आहेत. श्री. राठोड यांना पुरेपूर शिक्षा व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील राहील. सन्माननीय सदस्यां डॉ. गोऱ्हे यांनी पूर्ण राज्यातील प्लॅनिंग ॲथोरिटीचा प्रश्न उपस्थित केला आहे. यासंदर्भात अतिरिक्त मुख्य सचिव श्री. स्वाधीन क्षत्रिय यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने एक समिती नेमली होती. शहराच्या बाहेर, महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर जी काही अनाधिकृत बांधकामे झालेली आहेत त्यासंदर्भातील शिफारसी श्री. स्वाधीन क्षत्रिय यांनी केलेल्या असून त्यासंदर्भात शासनाचे छाननीचे काम सुरु असून त्यासंदर्भात शासन लवकरच निर्णय घेणार आहे.

सभापती महोदय, शिंदेवाडी येथे सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास एकदम 67 मिमी पाऊस अतिशय कमी वेळेत पडल्यामुळे डोंगराचे सर्व पाणी रस्त्यावर आले व त्यामध्ये आई व मुलीचा मृत्यू झालेला आहे. या ठिकाणी रस्त्याच्या हद्दीमध्ये श्री. राठोड यांनी सुध्दा बांधकाम केलेले आहे हे दिसून आलेले आहे. श्री. राठोड यांनी केलेल्या अनाधिकृत बांधकामामुळे पाणी वाहून जाऊ शकले नाही ही वस्तुस्थिती आहे. श्री. राठोड यांनी 112(अ) नुसार अनाधिकृत बांधकाम तसेच उत्खनन केल्याचे निष्पन्न झाले असून ते यासाठी कारणीभूत झालेले आहे. हायवे वरुन विना परवाना गटार बुजवून जोड रस्त्याचे काम सुरु होते तसेच याला नॅशनल हायवे ॲथोरिटीने परवानगी दिली होती.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ....

राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने इंडिपेन्डंट इंजिनिअरची यासंदर्भातील अहवाल घेण्यासाठी नेमणूक केली होती त्यांनी सुध्दा या दुर्घटनेस सहापदरीकरण संस्था जबाबदार असल्याचा अहवाल दिलेला आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात...

परंतु, हे सकृतदर्शनी खरे असले तरी यासंबंधात मॅजिस्ट्रेट चौकशी सुरू आहे. या चौकशीचा अहवाल 15 दिवसात येणार आहे. या अहवालात स्पष्ट कारणे येतील. त्यानुसार कारवाई केली जाईल.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुण्यातील टेकड्यांना महत्त्व आहे. परंतु, गेल्या वर्षभरामध्ये पुण्यातील टेकड्या फोडण्याचे काम सुरू होते. यासंबंधी मी नागपूरच्या आणि त्या आधीच्या मुंबईच्या अधिवेशनात शासनाचे लक्ष वेधले होते. तरी सुद्धा पुणे शहराच्या पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या टेकड्या फोडण्याचे काम राजरोसपणे सुरू असताना शासकीय अधिकारी त्याकडे डोळेझाक करीत होते. याचा अर्थ त्यांचा सुद्धा यामध्ये सहभाग आहे. यात जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांच्या विरूद्ध माननीय महसूल मंत्र्यांनी कारवाई केली पाहिजे. कारण शिंदेवाडी येथे घडलेली दुर्घटना अतिशय दुर्दैवी आहे. ज्या लोकांचा संबंध नव्हता त्यांचा जीव गेला आहे. या दुर्घटनेमध्ये 14 महिन्याची मुलगी व आई वाहून गेली आहे. पुण्याचे सौदर्य असलेल्या टेकड्या नष्ट करण्याचे काम रात्रंदिवस सुरू होते. त्यावेळी आपले अधिकारी काय करीत होते ? यास जे कोणी अधिकारी जबाबदार असतील, ज्यांनी कोणी अशा कामांना पाठिंबा दिला असेल त्यांच्या विरूद्ध ताबडतोब कारवाई झाली पाहिजे किंवा शासनाने तशी घोषणा केली पाहिजे. नाही तर आम्ही ही लक्षवेधी सूचना पूर्ण होऊ देणार नाही हे देखील मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो. या घटनेच्या पार्श्वभूमीवर टेकड्या आणि डोंगर विकासा संबंधी नियमावली करण्याचे शासनाने जाहीर केले आहे. ही नियमावली तीन महिन्यामध्ये पूर्ण करणार आहात काय ? येथे स्वाधिन क्षत्रिय समितीचा उल्लेख केलेला आहे. या समितीच्या शिफारशी लवकरात लवकर मान्य केल्या जातील काय ?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, स्वाधिन क्षत्रिय समितीच्या अहवालासंबंधी तातडीने लवकरात लवकर कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी सांगितले आहे की, याकडे अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे. येथे उत्खनन होत असल्याची बाब लक्षात आल्यानंतर महसूल अधिकाऱ्यांनी कारवाई म्हणून रूपये 57.00 लाख 56.00 हजार दंड आकारला. त्यामुळे त्यांनी कोर्टातून स्थगिती देखील आणली. ही स्थगिती उठविल्यानंतर पुन्हा दंड आकारल्यानंतर त्याने दिवाणी न्यायालयातून स्थगिती आणली. श्री.राठोड यांची कारवाईला न्यायालयातून स्थगिती आणावयाची अशा प्रकारची मोडस ऑपरेंडी दिसते. दुसऱ्या बाजूला असेही दिसते की, सर्व अधिकाऱ्यांनावर दबाव निर्माण करण्याकरिता अनेक गुन्हे दाखल करावयाचे. त्यांनी अधिकाऱ्यांविरूद्ध ॲस्ट्रॉसिटी पर्यंतचे गुन्हे दाखल केले आहेत. अशा प्रकारची त्यांची पद्धत होती. यामध्ये अधिकाऱ्यांनी सातत्याने कारवाई केल्याचे दिसून येते. परंतु, त्यास स्थगिती आल्याचे दिसून येते. या सगळ्या प्रकरणांची एकत्रित चौकशी होणे गरजेचे आहे. कारण अनेक विभागांचा यात संबंध येतो. यात केवळ महसूल विभागाचा प्रश्न येतो अशातला भाग नाही. यात नगरविकास, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसइबीचा संबंध येतो. याची एकत्रितपणे चौकशी झाली पाहिजे. त्यात जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, या मताचा मी देखील आहे. बेकायदेशीर पद्धतीने चाललेले उत्खनन, बेकायदेशीररित्या टेकड्या फोडण्याचे काम कुठे तरी बंद झाले पाहिजे. तेथे कायद्याचाच अवलंब झाला पाहिजे. पुण्याचे विभागीय आयुक्त आयएएस आहेत. ते सिनिअर आहेत. येथे जे सांगण्यात आले आहे त्यासंबंधी एकत्रित चौकशी करण्यास सांगण्यात येईल आणि त्यामध्ये जे जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यामध्ये श्री.राठोड यांनी एक मोडस ऑपरेंडी वापरली आहे. यामध्ये सार्वजनिक बांधकाम खात्यासह अमूक एक खाती आहेत त्यांची एकत्रितपणे चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे असे मत माननीय मंत्री महोदयांनी व्यक्त केले. असे असेल तर मग सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आणि माननीय सदस्य श्री.मोहन जोशी हे लक्षवेधी सूचना उपस्थित करे पर्यंत शासनाने वाट का पाहिलेली आहे ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

आपण या पूर्वी कारवाई का केली नाही ? मी वाडेकर कुटुंबीयांच्या घरी जाऊन आलो, प्रत्यक्ष घटना स्थळी जाऊन आलो.

सभापती महोदय, या ठिकाणी सांगण्यात आले की, न्यायालयाने स्थगिती दिली. त्यापूर्वी अपर जिल्हाधिकारी श्री.गायकवाड यांनी स्थगिती दिली होती. त्यांच्यावर आताच्या आता कारवाई करणार काय ? माझा दुसरा प्रश्न असा की, नॅशनल हाय-वे ऑथॉरिटी यांनी या गोष्टीकडे दुर्लक्ष केले. रिलायन्स कंपनीकडे रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम दिलेले आहे. त्याठिकाणी स्ट्रार्मवॉटर ड्रेनसाठी जे गटार होते ते बुजवून त्यावर रस्ता करुन तो रस्ता टाटा मोटर्स कंपनीकडे गेलेला आहे. तेव्हा नॅशनल हाय-वे ऑथॉरिटी, रिलायन्स कंपनी आणि टाटा मोटर्स कंपनी यांच्यावर श्रीमती वाडेकर आणि त्यांची मुलगी यांच्या सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणार काय ? या प्रकरणी अपर जिल्हाधिकारी श्री.गायकवाड यांनी स्थगिती दिलेली आहे. न्यायालयाने स्थगिती का दिली ते आपण नंतर पाहू. न्यायालयाच्या निकालात म्हटले आहे की, अपर जिल्हाधिकारी असे म्हणत आहेत तेव्हा स्थगिती देण्यास हरकत काय ? आपण त्या संदर्भात माहिती घेतली पाहिजे. ॲन्टी करप्शन विभागाचे तत्कालीन अधिकारी श्री.ज्ञानेश्वर चव्हाण यांनी महसूल विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून जबरदस्तीने नाव चढवून घेतले असे चॅनेल्सवर स्टेटमेंट आलेले आहे. तेव्हा अशा अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ? अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची इच्छा आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. ते जर खरे असेल तर त्याप्रमाणे ठोस कारवाई करणार काय ? शासनाने वाडेकर कुटुंबीयांना काहीच मदत दिलेली नाही. तेव्हा त्या कुटंबीयांना शासन मदत देणार काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, अपर जिल्हाधिकारी यांनी दिनांक 27.6.2011 रोजी स्थगिती दिलेली दिसते. त्यांनी ही स्थगिती दिनांक 19.7.2011 रोजी उठविल्याचे दिसते. यामध्ये अनेक विभाग येत असल्यामुळे सकृतदर्शनी चौकशीत दोषी आढळल्याशिवाय कारवाई करणे योग्य होणार नाही. या प्रकरणाची चौकशी आयुक्तांमार्फत एक महिन्यात करण्यात येईल. आयुक्त हे आय.ए.एस. आणि वरिष्ठ अधिकारी आहेत. यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात....

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, शासनाकडून वाडेकर कुटुंबीयांना मदत मिळालेली नाही. या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती करुन त्या कुटुंबाला चांगल्याप्रकारे मदत देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय,..

**उप सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर एकूण 11 लक्षवेधी सूचना आहेत. आपणास सर्व लक्षवेधी सूचनांना न्याय द्यायचा आहे.`.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, दोन लक्षवेधी सूचनांमध्ये माझे नाव आहे. मी वारंवार हात वर करीत आहे. आम्ही आपला सन्मान ठेवतो. आपण आमचा सन्मान ठेवावा अशी विनंती आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. आपण प्रश्न विचारावा.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**लक्षवेधी क्रमांक 7 बाबत**</u>

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 7

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या उत्तराला माझा आक्षेप आहे. निवेदनातील शेवटच्या ओळीत म्हटले आहे की, "... धरणांच्या पाणी साठ्याबाबत व पावसाळ्यात पडणाऱ्या पर्जन्यमाना बाबत ऑगस्ट व सप्टेंबर, 2013 अखेरीस आढावा घेऊन संनियंत्रण करण्याचे नियोजन आहे." परंतु आमच्या माहितीप्रमाणे गेल्या तीन-चार दिवसांपासून वरच्या धरणातून कालव्यात पाणी सोडण्याचे आदेश दिलेले आहेत. असे असताना लक्षवेधीच्या निवेदनात असे का नमूद करण्यात आले आहे ?

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांची ही लक्षवेधी सूचना दिलेली आहे त्यांना ती प्रथम मांडू तरी द्यावी. परंतु तसे न होता आपण लक्षवेधी क्रमांक 7 पुकारल्यानंतर आणि ज्यांची ही लक्षवेधी सूचना आहे त्यांनी ती पुकारण्या अगोदर सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे बोलण्यासाठी उभे राहिले.

**उप सभापती** : मी लक्षवेधी क्रमांक 7 पुकारलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांना माझी विनंती आहे की, कृपया आपण खाली बसावे.

श्री.सतिश चव्हाण : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना मी उपस्थित केलेली आहे...

(गोंधळ )

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी लक्षवेधी सूचना क्रमांक-7 पुकारलेली आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय,...

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना माझी आहे. त्यामुळे...

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : मी दोन वेळा संधी देऊन सुध्दा आपण लक्षवेधी सूचना पुकारत नसल्यामुळे मी आता लक्षवेधी सूचना क्रमांक-8 चर्चेला घेतो.

(सत्ताधारी पक्षातील अनेक सदस्य वेलजवळ येतात.)

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय,...

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांना सांगतो की, कृपया आपण खाली बसावे. मी लक्षवेधी सूचना क्रमांक-8 पुकारलेली असल्यामुळे सुरुवातीला लक्षवेधी सूचना क्रमांक-8 वर चर्चा होईल व त्या नंतर लक्षवेधी सूचना क्रमांक-7 चर्चेला घेण्यात येईल.

कृपया सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे.

--------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : खामगांव जि.बुलढाणा येथील निम्न ज्ञानगंगा लघु प्रकल्पासाठी दिवठाण येथील शेतकऱ्यांच्या जमिनी बाजारभावाप्रमाणे सरळ खरेदी करण्यास मंजुरी देऊनही त्या अद्याप पर्यंत संपादित न करणे,

**मु. शी.** : खामगांव जि.बुलढाणा येथील निम्न ज्ञानगंगा लघु प्रकल्पासाठी दिवठाण येथील शेतकऱ्यांच्या जमिनी बाजारभावाप्रमाणे सरळ खरेदी करण्यास मंजुरी देऊनही त्या अद्याप पर्यंत संपादित न करणे, या संबंधी श्री.पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"खामगांव, जिल्हा बुलढाणा येथील निमकवळा शिवारात ज्ञानगंगा नदीवर निम्न ज्ञानगंगा लघु प्रकल्पासाठी निमकवळा, काळेगांव, दिवठाणा व वर्णा येथील शेतकऱ्यांची संपादित करण्यात आलेल्या क्षेत्रापैंकी १२७ हेक्टर जमीन पाटबंधारे विभागाने सरळ खरेदी करुन संपादित केलेली असणे, या प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या ४ गावांपैकी ३ गावातील शेतजमिनी बाजार भावाप्रमाणे (सुमारे १० लाख रुपये) सरळ खरेदी व्यवहाराने संपादित करण्यात येणे, मात्र, दिवठाणा येथील शेतकऱ्यांच्या शेत जमिनीचे भूसंपादन बाजार भावाप्रमाणे सरळ खरेदी करण्याबाबत शासनाने मंजुरी देवूनही अद्याप पर्यंत या गावातील शेत जमीन शासनाने संपादित न करणे, या गावातील शेत जमिनीचे संपादन जुन्या भूसंपादन कायद्याप्रमाणे संपादित करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे सादर केल्यामुळे या गावातील भूसंपादनाची प्रक्रिया बंद पडणे, परिणामी प्रकल्पाचे काम देखील बंद असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व भूमिका."

श्री.सुनील तटकरे (जलसंपदा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>निवेदनानंतर</u>

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निम्न ज्ञानगंगा-2 बृहत लघु प्रकल्प हा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत आहे. या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दि.12/02/2009 रोजी मिळाली. या प्रकल्पाची साठवण क्षमता 10.82 द.ल.घ.मी. असून, प्रकल्पीय सिंचन क्षेत्र 1181 हेक्टर आहे. या प्रकल्पावर आतापर्यंत 35 कोटी रुपये खर्च झालेला आहे. या प्रकल्पासाठी निमकवळ, काळेगांव व रोहणा येथील 127.76 हेक्टर जमीन क्षेत्रीय कार्यालयामार्फत संपादित करण्यात आली आहे. उर्वरित 125.57 हेक्टर जमीन दिवठाणा येथील संपादित करणे बाकी आहे. परंतु ती जमीन क्षेत्रीय पध्दतीने संपादित न करता जिल्हाधिकाऱ्यांकडे सुधारित प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून माझी एकच मागणी आहे की, सुरुवातीला अन्य गावातील जमीन क्षेत्रीय पध्दतीप्रमाणे संपादित करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे दिवठाणा येथील जमीन सरळ खरेदीने संपादित करण्यात यावी. यासाठी त्या गावातील एकाही शेतकऱ्याचा विरोध नाही. सुधारित प्रस्ताव पाठविल्यामुळे भूसंपादनाचे काम थांबलेले आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, सुधारित प्रस्तावाला मान्यता मिळेपर्यंत वाट न पाहता क्षेत्रीय पध्दतीने भूसंपादनाची कार्यवाही करुन शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देणार काय ? माझी जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा झालेली आहे. त्यांनी सांगितले की, त्यांच्याकडे पैसे शिल्लक आहेत. या बाबतचा आदेश वरच्या स्तरावरुन आला तर या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करुन जमीन संपादित करता येईल.

श्री.सुनील तटकरे : महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता दि.12/02/2009 रोजी देण्यात आली. हा प्रकल्प अे.आय.बी.पी.मध्ये समाविष्ट आहे. त्या प्रकल्पात किती पाणी साठा आहे हे देखील सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. त्या प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र 1181 हेक्टर आहे. भूसंपादनाच्या कामावर 12.28 कोटी रुपये, धरणाच्या कामावर 19 कोटी रुपये आणि इतर कामांवर 3.79 कोटी रुपये खर्च झालेला आहे. या प्रकल्पासाठी काळेगांव, निमकवळा आणि

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

रोहणा येथील 127.76 हेक्टर जमीन खरेदी केली आहे. त्यावर 22.28 कोटी रुपये खर्च झालेला आहे. उर्वरित जमीन क्षेत्रीय पध्दतीने खरेदी करण्याची मागणी सन्माननीय सदस्यांनी केली आहे. या बाबत नक्की विचार केला जाईल. नियामक मंडळापुढे येत्या बैठकीमध्ये त्यास मान्यता देण्यात येईल आणि त्याच कालावधीत ही जमीन क्षेत्रीय पध्दतीने खरेदी करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, सुधारित प्रस्तावाला मान्यता मिळेपर्यंत त्या ठिकाणचे भूसंपादन थांबविण्यात येणार आहे काय ? सुधारित प्रस्तावाला मान्यता येत राहील. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देऊन दिवठाणा गावातील जमीन संपादित करण्याच्या अनुषंगाने माननीय मंत्री होकारार्थी उत्तर देणार काय ?

श्री.सुनील तटकरे : महोदय, मी अगोदरच होकारार्थी उत्तर दिलेले आहे. सुधारित प्रशासकीय मान्यता येईपर्यंत थांबणार आहोत, असे मी म्हटले नाही. सरळ खरेदीचा प्रस्ताव नियामक मंडळापुढे आणून त्याला तातडीने मान्यता देण्यात येईल आणि खरेदीची प्रक्रिया सुरु केली जाईल. तसेच शेतकऱ्यांना आवश्यक असलेला मोबदला अदा करण्यात येईल.

--------

**उप सभापती** : माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक-2 नतर चर्चेला घेण्यात येईल. आता लक्षवेधी सूचना क्रमांक-7 चर्चेला घेण्यात येईल.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोदावरी खोऱ्यातील पाण्याचे समन्यायी पध्दतीने वाटप करण्याच्या बाबतीत कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे मराठवाड्यातील जनतेमध्ये पसरलेली असंतोषाची भावना

**मु. शी.** : गोदावरी खोऱ्यातील पाण्याचे समन्यायी पध्दतीने वाटप करण्याच्या बाबतीत कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे मराठवाड्यातील जनतेमध्ये पसरलेली असंतोषाची भावना यासंबंधी श्री. सतीश चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सतीश चव्हाण ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"औरंगाबाद जायकवाडी धरणाची क्षमता 102 टीएमसी असून, धरणाच्या वरील बाजूस 115 टीएमसी पाणी अडविण्याची परवानगी आयोगाने दिलेली असताना तेथे, जागोजागी बंधारे व धरणे बांधून नियमबाह्य पध्दतीने 185 टीएमसी पाणी अडविण्यात येत असणे, औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, जिल्ह्यातील पेयजल, सिंचन व उद्योग तसेच, परळी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र हे सर्व जायकवाडीच्या पाण्यावरच अवलंबून असणे, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायदा, 2005 नुसार, या पावसाळ्यापूर्वी गोदावरी खोऱ्यातील पाण्याचे समन्यायी पध्दतीने वाटप करण्यासाठीचे नियम जून, 2013 पूर्वी करण्याचे आश्वासन सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक 8 मे, 2013 रोजी तर, जलसंपदा मंत्री यांनी अर्थसंकल्प अधिवेशन 2013 मध्ये दिलेले असूनही, यावर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, परिणामी, मराठवाड्यातील जनतेमध्ये पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. सुनील तटकरे ( जलसंपदा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी जास्त आकडेवारी...

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे...

( सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी कृपया खाली बसावे. मी लक्षवेधी सूचना क्रमांक 7 पुकारलेली आहे व ही लक्षवेधी सूचना ज्या सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे त्यांना आधी बोलू द्यावे. त्यांचे म्हणणे त्यांना मांडू द्यावे आणि मी जेव्हा परवानगी देईन तेव्हा आपण बोलण्यासाठी उभे राहावे. सभापती महोदयांनी ही लक्षवेधी सूचना मान्य केलेली आहे आणि ती सभागृहाची प्रॉपर्टी आहे. त्यामुळे आपण अशा पध्दतीने मध्ये बोलू शकत नाही.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, मी जास्त आकडेवारी देऊन सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. या विषयावर खूप चर्चा झालेली आहे. आज जायकवाडी धरणामध्ये फक्त 3 टक्के पाणी आहे. वरच्या भागातील सर्व धरणांमध्ये नियमबाह्य पध्दतीने 70 टक्के पेक्षा जास्त पाणी अडविले गेले आहे. नियमांचा चुकीचा अर्थ लावून हे सर्व अधिकारी असे म्हणतात की, ऑक्टोबर अखेरीस पाण्याचे नियोजन केले जाईल. म्हणजे जायकवाडीमध्ये 5 टक्केच पाणी राहील आणि मराठवाड्याला पिण्यासाठी 30 टक्के पाणी लागते. जायकवाडीमध्ये जर 30 टक्के पाणी आले तर ते आम्हाला फक्त पिण्यासाठी पुरते. सिंचनाची तर गोष्टच वेगळी. आज वरच्या बाजूला सिंचन चालू आहे. या बाबतीत आजच्या आज आढावा घेऊन जायकवाडी धरण 30 टक्के भरेपर्यंत ताबडतोब पाणी सोडण्यास सुरुवात करणार का ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी त्यांची भावना व्यक्त केली. गेल्या आठवड्यामध्ये या संदर्भामध्ये तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने सखोल चर्चा झालेली आहे. एक गोष्ट नक्की आहे की, गेल्या वर्षी पर्जन्यमान मोठ्या प्रमाणात कमी झाल्यामुळे पहिल्यांदाच आपल्याला मृत साठ्यातून पाण्याचा वापर करावा लागला. तो वापर करीत असताना त्यामध्ये शेतीचे असलेले रोटेशन, मग ते अहमदनगर जिल्ह्यातील असेल, नाशिक जिल्ह्यातील असेल, ते सुध्दा गेल्या वर्षी दिले नव्हते. सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी जो प्रश्न या ठिकाणी विचारलेला आहे त्या संदर्भात सांगू इच्छितो की, या वर्षी पाऊसमान तसे व्यवस्थित आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. सुनील तटकरे .....

(अडथळा) सन्माननीय सदस्यांनी मला उत्तर पूर्ण करु द्यावे. सभापती महोदय, या संदर्भामध्ये आपण एक समिती नेमलेली आहे. त्या समितीचा अहवाल येत्या आठ पंधरा दिवसात शासनास प्राप्त होईल. गेल्या वर्षी जशी स्थिती निर्माण झाली आणि पिण्याच्या पाण्याचे फार मोठ्या प्रमाणावर दूर्भिक्ष्य जाणवले त्या वेळेला भंडारदरा, निळवंडे, मुळा या सर्व धरणातून त्या ठिकाणी पाणी सोडले होते. या वर्षीच्या नियोजनाच्या बाबतीत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे नियोजन करणार आहोत. जायकवाडीमध्ये पाणी येत असताना वरच्या धरणातील आणि त्या धरणातील पाणी साठा त्या सर्व परिसरातील शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी निश्चितपणे उपलब्ध राहील याचे नियोजन 100 टक्के केले जाईल.

श्री. अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, आजच्या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने मी एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. जायकवाडीच्या प्रकरणातील हा विषय अतिशय गंभीर आहे आणि या संदर्भात विभागवार वाद होऊ शकतात, जिल्हावार वाद होऊ शकतात. त्यामुळे हा विषय माननीय मुख्यमंत्र्यांनी, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय जलसंपदा मंत्र्यांनी अत्यंत सचोटीने सोडविला पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमर राजूरकर.......

मला मंत्री महोदयांना या निमित्ताने दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. जायकवाडी प्रकल्पाला 1964 साली प्रशासकीय मान्यता मिळाली होती. केंद्रीय जल आयोगाची या प्रकल्पाला मान्यता मिळाली होती. त्यानुसार या प्रकल्पातील पाण्याचे नियोजन होत आहे काय ? तसेच या राज्याने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, 2005 हा कायदा मंजूर केलेला आहे. या कायद्यातील कलम 12 (6) (सी) मधील पाणी वाटपाबाबतच्या तरतुदींचे तंतोतंत पालन होत आहे काय ?

श्री.सुनील तटकरे :सभापती महोदय, 1976 साली जायकवाडी प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

( सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात. )

सभापती महोदय, या निवेदनात नमूद केलेले आहे की, हे धरण झाले त्यावेळी या धरणातील पाणी साठा 102.72 टीएमसी होता. त्यापैकी उपयुक्त पाणी साठा 72.62 टीएमसी व मृतसाठी 26.06 टीएमसी आहे. प्रकल्प अहवालाप्रमाणे 75 टक्के विश्वासार्हतेने एकूण 196.55 टीएमसी पैकी पैठण धरणाच्या उर्ध्व भागात 115.50 टीएमसी पाणी वापर मंजूर आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजूरकर यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर निवेदनाच्या पहिल्या परिच्छेदामध्ये नमूद केलेले आहे. तद्‌नंतर मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी यासंबंधी अभ्यास केला. त्या अभ्यासामध्ये असे लक्षात आले की, 146.50 टीएमसी पाणी वापर होत आहे. काही दिवसापूर्वी उपस्थित करण्यात आलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देत असताना मी सांगितले होते की, राज्यातील धरणांचे पाण्याचे नियोजन विचारात घेता काही वेळेला काही क्षमतेपेक्षा अधिक धरणे बांधण्याचा त्यावेळी निर्णय झाला होता, ही वस्तुस्थिती आहे.

सन्माननीय सदस्यांनी 2005 च्या कायद्याचा उल्लेख केलेला आहे. त्यानंतर त्या कायद्याचे 2013 मध्ये नियमन करण्यात आले. त्याच्या आधारे सुनावणी व निर्णय होऊ शकतो. माननीय उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर त्याबाबत शासनाने उच्चस्तरीय समिती नेमलेली आहे. त्या समितीचा अहवालही सादर होणार आहे. यादृष्टीने खबरदारी घेण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. जायकवाडी व मराठवाड्याला त्यांच्या हक्काचे पाणी देण्याचा निश्चितपणे प्रयत्न होईल. दुसरी एक बाबी अशी.....

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.सुनील तटकरे....

आहे की, सबंध गोदावरी खो-यात 20 टीएमसी तूट आहे. माझ्याकडे हा विभाग आल्यानंतर त्या सबंध खोऱ्यामध्ये उपलब्ध असलेल्या पाण्याचे सर्वेक्षण केलेले आहे. गेल्या अधिवेशनामध्ये या विषयाबाबत लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आल्यावर मी असे उत्तर दिले होते की, मराठवाड्याच्या वाट्याचे 18 टीएमसी पाणी आहे, तेथे उपलब्ध असलेल्या पाण्यापेक्षा हे अतिरिक्त आहे. म्हणून 600 हेक्टरच्या आसपासचे प्रकल्प सुरु करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केले जातील, असा प्रयत्न एका बाजूला केला जाईल. त्याचबरोबर तेथील पश्चिम वाहिन्या नद्या आहेत त्यांचे पाणी पूर्वेकडे वळविण्याच्या दृष्टीकोनातूनही प्रयत्न सुरु आहेत. कारण गोदावरी खोऱ्यातील तूट केवळ जायकवाडीतील पाण्यापुरती सीमित राहणार नाही. त्यासंबंधी कायम स्वरुपी पाण्याचे नियोजन करावयाचे असेल तर याबाबत सखोल सर्वेक्षण करण्याचे आदेश नुकतेच दिलेले आहेत. म्हणजे तातडीची उपाययोजना व दीर्घकालीन उपाययोजना करुन मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळण्याच्या दृष्टीकोनातून 100 टक्के प्रयत्न केला जाईल.

( सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात. )

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 9.

( सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून बोलत असतात. तसेच सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव सभात्याग करतात. )

**उप सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जावे, मी सर्वांना प्रश्न विचारण्याची संधी देईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरालाच माझी हरकत आहे. सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी सांगितल्या प्रमाणे प्रश्न अतिशय गंभीर आहे. विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर कुठेही देण्यात आलेले नाही. प्रश्न सुटसुटीत विचारलेला आहे. आजच्या घडीला जायकवाडी धरणामध्ये फक्त 3 टक्के पाणी आलेले आहे. हे 3 टक्के पाणी म्हणजे काहीच नाही. पालखेड धरणामध्ये 85 टक्के पाणी आहे. गंगापूर धरणामध्ये 84 टक्के पाणी आहे, दारव्हा धरणामध्ये 72 टक्के पाणी आहे, भंडारदरा धरणामध्ये 77 टक्के पाणी आहे. निळवंडे धरणामध्ये 60 टक्के पाणी आहे. अशा परिस्थितीमध्ये शेतीसाठी कॅनाल चालू ठेवला जातो. एका बाजूला ओला दुष्काळ जाहीर करण्यासाठी हे सभागृह बंद करण्यात आले होते. अशा वेळी तुम्ही शेतीसाठी आणि पिण्यासाठी पाणी मागण्याकरिता माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे शिष्टमंडळ घेऊन जात असाल तर त्याला विकृती म्हणावे की काय अशा प्रकारचे धाडशी वक्तव्य करण्याची वेळ आलेली आहे. एमडब्ल्यूआरआरच्या नियमावलीमध्ये दुष्काळी परिस्थितीमध्ये 33 टक्के पाणी सोडण्याचे नमूद केलेले आहे. मुळात एमडब्ल्यूआरआरच्या नियमावलीलाच आमची हरकत आहे.

प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये असे आश्वासित करण्यात आलेले आहे की, गोदावरी खो-यातील तूट भरुन काढण्यासाठी वरच्या धरणातील पाणी जायकवाडी धरणामध्ये सोडावे अशी प्राधिकरणाने शिफारस केलेली आहे. 30 ऑक्टोबरला पाणी सोडले जाईल असे सांगितले जाते. 344 गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न या जायकवाडी धरणातील पाण्यावर अवलंबून आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे पिण्यासाठी 30 टक्के पाणी लागते. ऑक्टोबरमध्ये पाणी सोडले जाईल, दुसरीकडे कॅनॉल चालू ठेवले जातील आणि 50 टक्के पाणी सोडल्यानंतर आमच्याकडे पिण्यासाठी पाणी शिल्लक नाही असे सांगितले जाईल. म्हणून मंत्री महोदयांना माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, 30 ऑक्टोबरची वाट न पाहता त्या त्या धरणातील पिण्याच्या पाण्याच्या 20 टक्के पाणी जायकवाडी धरणामध्ये सोडण्याचा निर्णय आपण कारणार काय ? कालवा सल्लागार समितीच्या निर्णयाप्रमाणे पिण्याचे पाणी सोडण्याचा निर्णय घेतला जात आहे. हे पिण्याचे पाणी 30 सप्टेंबर पर्यंत सोडले जाणार नाही अशा प्रकारचा निर्णय मंत्री महोदय घेतील काय ?

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी सविस्तर प्रश्न विचारले. जायकवाडी प्रकल्पांतर्गत पैठण धरणातील पाण्यावर औरंगाबाद महानगरपालिका,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

,एमआयडीसी वसाहती, जालना-अंबड शहर पाणी पुरवठा योजना, गेवराई, नेवासा, शेवगाव, पैठण इत्यादी शहरांच्या पाणी पुरवठा योजना व इतर जवळपास 205 गावांचा पाणी पुरवठा, तसेच औरंगाबाद शहरालगत असलेल्या औद्योगिक वसाहतींसाठी औद्योगिक पाणी पुरवठा या धरणावर अवलंबून आहे ही वस्तुस्थिती आहे. या धरणातील 529 द.ल.घ.मी.पाणी हे या कारणासाठी आरक्षित केलेले आहे. मी मघाशी उत्तर देताना सांगितले की, मेंढेकरी समितीचा अहवाल येत्या 8-15 दिवसामध्ये निश्चितपणे येईल. 15-20 दिवसामध्ये उच्चस्तरीय बैठक घेऊन निश्चितपणे नियोजन केले जाईल...(अडथळा)..गेल्यावर्षी जेव्हा पिण्याच्या पाण्याची आवश्यकता निर्माण झाली होती त्यावेळी शेतीचे उभे पीक असताना देखील त्याला पाणी न देता जायकवाडी धरणामध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय सरकारने दोन वेळा घेतला होता. गेल्यावर्षी खूप कमी पर्जन्यमान होते. त्यावेळी 10 टीएमसी पाणी सोडण्यात आले होते आणि त्यातील निम्मे पाणी धरणामध्ये पोहोचले होते. गतवर्षीचा अनुभव लक्षात घेऊन आम्ही निश्चितपणे नियोजन करणार आहोत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ D/ प्रथम श्री.शिगम 11:40

श्री.सुनील तटकरे...

या वर्षी धरणाचे गेट उघडून कोठेही शेतील पाणी उपलब्ध करुन दिलेले नाही.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, येत्या 15 ते 20 दिवसामध्ये एकंदरीत जलाशयातील पाणी साठा, आपण केलेले नियम, मेंढेकरी समितीचा अहवाल या बाबतीत साकल्याने विचार करुन मराठवाडयाला त्यांच्या हक्काचे शंभर टक्के पाणी उपलब्ध करुन दिले जाईल. मी मघाशी सांगितले की, केवळ तात्पुरते पाणी उपलब्ध करुन देणे एवढाच हा प्रश्न नाही. गोदावरी खोऱ्यातील 20 टी.एम.सी.ची तूट आपल्याला भरुन काढावयाची आहे. त्यासाठी आपल्याला जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहेत. शासनाकडून सर्वदृष्टीने लॉंग टर्म प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या लॉंग टर्म प्रयत्नांमध्ये सुध्दा या वर्षी या साऱ्या गोष्टींचा सारासार विचार हा शंभर टक्के केला जाईल.

**उप सभापती** : ठीक आहे. आता मी लक्षवेधी क्रमांक 9 पुकारतो आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा पूर्ण झालेली आहे. आता मी पुढील लक्षवेधी सूचना पुकारतो आहे. कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे.

(गोंधळ)

या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण झालेले आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर जाऊन बसावे. आपणास अपेक्षित असेल उत्तर मंत्रिमहोदयांकडून मिळेल अशी अपेक्षा कृपया कोणी करु नये. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी लक्षवेधी सूचना पुकारली आहे. त्या लक्षवेधी सूचनेवर चर्चा होऊ द्यावी.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण आपापल्या जागेवर जाऊन बसावे. तुम्ही म्हणता तसेच उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले पाहिजे काय ? अशा प्रकारचा आग्रह धरणे चुकीचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी लक्षवेधी सूचना मांडावी.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

----------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : धामापूर (जि.सिंधुदुर्ग) या गावाचा पर्यटन क्षेत्र म्हणून समावेश होणे.

**मु. शी.** : धामापूर (जि.सिंधुदुर्ग) या गावाचा पर्यटन क्षेत्र म्हणून समावेश होणे यासंबंधी श्री.सुभाष चव्हाण,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" "नैसर्गिक साधन सामुग्रीने समृध्द अशा सिंधुदूर्ग जिल्ह्याला पर्यटन जिल्हा घोषित करण्यात येऊन त्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील धामापूर येथे सुमारे ११४ हेक्टर क्षेत्रफळावर पुरातन व नैसर्गिकरित्या अतिशय सुंदर असा धामापूर तलाव लाभलेल्या धामापूर गावाचा सुध्दा पर्यटन क्षेत्र म्हणून समावेश करण्यात येणे, या तलावाशेजारी महाराष्ट्र शासनाची कृषी विभागाच्या फलोद्यान विभागाची एक सुंदर रोपवाटिका असून, या ठिकाणी कृषी चिकित्सालय व फळ रोपवाटिका बनविण्यासाठी कृषी पर्यटनाचा ४०१ लक्ष रूपयांचा प्रस्ताव तयार करण्यात येऊन नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येऊनही अद्याप सदर प्रस्तावास मान्यता मिळालेली नसणे, या प्रस्तावामुळे जिल्ह्यातील तरूणांना रोजगार मिळणार असून महसुलात मोठ्या प्रमाणात वाढ होणार असणे, या प्रस्तावाचा कृषी पर्यटनाच्या दृष्टीने विचारमर्श करून सदरहू प्रस्तावास मंजूरी मिळण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." "

डॉ.विजयकुमार गावित ( फलोत्पादन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3...



ABG/ MMP/ D/ प्रथम श्री.शिगम 11:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, सदरहू लक्षवेधी सूचना कृषी, पर्यटन विभागाशी संबंधित आहे...

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**उप सभापती** : अशा परिस्थतीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी आता सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 11.42 ते 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

--------

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेण्यासंबंधी

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, काल सभागृहाचे कामकाज सुरु होत असताना सभागृहामध्ये सिंचनाच्या प्रश्नावरुन जो पेच निर्माण झाला होता, त्या विषयाबाबत सत्ताधारी पक्षाने चर्चेची तयारी दर्शविली होती. त्यामुळे आम्ही दोन विषय आग्रहाने मांडण्याचा प्रयत्न करीत होतो त्यातील एक विषय मार्गी लागला. दुसऱ्या विषयाबाबत चर्चा होऊन सकारात्मक निर्णय होईल असे माननीय संसदीय कार्यमंत्री व माननीय मुख्यमंत्री यांनी सांगितले होते. स्वाभाविकपणे विरोधी पक्षाची ही भूमिका आहे की, शक्यतो चर्चेच्या माध्यमातून विषयाला चालना मिळावी. सिंचनाच्या विषयाबाबत ज्या काही जनतेच्या हिताच्या गोष्टी आहेत त्या मांडण्यात याव्यात. एखाद्या विशिष्ट मुद्यावरुन संघर्ष सुरु रहावा अशी आमची मानसिकता नाही.

सभापती महोदय, काल या विषयाबाबत बोलणे झाल्याबाबत आपल्यामार्फत मला माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना हे विचारावयाचे आहे की, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी लेखी पत्रान्वये दिलगिरी व्यक्त केली आहे. त्यानंतर सभागृहात आम्ही आमचे म्हणणे मांडले होते. सरकारने या मुद्याबाबत कोणते धोरण स्वीकारले आहे हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सभागृहात आता जी भूमिका विषद केली, काल देखील हीच भूमिका मांडली होती. सभापती महोदय, काल सभागृहाचे कामकाज सुरु होत असताना आम्ही विरोधी पक्षाचे सर्व माननीय सदस्य सभागृहामध्ये वेलमध्ये येऊन खाली बसलो होतो. सभागृहाच्या कामकाजामध्ये कोणताही व्यत्यय येणार नाही याची देखील आम्ही दक्षता घेतली होती. सभागृहाचे कामकाज व्यवस्थितरित्या चालावे ही आमची मानसिकता आहे.

आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये नियम 260 अन्वये फूड सिक्युरिटीच्या संदर्भातील प्रस्ताव चर्चेला दर्शविण्यात आला आहे. सिंचनाच्या विषयावरील एक प्रस्ताव चर्चेला येणार आहे. या प्रस्तावांवर व्यवस्थित चर्चा व्हावी म्हणून आमची शासनाला आणि आपल्यालाही विनंती आहे की, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या निलंबनाच्या प्रश्नाबाबत आपण मध्यस्थी करावी आणि त्यांचे निलंबन मागे घ्यावे. आपल्या दालनात झालेल्या चर्चेचा रेफरन्स सभागृहात देऊ नये असे संकेत आहेत. परंतु त्या ठिकाणी झालेल्या चर्चेनुसार निर्णय व्हावा अशी आमची प्रामाणिक इच्छा आहे. त्या दृष्टीने आपण सहकार्य करावे अशी माझी नम्र विनंती आहे. 

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, काल कामकाजपत्रिकेवरील निम्मे कामकाज पूर्ण होईपर्यंत आम्ही विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये वेलमध्ये बसून होतो. सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे चालेल याची आम्ही हमी दिली होती. त्यानुसार निम्मे कामकाज कोणताही व्यत्यय न येता पूर्ण झाले. सभागृहाचे नेते आणि राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री यांनी काल सभागृहात जाहीर केले होते की, उद्या सकाळी सिंचनाच्या विषयावरील प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल. सिंचनाच्या विषयावरील प्रस्तावावर सभागृहामध्ये आज, उद्या किंवा नेमकी कोणत्या दिवशी चर्चा होणार आहे हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे. त्यांनी चर्चा घेण्याचे जाहीर केले त्यावेळी सुध्दा आमचे समाधान झालेले नव्हते. म्हणून आम्ही विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य वेलमध्येच बसून होतो. त्यानंतर सभागृहाची बैठक स्थगित करण्यात आली.

सभापती महोदय, बैठक स्थगित झाल्यानंतर माननीय संसदीय कार्यमंत्री व माननीय विरोधी पक्षनेते यांची चर्चा झाल्यानंतर उद्या सभागृहाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी घोषणा होईल आणि एक-दोन दिवसात माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेण्यात येईल असे आम्हाला कळले. त्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरु झाले आणि आम्ही सर्वजण वेलमध्ये न येता आपापल्या जागेवर आसनस्थ झालो व कामकाजात सहभाग घेतला होता. त्यानंतर एक शासकीय विधेयक सर्व संमतीने मंजूर करण्यात आले. या बाबत नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे सभागृहाला कळले पाहिजे.

नंतर यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

आम्हाला जे आश्वासन या सभागृहात देण्यात आले होते ते चुकीचे होते, खोटे होते की, अजून काय होते ते आम्हाला कळले पाहिजे एवढीच या निमित्ताने विनंती आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, काल या सदनामध्ये सभागृहाचे कामकाज होऊ शकले नाही. कामकाजाच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच काही सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली होती व त्या चर्चेच्या माध्यमातून दोन मुद्दे पुढे आले होते. सिंचनाचा किंवा अजून कोणताही विषय असेल तर त्याबद्दल आम्हाला चर्चा करावयाची आहे यासंदर्भात विरोधी पक्षाची मागणी होती. या विषयाच्या संदर्भात शासनाचे धोरण स्पष्ट आहे. माननीय सभापती महोदय, ज्या विषयावर चर्चा करण्याची परवानगी देतील, त्यासाठी जो काही वेळ देतील त्यावर शासनाची चर्चा करण्याची तयारी आहे, याबाबत कोणतेही दुमत असण्याचे काहीच कारण नाही.

सभापती महोदय, काल दोन विषयावर सभागृहात डेड लॉग झाला होता ही वस्तुस्थिती आहे. यासंदर्भात चर्चा झाल्या होत्या. त्या चर्चेमध्ये विरोधी पक्षाकडून आलेल्या विषयावर चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे अशी भूमिका स्पष्ट करण्यात आली होती. या विषयावर चर्चा करण्यासाठी माननीय सभापती महोदय जो काही वेळ ठरवतील, ज्या माध्यमातून चर्चा स्वीकारली जाईल त्याप्रमाणे उत्तर देण्याची सरकारची तयारी आहे हा एक भाग झाला.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या निलंबनाचा होता. या मुद्याच्या संदर्भातही काल चर्चा झाली होती. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे एक पत्र माननीय सभापतींकडे आले असून त्या पत्राची एक प्रत माझ्याकडे, तसेच एक प्रत माननीय मुख्यमंत्र्याकडेही आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी झाल्या प्रकरणाबद्दल दिलगिरी व्यक्त केलेली आहे. त्या पत्रामध्ये त्यांनी "माझ्याकडून चुकून झाले आहे" असे नमूद केलेले आहे. हे पत्र मीडियाकडेही गेलेले आहे. या विषयाच्या संदर्भात आमचा अद्याप निर्णय झाला नसून त्यासंदर्भात चर्चा सुरु असून याबाबत जो काही मार्ग निघेल त्यासंदर्भातील माहिती सभागृहाला अवगत केली जाईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, काल सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यानंतर माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या घोषणेमुळे विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य वेलमध्ये खाली बसले होते. दीड तासानंतर या सभागृहाचे नेते माननीय श्री. अजित पवार साहेब आले व त्यांनी घोषणा केली की, सिंचनावरील चर्चा उद्या सकाळी स्पेशल सिटींगमध्ये 10 वाजताही होऊ शकते, दुपारच्या नंतरही होऊ शकते. माननीय सभापती महोदय, जसा वेळ देतील त्या प्रमाणे आमची सिंचनावर चर्चा करण्याची तयारी आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांचा निलंबनाचा विषय निघाला होता. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या निलंबनाच्या विषयावर माननीय सभापती महोदयांबरोबर चर्चा करुन उद्यापर्यंत निर्णय केला जाईल अशा पध्दतीचे वक्तव्य या सभागृहात करण्यात आले होते. अशा प्रकारचे वक्तव्य झालेले असतांना आज आपण सांगत आहात की, त्यामध्ये सिंचनाचा विषय नव्हताच, इतर विषयासंबंधी चर्चा करु. सिंचनाच्या विषयासंबंधी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती की, आमची सिंचनाच्या संदर्भात चर्चा करण्याची तयारी आहे. उद्या सिंचनाच्या प्रस्तावर सभागृहात चर्चा केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेतल्यानंतर सिंचनाच्या विषयाला सुरुवात केली जाईल असेही सांगण्यात आले होते. परंतु यासंदर्भात काही वेगळे झाले असेल तर ते सभागृहाला समजले पाहिजे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मला असे वाटते की, चर्चा करण्याच्या संदर्भात आपल्याकडून प्रस्ताव आला आहे किंवा नाही याची मला माहिती नाही. परंतु याबाबतीत माननीय मुख्यमंत्री काल जे काही म्हणाले होते तेच मी येथे सांगतो आहे. सिंचनाच्या संदर्भात शासनाची चर्चा करण्याची तयारी आहे. सिंचनाच्या संदर्भात आपण वेळ ठरवावा, ही चर्चा कोणत्या नियमाखाली करावयाची आहे हे ठरवले तर त्यावर उत्तर देण्याची सरकारची तयारी आहे.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या निलंबनाच्या बाबतीत काल चर्चा झाली होती. अद्याप ही चर्चा सुरु आहे. चर्चा झाल्यानंतर जो काही निर्णय होईल तो सभागृहाला अवगत केला जाईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय उपसभापती महोदयांनी निर्णय दिलेला आहे. परंतु यासंदर्भात काय झाले होते त्यासंदर्भातील बाब मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, आज सकाळी लक्षवेधी सूचनेवर चर्चा सुरु होती. त्यामध्ये एका लक्षवेधी सूचनेला 40 मिनिटे देण्यात आली व मराठवाडयाच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या लक्षवेधी सूचनेला केवळ 8/9 मिनिटांचा वेळ देण्यात आलस. या लक्षवेधी सूचनेच्या उत्तरावरुन वाद-विवाद झाल्यामुळे ही लक्षवेधी सूचना केवळ 8/9 मिनिटांमध्ये संपविण्यात आली. त्यामुळे ही लक्षेवधी सूचना राखून ठेवण्यात यावी अशी माझी आपल्याला विनंती असल्यामुळे ही बाब मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, लक्षवेधी सूचनांना न्याय मिळावा म्हणून आज सकाळी लक्षवेधी सूचनांसाठी विशेष बैठक घेण्यात आली होती. वेळ नसताना देखील लक्षवेधी सूचनांसाठी विशेष बैठक घेण्यात आली होती. सन्माननीय सदस्य एका लक्षवेधी सूचनेसाठी 40-40 मिनिटे घेऊ लागले तर आपण कितीही प्रयत्न केला तरी 4-5 लक्षवेधी सूचनेच्या पुढे जाऊ असे मला वाटत नाही. आपली लक्षवेधी सूचना ही महत्त्वाची होती याची मला देखील जाणीव होती.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नाला न्याय मिळावा अशी आपली देखील महत्त्वाची भूमिका होती म्हणून आपण लक्षवेधी सूचना मान्य केली. पण आपल्या या भूमिकेलाच हरताळ फासला गेला आहे. आम्हाला न्यायच मिळाला नाही. डोंगर पोखरून उंदीर काढला असे म्हणतात. पण येथे उंदीर पण नाही निघाला आणि मुंगीपण निघाली नाही. या लक्षवेधी सूचनेला शासनातर्फे गोलगोल उत्तर देण्यात आले आहे. मराठवाड्यातील लोकांसाठी पिण्याचे पाणी सोडावे एवढीच मागणी आम्ही सरकारकडे करीत असून ती देखील मागणी शासन पूर्ण करीत नाही. या प्रश्नावर कितीही मोठे किंवा छोटे उत्तर दिले तरी हा प्रश्न सुटत नाही. सभापती महोदय, आपण न्याय मिळावा म्हणून ही लक्षवेधी सूचना आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविली होती. पण आपल्या आदेशानुसार न्याय मिळालेला नाही. त्यामुळे सदर लक्षवेधी सूचना राखून ठेवून उद्या ही लक्षवेधी सूचना घ्यावी व तसे निदेश आपण शासनाला द्यावेत अशी विनंती करीत आहे. आपण जर असे केले तरच मराठवाड्याला न्याय मिळेल. आपण न्यायमूर्ती असल्यामुळे आम्हाला न्यायाची अपेक्षा आहे. धन्यवाद.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, यासंबंधीचे निदेश मी लगेच देणार नाही. या संबंधातील कागदपत्रे मी माझ्या दालनात पाहतो. खरेच अन्याय झाला असेल तर त्यास न्याय देण्याचा माझा प्रयत्न राहील.

श्री.विनायक मेटे : धन्यवाद.

...........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**राज्यातील शारिरीक व मानसिक आव्हाने असलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबत**

**(1) * 42975 श्री.कपिल पाटील** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) राज्यात अंधत्व, अपंगत्व, कर्णबधिरता, गतिमंदता आणि आत्ममग्नता अशी शारीरिक, मानसिक आव्हाने असलेल्या 48 शाळांमधील विद्यार्थ्यांचे शिक्षण शासनाचे धरसोडीचे धोरण, अपुरे कर्मचारी आणि अपुरा निधी यामुळे अडचणीत आले आहे, हे खरे आहे काय,
(2) तसेच, मा.उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतरही अतिरिक्त कर्मचाऱ्यांना मूळ संस्थामध्ये अद्यापी समावून घेतलेले नाही, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

##श्री.शिवाजीराव मोघे : (1) हे खरे नाही.
(2) हे खरे नाही, दि.18.04.2004 च्या शासन निर्णयानुसार अतिरिक्त होणाऱ्या पदांवरील कर्मचारी सध्या त्याच मुळ शाळेत / कर्मशाळेत कार्यरत आहेत. त्यांना अतिरिक्त ठरवून कामावरुन कमी केलेले नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ज्या उद्देशाने मी हा प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाला "हे खरे नाही" अशा प्रकारचे उत्तर शासनातर्फे देण्यात आले आहे ही अतिशय खेदाची बाब आहे. मी माझ्या पहिल्या प्रश्नात शासनाचे धोरण, अपूर्ण कर्मचारी आणि अपूर्ण निधी या तीन बाबी विचारल्या होत्या. आम्ही नेहमी कर्मचारी आणि शिक्षकांपुरताच प्रश्न विचारतो अशी बाब गृहीत धरून येथे दिलेले उत्तर आक्षेपार्ह आहे. ज्यांना शारीरिक, मानसिक दौर्बाल्य असते, जी फिझिकली चॅलेंज मुले आहेत अशा विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या सर्व सुविधा दिल्या जातात काय असा प्रश्न विचारला होता. अशा मुलांना सर्व सुविधा दिल्या पाहिजेत असे केंद्र शासनाचा राईट टु एज्युकेशन कायदा सांगतो. संयुक्त राष्ट्र संघाच्या करारावर भारत सरकारने सही केली आहे. त्यात ज्या तरतुदी आहेत त्यातील एकही तरतूद महाराष्ट्र शासनाने केली नाही हे खरे आहे काय, अशा मुलांसाठी ज्या सुविधा निर्माण करावयाच्या आहेत त्याची

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42975...

तरतूद तर दूर राहिली, पण त्यासाठी आवश्यक असलेले कर्मचारी आहेत ते अतिरिक्त ठरविण्यात आले आहेत. आपण झिरो बजेटींग ठरविले आहे ते येथे लावले. तेथील सर्व कर्मचारी काढून घेतले. त्यामुळे या मुलांना आधार द्यायला कोणीच नाही अशी स्थिती आहे. यात अंध, अपंग, गतिमंद, मतिमंद, ज्यांना काहीच कळत नाही अशी मुले आहेत. एवढेच नव्हे तर आत्ममग्न मुले आहेत. त्यांच्यासाठी असलेला कर्मचारी वर्ग आपण काढून घेतला आहे. त्याबद्दल शासन काय करणार आहे ? शारीरिक दौर्बल्य मुलांमध्ये एचआयव्ही बाधित मुलांचा देखील समावेश केला पाहिजे. आज त्यांच्यासाठी कोणतीच सुविधा दिलेली नाही. शासन प्रती विद्यार्थी फक्त 21 रूपये देत आहे. येथील जे कर्मचारी आहेत त्यांना पगार देखील नाही. मग कर्मचारी कुठून आणणार आहात ? 21 रूपयांमध्ये या मुलांना कोण सांभाळणार आहे ? उद्या काही गडबड झाली तर त्यातून आणखी प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. ही अतिशय संवेदनशील मुले आहेत. असे तीन वेगवेगळे प्रश्न आहेत. या तीन प्रश्नांचे समाधान माननीय मंत्री महोदय करतील काय असा माझा प्रश्न आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, येथे जे उत्तर देण्यात आले आहे ते 48 शाळांसंबंधी आहे. हे उत्तर बऱ्याच शाळांना लागू आहे. अपुरा कर्मचारी आणि अपुरा निधी यासंबंधी प्रश्न विचारला आहे. आपण निधी व्यवस्थित देत आहोत. केंद्र शासनाचा 1995 चा कायदा आहे त्यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. आमचा जो पॅटर्न आहे तो एज्युकेशन डिपार्टमेंट प्रमाणे असतो. आरटीइमध्ये सुधारणा झाली तर ती सुधारणा एज्युकेशन विभाग संपूर्ण राज्याला लागू करते. त्याप्रमाणे आम्ही ती सुधारणा राज्याला लागू करू.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42975....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे हे अनुभवी व ज्येष्ठ मंत्री आहेत. एक कुशल नेतृत्व म्हणून राज्य त्यांच्याकडे पाहत आहे. त्यांच्याकडे महत्वाचा विभाग दिलेला आहे. अपंग शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना अनुदान द्यावे यासाठी अपंग लोक मंत्रालयात खेपा मारत आहेत ही अतिशय लाजीरवाणी गोष्ट आहे. अपंग शाळांचे मूल्यांकन झाले आहे. त्यांचे प्रस्ताव शासनाकडे आलेले आहेत, अशा अपंग शाळांना शासन केव्हा अनुदान देणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या पूर्वी सांगितलेले आहे की, देशात सर्वात जास्त अनुदानित कार्यशाळा आणि अपंगांच्या शाळा महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रात एकूण 729 शाळा आहेत. आणखी शाळा देण्याचे आमचे प्रयत्न आहेत. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत या शाळांची तपासणी करण्यात आली. त्यानुसार "अ" वर्गातील 106 शाळा तर "ब" वर्गातील 63 शाळा आहेत. हा विषय मंत्रिमंडळापुढे आणून त्यावर लवकर निर्णय घेण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन कोणत्या विभागामार्फत देण्यात येते ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, कर्मचाऱ्यांचा पगार त्या-त्या संस्थेमार्फत दिला जातो. उच्च न्यायालयात लढाई सुरु आहेत. सन 2004 पूर्वी आकृतिबंधामध्ये बदल झाला त्यानुसार स्टाफ कमी झाला होता म्हणून शासनाने ॲडीशनल स्टाफ दिला. त्या स्टाफला काढून टाकायचे की कंटीन्यू करायचे या संदर्भात उच्च न्यायालयाचे अनेक निर्णय झाले. दिनांक 5 मार्च 2013 रोजी एक निकाल लागला आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याला कमी करु नये अशी शासनाची भूमिका होती आणि शासनाने कोणत्याही कर्मचाऱ्याला कमी केलेले नाही. टिचिंग स्टाफमध्ये जी अतिरिक्त पदे होती त्या पदावरुन सेवानिवृत्त झाल्यानंतर ती पदे भरण्यात येऊ नये. जर ती पदे भरण्याची आवश्यकता असेल तर ती स्पेशल म्हणून भरण्यात यावीत. नॉन टीचिंग स्टाफ कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने भरण्यात यावा आणि ती बाब न्यायालयाने मान्य केलेली आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, मतिमंद मुलांना मिळणारी शिष्यवृत्ती अतिशय अल्प आहे. असे असताना देखील मागील दोन वर्षापासून ही शिष्यवृत्ती दिलेली नाही हे खरे आहे काय ? माझा दुसरा प्रश्न आहे कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी सेवेत सामावून घेण्यात येईल काय ?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42975....

श्री.शिवाजीराव मोघे :सभापती महोदय, कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर कोणतेही कर्मचारी नाहीत. सर्व रेग्युलर बेसिसवर आहेत.

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, राईट टू एज्युकेशन कायदा लागू झाल्यावर त्याची अंमलबजावणी करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. खरे म्हणजे हा कायदा या शैक्षणिक वर्षापासून लागू झालेला आहे. त्यानुसार सर्व बदल सुरु झालेले आहेत. तेव्हा आपण या कायद्याची अंमलबजावणी केव्हा करणार आहात आणि विद्यार्थ्यांना त्या सुविधा केव्हा उपलब्ध करुन देणार आहात ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर मी दिलेले आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, मूकबधिर आणि अपंगाच्या सर्वात जास्त शाळा महाराष्ट्र राज्यात आहेत. त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, "अ" वर्गातील 106 आहेत तर "ब"वर्गातील 63 शाळा आहेत आणि आम्ही त्या संदर्भात लवकर मंत्रिमंडळापुढे जाणार आहोत. माननीय मंत्री महोदयांचे हे उत्तर आम्ही अनेक वेळा ऐकले आहे. माझा प्रश्न आहे की, पुढील अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळापुढे जाऊन त्या संदर्भात निर्णय घेणार काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, तसे पूर्ण प्रयत्न करण्यात येतील.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42975....

श्री.कपिल पाटील : महोदय, माननीय मंत्र्यांनी मघाशी उत्तर दिले की, शिक्षक निवृत्त झाल्यानंतर त्या शिक्षकांची पदे भरली जाणार नाहीत. याचाच अर्थ त्या शाळांसाठी जे शिक्षक हवे आहेत ते शासनाकडून काढून घेतले जाणार आहेत आणि त्यांना नव्याने शिक्षक दिले जाणार नाहीत. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, या पध्दतीमध्ये शासन बदल करणार काय ? तसेच आरटीई आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या करारामध्ये ज्या तरतुदी आहेत त्यांची अंमलबजावणी सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यासाठी तातडीने विधिमंडळ सदस्य व या क्षेत्रातील तज्ज्ञांना विश्वासात घेऊन काही बदल करण्यात येतील काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, या शाळांमध्ये आकृतिबंधानुसार जो स्टाफ आहे तो एक्सेस आहे. त्यामुळे जे एक्सेस शिक्षक आहेत त्यांना आम्ही आताच काढत नाही. एक्सेस शिक्षक ज्यावेळी निवृत्त होतील त्यावेळी त्यांच्या ऐवजी दुसऱ्या शिक्षकांना घेऊ नये हा विषय आहे.

श्री.भगवान साळुंखे : महोदय, सांगली जिल्ह्यातील एकात्मिक शिक्षण योजनेतील काही शिक्षकांना समायोजित करण्यात सामाजिक न्याय विभाग कमी पडले. त्यामुळे ते शिक्षक उच्च न्यायालयात गेले. उच्च न्यायालयाने त्या शिक्षकांना समायोजित करुन घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी केव्हापासून केली जाणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी उच्च न्यायालयाची 5 मार्च रोजीची रिसेन्ट ऑर्डर वाचून दाखविली आहे. त्या ऑर्डरनुसार अंमलबजावणी होईल.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बीड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याअभावी मोरांचा होत असलेला मृत्यू**

**(२) * ४२२०८ श्री.एम.एम.शेख , श्री.सतीश चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याच्या शोधात भटकंती करीत असलेल्या हरणांचा शिरुर, आष्टी व अंबाजोगाई तालुक्यात तसेच अनेक ठिकाणी पाण्याअभावी मोरांचा माहे मे २०१३ मध्ये वा त्या दरम्यान मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्य प्राण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पाणवठ्यात पाणी नसल्यामुळे वन्यजीव रस्त्यावर इतर ठिकाणी येवून मृत्युमुखी पडत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वन विभागातर्फे पशु व पक्ष्यांना पाणी मिळावे यासाठी कोण कोणत्या ठिकाणी उपाययोजना करण्यात आलेल्या होत्या, व भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) तसेच यासाठी वन्यजीव संरक्षण व संवर्धन संस्था, सामाजिक संस्था व वन प्रेमी संस्थांची मदत घेण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

**डॉ.पतंगराव कदम** : (१) व (२) बीड वनविभागात पाण्याअभावी मोरांचा माहे मे, २०१३ मध्ये मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि शिरुर तालुक्यात पाण्याचे शोधात एक काळविटाचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आलेली आहे.

(३) बीड वन विभागात ४९ कृत्रिम पाणवठे तयार करण्यात आलेले आहेत. त्यापैकी आष्टी तालुक्यात ०७ शिरुर तालुक्यात ०३ आंबाजोगाई तालुक्यात ०८ कृत्रिम पाणवठे तयार करण्यात आलेले आहेत. याशिवाय महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सहकार्याने बीड व गेवराई तालुक्यात अनुक्रमे १० व ३ सिमेंट टाक्या ठेवण्यात आल्या आहेत. तसेच बीड वन परिक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांनी वर्गणी गोळा करुन बेलगाव ता.बीड चे स.नं.३४८ मध्ये विंधन विहिर घेऊन हातपंप बसवला आहे. तसेच आष्टी तालुक्यातील मातावळी व शिरुर कासार तालुक्यातील दहीवंडी येथे प्रत्येकी एक विधंन विहिर घेवून त्यावर सोलार पंप बसवून वन्यप्राण्यासाठी पाणी पुरवठा करण्यात आला.

(४) बीड वनविभागात सामाजिक संस्था व वन प्रेमी संस्थाची मदत घेवून वनक्षेत्रात सिमेंटच्या पाण्याच्या टाक्या बसविण्यात आलेल्या असुन त्यामध्ये पिण्याचे पाणी नियमीत टाकण्यात येते व वन्यपशु व पक्षांसाठी खाद्यान्नाची सोय करण्यात आलेली आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, माननीय वन मंत्री व त्यांचा विभाग अतिशय धाडसी काम करुन वाघांची मोजदाद करतात. बीड जिल्ह्यात मोर आणि हरणांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, वाघांची जशी मोजदाद केली जाते तशाच प्रकारे बीड जिल्ह्यातील मोर व हरणांची मोजदाद करण्यात येईल काय ?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42208....

डॉ.पतंगराव कदम : महोदय, बीड जिल्ह्यात मोरांची संख्या साधारणपणे 10 हजार आहे. हरणांच्या कळपांची संख्या सुध्दा सातत्याने वाढत आहे. शिवाय यामध्ये काळवीट सुध्दा बऱ्याच प्रमाणावर आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : महोदय, माननीय डॉ.पतंगराव कदम हे वन मंत्री झाल्यापासून ते पशु, पक्षी, हरीण इत्यादींची मोठ्या प्रमाणावर काळजी घेत आहेत. पोपटांना पिंजऱ्यातून बाहेर काढण्याचे काम माननीय वन मंत्र्यांनी केले आहे. असे करुन एकप्रकारे त्यांनी राज्यात पोपटपंची बंद करण्याचे काम केले आहे, त्यामुळे या सर्व कामांबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या निमित्ताने मी त्यांना विचारु इच्छितो की, बीड जिल्ह्यातील आष्टी, शिरुर व अंबेजोगाई या ठिकाणी वन्य पशु-पक्षांसाठी करण्यात आलेल्या सुविधांवर शासनाने किती खर्च केला आहे ? बीड जिल्ह्यातील दुष्काळाबाबत त्या जिल्ह्यातील सन्माननीय सदस्य आजही संताप व्यक्त करीत असल्याचे बघतो. अजूनही त्या भागात पाण्याची व्यवस्था नाही. मी एवढेच विचारतो की, मोर वा पशु-पक्षांसाठी पाणी टँकरने आणले की विमानाने आणले ?

डॉ.पतंगराव कदम : महोदय, त्या भागात पशु-पक्ष्यांना पिण्यासाठी पाणी मिळावे म्हणून छोटेछोटे वनतळे करण्यात आले. सन्माननीय सदस्यांना त्याचे फोटो दाखविण्यासाठी मी आणलेले आहेत. त्या वनतळ्यांवर मोर कशा प्रकारे पाणी पित आहेत हे त्यांना फोटावरुन दिसून येईल. सन्माननीय सदस्यांनी माझ्या दालनात येऊन हे फोटो बघावेत. शासनाने पहिल्यांदा निर्णय घेऊन या कामासाठी 1 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. सौरऊर्जेचे सुध्दा काम केले आहे. प्राण्यांना जंगलात खाद्य आणि पाणी मिळाले नाही तर ते गावात येतात. सन्माननीय सदस्यांना या संदर्भातील सर्व आकडे हवे असतील तर माझ्याकडे तयार आहेत. आवश्यकता वाटल्यास या बाबतची आकडेवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : महोदय, मोरांच्या वाईट परिस्थितीबद्दल या सभागृहात या पूर्वी प्रश्न उपस्थित झालेले आहेत. मोरांना सुरक्षित वातावरण मिळावे म्हणून कार्यवाही केली जाते. कर्नाळा येथील पक्षासाठी अभयारण्य केले असून ते वन विभागाच्या अखत्यारीत आहे. राज्य सरकारने पशु-पक्षांच्या संदर्भात अभयारण्याच्या दृष्टीने पाऊले उचलली आहेत. परंतु प्रत्यक्षात तेथे पक्षी राहिलेले नाहीत. जवळजवळ अभयारण्यातील पिंजरे किंवा झाडांवरील व्यवस्था अपुरी आहे.

नंतर श्री.बरवड....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42208.... डॉ. नीलम गोऱ्हे....

या अभयारण्याच्या संदर्भात काय पावले उचललेली आहेत ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, या राज्यामध्ये अभयारण्यामध्ये जास्तीत जास्त झाडे लावण्याचा पहिला मोठा कार्यक्रम घेतलेला आहे. गेल्या वर्षी 13 हजार झाडे लावली पण दुष्काळामुळे जास्त झाडे टिकली नाहीत. या वर्षी सुध्दा सर्व विभागांचा सहभाग घेऊन 20 कोटी झाडे लागणार आहेत. आता पावसाळा सुरु झालेला आहे. झाडे असल्याशिवाय पाऊस पडणार नाही. याचे साधे उदाहरण सांगावयाचे झाले तर सातारा जिल्ह्यामध्ये महाबळेश्वरला प्रचंड पाऊस पडतो आणि माण, खटाव भागामध्ये अजूनही पाऊस नाही. परवाच आम्ही विदर्भात जाऊन आलो. त्यावेळी पालकमंत्री सुध्दा उपस्थित होते. आम्ही कारंजा, चंद्रपूर तसेच अनेक ठिकाणी जाऊन आलो. आम्ही संपूर्ण विदर्भातील नुकसानीचा सखोल आढावा घेतलेला आहे. तो विषय आल्यावर शासन काय करणार आहे त्या बाबतीत निवेदन करण्यात येईल. या पशुपक्षांच्या दृष्टीने पाण्यासाठी वनतळी, सौर ऊर्जा अशा सर्व व्यवस्था केलेल्या आहेत.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी चांगले उत्तर दिले की, त्या भागामध्ये जवळपास 10 हजार मोर आहेत. बीड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याची टंचाई निर्माण झाली आणि पाणी न मिळाल्यामुळे मोर मृत्युमुखी पडले. आपल्याला जिवंत मोरांची अचूक संख्या मोजता येणार नाही पण मेलेल्या मोरांची अचूक संख्या मोजता येते. वन अधिकाऱ्यांनी त्या महिन्यामध्ये किती मोर मृत्युमुखी पडले याची नोंद घेतली का आणि ती संख्या किती आहे ?

डॉ. पतंगराव कदम : मेलेल्या मोर आणि लांडोरींची मिळून संख्या साधारणत: 4 आहे. त्यांचे पोस्टमार्टेम झालेले आहे आणि त्यानुसार सनस्ट्रोकमुळे हे 4 मृत्यू झालेले आहेत. हे मृत्यू पिण्याच्या पाण्यामुळे झालेले नाहीत.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, बीड वन विभागात 49 कृत्रिम पाणवटे तयार करण्यात आलेले आहेत. बीड जिल्ह्यामध्ये नायगाव या ठिकाणी मयूर अभयारण्य आहे. त्या ठिकाणी किती पाणवठे आहेत त्याचा उल्लेख केलेला नाही. तेथील मोरांना पाणी लागत नाही का ? मे, 2013 मध्ये जरी मृत्युमुखी पडले नसतील पण

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

ता. प्र. क्र. 42208.... श्री. विनायक मेटे ....

आतापर्यंत त्या मयूर अभयारण्यामध्ये किती मोर मृत्युमुखी पडले ? या मयूर अभयारण्याकरिता या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली आहे का ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, किती मोर मेले या बाबतीत मी आताच उत्तर दिलेले आहे. नायगाव अभयारण्यामध्ये 35 पाणवटे तयार केलेले आहेत.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

**रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात वाळू उपशावर बंदी असतानाही मेरीटाईम बोर्डाने वाळू उपशासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिल्याबाबत**

**(३) * ४१८४२ श्री.विनायक राऊत , श्री.रामदास कदम , ॲड.अनिल परब , डॉ.दीपक सावंत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात वाळू उपशावर तात्पुरती बंदी असतानाही मेरीटाईम बोर्डाने वाळू उपशासाठी ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) देऊन त्यासाठी चुकीचे दर आकारल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडविल्याचे माहे एप्रिल, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) या प्रकरणी अद्यापही चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) मेरीटाईम बोर्डाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खाडीपात्रातील वाळू उपशासाठी ना-हरकत दिली होती.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यावरण अनुमतीस अधिस्थगन असल्यामुळे वाळू/रेती उत्खननास परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे शासनाच्या महसूलाचे नुकसान झाले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये थोडी दुरुस्ती करु इच्छितो. प्रश्न क्रमांक 1 च्या उत्तरामध्ये "मेरीटाईम बोर्डाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील" या ऐवजी "मेरीटाईम बोर्डाने रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील" असे वाचावे.

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, वाळू उपशाच्या संदर्भात माझा प्रश्न स्पेसिफिक होता. या ठिकाणी उत्तर देत असताना पहिल्या प्रश्नाला असे उत्तर दिले आहे की, मेरीटाईम बोर्डाने रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खाडीपात्रातील वाळू उपशासाठी ना-हरकत दिली आहे. पुढे असे म्हटले आहे की, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यावरण अनुमतीस अधिस्थगन असल्यामुळे वाळू/रेती उत्खननास परवानगी देण्यात आलेली नाही. वाळू उपसा आणि वाळू उत्खनन यामध्ये शक्यतो सरसकट वाळू उपसा केला जातो,उत्खनन केले जात नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41842..... श्री.विनायक राऊत....

माझा प्रश्न असा आहे की, या दोन्ही जिल्ह्यांमध्ये मोरोट्रम लागू असल्यामुळे मेरीटाईम बोर्डाला ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचा अधिकार आहे काय, असल्यास त्यांनी किती ठिकाणी वाळू उपशासाठी परवानगी दिलेली आहे आणि त्यातून किती महसूल वसूल करण्यात आला आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मेरीटाईम बोर्डाने रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये वाळू उपशासाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिले होते. परंतु प्रा.माधव गाडगीळ समितीने वेस्टर्न घाट इकोलॉजिकल एक्सपर्ट पॅनलने जो अहवाल दिला आहे त्यामध्ये उत्खननाला, पूर्णपणे या विकासाला प्रतिबंध केलेला आहे. त्यामुळे त्यांनी एनओसी दिली असली तरी तेथील उत्खनन किंवा त्या घाटाचे लिलाव करु शकलेलो नाही ही वस्तुस्थिती आहे. शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडाला असे सन्माननीय सदस्यांनी म्हटलेले आहे. वाळू उपशासाठी अगोदर स्थगिती दिलेली होती. ती उठल्यानंतर वाळूचा उपसा किंवा लिलाव केला जाणार होता. वाळूचा साठा निश्चित केला जाणे, त्याची तयारी ठेवली जाते, ही एक प्रक्रिया आहे. ज्यावेळी स्थगिती उठेल त्यावेळी तो साठा लिलावासाठी उपलब्ध होत असतो. त्यामुळे शासनाचे नुकसान होण्याचे कारण नाही. मेरीटाईम बोर्डाला खर्च येतो तो लिलाव घेतलेल्या लोकांकडून वसूल केला जातो.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये वाळू उपशासाठी तात्पुरती बंदी असतानाही मेरीटाईम बोर्डाने एनओसी दिली व चुकीचे दर लावल्यामुळे सरकारच्या महसुलामध्ये मोठी घट झाली असे कॅगने अहवालात नमूद केलेले आहे. रेडी, दाभोळ, विजयदुर्ग, जयगड, रत्नागिरी आदि बंदरे खाजगी विकासकांना दिलेली असतानाही रेडी व दिघी बंदराची भाड्याची 10.60 कोटी इतकी रक्कम कमी प्राप्त झाल्याने सरकारचे नुकसान झालेले आहे. मेरीटाईम बोर्डाच्या चुकीच्या आदेशामुळे सरकारचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांनी चुकीचा आदेश दिला आहे त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे का ?

श्री.बाळासाहेब थोरात : वाळू किंवा गौण खनिज हा विषय महसूल विभागाचा आहे. परंतु दिघी बंदराचा विषय महसूल विभागाच्या अंतर्गत येत नाही. मेरीटाईम बोर्ड सर्वेक्षण करीत असते. साठे निश्चित करीत असते. त्याची फी कशी ठरवावयाची हा एक विषय असतो. सर्वेक्षणासाठी बोटी वापरल्या जातात, त्यासाठी दिवसाला 16 हजार रुपये खर्च होतो. तो खर्च लिलाव

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेणाऱ्याकडून वसूल केला जातो.  इतका सरळ हा विषय आहे.  यामध्ये इतर काही अडचण नाही.

ॲड.अनिल परब : प्रा.माधव गाडगीळ समितीने स्थगिती दिलेली आहे, असे मंत्री महोदयांनी आताच सांगितलेले आहे.  तरीही या दोन जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृतपणे वाळूचा उपसा होत आहे.  वाळूच्या उपशाला स्थगिती दिलेली असताना वाळूचा उपसा करणाऱ्या कितीजणांवर कोणती शासनाने कारवाई केली आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : वाळूचा उपसा करणाऱ्यांविरुध्द केलेल्या कारवाईबाबतची माहिती सन्माननीय सदस्यांनी विचारली आहे.  ती आकडेवारी सध्या माझ्याजवळ उपलब्ध नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा धोरणात्मक विषय आहे.  याबाबत गाडगीळ समितीने शासनाला अहवाल दिलेला आहे.  माझ्या माहिती प्रमाणे कस्तुरीरंगन समितीने वाळू व गौण खनिजचा अहवाल स्वीकारलेला आहे.  हा अहवाल स्वीकारला तर कोकणामध्ये कोणतेही विकासाचे काम होणार नाही.  या सभागृहामध्ये यासंबंधी मी यापूर्वीही प्रश्न विचारला होता. त्यामुळे या प्रश्नासंबंधी कोकणातील सर्व आमदारांची माननीय मुख्यमंत्र्यांच्या समवेत बैठक घेतली जाईल काय ? हा प्रश्न खूप व्यापक झालेला आहे.  त्यामुळे अनेक ठिकाणी मोर्चे निघालेले आहेत, आंदोलने झालेली आहेत.  कोकणातील विकास पूर्णपणे ठप्प झालेला आहे.  याबाबत शासनाचा खर्च होणार नाही, खासदार किंवा आमदार फंड यासाठी खर्च होणार नाही.  त्यासाठी शासनाने तातडीने कोणत्या उपाययोजना करणार आहे, यासाठी मी मघाशी म्हटल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये कोकणातील सर्व आमदारांची एक बैठक बोलविली जाईल काय ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : मी आधीच्या प्रश्नाला उत्तर देऊ इच्छितो. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये 1 एप्रिल ते 30 जून पर्यंत 214 प्रकरणामध्ये 22 लाख रुपये दंड वसूल करण्यात आला. 11 गुन्हे दाखल करण्यात आले आणि 11 आरोपींना अटक करण्यात आली. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 246 प्रकरणामध्ये 16 लाख 34 हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आणि 1 गुन्हा दाखल करण्यात आला.

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारला. कोकणातील विकास कामांना गाडगीळ समितीच्या शिफारशींमुळे बंधने आली. सातपुडा पर्वतापासून कोकण पट्टा हा इकोसेन्सेटीव्ह झोन म्हणून जाहीर केलेला आहे. या पट्टयामध्ये कर्नाटक, केरळ या राज्यातील काही भागाचा समावेश झालेला आहे. या पट्टयातील नैसर्गिक वैविध्य जपले जावे यासाठी प्रा. माधव गाडगीळ समिती नेमण्यात आली होती. या समितीने तीन प्रकारचे झोन निश्चित केले. यामध्ये जिल्हा, तालुका, गाव यांचा समावेश आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे या इकोसेन्सेटीव्ह झोनच्या पट्टयामध्ये येतात. त्यानंतर कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली 9 सदस्यांची दुसरी समिती नेमण्यात आली. या समितीने अहवाल दिलेला आहे. या दोन जिल्ह्यातील संपूर्ण विकास ठप्प होईल अशा गाडगीळ समितीच्या शिफारशी आहेत. कस्तुरीरंगन समितीने विकासास काही अटीवर परवानगी द्यावी असे म्हटलेले आहे. या कस्तुरीरंगन समितीच्या शिफारशी पाहिल्या तर पुढे काही विकास होईल अशी परिस्थिती नाही. या समितीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने देखील प्रतिनिधीत्व करण्यात आले होते. एका सदस्याने इको झोनमध्ये संपूर्ण बंदी घालणे व्यवहार्य नाही असे समितीमध्ये स्पष्टपणे सांगितले होते. या जिल्ह्यामध्ये औद्योगिक विकासास तसेच गौण खनिज उत्खननास परवानगी देण्यात यावी अशी मागणी राज्याच्या वतीने करण्यात आली होती. ही परवानगी अद्याप मान्य झालेली नाही. 31 जुलै पर्यंत त्यास स्थगिती आहे. पूर्वानुभवाप्रमाणे ही स्थगिती आणखी एक दोन महिने पुढे वाढविली जाईल. जेव्हा केन्द्रीय पर्यावरण मंत्री महोदया श्रीमती जयंती नटराजन मुंबईमध्ये आल्या होत्या त्यावेळी ही बंदी उठवावी अशी मागणी माननीय मुख्य मंत्री महोदयांनी त्यांच्याकडे केली होती.

===2==



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र.क्र. 41842...

श्री. प्रकाश बिनसाळे : ट्रकने वाळूची वाहतूक करताना त्यांना बारकोडच्या पावत्या दिल्या जातात. जळगावमध्ये डयुप्लीकेट पावती दाखवून वाळू नेली जात असताना एका ट्रकला पकडण्यात आले हे खरे आहे काय, असल्यास अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कोणती कारवाई करण्यात आलेली आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : हा प्रश्न मूळ प्रश्नाशी विसंगत आहे. या प्रश्नाच्या माहितीसाठी सन्माननीय सदस्यांची स्वतंत्रपणे वेगळा प्रश्न विचारावयास पाहिजे. तरीही मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण बारकोडची पावती देणे आणि त्याची चेकिंग करणे सुरु केलेले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : मेरिटाईम बोर्डाने वाळू उपशासाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. प्रत्यक्षात उत्खननाची परवानगी महसूल खात्या मार्फत दिली जाते. ही उत्खनाची परवानगी महसूल विभागाने दिली होती काय ?

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41842...

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, सिंधुदुर्ग, रत्नागिरी येथे विशेषत: सरकारी निधीतून बांधकाम झालेले आहे. त्या बांधकामास रेती कोठून आणली ? त्या ठिकाणी आमदार फंड, खासदार फंडातून रस्ते दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे, त्या कामांसाठी रेती रायगड, कोल्हापूर येथील आणली आहे काय, तेथून रेती आणली नसेल तर बेकायदा रेतीचा उपसा करुन त्या कामांसाठी आणली असेल तर संबंधितावर महसूल विभागाने काय कारवाई केली आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मेरीटाईम बोर्ड एवढेच पाहते की, पाण्याचे जे चॅनल्स आहेत, त्या ठिकाणी वाळुचे साठे आहेत. त्या ठिकाणचे वाळुच्या साठयांचा उपसा करुन ते चॅलन्स मोकळे ठेवले जात असतात. ते चॅनल्स मोकळे रहावेत म्हणून तेथील वाळूचा काही साठा उपसा करण्यासाठी मेरीटाईम बोर्ड परवानगी देत असते. या ठिकाणी मेरीटाईम बोर्डाने अशा प्रकारची एनओसी दिली होती. यासबंधीची स्थगिती उठली तर तातडतोबीने कामास सुरुवात करता येईल यासाठी आपण सर्व तयारी केलेली असते. दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, दुसऱ्या राज्यातून, दुसऱ्या जिल्हयातून वाळू येत असून काही ठिकाणी बांधकामे सुरु आहेत.

------------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे लोणाड (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील शेतकऱ्यांच्या वडिलोपार्जित वहिवाटीचा रस्ता बंद केल्याबाबत**

**(४) * ४३००७ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३६९४२ ला दिनांक २५ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लोणाड (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्व्हे नंबर, ११, हिस्सा नं. १ पै या जमिनीतून जाणारा शेतकऱ्यांच्या वडिलोपार्जित वहिवाटीचा रस्ता बंद केल्याबाबत दिलेल्या उत्तरात "मंजूर क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्रावर बांधकाम सुरु केले" अशी वस्तुस्थिती असल्याचे शासनाने मान्य केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.कमलेश सदाभाई पटेल यांना जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या आदेशान्वये १० टक्के बांधकामाची परवानगी दिली असताना त्यांनी एकूण क्षेत्राच्या ७० टक्के बांधकाम केले असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या पहाणीत आढळून आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी तहसिलदार, भिवंडी यांचेकडे कोणत्याही प्रकारची सुनावणी घेण्याबाबत अर्ज केलेला नसताना प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याची चुकीची माहिती देऊन तहसिलदारांनी शासनाची दिशाभूल केली असल्यामुळे त्यांचेवर तसेच अवैध बांधकाम करणारे श्री.कमलेश पटेल यांचेवर कारवाई करावी अशी मागणी विधान परिषद सदस्य यांनी दिनांक १७ मे, २०१३ रोजी मा.महसूल मंत्री व विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.कमलेश पटेल यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या आदेशातील शर्त क्रमांक ५, ७, ८, १०, १५, १९, २०, २८ व ५२ या शर्तीचा भंग केला असल्यामुळे त्यांनी केलेल्या ७० टक्के बांधकामापैकी ६० टक्के बांधकाम तातडीने पाडण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) होय, हे खरे आहे.

(२) अनुज्ञेय क्षेत्रापेक्षा जादा बांधकाम केल्याचे आढळून आले आहे.

३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(३) होय, अशा प्रकारचे निवेदन लोकप्रतिनिधींनी दिले आहे, हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्नाधीन जमिनीवर श्री.कमलेश पटेल यांनी अनुज्ञेय क्षेत्रापेक्षा केलेले जादा बांधकाम निष्कासित करण्याबाबत तहसीलदार, भिवंडी यांनी दिनांक २१.०६.२०१३ रोजी आदेश पारित केले असून, ६० फुट x २४ फुट उंचीचे तसेच ३० फुट x २४ फुट उंचीचे विटसिमेंटचे भिंतीचे बांधकाम पाडण्यात आले आहे. दरम्यान, श्री.कमलेश पटेल यांनी दिवाणी न्यायालय, भिवंडी येथे दावा क्रमांक ३२६/२०१३ दाखल केला असून, सदर न्यायालयाने "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याचे आदेश पारित केले आहेत.

श्री. पांडरंग फुंडकर : सभापती महोदय, मौजे लोणाड येथील शेतकऱ्यांच्या वडिलोपार्जित वहिवाटीचा रस्ता बंद केला गेलेला आहे त्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. हा प्रश्न या सभागृहात दोन-तीन वेळा चर्चेला आलेला आहे. दिनांक २५ मार्च, २०१२ रोजी तारांकित प्रश्न उपस्थित झाला होता, त्या प्रश्नाचा अनुक्रमांक १,२ व ३ ला माननीय मंत्री महोदयांनी "होय" असे उत्तर दिलेले आहे. लोणाड येथील शेतकऱ्यांचा वडिलोपार्जित वहिवाटीचा रस्ता बंद केल्याबाबत दिलेल्या उत्तरात "मंजूर क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्रावर बांधकाम सुरु केले" अशी वस्तुस्थिती आहे काय असा त्यावेळी विचारण्यात आला होता. त्यावेळी अशी वस्तुस्थिती असल्याचे माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. त्या ठिकाणी १० टक्क्यांपेक्षा जास्त बांधकाम केले गेले आहे ही बाबही मान्य करण्यात आली आहे. जादा बांधकामाबाबत संबंधित बिल्डरवर काय कारवाई केली असा तिसरा प्रश्न विचारला होता. या बाबतीत संबंधितावर कारवाई करण्यात येईल ही बाबही मान्य केले आहे. परंतु संबंधित बिल्डरवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली दिसून येत नाही. प्रश्नाच्या उत्तराच्या ४ आणि ५ मध्ये श्री.कमलेश पटेल यांनी अनुज्ञेय क्षेत्रापेक्षा जादा बांधकाम दिनांक २१.६.२०१३ रोजी निष्कासित करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. शासनाने जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आणि दिशाभूल करणारे आहे. माझ्याकडे दिनांक १९.७.२०१३ रोजी सदर बांधकामाचे काढलेले फोटो आहेत. सभापती महोदय, ते फोटो मी आपल्याला पाठवितो. या ठिकाणी अतिशय छोटेसे बांधकाम पाडलेले आहे. श्री.कमलेश पटेल यांनी तहसीलदार, भिवंडी यांच्याशी संगनमत करुन

४...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

बांधकाम केले आहे. त्या ठिकाणी वीट, सिमेंट भिंतीचे जादा बांधकाम केल्याचे स्पष्टपणे पाडण्यात आले आहे अशा प्रकारची चुकीची व दिशाभूल करणारी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी उत्तरात दिलेली आहे. माझ्याकडे जादा बांधकामाचे फोटो उपलब्ध आहेत, ते मी आपल्या अनुमतीने माननीय मंत्री महोदयांना देखील उपलब्ध करुन देतो. शासनाला खोटे उत्तर देऊन सभागृहाचा अवमान करणारे भिवंडीचे तहसीलदार, प्रांत व जिल्हाधिकारी, ठाणे यांचे विरुध्द काय कारवाई करणार आहात ?

सभापती महोदय, अनुज्ञेय क्षेत्रापेक्षा जादा बांधकाम करणारे बिल्डर श्री.कमलेश पटेल यांच्या विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे ? महसूल व वन विभागाच्या दिनांक १८ जुलै, २०१३ च्या शासन निर्णयातील पान क्रमांक ३ वर गाव नकाशात अतिक्रमित व बंद झालेले रस्ते,पांदण शेतरस्ते, शीव रस्ते मोकळे करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या निर्णयाप्रमाणे मौजा लोणाड, ता.भिवंडी,जि.ठाणे येथील सर्व्हे क्रमांक ११, हिस्सा नंबर १ पै या जमिनीतून जाणारा शेतकऱ्यांचा वाडिजोपार्जित वहिवाटीचा रस्ता पूर्ववत मोकळा करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे, ही कार्यवाही किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे ?

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, श्री.रघुनाथ कान्हो पाटील व इतर 40 शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे रस्ता बंद केला जावा यासाठी अर्ज केला होता. तहसीलदार यांनी स्वत: स्थळ पाहणी केली होती. शेतीला दोन्ही बाजूंनी रस्ते आहेत. शेतकऱ्यांची मागणी आहे की, पटेल यांच्या प्लॉटमधून रस्ता तयार करण्यात यावा. पाहणी केल्यानंतर असे आढळून आले की, पूर्वापार कोणताही रस्ता किंवा कायदेशीर वाट अस्तित्वात नाही. रस्ता होता किंवा केला पाहिजे हे स्पष्ट होत नाही. म्हणून निर्णय देत असताना मामलेदार न्यायालय अधिनियम, 1906 अन्वये चौकशी करुन शेतकऱ्यांची विनंती अमान्य करण्यात आली आहे.

सभापती महोदय, कमलेश व जितेंद्र पटेल यांनी जे अनधिकृत बांधकाम केले ते अनुज्ञेय क्षेत्रापेक्षा जास्त झालेले आहे ही वस्तुस्थिती आहे. म्हणून त्यांना नोटीस देऊन बांधकाम काढण्याबाबतच्या कारवाईचे टप्पे पूर्ण करुन 24.2 व 25.2 ला बांधकाम पाडण्यास सुरुवात करण्यात आली. 27.2 रोजी भिवंडी न्यायालयाने जैसे थे परिस्थिती ठेवावी असे आदेश दिले. त्यामुळे बांधकाम पाडण्याची कारवाई थांबवावी लागली. यामध्ये कोणत्याही प्रकारची चूक झालेली आहे असे वाटत नाही. योग्य ती कार्यवाही झालेली आहे असे मला स्पष्टपणे वाटते.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासनाने तीनही गोष्टी मान्य केलेल्या आहेत. मंजूर क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्रावर बांधकाम सुरु केले ही वस्तुस्थिती असल्याचे शासनाने मान्य केले आहे. कमलेश पटेल यांनी अनुज्ञेय क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्रावर बांधकाम केल्याचे शासनाने मान्य केले आहे. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या आदेशानुसार 10 टक्के क्षेत्रावर बांधकामाची परवानगी असताना 70 टक्के क्षेत्रावर बांधकाम केल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत आढळून आले हे शासनाने मान्य केले आहे. अनुज्ञेय क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्रावर बांधकाम केल्याचे आढळून आलेले आहे असे उत्तरात नमूद केले आहे.

सभापती महोदय, 10 टक्क्यापेक्षा किती टक्के जादा बांधकाम केल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी अहवालात नमूद केले आहे?

श्री.बाळासाहेब थोरात : 10 टक्के बांधकाम करावयाचे असताना 70 टक्के बांधकाम केले आहे ही वस्तुस्थिती शासनाने मान्य केलेली आहे. 60 टक्के जादा बांधकाम केल्याचे मान्य केले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. अतिरिक्त बांधकामाचे निष्कासन सुरु करताच कोर्टाचा स्टे आलेला आहे. कोर्टाने जैसे थे परिस्थिती ठेवावी असे म्हटले आहे. कोर्टाकडून पुढील तारीख दिली जाणार आहे. स्टेटस को उठल्यानंतर अतिरिक्त बांधकाम निष्कासनाची जबाबदारी शासनाची आहे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, महसूल खात्यातील अधिकारी कशाप्रकारे काम करतात त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. माननीय सदस्यांनी प्रश्न एक महिन्यापूर्वी विचारला होता. शासनाने कारवाई दिनांक 21 जून, 2013 रोजी प्रस्तावित केली. म्हणजे प्रश्न विचारण्यापूर्वी ही बाब शासनाच्या निदर्शनास आलेली नाही. प्रश्न विचारण्यापूर्वी महसूल विभागाचे अधिकारी बांधकाम झाल्याच्या ठिकाणी गेल्याचे दिसून येत नाही. ज्या काळात अतिरिक्त बांधकाम झाले त्या काळात जिल्हाधिकारी किंवा महसूल विभागाचे अधिकारी यांनी मॉनिटरिंग करणे आवश्यक होते, त्यांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय? 21जून, 2013 रोजी नोटीस काढण्यात आली त्याच वेळी एमआरटीपी ॲक्टनुसार संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद का केला नाही?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जादा बांधकाम झालेले आहे हे खरे आहे. बांधकाम कसे झाले याची चौकशी केली जाईल. त्यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, विधानपरिषद सदस्य यांनी दिनांक 17 मे, 2013 रोजी महसूलमंत्री यांना निवेदन दिलेले आहे हे उत्तरात मान्य केले आहे. महसूल विभागाचे तलाठी व इतर संबंधित अधिकारी यांनी या बांधकामाबाबत देखरेख केली नाही. किती चटई क्षेत्र बांधकाम करण्यास परवानगी दिली होती आणि प्रत्यक्ष किती प्रमाणात जादा बांधकाम करण्यात आले?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, 2395 चौ.मी.बांधकाम करावयास पाहिजे होते, त्याऐवजी 3925 चौ.मी.इतके जादा बांधकाम झाल्याचे मान्य केले आहे. याची चौकशी केली जाईल. बांधकाम सुरु असताना ते योग्य पध्दतीने होत आहे की नाही याची तपासणी झाली पाहिजे, ती झालेली नाही. यात जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

नंतर एफएफ.1...

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 43007......

ॲड. निरजंन डावखरे : सभापती महोदय, 70 टक्के बांधकाम झालेले आहे असा प्रश्न विचारण्यात आला होता व 70 टक्के बांधकाम झालेले आहे हे आपण मान्यही केले आहे तसेच यामधील काही बांधकाम पाडण्यात आलेले आहे. हे बांधकाम होत असतांना बांधकामावर अधिकाऱ्यांची मेहरनजर असेल तर अशा अधिकाऱ्यांवर आपण काही कारवाई करणार आहात काय ? त्यामुळे अशा अधिकाऱ्यांना पाठीशी न घालता त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात चौकशी केली जाईल. जे जादा बांधकाम होत होते त्यावर अधिकाऱ्यांनी नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता होती. त्यामुळे यासंदर्भात संपूर्ण चौकशी करुन जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, "या जमिनीवर कमलेश पटेल यांनी अनुज्ञेय क्षेत्रापेक्षा केलेले जादा बांधकाम निष्कासित करण्याबाबत तहसीलदार भिवंडी यांनी दिनांक 21/6/2013 रोजी आदेश पारित केले." जून महिन्यामध्ये यासंदर्भातील आदेश पारित करण्यात आलेले आहेत. आम्ही 45 दिवस अगोदर प्रश्न देत असतो. याचा अर्थ जून महिन्यापर्यंत तेथील तहसीलदार झोपले होते असाच त्याचा अर्थ होतो. 70 टक्के जादा बांधकाम करु देणारे तहसीलदार,प्रांत काय करीत होते. 10 टक्क्यापेक्षा जास्त बांधकाम करु नये असा नियम असतांना 70 टक्के बांधकाम करण्यात आलेले आहे. आमचा प्रश्न गेल्यानंतर 21 तारखेला अधिकारी नोटीसेस देतात त्यामुळे यामध्ये चौकशी करण्याची काहीच गरज नाही. त्यामुळे या अधिकाऱ्यांवर ताबडतोब कारवाई झाली पाहिजे एवढाच आमचा प्रश्न आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये काही बाबींची चौकशी केली पाहिजे या मताचा मी सुध्दा आहे. त्यामुळे यासंदर्भात एक महिन्यात चौकशी करुन त्यामध्ये जे कोणी दोषी आढळतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

-----------

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**बेला (ता.जि.भंडारा) येथील सेतु केंद्रावरुन तहसीलदराच्या बिना शिक्याने बनावट प्रमाणपत्र वितरीत होत असल्याबाबत**

**(५) * ४२००३ श्री.मितेश भांगडिया , श्री.विनोद तावडे , डॉ.रणजित पाटील , श्री.प्रवीण पोटे-पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा (जि.भंडारा) तालुक्यातील बेला येथील सेतू केंद्रावरुन तहसीलदारांचे बिना शिक्क्यानिशी प्रमाणपत्र वितरीत केला जात असल्याचे दिनांक १६ मे, २०१३ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील इतर सेतू केंद्रावर देखील अशाच प्रकारच्या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बनावट प्रमाणपत्रावर निर्बंध लावण्याकरिता विशेष उपाययोजना करण्यात येणार आहे काय, असल्यास, योजनेचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच पर्यायी व्यवस्थेचे स्वरुप काय आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे - बेला, तालुका - भंडारा, जि.-भंडरा येथील सेतु केंद्राकडून प्रमाणपत्रावर शिक्के मारले आहेत किंवा नाही याची शहानिशा न करता अनावधानाने प्रमाणपत्र कार्यालयातून घेऊन वितरीत केले गेले. सेतू केंद्र संचालकास याबद्दल ताकीद दिली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मितेश भांगडिया : सभापती महोदय, ग्रामीण आणि शहरी जनता वेगवेगळया प्रमाणपत्रासाठी सेतू केंद्रावर जात असते. भंडारा तालुक्यातील बेला येथील सेतू केंद्रावर दलालांचा सुळसुळाट झालेला आहे असा माझा प्रश्न होता. परंतु उत्तरात म्हटले आहे की, "अनवधानाने शिक्के मारण्याचे राहिले आहे." या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे ते पूर्ण सत्य देण्यात आलेले नाही. या ठिकाणच्या सेतू केंद्राच्या संदर्भात सामाजिक संस्था तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी वारंवार स्टिंग ऑपरेशन करुन सेतू केंद्रावर बनावट प्रमाणपत्र व पाहिजे तसे प्रमाणपत्र तयार करण्याचे काम सेतू चालकाच्या संगनमताने केले जाते हे सिध्द केलेले आहे. प्रश्न क्रमांक ३ व ४ च्या संदर्भातील उत्तरामध्ये "प्रश्न उद्‌भवत नाही" असे म्हटले आहे. परंतु या ठिकाणी सिध्दार्थ ऊके या इसमाला बनावट प्रमाणपत्र तयार करणाऱ्या टोळीचा प्रमुख म्हणून पोलिसांनी कारवाई करुन त्याला अटक केलेली आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, दलालांच्या बंदोबस्तासाठी कायमस्वरुपी कारवाई केली जाणार आहे काय ? सेतू चालक संगनमताने काम करतात त्यामुळे सेतू चालकांवर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

..३...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :** ४२००३......

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात दोन प्रश्न आहेत. बनावट दाखले तयार करणे हा विषय सेतू केंद्राच्या बाहेरचा आहे. हा विषय सेतू केंद्राच्या बाहेरील जरी असला तरी त्यासंदर्भात आम्ही निश्चितपणे चौकशी करणार आहोत. सेतू केंद्रात काही वेगळे घडत असले तर त्यासंदर्भातीलही चौकशी करण्याची आमची तयारी आहे. या सेतू केंद्रावर एकंदर १३ दाखले नायब तहसीलदारांकडे शिक्के व सहीसाठी गेले होते. त्याच दिवशी सेतू केंद्राच्या प्रमुख संचालकाचा अपघात झाला होता. सेतू केंद्रात हे दाखले आल्यानंतर त्यांच्यावर शिक्के मारावयास पाहिजे होते परंतु शिक्के न मारता दाखले बाहेर गेले ही वस्तुस्थिती आहे व ती आम्ही मान्य केलेली आहे. परंतु बाकीच्या दाखल्यावर व्यवस्थित शिक्के मारले गेले तसेच त्यांची नोंदही करण्यात आलेली आहे. यामध्ये केवळ एक दाखला बिगर शिक्क्याचा राहिला होता ही वस्तुस्थिती आम्ही मान्य केलेली आहे. यासंदर्भात काही तक्रारी असतील त्यासंदर्भात योग्य ती कारवाई करण्याचे शासनाचे धोरण आहे. भंडारा जिल्हयातील सेतू केंद्रावर जानेवारी महिन्यामध्ये १३७३६ आणि भंडारा तालुक्यामध्ये ४८८४ दाखले तयार झालेले आहेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42003..

श्री.बाळासाहेब थोरात.....

प्रत्येक महिना निहाय माहिती माझ्याकडे आहे. जानेवारी नंतर जिल्ह्यामध्ये 1 लाख 29 हजार 665 निरनिराळ्या प्रकारच दाखले देण्यात आले आहेत. भंडारा तालुक्यामध्ये 37295 दाखले देण्यात आले आहेत. याचा अर्थ काम हे झालेले आहे. आपण जर स्पेसिफिक तक्रार सांगितली तर त्याची चौकशी करण्यात येईल आणि त्यात जे दोषी असतील त्यांच्या विरूद्ध कारवाई करण्यात येईल.

श्री.प्रविण पोटे : सभापती महोदय, सेतू केंद्राचा विषय हा महत्वाचा असून तो मोठ्या प्रमाणावर आहे. प्रत्येक जिल्ह्यांमध्ये वेगवेगळी सेतू केंद्र फार मोठ्या संख्येने उघडली गेली आहेत. या सेतू केंद्रासाठी कोणाच्या माध्यमातून ठेके देण्यात आले आहेत असा माझा पहिला प्रश्न आहे. ग्रामीण किंवा शहरी भागामध्ये प्रत्येक सेतू केंद्रामध्ये चार कंप्युटर्स आणि चार कंप्युटर ऑपरेटर असणे आवश्यक आहे. सध्या ॲडमिशेनचा काळ सुरू आहे. कुठलेही शासकीय काम करावयाचे असेल तर सेतू केंद्रांमध्ये जाऊन पत्र घ्यावे लागते. अमरावती जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाला लागून सेतू केंद्र आहे. त्या सेतू केंद्रावर एकही व्यक्ति नाही. तेथील एकही संगणक सुरू नाही. हाताने शिक्के मारले जातात. तसे वातावरण निर्माण केले जाते. लोकांच्या अडचणीचे लवकरात लवकर कसे निरसन कसे होईल यासाठी शासन काय करणार आहे असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, या कामाचे ठेके कोणाच्या माध्यमातून देण्यात आले आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सेतू केंद्र असे म्हणत आहेत. पण हा महा ई सेवेचा मोठा कार्यक्रम आहे. ऑनलाईन पद्धतीने सर्व सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यात सहजता असून पारदर्शीपणा आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. महाराष्ट्र शासन आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांचा संयुक्त प्रकल्प संपूर्ण महाराष्ट्रात राबवित आहोत. यात टाटा कन्सल्टन्सीची संपूर्ण मदत आणि भागीदारी मोठ्या प्रमाणावर आहे. यामध्ये स्टेट डाटा सेंटर तयार करणे, तांत्रिक सुविधा पुरविणे, सर्व्हर पुरविणे, सॉफ्टवेअर तयार करणे इत्यादी सर्व केले जाते. या सेवेसाठी 20 रूपये शुल्का पोटी घेतले जातात. त्याचे विभाजन देखील निरनिराळ्या पद्धतीने होत असते.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42003..

श्री.बाळासाहेब थोरात...

चार गावे मिळून एक ई महासेवा केंद्र निर्माण करण्यात आले आहे. सर्वच केंद्र चांगली चालू असतात असे होऊ शकत नाही. बऱ्याच वेळा काही जणांना ते केंद्र चालविणे परवडत नाही. त्यामुळे ते काम थांबवतात. असे जरी असले तरी आपण दोन वर्षात हा टप्पा पुढे नेत आहोत. आपला बऱ्याच गोष्टी ऑनलाईन करण्याचा प्रयत्न आहे. या केंद्रासाठी कोण ठेके देतो असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. आपण पाच वर्षाच्या मुदतीकरिता टेंडर्स बोलावितो. त्याद्वारे केंद्र कोणाला चालवविण्यास देण्याचे ठरविण्यात येते. मी येथे सहज म्हणून सांगतो की, कोकण पुण्यामध्ये स्पॅनको टेलिसिस्टीम नावाची कंपनी काम करीत आहे. नाशिकमध्ये श्री आय इन्फोटेक कंपनी काम करीत आहे. नागपूरमध्ये रिलायन्स कम्युनिकेशन्स ही कंपनी काम करीत आहे. या कंपनीवर केंद्राचा चालक ठरविणे, त्यावर नियंत्रण ठेवणे, टेंडर बोलाविणे याची जबाबदारी असते. अशा पद्धतीने हे काम चालले असते. भंडारा जिल्ह्यात 106 महा ई सेवा केंद्र असली तरी 44 केंद्र चांगल्या पद्धतीने सुरू आहेत ही वस्तुस्थिती आहे. हे नेटवर्क जास्तीत जास्त चांगले करण्यासंबंधी आमचा प्रयत्न आहे. दोन वर्षात हा प्रयत्न आम्ही पुढे नेलेला आहे.

........

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**यवतमाळ जिल्ह्यातील वणी उपविभागातील जुनोनी-साखरा (पोड) परिसरातील सागवान वृक्षांची होत असलेली तोड**

**(6) * 42465 श्री.संदिप बाजोरिया , श्री.दीपकराव साळुंखे-पाटील , श्री.हेमंत टकले , श्री.नरेंद्र पाटील , श्री.रमेश शेंडगे , श्री.सतीश चव्हाण , श्री.विक्रम काळे** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) यवतमाळ जिल्ह्यातील वणी उपविभागातील जुनोनी-साखरा (पोड) परिसरातील सागवान वृक्षांची तोड होत असल्याची घटना माहे एप्रिल, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या संदर्भात शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई कली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.पतंगराव कदम** : (1) हे खरे नाही.

(2), (3) व (4) अशी घटना निदर्शनास न आल्याने चौकशीचा अथवा कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, आताच माननीय मंत्री महोदयांनी 20 कोटी झाडे लावण्यासंबधातील वक्तव्य केले आहे. परंतु, यवतमाळ जिल्ह्यातील वणी परिसरामध्ये जी जुनी सागवनाची झाडे आहेत त्याची वृक्षतोड मोठ्या प्रमाणावर होत आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42465...

श्री.नरेंद्र पाटील.....

असे काही प्रकार होत नाहीत असे लेखी उत्तरामध्ये म्हटलेले आहे ते असत्य आहे. आपण या प्रकरणातील प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहिलेली नाही असा माझा समज आहे. तेव्हा आपण या संदर्भात पुन्हा चौकशी करणार काय ? या गोष्टींकडे वन अधिकाऱ्यांनी लक्ष दिले पाहिजे होते, परंतु तसे झालेले दिसत नाही. माझ्या माहिती प्रमाणे त्या ठिकाणी झाडे तोडण्यात येऊन तेथे अतिक्रमण करण्याचा प्रयत्न सुरु आहे. माझा प्रश्न आहे की, सागाची झाडे तोडणाऱ्यांवर कारवाई करणार काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, ज्या अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, जुनोनी टेकडीवर एकही वृक्ष तोड झालेली नाही. साखरापोड परिसरामध्ये 9 सागाच्या झाडांची तोड झालेली आहे. त्या संदर्भात संबंधितांवर केस झालेली आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, जुनोनी टेकडीबद्दल अधिकाऱ्यांनी माहिती दिलेली नाही. तेव्हा त्या संदर्भात फेर तपासणी करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. परंतु प्रश्नोत्तराच्या तासाची पहिली दहा मिनिटे अन्य विषयावर गेली असल्यामुळे मी दहा मिनिटे प्रश्नोत्तरासाठी वाढवून देत आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**केंद्र शासनाने दारिद्र्य रेषेखालील लोकांचा स्तर उंचाविण्यासाठी कार्यक्रम तयार केल्याबाबत**

**(7) * 42615 डॉ.दीपक सावंत , श्री.दिवाकर रावते , श्री.विनायक राऊत** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) केंद्र शासनाने दारिद्र्य रेषेखालील लोकांचा स्तर उंचाविण्यासाठी रु. 25 हजार कोटीचा कार्यक्रम तयार केला असून हा कार्यक्रम राबविण्यासाठी राज्य शासनाला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होणार आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्य शासनाने हे काम खाजगी संस्था, सामाजिक संस्था, सहकारी संस्था, सीएसआर फाऊंडेशन, शासन संचलित विविध अभियाने यांच्याकडे सोपविण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर काम खाजगीकरणातून किंवा बाहेरुन करण्याची कारणे काय आहेत,

(4) वरील योजनेनुसार केंद्र शासनाकडून राज्य शासनास निधी प्राप्त झाला आहे काय, असल्यास, किती निधी उपलब्ध झाला आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे ?

**श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता** : (1) होय.

(2) नाही. तथापि, सदर अभियान मर्यादित कालावधीसाठी राबविण्यात येत आहे. यामुळे, केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार यामध्ये होणारा आस्थापनाविषयक आवर्ती खर्च टाळण्यासाठी, तसेच काम अधिक गुणवत्तापूर्ण पध्दतीने करण्यासाठी खुल्या बाजारपेठेतून विशिष्ट क्षेत्रातील ज्ञान व अनुभव असणाऱ्या संस्थांची मदत घेण्यात येत आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) होय. सदर अभियानासाठी आत्तापर्यंत केंद्र शासनाकडून रुपये 198.54 कोटी एवढा निधी प्राप्त झाला आहे. सदर अभियान राज्यातील 10 जिल्ह्यांतील 36 तालुक्यांमध्ये संवेदनशील (इंटेसिव्ह) पध्दतीने राबविण्यात येत आहे. तसेच राज्यातील उर्वरित 315 तालुक्यांमध्ये सदर अभियान (नॉन इंटेसिव्ह) पध्दतीने राबविण्यात येत असून टप्प्या-टप्प्याने इंटेसिव्ह पध्दतीने राबविण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, दारिद्रय रेषेखालील लोकांचा स्तर उंचाविण्यासाठी केंद्र सरकारने काही डायरेक्टीव्हज दिलेल्या आहेत.. हे अभियान केंद्र शासनाकडून आलेले आहे आणि ते राज्य शासनामार्फत राबविण्याचा प्रयत्न सुरु आहे. मी प्रथम आपल्या निदर्शनास एक बाब

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42615.....

डॉ.दीपक सावंत....

आणून देतो की, अधिकारी पंचतारांकित हॉटेलमध्ये बसून दारिद्र्य रेषेखालील लोकांचा स्तर कसा उंचवावा याची तपासणी करुन त्यावर उपाय योजना सुचविणार आहेत ही दुर्दैवी बाब आहे. सामाजिक संस्था, सहकारी संस्था आणि एनजीओ या कामासाठी नियुक्त केल्या आहेत. या कामासाठी कोणते निकष लावण्यात आले आहेत ? हे काम देण्यासाठी शासनाने आर्थिक निकष लावले आहेत की गुणवत्तेचे निकष लावले आहेत ? एकूण 25 हजार कोटी रुपयांचा हा प्रोजेक्ट आहे. आतापर्यंत 198.54 कोटी इतका निधी प्राप्त झाला. सध्या दहा जिल्ह्यातील 36 तालुक्यांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. आतापर्यंत किती लोकांची तपासणी करण्यात येऊन त्यांच्या जीवनस्तरा विषयी माहिती प्राप्त झाली ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, देशपातळीवर दारिद्र्य रेषेखालील लोकांचा स्तर उंचावण्यासाठी ही योजना आणलेली आहे. राज्य सरकारने देखील त्यास सुरुवात केलेली आहे. 10 जिल्हयांतील 36 तालुक्यांमध्ये ही योजना कार्यान्वित झालेली आहे. या योजनेमध्ये विविध संस्थाचा सहभाग असावा म्हणून त्यासाठी जाहिरात देण्यात आली होती. टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, सोसायटी फॉर एल्युमिनेशन ऑफ रुरल पॉव्हर्टी, आंध्र प्रदेश या संस्थांची आपण मदत घेत आहोत. महिला आर्थिक विकास महामंडळ या शासकीय संस्थेची देखील आपण मदत घेत आहोत. पहिल्या टप्प्यामध्ये 10 जिल्ह्यांतील 36 तालुके आहेत त्याचे आपण इन्टेन्सीव्ह सेन्सीटायझेशन करणार आहे. त्यांचे लाईव्हहुड वाढविण्यासाठी जे उपक्रम राबविणे आवश्यक आहे ते राबविण्याच्या उपक्रम यामध्ये आहे. दारिद्र्यरेषेखालील वर्गाचा स्तर पुढील सात वर्षामध्ये वाढला पाहिजे या दृष्टीने नियोजनबध्द कार्यक्रम सुरु केलेला आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, या अभियानांतर्गत फक्त दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, केंद्र सरकारने ही योजना दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी सुरु केली होती.परंतु आता काही निकष बदलण्यात येत आहेत. या योजनेमध्ये दारिद्र्य रेषेवरील गरीब लोकांचा समावेश करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकार भूमिका घेत आहे. आपण त्या संदर्भातील नियमावली लवकर तयार करीत आहोत.

यानंतर श्री.बोर्डे...

अग्रुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42615....

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील....

केवळ दारिद्र्य रेषेखालील लोकांचे नव्हे तर त्या रेषेवरील गरीब लोकांचे निकष ठरविण्याचे काम शासनाच्या स्तरावर सुरु आहे. या संदर्भातील निकष ठरल्यानंतर या बाबत काही प्रमाणात व्याप्ती वाढविण्यात येईल.

ॲड.जयदेव गायकवाड : महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अतिशय महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, महाराष्ट्रात दारिद्र्य रेषेखालील लोकांचा सर्व्हे झाला आहे काय ? असल्यास, महाराष्ट्रात दारिद्र्य रेषेखालील लोकांचे एकूण लोकसंख्येशी काय प्रमाण आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : महोदय, मागच्या वेळी या संदर्भातील सर्व्हे वादात अडकला होता. 2002 सालच्या सर्व्हेमध्ये 45 लाख कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली असल्याचे निदर्शनास आले होते. आता नव्याने आर्थिक निकषाचा सर्व्हे सुरु आहे. त्या सर्व्हेचाही विचार या दृष्टीने करणार आहोत.

श्री.मितेश भांगडीया : महोदय, दारिद्र्य रेषेखालील लोकांचा स्तर उंचविण्यासाठी खुल्या बाजारातून विशिष्ट क्षेत्रातील ज्ञान व अनुभव असलेल्या संस्थांची मदत घेण्यासंदर्भातील लेखी उत्तर दिले आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, शासनाने या संदर्भात कोणत्या मार्गाचा अवलंब केला आहे ? तसेच राज्यातील कोणत्या जिल्ह्यांत सेन्सेटीव्ह पध्दतीने ही योजना राबविण्यात येत आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : महोदय, विभागाने जाहिरात देऊन संस्थांबाबतची मागणी केली होती. त्यानुसार संस्थेचा 3 वर्षात 50 लाख रुपयांचा टर्नओव्हर असावयास पाहिजे, त्यांचे बॅकग्राऊंड सोशल सायन्स स्वरुपाचे पाहिजे तसेच त्या संस्थेची महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन काम करण्याची तयारी असायला पाहिजे. या योजनेसाठी राज्यातील रत्नागिरी, ठाणे, जालना, नंदुरबार, सोलापूर, उस्मानाबाद, वर्धा, यवतमाळ, गोंदिया, गडचिरोली हे 10 जिल्हे पहिल्या टप्प्यामध्ये निवडलेले आहेत. साधारणपणे येत्या 3 वर्षात संपूर्ण राज्यात या योजनेचा विस्तार करणार आहोत.

-----------

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील जिल्हा परिषद व खाजगी प्राथमिक शाळेतील कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षकांना पदवीधर प्रशिक्षित शिक्षकाची वेतनश्रेणी देण्याबाबत**

**(८) * ४२५९६ श्री.विक्रम काळे , डॉ.सुधीर तांबे , श्री.सतीश चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद व खाजगी प्राथमिक शाळेतील कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षकांना प्रशिक्षित समजुन नियुक्ती दिनांकापासून त्यांना पदवीधर प्रशिक्षित शिक्षकाची वेतनश्रेणी (बी.एड.) देण्यात यावी या शालेय शिक्षण विभागाच्या ११ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील आश्रमशाळेतील शिक्षकांनाही हे लाभ देण्यात यावेत अशी मागणी महाराष्ट्र आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी महासंघाने एका निवेदनाद्वारे प्रधान सचिव, तसेच संचालक व आयुक्त समाज कल्याण, पुणे यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंबंधी शासनस्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) अद्याप, कोणत्याच प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नसल्यास होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्री.शिवाजीराव मोघे** : (१) होय

(२) शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दिनांक ११.११.२०११ नुसार राज्यातील विजाभज प्राथमिक आश्रमशाळांमधील बी.एड. ही अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी देण्याकरिता आवश्यक असणारी रक्कम रुपये २.२९ कोटी रकमेची पुरवणी मागणी वित्त विभागाने डिसेंबर, २०१३ च्या अधिवेशनात सादर करण्याचे निदेश दिलेले आहेत. तरतुद उपलब्ध झाल्यानंतर आश्रमशाळेतील शिक्षकांना फरकासह वेतन देण्याची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सर्वप्रथम मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. शालेय शिक्षण विभागाने दि.11 नोव्हेंबर, 2011 रोजी म्हणजेच दोन वर्षांपूर्वी राज्यातील जिल्हा परिषद आणि खाजगी प्राथमिक शाळांतील शिक्षक आणि सेवानिवृत्त शिक्षकांना बी.एड. ची वेतनश्रेणी लागू केली आहे. शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर आश्रमशाळांतील शिक्षकांना सुध्दा ती वेतनश्रेणी लागू करावी अशी मागणी आहे. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, सदरहू वेतनश्रेणी देण्यासाठी डिसेंबर-2013 च्या अधिवेशनात पुरवणी मागणी सादर करण्याबाबतचे निदेश दिलेले आहेत. या निमित्ताने मी माननीय मंत्र्यांना विचारु इच्छितो की, शालेय शिक्षण विभागाने जसा शासन निर्णय निर्गमित केला आहे तसा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाने निर्गमित केला आहे काय ? नसल्यास, हे अधिवेशन संपण्यापूर्वी तशा प्रकारचा शासन निर्णय निर्गमित करणार काय ?

..3..



SJB/ D/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 13:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42596....

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, शालेय शिक्षण विभागाची जी सिस्टीम असते तीच सिस्टीम सामाजिक न्याय विभाग मान्य करते. त्यामुळे शालेय शिक्षण विभागाने जे मान्य केले असेल ते सामाजिक न्याय विभागाकडून सुध्दा मान्य करण्यात येईल.

-----------



अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**चंद्रपूर वन विभागाच्या बफर झोनच्या परिसरात वाघांच्या हल्ल्यात ८ व्यक्तींचा झालेला मृत्यू**

**(९) * ४१८३० श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.नागो पुंडलिक गाणार :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर वन विभागाच्या बफर झोनच्या चिचपल्ली ते आडेगाव, चोरगाव, किटाळी ह्या परिसरात दिनांक १० ते १८ एप्रिल, २०१३ पर्यंत ८ व्यक्तींचा वाघांच्या हल्ल्यात मृत्यू झाला तर २ जण जखमी झाले, तसेच दिनांक ३० एप्रिल, २०१३ रोजी मानोरा येथे त्याच विभागात पुन्हा एका व्यक्तीचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नरभक्षक वाघाला पकडण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, वाघाला पकडण्याकरिता व या नरभक्षक वाघांपासून गावकऱ्यांच्या सुरक्षिततेकरिता कोणत्या उपाययोजना केल्या आहेत तसेच कोणते प्रयत्न सुरु आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.पतंगराव कदम** : (१) चंद्रपूर वनविभागाचा ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प अंतर्गत बफर क्षेत्राचा भाग ताडोबा व्याघ्र प्रकल्पाचे अधिनस्थ असून तसेच बफर बाहेरील चंद्रपूर वन विभागाचे क्षेत्र चंद्रपूर (प्रा) वनवृत्ताचे अधिनस्थ व्यवस्थापनेत आहे. सदर क्षेत्रात अडेगांव, चोरगांव, पायली पटाळी व किटाळी या गावात दि.१०.०४.२०१३ ते दि.१८.०४.२०१३ या कालावधीत एकूण ५ व्यक्तींचा बिबटयाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याच्या व एक व्यक्ती गंभीर जखमी झाल्याची घटना निदर्शनास आलेली आहे. वाघाच्या हल्ल्यात व्यक्ती मृत किंवा जखमी झाल्याची घटना निदर्शनास आलेली नाही.
(२) घटनास्थळाचे जवळपासचे परिसरातून तीन बिबट्यांना पिंजऱ्यात जेरेबंद करण्यात आलेले आहे.
(३) चंद्रपूर वनविभागात रॅपिड रिस्पॉन्स युनीट २४ तास कार्यरत आहे. २४ तासाकरिता नियंत्रण/बिनतारी संदेश कक्षाची स्थापना करण्यात आलेली असुन दुरध्वनी हेल्पलाईन क्रमांक १५५३१४ कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. ज्या भागात वाघाचे/बिबट्याचे अस्तित्व आहे त्या ठिकाणी जंगलात न जाण्याबाबत सावधानतेचे इशारादर्शक पोस्टर्स लावण्यात आलेले असून जनजागृती करण्यात येते. कॅमेरा ट्रॅप लावुन वाघ/बिबट यांच्या हालचालींचे सनियंत्रण करण्यात येते. वाघ, बिबट व इतर वन्यप्राणी यांना नागरी वस्तीत येण्यापासून रोखण्यासाठी कर्मचाऱ्यांचे वेगवेगळे गट तयार करण्यात आलेले असून संरक्षण समितीच्या मदतीने नियमित गस्त करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, वाघाच्या धाकाने जंगलात जाऊ नये अशा प्रकारे सावधानतेचे पोस्टर्स त्या भागात लावण्यात आलेले आहेत. परंतु गावकरी जंगलात गेले नाही तर ते काम कसे करणार आणि काम केले नाही तर काय खाणार ? शासनाने अद्याप पर्यात रोजगार हमी योजनेची किंवा वन विभागाची कामे सुरु केली नसल्यामुळे लोकांना कामानिमित्त जंगलात जावे लागते हे खरे आहे. त्यामुळे यावर शासन

..5..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 13:05

ता.प्र.क्र.41830....

श्रीमती शोभा फडणवीस....

काय उपाययोजना करणार आहे ? चंद्रपूर वन विभागात 8 रेंजर आणि 1 डी.एफ.ओ. ही पदे रिक्त आहेत. या निमित्ताने मी विचारते की, ही रिक्त असलेली पदे ताबडतोब भरण्यात येतील काय ? तसेच वन विभागामध्ये पशु वैद्यकीय व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देणार काय ? त्याच बरोबर जेलबंद नरभक्षक वाघाला पिंजऱ्यातून सोडणार नाही, असे माननीय मंत्री महोदय सांगतील काय ?

डॉ.पतंगराव कदम : महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी या अनुषंगाने दोन-चार उपप्रश्न उपस्थित केले आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, जेरबंद केलेल्या वाघाला सोडणार नाही. बफर झोनमध्ये 1 लाख 43 हजार मॅनपॉवरची कामे घेतलेली आहेत. आणखी कामे घेण्याची आवश्यकता पडली तर ती घेण्यात येतील. तसेच सन्माननीय सदस्यांनी स्टाफ भरण्याबाबत जे विचारले आहे, त्या बाबत सांगू इच्छितो की, तो स्टाफ येत्या 15 दिवसांत पूर्णपणे भरण्यात येईल. आज जागतिक व्याघ्र दिनाच्या निमित्ताने सांगतो की, वाघाच्या पोचिंगसाठी इंटरनॅशनल टोळ्या येत असल्यामुळे सी.बी.आय. चौकशी जाहीर केली आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 41830 .....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आता या प्रश्नाच्या चर्चेमधून सर्व प्रश्न सुटू शकत नाहीत. त्या भागात बफर झोनचे प्रश्न आहेत तसेच वाघांच्या बाबतीत जे इतर प्रश्न आहेत त्या संदर्भात मंत्री महोदय त्यांच्या दालनामध्ये आमची बैठक घेणार का ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, खरे म्हणजे चंद्रपूर जिल्हा हा संपूर्ण जिल्हाच वाघांचा आहे. कोअर क्षेत्रामध्ये व्यवस्था केलेली आहे. बफरमध्ये सर्वांना मोकळीक असते. नॉन बफर झोनमध्ये सुध्दा आता आपल्याला यंत्रणा उभी करावी लागेल. कारण त्या ठिकाणी सुध्दा वाघ सापडावयास लागले आहेत. त्या ठिकाणी वाघांची मोठी संख्या आहे म्हणून त्या जिल्ह्यामध्ये ताडोबा येथे परदेशातील लोक मोठ्या प्रमाणावर येऊ लागले आहेत. परंतु आणखी जर काही प्रश्न असतील तर सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे माझ्या दालनामध्ये सन्माननीय सदस्यांना बोलवून बैठक घेण्यात येईल आणि त्या बैठकीस माझ्या खात्याचे अधिकारी हजर राहतील.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

**नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या दोन सूचना आलेल्या आहेत. त्यामध्ये पहिली सूचना सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "राज्यातील 9 वस्तीशाळा शिक्षकांनी आर्थिक दुरवस्थेला कंटाळून आत्महत्या करणे, राज्यातील 9000 वस्तीशाळा (निमशिक्षक) शिक्षकांना नियमित न केल्यामुळे गेली 12 वर्षे त्यांची उपेक्षा आणि अप्रतिष्ठा होणे" या विषयाच्या संदर्भात दिलेली आहे. या बाबतीत शासनाने निवेदन करावे अशी मी शासनाला सूचना करतो.

यानंतर नियम 289 अन्वये दुसरी प्रस्तावाची सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामदास कदम, पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, डॉ. दीपक सावंत, जयंत प्र. पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, श्री. भाई गिरकर, ॲड. अनिल परब, श्री. रामनाथ मोते, ॲड. आशिष शेलार, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार, विनायक राऊत यांनी "संपूर्ण विदर्भामध्ये जून व जुलै महिन्यामध्ये सरासरीपेक्षा 150 ते 200 टक्के पाऊस पडल्याने शेतकऱ्यांची प्रचंड प्रमाणात जीवित व वित्तहानी होणे" या विषयाच्या संदर्भात दिलेली आहे. आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये या विषयाच्या संदर्भात नियम 260 अन्वये प्रस्ताव दाखविलेला आहे. त्या प्रस्तावावरील चर्चा आज आपल्याला घ्यावयाची आहे. त्यामुळे आपण नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम या ठिकाणी उपस्थित आहेत. ओल्या दुष्काळाच्या संदर्भात आमचे एवढेच म्हणणे होते की, ज्यावेळी प्रस्ताव चर्चेला येईल त्यावेळी आपण सविस्तर चर्चा करावी. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री तसेच माननीय मंत्री डॉ. पंतगराव कदम हे एकाच विमानातून गेल्यामुळे चारच जिल्ह्यात पाहणी झाली. त्या ऐवजी माननीय मुख्यमंत्री आणि होणारे मुख्यमंत्री किंवा संबंधित मंत्री यांचे दोन गट केले असते तर विदर्भातील सर्व 8 जिल्हे कव्हर झाले असते. आपण अर्ध्याच जिल्ह्यात जाऊन आलात. अर्ध्या ठिकाणी गेलाच नाहीत. मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांचा ग्राप्स असा आहे की ते 4 जिल्ह्यात जाऊनही 10 जिल्ह्यांच्या बाबतीत घोषणा करु शकतात याबद्दल शंका नाही. आज या

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

विषयावर जर सविस्तर चर्चा करणार असू तर सविस्तर चर्चेला सविस्तर उत्तर यावे अशी अपेक्षा आहे. परंतु या विषयाच्या संदर्भात आज नक्की चर्चा करावी कारण विदर्भात पाहणी करुन आल्यानंतर काल माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन होईल अशी अपेक्षा करीत होतो. हा विषय अतिशय महत्वाचा आहे. त्या ठिकाणच्या लोकांना इतका त्रास झाल्यानंतर अधिवेशन संपेपर्यंत न थांबता माननीय डॉ. पंतंगराव कदम किंवा दुसऱ्या एखाद्या ज्येष्ठ मंत्र्यांना पाठवून लगेच काही तरी करता आले असते तर ते बरे झाले असते. ते झाले नाही त्यामुळे काल तरी निवेदन व्हावयास पाहिजे होते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आजच्या कामकाजामध्ये सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव दाखविलेला आहे. या प्रस्तावावरील चर्चा दुपारी 2 वाजता सुरु करण्यात येईल. तो पर्यंत इतर कामकाज आपण पूर्ण करुन घेऊ. त्यानंतर सुट्टी घेण्यात येईल. आज आपल्याला नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील दोन चर्चा पूर्ण करावयाच्या आहेत. पहिल्या प्रस्तावाला अडीच तासाची वेळ देण्यात येईल.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांचा नियम 260 अन्वयेचा दुसरा प्रस्ताव आहे. या प्रस्तावालाही अडीच तासाची वेळ देण्यात येईल. हे दोन्ही प्रस्ताव आज आपल्याला पूर्ण करावयाचे आहेत. कारण अधिवेशनाचा तीन दिवसांचा कालावधी उरलेला आहे. त्यामुळे आपणा सर्वांच्या सहकार्याने मला जास्तीत जास्त कामकाज करावयाचे आहे.

---

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा सन 2012 चा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे.

श्री.सचिन अहिर (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विधानपरिषदेच्या सन 2013 च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक 11 मार्च ते दिनांक 18 एप्रिल, 2013 या कालावधीत मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 732 आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावे.)

-----

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीचे विवरण सभागृहासमोर ठेवणे.

श्री.सचिन अहिर (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 1986 च्या पहिल्या अधिवेशनापासून ते सन 2013 च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनापर्यंत देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी एकूण 1238 आश्वासनांवरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावे.)

-----

5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र गावित (फलोत्पादन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2010-2011 या वर्षाचा अठ्ठेचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री.राजेंद्र गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना यांचा सन 2009-2010 ते 2012-2013 या वर्षाचा एकत्रित वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

**पृ.शी./मु.शी.**:अल्पकालीन चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनाबाबतची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

प्रा.फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "शासनाने दुष्काळावर कायम स्वरुपी उपाययोजना करण्यासाठी सुरु केलेल्या महत्वाकांक्षी कार्यक्रमात विदर्भ व मराठवाडा भागात भयानक दुष्काळ पसरलेला असतानाही या भागातील एकाही तालुक्याचा समावेश न करणे" या विषयावर नियम 97 अन्वये श्री.दिवाकर रावते व इतर वि.प.स.यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेच्या वेळी दिनांक 16 एप्रिल, 2013 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार (आश्वासन क्र.665) अधिक माहिती सभागृहासमोर ठेवते.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी. )

-------

7....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

**पृ.शी./मु.शी.**: विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

श्री.राम पंडागळे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा सातवा व आठवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा सातवा व आठवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्री. सुभाष चव्हाण (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा पंचवीसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विनंती अर्ज समितीचा अहवाल सादर करणे

श्री. प्रकाश बिनसाळे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मौजे चौफुला, मांजरेवाडी, पिंपळे जगताप, शिक्रापूर, ता. शिरुर, जिल्हा पुणे येथील शेतजमिनीतून रिलायन्स गॅस पाईप लाईन गेल्यामुळे नुकसानभरपाई देण्यात पक्षपात/अन्याय होत असल्या प्रकरणी न्याय मिळण्याबाबत विनंती अर्ज समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : विनंती अर्ज समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:20

## नियम 93च्या सूचनांवरील निवेदनासंबंधी

**सभापती** : आज नियम 93च्या सूचनांवरील चार निवेदने आलेली आहेत. ..

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, निवेदने उशिरा येतात यासंबंधी मी मागील अधिवेशनामध्ये देखील हरकत घेतली होती. या आठवड्यामध्ये अधिवेशन संपणार आहे. कमीत कमी उद्या तरी सर्व निवेदने आली पाहिजेत. माझ्या नियम 93च्या चार-पाच सूचना स्वीकारलेल्या आहेत. काल एका सूचनेवरील निवेदन आले होते. परंतु त्यावर चर्चा होऊ शकली नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सरकार गंभीर नसेल तर नियम 93च्या सूचनांचे आयुध रद्द करावे.

**सभापती** : यामध्ये कशी सुधारणा करता येईल हे आपण पाहू.

श्री. पांडुरंग फुंडकर : प्रत्येक अधिवेशनामध्ये हा विषय उपस्थित करण्यात येतो. माझी देखील 5-7 सूचनांवरील निवेदने प्रलंबित आहेत. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सर्व निवेदने आमच्या हाती देणार आहात काय ?

श्री. जयंत प्र. पाटील : मागील अधिवेशनामध्ये यासंबंधी हरकत घेतल्यानंतर आपण मुख्य सचिवांना पत्र लिहिले जाईल असे सांगितले होते. आता पुनश्च मुख्य सचिवांना स्मरणपत्र द्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : या संदर्भात मी मुख्य सचिवांना पत्र लिहीन. तसेच प्रधान सचिवाना देखील सांगतो. मी स्वत: मुख्य सचिव आणि माननीय मुख्यमंत्री यांना सांगतो.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./ मु.शी** : ठाणे जिल्ह्यात कुपोषणामुळे 171 बालकांचे झालेले मृत्यू याबाबत सर्वश्री भाई गिरकर, विनोद तावडे व ॲड.आशिष शेलार, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर : आपल्याला स्वातंत्र्य मिळून 68 वर्षे पूर्ण झाली तरी ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा हे भाग मुंबई पासून जवळ असताना त्या ठिकाणी कुपोषणामुळे 58 बालकांचा मृत्यू झालेला आहे. तसेच 370 बालके अत्यवस्थ आहेत. ठाणे जिल्ह्यामध्ये या कुपोषणामुळे हाहाकार निर्माण झालेला आहे. शासनाने दिलेल्या निवेदनामध्ये कुपोषणामुळे एकही मृत्यू झालेला नाही असे नमूद केलेले आहे. हे उत्तर सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. आदिवासींच्या बालकांना जणुकाही जगण्याचा अधिकारच नाही अशी परिस्थती तेथे निर्माण झालेली आहे. या बाबतीत शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. कुपोषण हा एक मोठा सामाजिक प्रश्न आहे. जागतिक पातळीवर देखील हा प्रश्न हाताळण्याचे मोठे आव्हान आहे. राज्य शासनाच्या वतीने हा कुपोषणाचा सामाजिक प्रश्न हाताळण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले जात आहेत. या प्रश्नाला अनेक सामाजिक कारणे आहेत. आव्हान खूप मोठे आहे. लवकर लग्न होणे, मुलींची स्वत:ची प्रकृती चांगली नसणे अशी अनेक कारणे आहेत. मी ही कारणे यासाठी सांगत आहे की याबाबतीत विभागांचे कन्व्हर्जन्स महत्वाचे आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ MMP/ प्रथम श्री.शिगम 13:25

प्रा.फौजिया खान...

कृपया सन्माननीय सदस्यांनी माझे पूर्णपणे उत्तर ऐकून घ्यावे. सोशल कस्टम्स आहेत, इतर सर्व प्रकारचे प्रॉब्लेम्स आहेत, त्यासाठी शासनाने अनेक प्रकारचे उपक्रम राबविलेले आहेत. राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्र राज्याला या बाबतीत पहिल्या क्रमांकाचे पारितोषिके मिळालेली आहेत. जन्मापासून ते 25 दिवसापर्यंत जे बालमृत्यू होतात, बालमृत्यूचे प्रमाण कमी झाल्यामुळे त्यासंबंधी पारितोषिक या राज्याला मिळालेले आहे. 0 ते 1 या अनुषंगाने देखील पारितोषिक मिळालेले आहे. शासकीय रुग्णालयात जास्त प्रसूती झाल्या आहेत, त्यातही पारितोषिक मिळालेले आहे. राष्ट्रीय पातळीवर चार पारितोषिके महाराष्ट्र राज्याला मिळालेली आहेत. आपण या संदर्भात जास्त प्रयत्न करीत आहोत, त्यामुळे ही पारितोषिके मिळालेली आहेत. आपण राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रम सुरु केला आहे, लसीकरणाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात हाती घेतलेला आहे. या संदर्भात राजमाता जिजाऊ मिशन सुरु केलेले आहे. मातृत्व अनुदान योजना, मानव विकास कार्यक्रम सुरु केलेले आहेत. वैदू आणि भगत यांच्या समवेत आम्ही बैठका घेतलेल्या आहेत. अनेक प्रकारचे प्रयत्न करण्यात येत आहेत. कुपोषण आणि बालमृत्यूचे प्रमाण केंद्राच्या प्रमाणात कमी झालेले असले तरी ठाणे जिल्हयात मात्र कुपोषण आणि बालमृत्यूच्या बाबतीत मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. ठाणे जिल्हयात हा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे ही गोष्ट मी नाकारीत नाही. त्या प्रश्नाकडे कधीही दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न विभागाकडून होणार नाही. कुपोषण व बालमृत्यू होऊ नयेत यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

सदस्यांनी ज्या सूचना केल्या त्यासंदर्भात चर्चा ठेवली तर शासनाची चर्चा करण्याची तयारी आहे. मी स्वत: संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन ठाणे जिल्हयास भेट देणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मॉनेटरींग कमिटी निर्माण केली आहे. सदर प्रश्न महिला व बालविकास विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभागाशी संबंधित आहे. त्यामुळे या प्रश्नासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांच्या पातळीवर मॉनेटरींग कमिटीची बैठक घेण्यात यावी अशा प्रकारची माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्या बाबतीत मी माझ्या स्तरावर बैठक घेऊन या संदर्भात अधिकची काय उपाययोजना करता येईल यादृष्टीने चर्चा करण्याची माझी तयारी आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एप्रिल, 2013 ते जून, 2013 या तीन महिन्यात 171 बालमृत्यू झाले आहेत. इमारत कोसळली त्यात 72 व्यक्ती मृत्युमुखी पडल्या तर त्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री पाहणी करण्यासाठी जातात. अतिवृष्टीच्या परिस्थितीत 12 ते 15 लोक मृत्युमुखी पडले, त्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार, डॉ.पतंगराव कदम, श्री.शिवाजीराव अशी सर्व टीम अतिवृष्टीची पाहणी करण्यासाठी गेली.

**सभापती** : श्री. शिवाजीराव कोणते ?

श्री.विनोद तावडे : श्री.शिवाजीराव मोघे. सभापती महोदय, आम्ही तुमचे नाव घेऊ शकत नाही. आपल्याबद्दल आम्हाला आदर आहे. मुंबई पासून जवळ असलेल्या ठाणे जिल्हयात एवढी मोठी घटना घडली आहे. त्या घटनेचे वृत्त छापून आलेले आहे. त्या घटनेची पाहणी करण्यासाठी माननीय आरोग्य मंत्र्यांना जावे असे वाटले नाही काय ? आदिवासी लोक मृत्युमुखी पडतात, त्याकडे दुर्लक्ष करावयाचे ही अतिशय खेदजनक बाब आहे. माननीय आरोग्य राज्यमंत्र्यांकडून उत्तरात सांगितले जात आहे की, राज्य शासनाला अशा प्रकारची पारितोषिके मिळाली आहेत. ठाणे जिल्हयातील 13 तालुक्यांमध्ये मी नेहमी फिरत असतो. या विभागात कमी वयात मुलींचे लग्न होत नाहीत. विदर्भात होतात. परंतु तसे या ठिकाणी होत नाही. आपण त्या विभागात गेलेला नाहीत. माझे माननीय श्री.मधुकरराव पिचड, डॉ.विजयकुमार गावित यांच्यांशी कुपोषण आणि बालमृत्युच्या संदर्भात बोलणे झाले आहे. त्यांनी या बाबतची कारणे मला खाजगीत सांगितली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांच्या समवेत ते दोघी मंत्री ठाणे जिल्हयात पाहणी करण्यासाठी जाणार आहेत. या ठिकाणी 171 बालमृत्यू कुपोषणामुळे झाले नाहीत तर कोणत्या कारणामुळे झाले आहेत? या ठिकाणी कमी वयात लग्न झालेल्या जोडप्यांची संख्या किती आहे ?

प्रा.फौजिया खान : या जिल्हयात 171 बालमृत्यू कोणकोणत्या कारणामुळे झालेले आहेत याची मी या ठिकाणी माहिती देत आहे. सभापती महोदय, मला या ठिकाणी वर्षनिहाय आकडेवारी सांगितली पाहिजे. ती आकडेवारी सांगणे मला अतिशय आवश्यक वाटते...

श्री.विनोद तावडे : तीन महिन्याच्या कालावधीत जे बालमृत्यू झालेले आहेत ते कोणत्या कारणामुळे झालेले आहेत याचे आम्हाला उत्तर हवे आहे.

**सभापती** : तीन महिन्यांच्या कालखंडामध्ये जे बालमृत्यू झाले, ते कोणत्या कारणामुळे झाले असा सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा प्रश्न आहे...

यानंतर श्री. भोगले...

निवेदन क्रमांक.1........

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या क्षेत्रामध्ये 171 बालमृत्यू झाले असले तरी त्याचा पॅटर्न 2008 पासून आतापर्यंत डिक्लाईनवर आहे. तीन महिन्याची आकडेवारी विचारली आहे. या काळात बालमृत्यू कसे कसे झाले याची माहिती मी देऊ इच्छिते. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो आरोप केला आहे त्यात तथ्य नाही. आजच फक्त असे झाले हे खरे नाही. 2008 पासून बालमृत्यूचे प्रमाण कमी झालेले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, 2008 पासून बालमृत्यू होत आहेत याची शासनाला माहिती आहे.

प्रा.फौजिया खान : लो बर्थ रेट....(अडथळा)... जर मी काही चुकीचे सांगते असे सभागृहाला वाटत असेल तर मी थांबते.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, मागील तीन महिन्याची माहिती विचारलेली आहे. मंत्री महोदया पाच वर्षापूर्वीची माहिती सांगत आहेत. आदिवासींबद्दल यांच्या मनात जराही प्रेम किंवा आदर नाही. मुंबईपासून हाकेच्या अंतरावरील ठाणे जिल्हयामध्ये कुपोषणामुळे 70 बालके दगावतात. आई वडिलांचे म्हणणे आहे की, आमच्या पोटाला खायला अन्न नाही, आम्ही आमच्या मुलांना कुठून अन्न द्यायचे?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मागील तीन महिन्यात 171 बालमृत्यू कसे कसे झाले याची माहिती मी सभागृहाला देऊ इच्छिते. अपघातामुळे 11, विषबाधेमुळे 1, सर्पदंशामुळे 2, unknown bite मुळे 4, न्यूमोनियामुळे 13, जन्मत: व्यंग असल्यामुळे 12, कमी दिवसात जन्म होणे किंवा प्रि-मॅच्युअर बेबीज या कारणामुळे 16, कमी वजनाची बालके म्हणजे 500 ग्रॅम, 800 ग्रॅम वजनाची बालके जन्माला आल्यास ती जीवित राहण्याची शक्यता नसते या कारणामुळे 28, जन्मत: कावीळ झाल्यामुळे 3, एक्स्पेशिया न्यूमोनियामुळे 4, दम्यामुळे 2, श्वासावरोधामुळे 15, सक्टोसीमिया म्हणजे इन्फेक्शनमुळे सुध्दा बालमृत्यू झाले आहेत.(अडथळा)....हा गंभीर विषय असताना माननीय सदस्यांनी या विषयाकडे गांभीर्यतेने पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, शासन या विषयाबाबत तेवढ्याच गांभीर्याने सामोरे जाण्याचा प्रयत्न करीत आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर सर्व संबंधित अधिकाऱ्यांसमवेत मी स्वत: त्या भागात जाणार आहे. त्यानंतर माननीय मुख्यमंत्री यांच्या स्तरावर बैठक घेतली जाणार आहे. मुख्य

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान.........

सचिवांना सुध्दा सांगण्यात येणार आहे. त्यांनी सर्व विभागांची कन्व्हर्जन्ससाठी बैठक घ्यावी. एक समिती आरोग्य सेवा संचालकांच्या अध्यक्षतेखाली गठीत केली आहे. त्यात राजमाता जिजाऊ मिशनचे अधिकारी आणि इतर विभागांच्या अधिकाऱ्यांचा समावेश केलेला आहे.

या प्रश्नाबाबत अधिक उपाययोजना कशा करता येतील आणि कुपोषित बालकांची यादी कशा प्रकारे करता येईल याचा सुध्दा अहवाल शासनाला सादर झाला आहे. या सगळ्या उपाययोजना शासनाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न होत आहे.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : एनसीटीई मार्फत आवश्यकतेपेक्षा जास्त अध्यापक विद्यालयांना मान्यता दिल्यामुळे डी.एड.बेरोजगारांची संख्या वाढत असणे याबाबत सर्वश्री भगवान साळुंखे, चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...नंतर 2ओ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, ज्या हेतूने प्रश्न विचारण्यात आला होता त्याला थोडासा फाटा दिला जातो आहे असे मला वाटते. राज्यामध्ये 1405 अध्यापक विद्यालये असून त्यामध्ये 90 हजार विद्यार्थी संख्या अपेक्षित आहे. परंतु अद्यापपर्यंत केवळ 20 हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयामधील प्रवेशाची अट शिथील होऊ शकते तर अध्यापक विद्यालयांमध्ये प्रवेशाची अट 50 वरुन 40 टक्क्यावर आणण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. या निवेदनाच्या संदर्भात "एनसीटीईची तांत्रिक मान्यता आवश्यक आहे" असे उत्तर देण्यात आलेले आहे. त्यामुळे राज्यशासन एनसीटीईशी संपर्क करुन ही अट शिथील करण्यासाठी प्रयत्न करणार आहे काय ? बंद पडणारी जी अध्यापक विद्यालये आहेत त्यातील प्राध्यापकांना अन्य ठिकाणी समायोजित करण्याची यंत्रणा शासन राबविणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आपल्या राज्यात एनसीटीईचा अधिनियम 1993 अनुसार अध्यापक विद्यालयांना परवानगी दिली जाते. राज्यशासन यामध्ये केवळ संलग्नता देत असते. आपल्याकडे एकंदर 1400 अद्यापक विद्यालय सुरु आहेत. 1255 अध्यापक कॉलेजेस हे खाजगी विनाअनुदानित कॉलेजेस आहेत. एनसीटीईच्या रेग्युलेशन आणि ॲक्ट प्रमाणे प्रवेश होत असतात. यामध्ये राज्यशासनाचा काहीच रोल राहत नाही. अध्यापक विद्यालयाची 90 हजार विद्यार्थी क्षमता असतांना आपल्याकडे विद्यार्थ्यांचा तेवढया प्रमाणात प्रतिसाद मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. आता अध्यापक महाविद्यालयांचे काय करावयाचे असा आपल्या समोर महत्वाचा प्रश्न उभा आहे. अध्यापक महाविद्यालये एनसीटीईचे नियम पूर्ण करीत नसतील तर त्याबाबतीतही विचार करणे गरजेचे आहे. याशिवाय एनसीटीईच्या रेग्युलेशन प्रमाणे जेव्हा शिक्षकाची नियुक्ती होत असते त्यामध्येही 50 टक्के मार्क असणे गरजेचे आहे. जर रिक्रुटमेंटला 50 टक्क्याची अट आवश्यक असेल तर अध्यापक महाविद्यालयाच्या प्रवेशासाठी ही अट कमी करणे योग्य राहणार नाही. आता आपल्याकडे टिचर इलिजिबिलीटी टेस्ट येणार असून ती अतिशय कडक राहणार असून शैक्षणिक दर्जा वाढविण्याच्या अनुषंगाने ही टेस्ट होणार आहे. आपण जर टक्केवारी कमी केली तर दर्जा कसा काय राहणार ? खरे म्हणजे हे सर्व करण्याचा राज्य शासनाला अधिकार नाही. एनसीटीईने जी अट ठेवलेली आहे त्या प्रमाणे सर्व करणे गरजेचे आहे.

-------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : खामगाव, जिल्हा बुलढाणा येथील सामान्य रुग्णालयामध्ये वैद्यकीय सुविधा व तज्ज्ञ डॉक्टरांचा अभावामुळे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची होत असलेली प्रचंड गैरसोय याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.फौजिया खान( सार्वजनिक आरोग्य राज्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदर 93 अन्वयेची सूचना खामगाव, जिल्हा बुलढाणा येथील सामान्य रुग्णालयामध्ये वैद्यकीय सुविधा व तज्ज्ञ डॉक्टरांचा अभावामुळे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची होत असलेली प्रचंड गैरसोय यासंबंधी दिलेली आहे. उत्तरामध्ये दवाखाना कसा आहे याची माहिती देण्यात आलेली आहे यामध्ये "200 खाटांचे सामान्य रुग्णालय असून तेथे 20 खाटांचे ट्रामा केअर युनिट कार्यरत आहे, बाहय रुग्ण, आंतररुग्ण, अपघात विभाग, प्रयोगशाळा, क्ष-किरण शस्त्रक्रिया विभाग,प्रसूती कक्ष, आयसीटीसी, नेत्र शस्त्रक्रिया विभागा, डायलेसिस, रक्तपेढी" या सर्वांची माहिती दिलेली आहे. परंतु हे सर्व असतांना या रुग्णालयामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आहे. "223 पैकी 181 पदे भरण्यात आलेली आहेत, 42 जागा रिक्त आहेत. कंत्राटी पध्दतीवर पदे भरण्यात येणार आहेत" असे उत्तर देण्यात आलेले आहे. हॉस्पिटलमध्ये कंत्राटी पध्दतीने पदे भरली तर हॉस्पिटलचे काम चालू शकते काय ? उत्तरामध्ये म्हटले आहे की, "कंत्राटी पध्दतीवर तंत्रज्ञ नेमण्यात येऊन त्यांनाही प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच रेडिओ डायग्नोस्टीकच्या सेवा खाजगी सहभागातून उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया सुरु आहे."

सभापती महोदय, हे हॉस्पिटल मोठे आहे. या हॉस्पिटलमध्ये डायलेसिस आहे, इसीजी आहे सर्व काही आहे. असे असतांना या हॉस्पिटलमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आहे हे खरे आहे काय ? असल्यास रिक्त पदे केव्हापर्यंत भरली जाणार आहेत ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, खामगाव जि. बुलढाणा या रुग्णालयामध्ये सर्व फॅसेलिटीज आहेत परंतु अकोला येथे मेडीकल कॉलेज असल्यामुळे त्या ठिकाणी रेफरन्ससाठी रुग्णांना पाठविले जाते. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडलेला आहे तो खरा आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

आपल्या राज्यातच डॉक्टरांची काही पदे कमी आहेत. या सभागृहात परवाच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, क्लास-3च्या रिक्त पदांसंबंधी महत्वाचा निर्णय झाला आहे. पाच हजार पदे भरण्याची परवानगी आपल्याला सामान्य प्रशासन विभागाने दिलेली आहे. आता ही पदे भरण्याची प्रक्रिया आम्ही सुरू केलेली आहे. ऑक्टोबर पर्यंत ही सर्व प्रक्रिया पूर्ण होईल, असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. या रूग्णालयामध्ये फिजिशियन्स, इएनटी सर्जन,मानसोपचार तज्ज्ञ, चेस्ट फिजिशियन्स आणि रेडिओलॉजिस्ट नाहीत. येथे जनरल सर्जन, स्त्रीरोग्य व प्रसूती तज्ज्ञ आहेत, 2 बालरोग तज आहेत, 2 भूलतज्ज्ञ आहेत, एक दंतशल्य आहेत, दोन नेत्रशल्य आहेत, ऑर्थोपेडिक सर्जन आहेत. काही स्पेशालिस्टची कमतरता आहे. काही जणांना कॉन्ट्रॅक्टवर घेऊन काम करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती झाल्यानंतर या रूग्णालयातील पोस्ट भरण्याची कार्यवाही लवकरच पूर्ण करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 2 स्त्री रोग तज्ज्ञांची पदे रिक्त आहेत. आपण लेखी निवेदनात प्रसूतीच्या प्रकरणांची माहिती दिली आहे. यात नमूद केले आहे की, सन 2010-11 मध्ये 2576, सन 2011-12 मध्ये 2290 आणि सन 2012-13 मध्ये 3469 प्रसुतीसाठी पेशंट येतात. येथे एकच स्त्री रोग तज्ज्ञ असेल तर रूग्णांकडे काय लक्ष दिले जात असेल ? त्यामुळे किमान आवश्यक डॉक्टरांच्या ज्या जागा आहेत त्या तरी लवकरात लवकर भरण्यात येणार आहेत काय ? मला मागच्या वेळी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, मार्चच्या आत या जागा भरल्या जातील. त्या जागा अद्यापि का रिक्त आहेत व त्या किती दिवसात भरल्या जातील ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, ऑक्टोबर पर्यंत वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती होणार आहे. त्यानंतर ताबडतोब या रूग्णालयाला वैद्यकीय अधिकारी देण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. येथे स्त्री रोग तज्ज्ञांसंबंधी प्रश्न विचारण्यात आला आहे. येथे क्लास-1 चे पद भरलेले आहे व एक पद कॉन्ट्रॅक्टवर आहे. तेथे क्लास-2 चे एक पद रिक्त आहे. ते पद कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने भरलेले आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजीत पाटील : सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यामध्ये जिल्हा समान्य रूग्णालया नंतर दुसरे मोठे रूग्णालय खामगावला आहे. या रूग्णालयाला सामान्य रूग्णालयाचा दर्जा दिलेला आहे. बुलढाणा पेक्षा जास्त लोकसंख्या खामगावला आहे. आपण फिजिशियन, रेडिओलॉजिस्ट, इएनटी, मानसोपचार तज्ज्ञ नाहीत हे मान्य केलेले आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी स्त्री रोग तज्ज्ञासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांनी सांगितले की, तीन पदांपैकी एक पद भरलेले आहे. या सर्जिकल पोस्टवर काम करण्यासाठी भूलतज्ज्ञांची गरज असते. आमची माहिती अशी आहे की, 2 भूलतज्ज्ञ आहेत असे म्हणत असला तरी एका भूल तज्ज्ञाची बदली आता गडचिरोली येथे झाली आहे हे खरे आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या संबंधात मला माहिती घ्यावी लागेल. माझ्याकडे जी माहिती त्या प्रमाणे आजच्या घडीला या रूग्णालयामध्ये 2 भूलतज्ज्ञ कार्यरत आहेत. भूलतज्ज्ञांची बदली झाली आहे अशा प्रकारची माहिती आता माझ्याकडे नाही. दोन्ही भूलतज्ज्ञ नियमित पदावर आहेत. माझ्या माहिती प्रमाणे भूलतज्ज्ञांची आज बदली झालेली नाही.

श्री.प्रविण पोटे : सभापती महोदय, हा गंभीर प्रश्न आहे. असे असताना माननीय मंत्री महोदय वेगळ्या पद्धतीने उत्तर देत आहेत. भूलतज्ज्ञांची बदली झाली नाही असे माननीय मंत्री महोदय म्हणत आहेत. सभागृहातील अधिकाऱ्यांच्या गॅलरीमध्ये आरोग्य संचालनालयाचे अधिकारी बसले आहेत. ते अधिकारी देखील आमच्या अमरावती विभागामध्ये येऊन गेले आहेत. आमच्या अमरावती जिल्ह्यामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. अधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतर त्या पदावर कोणीच येत नाही. भूलतज्ज्ञाची बदली करण्यात आली आहे याची माहिती मंत्रिमहोदयांकडे नाही. ही बाब मला चुकीची वाटते. कारण आपण सभागृहामध्ये बसलेलो आहोत. हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. आमदार या नात्याने आमच्याकडे रोज लोक येत असतात. आमच्याकडे तक्रार करतात की, रूग्णालयामध्ये रूग्णांना झोपण्यासाठी बेड नाही, औषध नाही.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रवीण पोटे....

तेव्हा या गोष्टींची तरतूद करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. जर एखाद्या डॉक्टराची बदली झाली असेल तर त्या जागेवर दुसरा डॉक्टर येत नाही तोपर्यंत त्या बदलीस स्थगिती द्यावी अशाप्रकारच्या उपाययोजना आपणास कराव्या लागतील. त्या आपण करणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, डायेक्टर मेडिकल एज्युकेशन यांच्याकडे बॉन्डेड उमेदवारांच्या मुलाखती सुरु आहेत. आपणास लवकर 240 स्पेशालिस्ट उपलब्ध होणार आहेत. जर कुठे वैद्यकीय अधिकाऱ्यांची कमतरता असेल तर त्या ठिकाणी त्यांची नियुक्ती करण्यात येईल.

------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** :आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न मिळणे या बाबत श्री. रामदास कदम, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.शिवाजीराव मोघे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, शासन आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीने पैसे दोन दोन वर्षे देणार नसेल तर खाजगी महाविद्यालये चालवावची कशी असा प्रश्न त्यांच्यापुढे निर्माण झालेला आहे. सन 2011-2012 या वर्षातील शिष्यवृत्तीचे पैसे देखील दिलेले नाहीत. सरकारकडे निधी नसेल तर सरकारने विद्यार्थ्यांना सुविधा देऊ नयेत. आपणास आठ-दहा वेळा पत्र पाठवूनही त्यास उत्तर दिले जात नाही. निवेदनात नमूद केलेले आहे की, "महाविद्यालयातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील 24 विद्यार्थ्यांचे प्रस्ताव सन 2011-2012 मध्ये प्राप्त झाले असून त्यापैकी 10 विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात आली असून 14 प्रस्ताव प्रलंबित आहेत." शासनाला विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वेळेवर देता येत नसेल तर शासन त्यांची जबाबदारी का घेते ?

सभापती महोदय, मला मिळालेली माहिती मी सभागृहात सांगू शकणार नाही. काही ठराविक कॉलेजचे पैसे दिले जात नाहीत काय ? पैसे मिळण्यासाठी काही टक्के द्यावे लागतात काय याची मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी. असे प्रकार होत असतील तर ती चुकीची गोष्ट आहे. तेव्हा या गोष्टी मंत्री महोदयांनी तपासून घ्याव्यात अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, निवेदनात पुढे नमूद केले आहे की, " सन 2012-2013 साठी 28 विद्यार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले असून ते प्रलंबित आहेत. अशाप्रकारे एकूण 42 विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीचे प्रस्ताव पुरेशा निधी अभावी प्रलंबित आहेत." असे जर होत असेल तर कॉलेजेस कशी चालविणार ? निधी वेळेवर मिळत नाही म्हणून मंत्री महोदयांना दहा वेळा स्मरणपत्र लिहून देखील त्या पत्रांना उत्तरे मिळालेली नाहीत. माझा प्रश्न आहे की, 42 विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीचे प्रस्ताव आठ दिवसांत मंजूर करण्यात येतील काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे सन 2012-2013 चे पैसे दिलेले आहेत. इतर मागासवर्ग, भटक्या जाती व विमुक्त जमाती व विशेष मागासप्रवर्ग या विद्यार्थ्यांचे पैसे रिलिज झालेले आहेत. बजेटमध्ये चौदाशे कोटी रुपये दिले होते. साडे अकराशे रुपये रिलिज झालेले आहेत. ज्या ज्या जिल्ह्यांना हे पैसे द्यायचे आहेत ते दिलेले आहेत. मागील वर्षीचे ओबीसी आणि व्हीजेएनटीचे 800 कोटी रुपये द्यायचे आहेत, त्यास प्रॉयॉरिटी दिलेली आहे. ते एक महिन्यात मिळतील.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आर्थिकदृष्टया मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. तो विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे आहे. तो विभाग हे पैसे लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न करणार आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, राज्यातील कोणत्याही तांत्रिक आणि व्यावसायिक कोर्समधील ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे पैसे दिले नाहीत हे खरे आहे काय ? तसेच बीबीए सारख्या कोर्सेसना एक रुपया देखील अनुदान देण्यात येत नाही हे खरे आहे काय, असल्यास त्या कोर्ससाठी अनुदान देण्यात येईल काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मंत्रिमंडळाने जे कोर्सेस मान्य केलेले आहेत त्यांना पैसे दिलेले आहेत. केंद्र शासनाने जो निधी दिलेला आहे तो अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येतो. निधी नसल्यामुळे बाकींच्याना तो देता येत नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MMP/ D/ पूर्वी श्री.अजित.... 13:50

श्री.कपिल पाटील : मी माननीय मंत्र्यांना सांगतो की, बीबीएला राज्य सरकार आणि विद्यापीठ अशी दोघांची मान्यता आहे. असे अनेक कोर्स आहेत की, ज्याला राज्य सरकार व विद्यापीठाची मान्यता आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, मंत्रिमंडळाने ज्यांना मान्यता दिली आहे त्यांनाच पैसा दिला जातो. केंद्र सरकारचे पूर्ण पैसे अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देतो. इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मंत्रिमंडळाच्या परवानगीशिवाय पैसा देत नाही.

श्री.रामदास कदम : महोदय, माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी शासन म्हणून उत्तर दिले पाहिजे. माननीय मंत्री ज्येष्ठ असल्यामुळे त्यांना 'लवकरात लवकर' या शब्दाचा चांगलाच अर्थ माहीत आहे. हे कॉलेज डोंगरी भागातील आहे. त्यामुळे त्यांनी 8 दिवस, 15 दिवस, 1 महिना असा स्पेसिफिक कालावधी सांगावा. त्या कालावधीत संबंधित विभागाच्या माननीय मंत्र्यांशी संपर्क साधून कार्यवाही करावी.

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, माझ्या माहितीनुसार यासाठी संबंधित विभागाने पुरवणी मागणी केली होती. परंतु त्यांना पुरवणी मागणीतून पैसे मिळाले नाहीत. ते डिसेंबरच्या अधिवेशनात यासाठी पुरवणी मागणी करणार आहेत.

श्री.रामदास कदम : महोदय, पुरवणी मागणीवर अवलंबून राहिल्यास अजून सहा महिन्यांचा वेळ जाईल. या विद्यार्थ्यांना दोन-दोन वर्षांपासून पैसा दिला जात नाही. अजून सहा महिने पैसा मिळाला नाही तर त्या भागातील शाळा-महाविद्यालयांना टाळे लागेल. शासन एका बाजूला आदिवासी, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नाबाबत गंभीर नाही आणि दुसऱ्या बाजूला सत्ताधारी पक्षातील आमदारांच्या मतदारसंघात निवडणुकीसाठी 10-10 कोटी रुपये देत आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, अनुसूचित जाती व जमातीचे 100 टक्के पैसे दिलेले आहेत. इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे पैसे रिलीज झालेले आहेत त्यामुळे सन्माननीय सदस्य मतदारसंघात जाण्यापूर्वी कदाचित ते मिळून जातील. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांचा विषय उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे आहे. त्यांच्याशी समन्वय साधण्यात येईल. हे पैसे तातडीने द्यावेत म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांना देखील या विषयी विनंती करण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, हा प्रश्न या राज्यातील गंभीर प्रश्न झालेला आहे. या राज्यातील इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांची व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण इ. अभ्यासक्रमाची 1400 कोटी रुपये फी प्रलंबित असल्याचे सांगण्यात आले आहे. गेल्या तीन वर्षांपासून ही फी प्रलंबित आहे. यामुळे अनेक महाविद्यालये अडचणीत आलेली आहेत. मागील दोन वर्षांतील इतर मागासवर्ग प्रर्गातील विद्यार्थ्यांची फी तातडीने देण्यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, गेल्या तीन वर्षांचे नव्हे तर मागच्या वर्षीचे फीचे पैसे बाकी आहेत. मागच्या वर्षीचे 800 कोटी रुपये देणे बाकी आहेत. त्यासाठी 1400 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. 1123 कोटी रुपये रिलीज करण्यापूर्वी मागच्या वर्षीचे पैसे पूर्णपणे देण्यात येतील. या वर्षीचे राहिलेले 600 कोटी रुपये पुन्हा पुरवणी मागणीच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येतील.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ.शी./मु.शी.**: शासकीय विश्रामगृहाचा वापर शासकीय अधिकारी/लोकप्रतिनिधी यांच्याशिवाय अन्य व्यक्ती करीत असल्याने ओळखपत्र अनिवार्य करुनच विश्रामगृह कक्षाचा ताबा देणे, या बाबत श्री.रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

राज्यातील शासकीय विश्रामगृहात लोकप्रतिनिधींचे नाव पुढे करुन राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी विश्रामगृहाचा ताबा घेणे, विश्रामगृहात पत्त्याचे डाव, दारुच्या पार्ट्या करणे, तसेच विश्रामगृह कक्षात घाण करणे, तसेच विश्रामगृहाचा वापर हा सरकारी कामासाठी येणाऱ्या अधिकारी आणि लोकप्रतिनिधींच्या वास्तव्यासाठी करावयाचा असताना अन्य नागरिक गैरमार्गाने विश्रामगृहाचा वापर करीत असल्याचे माहे जुलै-2013 च्या चौथ्या सप्ताहात उघडकीस येणे, शासकीय विश्रामगृहाचा वापर शासकीय अधिकारी/लोकप्रतिनिधी यांच्याशिवाय अन्य व्यक्ती करीत असल्याने ओळखपत्र अनिवार्य करुनच विश्रामगृह कक्षाचा ताबा देण्याविषयी संबंधित शासकीय विश्रामगृहाच्या व्यवस्थापकांना शासनामार्फत सूचित करण्यात यावे, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

--------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : शेगाव, जि. बुलढाणा येथील शासकीय वसतिगृहात निकृष्ट दर्जाचे जेवण देत असल्याची घडलेली घटना याबाबत श्री. पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. पांडुरंग फुंडकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी खालील घटनेकडे माननीय मंत्री महोदयांचे व सभागृहाचे लक्ष वेधून कारवाई व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करतो.

"दिनांक 28 जुलै, 2013 रोजी शेगाव, जिल्हा बुलढाणा येथील गोलखेड रोडवर असलेल्या मुलीच्या निवासी वसतिगृहात इयत्ता 5 वी ते 9 वी च्या 230 विद्यार्थीनींपैकी 100 विद्यार्थीनींना उडीद डाळीचे वरण, भात व पोळ्या असे जेवण दिले. या जेवणानंतर त्यापैकी सुमारे 77 मुलींना उलट्या-मळमळ, पोटदुखी झाल्यामुळे त्यांना नजीकच्या सईबाई मोटे या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या मुलींपैकी 2 विद्यार्थीनी गंभीर आहेत. या वसतिगृहाला मी परवा रात्री भेट देऊन इस्पितळात दाखल केलेल्या मुलींची भेट घेतली. यापूर्वीही या शासकीय वसतिगृहात निकृष्ट जेवण देत असल्याबद्दलची तक्रार सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांकडे या मुलींनी वारंवार करुनही याकडे सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. चार-पाच दिवसांपूर्वी मुलींना दिलेल्या जेवणामध्ये टाचण्या निघाल्या होत्या. या टाचण्या तोंडात अडकल्यामुळे पाच-सहा मुलींना इस्पितळात दाखल करण्यात आले होते. या मुलींनी तक्रार केल्यानंतर त्यांना सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांकडून शाळा सोडल्याचा दाखला (टी.सी.) देण्याची धमकी देण्यात येते. शेगाव येथील या शासकीय मुलींच्या वसतिगृहात घडलेल्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करुन या प्रकरणास जबाबदार असणाऱ्या सामाजिक न्याय विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करावी अशी या विशेष उल्लेखाव्दारे मी मागणी करीत आहे."

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, संबंधित माननीय मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. त्या जेवणामध्ये अळ्या, मेलेल्या माशा, टाचण्या हे सर्व आढळून आले. मुलींनी स्टेटमेंट दिले की, असे जेवण गेली अनेक दिवस आम्हाला देण्यात येते. तक्रार करुनही यावर कोणतीही कारवाई होत नाही. असे स्टेटमेंट त्या मुलींनी दिले. या संबंधी उच्चस्तरीय चौकशी करुन त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करणार का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, अशा प्रकारचे जे पॉईझनिंग झालेले आहे त्या संबंधात ठेकेदारावर गुन्हे दाखल केलेले आहेत. ज्या संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करावयाचे आहे त्या संदर्भात अहवाल मागितलेला आहे. ती कारवाई योग्य वेळी करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सदर ठेकेदारास ब्लॅक लिस्ट करावयास पाहिजे. हा महत्वाचा मुद्दा आहे.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, कायदेशीर, नियमामध्ये ज्या गोष्टी आहेत त्या पूर्ण करण्यात येतील.

----

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : दिवसेंदिवस लोकलने प्रवास करणाऱ्या महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या प्रमाणात होत असलेली वाढ याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, खरे म्हणजे याचा उल्लेखच असा करावयास पाहिजे की, अत्यंत व्यथित आणि दु:खी अंत:करणाने हे विषय मांडावे लागतात. कारण दिवसेंदिवस राज्यामध्ये वाढत असलेली असुरक्षितता, आरोग्याची हेळसांड हे सर्व प्रकार पाहिल्यानंतर माणसाच्या जगण्याची किंमतच संपून गेलेली आहे की काय असा प्रश्न उभा राहतो. या दृष्टीकोनातून मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

"दिवसेंदिवस लोकलने प्रवास करणाऱ्या महिलांवर होणाऱ्या अत्याचारांच्या प्रमाणात सतत वाढ होत राहणे, विशेषत: रात्रीच्या वेळी महिलांच्या डब्यात सुरक्षेसाठी पोलीस असणे अत्यावश्यक असताना ड्युटी दिलेले पोलीस हजरच नसणे, पुरेशा संख्येने महिला पोलीसही नेमल्या जात नसणे, समाजकंटक या परिस्थितीचा फायदा घेऊन केवळ विनयभंगच नाही तर प्रसंगी डब्यातून ढकलून मारण्यासाठी प्रवृत्त होतात. हे सर्व प्रकार तत्काळ थांबविण्यासाठी राज्याच्या गृह विभागाने आणि रेल्वे खात्याच्या पोलीस विभागाने एकत्र येऊन ताबडतोब कारवाई करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...4....

RDB/ KTG/ D/ MMP

**पृ. शी./मु. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील मूल (ता.भवराळा) चिमढा नदीजवळ खेडी, चांदापूर येथील पाणीपुरवठा योजनेची मुख्य पाईपलाईन लिकेजमुळे हजारो लिटर पाण्याचा होत असलेला अपव्यय याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

"राज्यात विशेषत: चंद्रपूर जिल्ह्यातील मूल ता. भवराळा, चिमढा नदीजवळ, खेडी, चांदापूर येथील पाणी पुरवठा योजनेची मुख्य पाईपलाईन लिकेजमुळे हजारो लिटर पाण्याचा अपव्यय होणे, तालुक्यात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना बोअर वेलवर दुपारचे बारा वाजेपर्यंत पाण्याचे गुंड धरुन उन्हात ताटकळत उभे राहावे लागणे, एकीकडे पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना दुसरीकडून दूरवर पाणी आणण्यासाठी पायपीट करावी लागणे, जीवन प्राधिकरण पाणी पुरवठा योजना, ग्रामीण पाणी योजनेची मुख्य पाईपलाईन लिकेज असणे, पाणी असूनही अधिकाऱ्याचे नियोजन नसल्याने नागरिकांना पाण्याचा दुष्काळ सहन करावा लागत असणे, यावर शासनाने ताबडतोब तातडीने करावयाची कार्यवाही, यावर शासनाचे लक्ष वेधण्याकरिता मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

----

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. / मु.शी.** :राज्यात महिलांच्या सॅनेटरी नॅपकिनची विल्हेवाट लावण्याचा निर्माण झालेला प्रश्न याबाबत डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, काही विषय सभागृहात वारंवार उपस्थित होत असतात. परंतु आता मी जो विषय मांडत आहे त्या विषयाबाबत यापूर्वी कोणत्याही सदस्यांनी लक्ष वेधलेले आहे असे मला वाटत नाही. एक्सटेण्डेड प्रोडयुसर्स रिस्पॉन्सिबिलिटी म्हणजे प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेण्ट ॲण्ड हँडलिंग रुल्स, 2011 हा कायदा स्त्रिया सॅनेटरी नॅपकिन्स वापरतात त्याला देखील लागू आहे. प्रॉक्टर ॲण्ड गॅम्बल सारखी कंपनी किंवा शेकडो कंपन्या कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय सॅनेटरी नॅपकिन्सच्या माध्यमातून करीत असतात. माझ्याकडे पुण्यातील कचरा वेचक संघटनेच्या वतीने निवेदन आलेले आहे. सर्व औषध कंपन्यांनी सॅनेटरी नॅपकिन बरोबर एक कागदी बॅग द्यावी अशा आशयाचे पत्र लिहिण्याची एक मोहिम घेतलेली आहे. जेणे करुन सॅनेटरी नॅपकिन्स कागदात गुंडाळून कचऱ्याच्या टोपलीत टाकली जातील. आज हजारो महानगरपालिका व शेकडो ग्रामीण भागात परिस्थिती अशी आहे की, ते उघड्यावर टाकले जातात. औषध कंपन्यांनी विक्री करीत असताना कागदी बॅग दिली पाहिजे. त्यामुळे कचरा वेचकांनाही त्यात सॅनेटरी नॅपकिन आहे ते कळू शकेल. कचरा वेचकांना कचरा ढुंढाळताना हाताला सॅनेटरी नॅपकिन लागतात. त्यामुळे औषध कंपन्यांना सॅनेटरी नॅपकिन विकत असताना त्यासोबत कागदी बॅग देण्याचे बंधनकारक केले पाहिजे. त्यावर कोठे तरी आयडेंटिफिकेशन असले पाहिजे. म्हणून या कचरा वेचक संघटनेने तशी मागणी केलेली आहे. या मागणीकडे सरकारने बघ्याची भूमिका न घेता यामध्ये हस्तक्षेप करुन औषध कंपन्यांना हा विषय बंधनकारक करुन सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शासनाने महत्वाचे पाऊल उचलावे, या महत्वाच्या बाबीकडे मी या विशेष उल्लेखाच्या शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

--------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. / मु.शी.** :मागासवर्गीय समाजाला कर्ज हमी मिळत नसल्यामुळे मागासवर्गीय समाज विकासापासून वंचित राहणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" राज्यातील साखर कारखाने व सूत गिरण्या यांना आतापर्यंत राज्य शासनाने 1,874 कोटी रुपये थकविले असतानाही त्यांना पुन्हा कर्ज हमी देण्यात येते. मात्र मागासवर्गीयांच्या कर्ज हमीला नकार देण्यात आल्यामुळे महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाकडे सध्या कर्जासाठी सुमारे 15 हजार अर्ज पडून असल्याचे आढळून आले आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे. यामुळे मागासवर्गीय समाजाला सक्षम करण्यासाठी कर्जाची आवश्यकता असतानाही कर्ज हमी मिळत नसल्यामुळे कर्ज उपलब्ध होत नाही व यामुळे मागासवर्गीय विकासापासून वंचित राहत आहे. केंद्र शासनाने सफाई कामगार व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीचे पुनर्वसन करण्यासाठी राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाची (एनएसकेएफडीसी) स्थापन करण्यात येऊन त्या अंतर्गत विविध व्यवसायासाठी 4 टक्के व्याजाने 10 लाख रुपयापर्यंत कर्ज दिले जाते. मात्र सध्या कर्ज हमी देण्यात आली नसल्यामुळे मागासवर्गीयांना कर्ज मिळत नाही. यामुळे मागासवर्गीयांच्या कर्जाला कर्ज हमी देण्याबाबत तातडीची कार्यवाही होणे आवश्यक आहे. अशा या अतिशय महत्वाच्या व मागासवर्गीयांच्या जिव्हाळ्याच्या विषयावर मी विशेष उल्लेखाद्वारे सूचना मांडीत आहे."

----

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. / मु.शी.** :राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रयोगशाळा सहाय्यकांची पदे रद्द करणाऱ्या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक नुकसानीस बळी पडावे लागणे याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रयोगशाळा सहाय्यकांची (Lab.Asstt.) पदे रद्द करुन त्याचा समावेश चतुर्थ श्रेणीत करावा असा शासनाने (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) निर्णय घेणे, तथापि, प्रयोगशाळा सहाय्यकांची पदे व्यपगत करताना माध्यमिक शाळा संहिता यामधील जोडपत्र क्र.70 वरील तसेच शिक्षणाचा आकृतीबंध पत्र क्र.17 मधील 18-अ या दोन्ही तरतुदींचा भंग करण्यात येणे, तसेच माध्यमिक शाळा संहितेत सदर कलमाबाबत कोणतीही दुरुस्ती नसताना सदरची पदे व्यपगत करण्यात येणे, वास्तविकत: या प्रकरणी दि.3.7.2013 रोजी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्या समवेत झालेल्या बैठकीत सदरची पदे पुनर्जीवित करण्याबाबत मा.मंत्री महोदयांनी स्पष्ट आदेश दिले असतानाही, त्या आदेशाचे पालन न करता कर्मचाऱ्यांकडून विकल्प भरुन घेण्याची सक्ती करण्यात येणे, इतकेच नव्हे तर अतिरिक्त कर्मचाऱ्यांची सेवा सामावून घेताना त्यांची वेतनश्रेणी संरक्षित करण्यात यावी या दि.26.3.2004 च्या शासन निर्णयामधील 16(इ) च्या तरतुदीनुसार व मा.राज्यपालांचे देखील तसे आदेश असतानाही त्या आदेशांचे उल्लंघन करण्यात येऊन 30 वर्षापेक्षा अधिक सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांची पदे व्यपगत करणाच्या निर्णयामुळे आर्थिक नुकसानीस नाहक बळी पडावे लागणे, वास्तविकत: प्रयोगशाळा सहाय्यक ही पदे प्रात्यक्षिकांच्या आयोजनामध्ये महत्वाची भूमिका आणि जबाबदारी पार पाडणारी असल्याने, प्रयोगशाळा सहाय्यकांची (Lab.Asstt.) पदे व्यपगत न करता, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार पुनर्जीवित करण्यात यावीत, एवढीच मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे."

-----

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : क्रीडा मंडळाच्या व्यायाम शाळांना 7 लाख रु. अनुदान देण्याबाबत प्रा. सुरेश नवले,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यातील क्रीडा मंडळाच्या व्यायाम शाळा बांधकामासाठी 2 लाख 50 हजार रुपयावरुन 7 लाख रुपये निधी देण्याबाबत संबंधित विभागाकडून मागील सुमारे एक वर्षापासून होणा-या प्रत्येक अधिवेशनामधून आश्वासन देण्यात येऊनही अद्यापि व्यायाम शाळा बांधकामासाठी 7 लाख रुपयाचे अनुदान दिले जात नसल्याचे आढळून येणे, राज्यात विविध क्षेत्रातील खेळाडूंची संख्या निर्माण व्हावी असे शासनाचे धोरण आहे. मात्र क्रीडा मंडळाच्या व्यायाम शाळांना पुरेसा निधी नसल्यामुळे विविध क्षेत्रातील खेळाडू खेळापासून वंचित राहत आहेत, तसेच विविध क्षेत्रातील क्षेळाडू तयार करण्यास अनेक अडचणी निर्माण होत आहेत. यामुळे खेळाडूंमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, खेळाडूंच्या हिताचा विषय असल्यामुळे या विषयावर मी विशेष उल्लेखाद्वारे सूचना मांडीत आहे."

---

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : पोलीस दलात मंजूर पदांपेक्षा 50 टक्के अधिक मनुष्यबळाची भरती करण्याची आवश्यकता याबाबत ॲड. आशिष शेलार, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी दिनांक 30 जुलै 2013 रोजी विधानपरिषदेत विशेष उल्लेखाच्या माध्यमातून खालील प्रश्नाकडे माननीय मंत्री महोदयांचे व सभागृहाचे लक्ष वेधून कारवाई व्हावी अशी अपेक्षा करतो.

"पोलीस दलातील मंजूर पदांची संख्या 2,09,443 असून पदे मंजूर करताना 23 जानेवारी 1960च्या शासन निर्णयानुसार निकष लावण्यात येतात अशी माहिती पोलीस महासंचालक कार्यालाने दिलेली आहे. याचा अर्थ 1960च्या जनगणनेच्या आधारे ही पदे मंजूर करण्यात आली आहेत. 2011च्या जनगणनेनुसार 1,22,788 इतके मनुष्यबळ वाढविणे आवश्यक आहे, असेही पोलीस महासंचालक कार्यालयाने कळविले आहे. मंजूर पदापेक्षा 50 टक्के अधिक संख्येने मनुष्यबळाची गरज पोलीस खात्यास आहे व ही गंभीर बाब आहे. तरी यासंदर्भात शासन काय कार्यवाही करणार आहे व मनुष्यबळाची कमतरता केव्हा भरुन काढणार आहे याची माहिती तत्काळ सभागृहासमोर सादर करण्यासाठी आपण शासनाला आदेश द्यावेत अशी माझी या विशेष उल्लेखाद्वारे आपणास विनंती आहे."

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

**पृ. शी./मु. शी.** : साने गुरुजींचे नाव उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला देण्याची केलेली मागणी याबाबत श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"साने गुरुजींचा मोठेपणा, खानदेशातील त्यांचे दीर्घकालीन वास्तव्य, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील त्यांची संस्कारक्षम कृती आणि स्वातंत्र्य लढयातील पुरोगामी परिवर्तनवाद्यांच्या चळवळीच्या दिग्दर्शनासाठी केलेले योगदान या गोष्टी खानदेशाच्या उभारणीत महत्वपूर्ण राहिलेल्या आहेत. खानदेशावर त्यांचा अमीट असा ठसा गुरुजींच्या जाण्यानंतरच्याही काळामध्ये आजपर्यंत तीन पिढयावर कायम आहे. कोकणामध्ये जन्माला येऊन उच्च शिक्षण व गुणवत्ता संपादन करुन खानदेशातील अंमळनेर या गावी शाळा व वसतिगृहातील मुलांच्या शिक्षणाच्या सेवेत ते दाखल झाले. त्यांनी खानदेश हीच त्यांची कर्मभूमी मानली. खानदेशात राहून त्यांनी स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. त्या चळवळीमध्ये संपूर्ण खानदेश पेटून उठला. साने गुरुजींची ओळख संपूर्ण महाराष्ट्राला सर्वश्रृत आहे. म्हणून साने गुरुजींचे नाव उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला द्यावे अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे सरकारला करीत आहे.

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पॉईण्ट ऑफ इन्फॉर्मेशन

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय,पुण्यामध्ये पिंपरी-चिंचवड प्राधिकरणासमवेत जमिनीचा प्रश्न आणि गरीब लोकांची घरे नियमित करावीत यासाठी अनेक दिवस लोकांचे आंदोलन चालू आहे. 1984पूर्वीच शेतक-यांना साडेबारा टक्क्याने जमीन परत करणे गरजचे होते, ते शासनाने केलेले नाही. तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील घरांना लागलेला शास्तीकर रद्द करण्यात यावी अशी त्यांची मागणी आहे. या संदर्भात महापालिकेने दिलेला प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे. 31.3.2012च्या पूर्वीची बांधकामे नियमित करण्यात यावीत अशा त-हेचा तो प्रस्ताव आहे. आज पिंपरी-चिंचवड मधील हजारो लोक आझाद मैदानामध्ये येऊन भर पावसात बसलेले आहेत. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या मोर्चाला सामोरे जाऊन त्यांना न्याय द्यावा यासाठी मी माहितीच्या मुद्याद्वारे सभागृहाचे लक्ष वेधीत आहे.

--

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

30-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) UU-5

MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

**पृ. शी.**/**मु. शी.** : कल्याण मधील दुर्गाडी पुलाला समांतर पूल उभारण्याची

आवश्यकता याबाबत श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

कल्याण शहरातील प्रवेशद्वार असलेल्या दुर्गाडी परिसरासह आसपासच्या परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या आणि आवश्यक असणा-या दुर्गाडी पुलाला समांतर पूल उभारण्याचा प्रस्ताव गेल्या अनेक महिन्यापासून मंत्रालयात धूळ खात पडून आहे. सध्या उपलब्ध असलेला दुर्गाडी पूल वाढत्या वाहतुकीला अपुरा पडत असल्यामुळे हजारो वाहनचालकांसह वाहतूक पोलिसांनाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याबाबत आम्ही वेळोवेळी मागणी करुन आणि जनतेच्या अडचणी शासन दरबारी पोहोचवून सुध्दा या प्रलंबित प्रश्नाला अजून न्याय मिळालेला नाही. या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर होणारी वाहतूक कोंडी आणि वेळेचा होणारा अपव्यय टाळण्याच्या दृष्टीकोनातून या नवीन दुर्गाडी पुलाला समांतर पूल उभारण्याची गरज आहे. तशी सूचना कल्याण शहर वाहतूक शाखेने ठाणे पोलिस आयुक्तांना केली. त्या आधारे ठाणे पोलीस आयुक्त यांनी डिसेंबर 2012मध्ये या ठिकाणी समांतर पूल उभारण्याचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाला पाठविला. मात्र 7 महिने उलटून देखील त्यावर अद्याप कोणताही विचार झाला नसल्याचे सद्य:स्थितीवरुन दिसून येते. विशेष म्हणजे कल्याण-डोंबिवलीकरांबरोबर उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर येथील नागरिकांना देखील या पुलाचा उपयोग होणार आहे. म्हणून कल्याण आणि दुर्गाडी परिसरातील वाहतूक कोंडी ही शहरातील नागरिकांची रोजची समस्या बनली असून या ठिकाणी तासनतास होणा-या वाहतूक कोंडीमध्ये त्यांना अडकून रहावे लागते. त्यामुळे या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून कल्याण परिसरातील दुर्गाडी पुलाला समांतर पूल उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनाने तातडीने करावा अशी मागणी मी करीत आहे."

---

..नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.**:श्री.दि.बा.पाटील साडेबारा टक्के योजना असे पुनर्नामांकन याबाबत श्री.नरेंद जाधव, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

" विधानसभा, विधानपरिषद व लोकसभेचे सदस्यत्व भूषविलेले शेतकरी व कष्टकऱ्यांचे झुंझार नेते श्री.दिनकर बाळू पाटील (दि.बा.पाटील) यांचे दिनांक 24 जून, 2013 रोजी निधन झ ाले. नवी मुंबई शहराची स्थापना करताना शासनाने उरण व पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी सक्तीने संपादन करीत असताना शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्याया विरुध्द स्वर्गीय दि.बा.पाटील यांनी लढा उभारला व हया लढयाचे यशस्वी नेतृत्वही केले आणि महाराष्ट्र शासनास दिनांक 6 मार्च, 1090 रोजी "साडेबारा टक्के योजना" नामक शासन निर्णय पारीत करण्यास भाग पाडले. हा निर्णय म्हणजे कोणत्याही प्रकल्पाने बांधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तास शासनाने संपादित केलेल्या जमिनीच्या सोडबारा टक्के जमीन त्या प्रकल्पग्रस्तास देण्याचे बंधन सरकारवर आले. असा हा ऐतिहासिक ठरलेला निर्णय देश पाळतीवरील अन्य प्रकल्पग्रस्तानाही मार्गदर्शक ठरला आहे. यास्तव ही प्रसिध्द योजना हया योजनेचे प्रणेते श्री.दि.बा.पाटील याच्या नावाने ओळखली गेल्यास त्यांना ती उचित श्रध्दांजली ठरेल अशी शेतकरी व कष्टकरी वर्गाची मागणी आहे. तरी उपरोक्त योजनेचे "श्री.दि.बा.पाटील साडेबारा टक्के योजना" असे पुनर्नामांकन करण्यात यावे अशी शिफारस या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे शासनास करीत आहे."

-----------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :मल्टीड्रग रजिस्टन्स टी.बी.चे रुग्ण मुंबई शहरात आढळून येणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

" आज अनेक वृत्तपत्रांमध्ये छापून आलेले आहे की, प्रज्ञा फाऊंडेशनचा एक अहवाल प्रसिध्द झाला आहे, त्यामुळे मुंबईकराच्या आरोग्याच्या बाबतीत एक प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. पावसाळयात मलेरिया, डेंग्यू सारखे आजार उदभवतात. या वर्षी मलेरियाचे प्रमाण कमी असले तरी डेंग्यूचे प्रमाण वाढत चाललेले आहे. म्हणजे एम.डी.आर.(मल्टीड्रग रजिस्टन्स टी.बी.)चे 6219 रुग्ण आढळून आले आहेत. ही अतिशय वाईट व गंभीर बाब आहे. एम.डी.आर.टी.बी. झपाटयाने पसरु नये, कारण त्याचा संसर्ग लोकांना होईल. नंतरची उपाययोजना त्या रुग्णांना लागू पडणार नाही. म्हणून या बाबतीत शासनाने काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे." धन्यवाद.

----------

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 45 मिनिटांनी पुन्हा सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.14 ते 02.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेण्यासंबंधी

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आज सकाळी सभागृहाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी मी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे हे जाणून घेण्यासंबंधीचा मुद्दा मांडला होता. त्या अनुषंगाने संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले होते की, आज दुपारपर्यंत सभागृहाला कळविण्यात येईल. या प्रश्नाबाबत शासनाची नेमकी भूमिका सभागृहापुढे स्पष्ट होणे अत्यंत आवश्यक आहे.

**सभापती** : मी आपली भावना शासनाला कळवितो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेण्याबाबत चर्चा सुरु असताना सभागृहात शासनाच्या वतीने स्टेटमेंट करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्या स्टेटमेंटनंतर सिंचनासंबंधीच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करण्याचे ठरले होते. आज देखील सकाळी माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी सांगितले होते की, थोड्या वेळानंतर सभागृहात निर्णय जाहीर करु. त्या अनुषंगाने त्यांनी सभागृहात स्टेटमेंट केले तर पुढील कामकाजाच्या दृष्टीने ते सोयीचे होईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण मोठे मन करुन शिवसेना पक्षाचे गटनेते माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेण्याबाबत मध्यस्थी करावी. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्याला पत्र देऊन दिलगिरी व्यक्त केली आहे. त्यांनी मला असे सांगितले की, आपण माननीय सभापतींना विनंती करावी. आम्ही या विषयाच्या अनुषंगाने काल आपला सन्मान राखला, आजही सन्मान ठेवला आहे आणि भविष्यातही सन्मान करणार आहोत. माझी आपल्याला विनंती आहे, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेतले आणि त्यांना सभागृहात येण्याची अनुमती मिळाली तर आम्हाला नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेत मोकळेपणाने सहभागी होता येईल. काल आम्ही सभागृहात वेलमध्ये बसलो होतो. त्या अनुषंगाने निलंबनाच्या प्रस्तावावर सकारात्मक भूमिका घेण्याचे शासनाने आश्वासन दिले होते. या ठिकाणी संसदीय कार्यमंत्री उपस्थित आहेत. अधिवेशनाचे तीन दिवस शिल्लक राहिलेले आहेत. शासनाने निलंबन मागे घेण्याबाबत आपण मध्यस्थी करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर आणि रामदास कदम यांनी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. आज सकाळी याबाबत सदनामध्ये मी स्पष्ट केले होते की, राज्याचे माननीय मुख्यमंत्री आणि आम्ही एकत्र बसून या संदर्भातील विचारविनिमय करुन प्रस्ताव कशा पध्दतीने तयार करायचा याची चर्चा करीत आहोत. मला असे वाटते की, आपण सभागृहाचे नियमित कामकाज सुरु ठेवावे. निश्चितपणे या विषयाबाबत विचारविनिमय करुन या संदर्भात काय निर्णय घ्यायचा याबद्दलची माहिती सदनाला देण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेण्याबाबत शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाच्या वतीने आम्ही आपल्याला विनंती केली आहे. माझी विनंती आहे की, या मुद्याबाबत तोडगा काढण्यासाठी सभागृहाची बैठक 10 मिनिटे तहकूब करावी आणि माननीय सभापतींसमवेत चर्चा करुन नंतर कामकाज सुरु केले तर ते अधिक सोयीचे होईल असे मला वाटते.

नंतर 2एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

हा विषय डायरेक्ट माननीय सभापती महोदयांच्या संदर्भातील आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर बोलून निर्णय घेऊ असे जे काही सांगण्यात आलेले आहे त्यामुळे काहीही होणार नाही. या विषयाचा संबंध डायरेक्ट माननीय सभापती महोदयांशी आहे, तसेच माननीय सभापती महोदय आता चेअरवर बसलेले आहेत. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात आपल्याकडून आमची दिशाभूल होते की, काय अशी शंका मनात येते. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे निलंबन मागे घेण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी सभागृहाचे कामकाज 10/15 मिनिटासाठी स्थगित करण्यात यावे अशी विनंती आहे.

श्री. हेमंत टकले : सन्माननीय विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जो विषय उपस्थित केलेला आहे त्याबद्दल संसदीय कार्यमंत्र्यांनी "शासन यासंदर्भात विचार करीत आहे" असे सांगून आश्वासित केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो मुद्दा केवळ माननीय सभापती महोदयांपुरता मर्यादित नव्हता. ज्यावेळेला घटना घडली त्यावेळेला तेथे उपस्थित असलेले सर्वजण त्या घटनेचे साक्षीदार होते. त्यामुळे माननीय सभापती महोदयांचा मान राखणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. निलंबन रद्द करण्याचा निर्णय माननीय सभापती महोदयांकडे मागण्या ऐवजी आपल्या सर्वांच्या भावना कळविण्यात आलेल्या आहेत. विरोधी पक्षाने कामकाज करण्यामध्ये काल सहकार्य केलेले आहे. निलंबन मागे घेण्याचा निर्णय येईल तोपर्यंत आपण सभागृहाचे कामकाज यापुढेही सुरु ठेवले तर आपल्याला आजचे सर्वकामकाज पूर्ण करता येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, निलंबनाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : या निर्णयाच्या अनुषंगाने सभापती म्हणून मी काही बोलावे अशी परिस्थिती मला काही दिसत नाही. याबाबतीत सन्माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी या विषयाच्या संदर्भात सकाळी आणि आताही निवेदन केलेले आहे. या विषयाच्या संदर्भातील प्रक्रिया त्यांच्याच पातळीवर पूर्ण होऊ द्यावी, त्यामध्ये मी हस्तक्षेप करणे योग्य होणार नाही असे मला वाटते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, निलंबनाचा निर्णय हा संसदीय कामकाज मंत्र्यांनी तसेच सरकारने घेतलेला असतो. संसदीय कार्यमंत्र्यांनी आजच्या प्रश्नोत्तराच्या वेळेस सांगितले होते की, "या विषयावर माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री तसेच संबंधितांशी चर्चा करणार आहोत". ही घटना आपल्या दालनात घडलेली आहे. माननीय सभापती महोदय, आसनावर असल्यामुळे यासंदर्भातील निर्णय घेण्यास वेळ मिळाला नसावा. त्यामुळे निलंबनाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटे स्थगित केले तर सोईचे होईल. किंवा तालिका सभापती महोदयांना आसनावर बसवून निलंबनाच्या संदर्भात चर्चा केली तर तोही एक मार्ग निघू शकतो.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे निलंबन रद्द होण्याच्या संदर्भात सभागृहात निवेदन व्हावे असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. आता आपण सभागृहाच्या पुढील कामकाजास सुरुवात करावी अशी माझी विनंती आहे. सभागृहाच्या कामाकाजामध्ये विरोधी पक्षाचे नेहमीच सहकार्य असते. विरोधी पक्षाने सभागृहाच्या कामाकाजात कालही सहकार्य केले, आजही केले आणि भविष्यातही सहकार्य मिळेल. त्यामुळे सभागृहाचे कामकाज आता सुरु करावे अशी माझी विनंती आहे. निलंबनाच्या बाबतीत विचार विनिमय सुरु आहे. फक्त एकत्रितपणे बसून, काही बाबतीतील चर्चा करुन मार्ग काढावा लागणार आहे. या विषयाच्या संदर्भात निवेदन निश्चितपणे केले जाईल असे मी सकाळीही सांगितले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या निलंबनाचे निवेदन आज 4 वाजता, 5 वाजता किंवा किती वाजता केले जाणार आहे याची माहिती दिली तर बरे होईल.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी आज सकाळी सांगितले होते की, आम्ही दुपार पर्यंत निर्णय घेतो. आम्ही दुपार पर्यंत थांबलो. काल आम्हाला सांगितल्यानंतर आम्ही काल देखील थांबलो होतो. आम्ही शासनाला मदत केली नाही अशातला भाग नाही. आम्हाला देखील कामकाजात भाग घ्यायचा आहे म्हणून शासनाला सहकार्य करीत आहोत. शासन सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत नसेल तर त्यासाठी आम्ही काय केले पाहिजे हे आम्हाला सांगावे. यासाठी माझी आपल्याला विनंती आहे की, सभागृहाचे कामकाज आपण 10-15 मिनिटांसाठी तहकूब करावे. या अवधीमध्ये आपण चर्चा करावी. त्याद्वारे काय निर्णय घेतला आहे तो सभागृहाला कळेल. या संबंधातील आम्हाला शासनाची भूमिका कळली पाहिजे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपली सभागृहातील कामकाज व्यवस्थितपणे चालावे यासाठी चर्चा झाली होती. या सभागृहात आपल्याला जलसंपदा व अन्य काही विषयावर बोलावयाचे होते. ती चर्चा करण्याकरिता संमती दिली त्याप्रमाणे सभागृहात निवेदन करण्यात आले.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या निलंबनासंबंधीचा आहे. मी सकाळीही सांगितले आहे आणि आताही सांगतो की, यासंबंधी कोणीही गैरसमज करून घेऊ नये. सभागृह चालावे म्हणून हे सर्व पर्याय आपण काढत आहोत. सभागृहाचे कामकाज तहकूब करून पुन्हा सुरू करणे संयुक्तिक होणार नाही असे मला वाटते म्हणून माझी विनंती आहे की, आपण पुढच्या कामकाजाला सुरूवात करावी. माझी माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा झालेली आहे. या चर्चेमध्ये काही विषय होते. ते मला येथे सांगता येणार नाहीत. या संबंधातील निवेदन निश्चितपणे केले जाईल. आपण पुढचे कामकाज सुरू करावे अशी माझी विनंती आहे. यासंबंधातील निर्णय झाल्यानंतर शासनाची भूमिका निश्चितपणे येथे मांडण्यात येईल.

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सन्माननीय सदनाला सांगू इच्छितो की, माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी सांगितले की, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांची चर्चा सुरू आहे. सदर चर्चा प्रक्रिया पूर्ण होण्याकरिता काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. या बाबत त्यांनी लवकर विचार करावा व या सदनाला यासंबंधी विश्वासात घ्यावे एवढेच मी शासनाला सांगू इच्छितो. मला वाटते की, आपण सदनाच्या कामकाजाला आता सुरूवात करावी.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री ज्यावेळी निलंबन मागे घेण्यासंबंधीचा प्रस्ताव आणतील त्यावेळी आम्ही कामकाजात सहभागी होऊ.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन बसतात.)

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी सांगितले की, या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा सुरू असून सदर चर्चा झाल्यानंतर लगेच निर्णय घेण्यात येईल. अन्न सुरक्षा संबंधातील प्रस्ताव आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आला आहे. त्याला विरोध म्हणून विरोधी पक्ष हे सर्व करीत आहे काय ? हे जे चालले आहे ते बरोबर नाही. अन्न सुरक्षा संबंधातील जो प्रस्ताव आहे त्या प्रस्तावाला विरोध म्हणून हा प्रकार आहे काय ? या प्रस्तावावर माननीय विरोधी पक्षाने चर्चा करावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माझी विरोधी पक्षातील माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपली चर्चा सुरू असून त्यात मार्ग काढण्यात येत आहे. असे असताना माननीय विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी वेलमध्ये बसणे आणि आमचा निर्णय झाल्यानंतर पुन्हा कामकाजात सहभागी होऊ असे म्हणणे देखील योग्य नाही. आपण चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहोत. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती करतो की, अशा प्रकारे विराधी पक्षातील माननीय सदस्यांनी खाली बसणे योग्य नाही. सभागृहाचे कामकाज आपल्याला चालवायचे आहे. आम्ही खाली बसतो आपण सभागृहाचे कामकाज सुरू ठेवावे असे म्हणणे योग्य नाही. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, विधान सभेतील विषय वेगळा आहे आणि या सभागृहातील विषय वेगळा आहे. कृपा करून दोन्ही विषय क्लब करू नयेत. असे करणे योग्य नाही. या संबंधातील चर्चा सुरू आहे. या संबंधातील निवेदन करावे असे माननीय सभापतींनी सांगितले आहे. आमची चर्चा झाल्यानंतर या सभागृहात मी निवेदन करणार आहेच.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील....

सभागृहाचे कामकाज सुरु राहावे, एवढीच आमची विनंती आहे. मी पुन्हा एकदा विनंती करतो की, विरोधी पक्षाने सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घ्यावा. महोदय, विरोधी पक्षाने एका बाजूला सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्याचा निर्णय घ्यायचा आणि दुसऱ्या बाजूला अशा प्रकारे वेलमध्ये बसणे हे योग्य नाही. माननीय सभापती महोदय, आपणच यावर निर्णय घ्यावा, असे मला वाटते.

**सभापती** : मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.00 वाजता 5 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

--------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 3.11 वाजता 15 मिनिटांकरिता स्थगित झाली )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी ज्या मुद्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित झाले होते त्याबाबत आपण गेल्या आठवडाभरातील घडामोडी पाहत आहोत. त्या विषयाबाबत वेगवेगळी स्थितंतरे झाली आहेत. आमचा एका मुद्याबाबत आग्रह आहे आणि सत्ताधारी पक्षाचाही आग्रह आहे. त्यावेळी हा विषय न्यायप्रविष्ट असल्याचे सांगण्यात आले होते. यासंबंधी सर्व प्रकारची चर्चा झाल्यानंतर पॉझिटिव्ह मोडला आपण आलो होतो. पॉझिटिव्ह मोडला येत असताना सर्वांबरोबर चर्चा होत असताना एक दिशा ठरविली जात होती. त्या सर्व चर्चेला अनुलक्षून विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनीही त्याबाबत तो विषय प्रतिष्ठेचा न करता सरकारला मदत केली. काल सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी अपेक्षा होती, आज सकाळी अपेक्षा होती, आज दुपारपर्यंत अपेक्षा होती. आम्ही आताच निवेदन करावे असे म्हणत नाही. परंतु सरकारने त्या विषयातील आपली मानसिकता काय आहे हे इंगित करणारे किंवा दिशादर्शन करणारे वक्तव्य करावे असे अपेक्षित होते. आमचे असे म्हणणे आहे की, सरकारची मानसिकता दर्शविणारे निवेदन सरकारने विधानसभेमध्ये केलेले आहे. किमान त्या वक्तव्याची आम्ही अपेक्षा करीत आहोत. सरकारला तसे निवेदन येथे करावयाचे नाही असे दिसते, त्यामुळे सरकारच्या वतीने आम्ही बघू, आम्ही करु असे सांगितले जात आहे. सन्माननीय सदस्यांचे निलंबन योग्य की अयोग्य आहे, माननीय सभापतींच्या दालनात जे घडले होते त्या चर्चेमध्ये आम्ही जात नाही. विधानसभेमध्ये वापरण्यात आलेले अपशब्द चुकीचे होते की, माननीय सभापतींच्या दालनात घडलेला प्रकार चुकीचा होता याबाबत आम्ही काही म्हणत नाही. तरीही विधानसभेमध्ये शासनाने निवेदन केलेले आहे. त्या चर्चेमध्ये आम्ही जात नाही. विरोधकांची माफक अपेक्षा आहे. आम्हाला सभागृहासमोरील कामकाज करावयाचे आहे. पुढील तीन दिवस सभागृहासमोर विरोधी पक्षाकडून व सत्ताधारी पक्षाकडून महत्वाचे विषय चर्चेला घेतले जाणार आहेत. आज सत्ताधारी पक्षाकडून नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडला जाणार आहे त्यावर आम्हाला आमची मते मांडावयाची आहेत. अन्न सुरक्षा विधेयकावर लोकसभेत नंतर चर्चा होणार आहे. परंतु त्या विधेयकाच्या अनुषंगाने या सभागृहात अगोदर चर्चा होणार आहे. हे पुरोगामी महाराष्ट्र राज्य आहे. कदाचित या राज्याच्या कल्पनेतूनच.....

2...

NTK/ D/ MMP/

श्री.विनोद तावडे.....

हायकमांडने हा विषय तेथे आणला असावा. त्या विषयाचे क्रेडिटही आम्हाला तुम्हाला द्यावयाचे आहे.

या राज्यातील रोजगार हमी योजना केंद्र सरकारने स्वीकारली आहे. त्या प्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्यामार्फत हा विषय देखील केंद्र सरकार स्वीकारणार आहे की काय असे आम्हाला वाटत आहे. आम्हाला हे सर्व पॉझिटिव्हली करावयाचे आहे. या विषयाबाबत सरकार सकारात्मक निर्णय करीत आहे असे त्यांनी सांगावे. काल संध्याकाळपर्यंत पॉझिटिव्ह माहोल तयार केला होता. उर्वरित चार दिवसामध्ये आणखी काही पॉझिटिव्ह गोष्टी आपल्याला करावयाच्या आहेत. सरकारने तसा निर्णय करावा असा आग्रह आम्ही धरला आहे. मी आपल्यामार्फत सरकारला पुन्हा एकदा विनंती करतो की, सरकारने याबाबत विधानसभेमध्ये सकारात्मक निर्णय जाहीर केला तसे या सभागृहातही सकारात्मक निवेदन करावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आज सकाळी व मघाशीही या संदर्भातील मी निवेदन केलेले आहे. एक गोष्ट निश्चित आहे की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या निलंबनाबाबत चर्चा चालू आहे. मी दोन्ही वेळा निवेदन करीत असताना हेच सांगितले आहे की, चालू असलेली चर्चा पूर्ण झाल्यानंतर या सदनात योग्य ते निवेदन करण्यात येईल. या सभागृहाचे कामकाज चालू ठेवावे अशी मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो. आपण याबाबत सहकार्य केलेले आहे त्याची मला कल्पना आहे. म्हणूनच या विषयाबाबत चर्चा सुरु केली आहे. हा डेडलॉक सभागृहामध्ये सोडविण्याचा सर्वांनी प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:30

श्री. हर्षवर्धन पाटील...

त्याबद्दल दुमत नाही. सभागृह चालले पाहिजे. हा विषय आम्ही प्रतिष्ठेचा करीत नाही आणि आपण देखील तो प्रतिष्ठेचा करु नये. चर्चा झाल्यानंतर योग्य ते निवेदन आम्ही करु. माझी माननीय विरोधी पक्षनेत्यांना आणि विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, सभागृहाचे कामकाज चालू द्यावे. आपल्या समोर अनेक विषय आहेत. सभागृहामध्ये चर्चा सुरु करण्याच्या दृष्टीने योग्य वातावरण तयार केलेले आहे. असेच वातावरण पुढे रहावे अशी माझी विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : सकारात्मक निर्णय घ्यावा अशी आम्ही मंत्री महोदयांना विनंती केलेली आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : शेवटी संसदीय कार्यमंत्री उत्तर देत असताना किंवा निवेदन करीत असताना "योग्य ते" आणि "सकारात्मक" या शब्दामधील फरक माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मला साांगावा. असा शब्दप्रयोग करुन सरकारने देखील बोलले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा असेल तर ते बरोबर नाही. मी शासनाची भूमिका या ठिकाणी मांडलेली आहे.

**उप सभापती** : या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय सदस्यांच्या भावना माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी जाणून घेतल्या. सभागृहातील कामकाज मी माझ्या दालनातील स्क्रीनवरुन पहात होतो. मी सांगू इच्छितो की, ज्या गोष्टी आपणास अपेक्षित आहेत किंवा या सभागृहाला अपेक्षित आहेत त्यासंबंधीची चर्चा चालू आहे. त्या बाबतीत योग्य तो निर्णय घेतला जाईल. चर्चा झाल्यानंतर या ठिकाणी निवेदन करण्यात येईल. यावर अधिक चर्चा न करता आपण कामकाजाला सुरुवात करण्यास सहकार्य करावे अशी मी आपणास विनंती करतो. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना मी विनंती करतो आणि ते माझ्या विनंतीचा मान राखतील याची मला खात्री आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आपल्या विषयी आमच्या मनामध्ये नितांत आदर आहे आणि त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. काल देखील आम्ही या सदनामध्ये मार्गिकेमध्ये बसलो होतो. त्यानंतर आपण आदेश दिल्यानंतर आम्ही कामकाजामध्ये भाग घेतला व एक विधेयक देखील संमत केले. आज देखील सकाळपासून आम्ही कामकाजामध्ये भाग घेतलेला आहे. माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना आम्ही भेटलो. त्यांनी सांगितले की, दुपारपर्यंत योग्य ती घोषणा केली

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

जाईल. त्यानंतर पुन्हा एक तासाचा वेळ घेतला. आम्ही दुपारी 2.00 वाजता पुन्हा विचारणा केली. त्यांनी "हो" म्हटले. पुन्हा त्यांच्या दालनामध्ये गेलो. सभापती महोदय, निर्णय जाहीर करण्यासाठी काही काळवेळेचे बंधन आहे की नाही ? कालचा दिवस असाच गेला. आमच्या सहका-या प्रती आमची बांधिलकी आहे. या सभागृहामध्ये आमचे गटनेते नसताना या ठिकाणी कामकाज करणे आम्हाला पटत नाही. शासन या बाबतीत गंभीर नाही. शासनाने आम्हाला आश्वासन दिलेले असून शासनाने त्याचे पालन केले नाही. मी माननीय संसदीय कार्यमंत्र्यांचे आभार मानतो त्यांनी प्रयत्न केलेले आहेत. परंतु एकूणच शासनाच्या अशा प्रकारच्या मानसिकतेमुळे आम्ही कामकाजामध्ये भाग घेऊ शकत नाही, त्यामुळे आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात)

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: श्री.श्रीनिवास कर्वे, सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांनी श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा केलेला अवमान

**मु.शी.**: श्री.श्रीनिवास कर्वे, सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांनी श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा केलेला अवमान, या बाबतचा विशेषाधिकार समितीचा अहवाल विचारात घेणे व अहवालास अनुलक्षून प्रस्ताव

श्री.हेमंत टकले (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने असा प्रस्ताव मांडतो की,

"श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. तथा माजी मा.विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी श्री.समाधान डाबेराव, जिल्हा परिषद सदस्य, बुलडाणा यांच्या जातीच्या प्रमाणपत्राबाबत माहिती घेण्यासाठी श्री.श्रीनिवास कर्वे, सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता "प्रश्न विचारणारे आपण कोण ?" असे बोलून फोन बंद केल्याने तसेच यानंतर माजी माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या स्वीय सहायकांनी "विरोधी पक्ष नेते आपणाशी बोलू इच्छितात" असे सांगूनही श्री.कर्वे यांच्याशी संपर्क साधण्याचा तीन वेळा प्रयत्न केला असता तिन्ही वेळेस श्री.कर्वे यांनी फोन बंद केल्यामुळे उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणासंदर्भातील विधानपरिषद विशेषाधिकार समितीचा अहवाल विचारात घेण्यात यावा."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : अहवाल विचारात घेण्यात आला आहे. आता माननीय संसदीय मंत्र्यांनी प्रस्ताव मांडावा.

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. तथा माजी मा.विरोधी पक्ष नेते,विधानपरिषद यांनी श्री.समाधान डाबेराव, जिल्हा परिषद सदस्य, बुलडाणा यांच्या जातीच्या प्रमाणपत्राबाबत माहिती

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

घेण्यासाठी श्री.श्रीनिवास कर्वे, सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता "प्रश्न विचारणारे आपण कोण ?" असे बोलून फोन बंद केल्याने तसेच यानंतर माजी मा.विरोधी पक्ष नेत्यांच्या स्वीय सहायकांनी "विरोधी पक्ष नेते आपणाशी बोलू इच्छितात" असे सांगूनही श्री.कर्वे यांच्याशी संपर्क साधण्याचा तीन वेळा प्रयत्न केला असता तिन्ही वेळेस श्री.कर्वे यांनी फोन बंद केल्यामुळे उद्‌भवलेल्या विशेषाधिकार भंग व अवमानाच्या प्रकरणाबाबत विधानपरिषद विशेषाधिकार समितीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर हे सभागृह सदरहू अहवालातील निष्कर्षांशी सहमत असून असा ठराव करीत आहे की,

- भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी दूरध्वनीद्वारे माहिती विचारल्यास अथवा चौकशी केल्यास यथोचित माहिती देण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचनांचा समावेश शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमीत केलेल्या दिनांक 4 जून, 2011 रोजीच्या परिपत्रकात करण्यासंदर्भात शासनाने योग्य ती कार्यवाही करावी, जेणेकरून या बाबतीत कुठलीही संदिग्धता राहणार नाही.
- श्री.श्रीनिवास कर्वे, तत्कालीन सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांच्या गैरवर्तणूकीसंदर्भात तीव्र नापसंती व्यक्त करण्यात येत आहे व याप्रकरणी पुढे कोणतीही कार्यवाही न करता हे प्रकरण येथेच संपविण्यात यावे."

सभापती महोदय, या बाबतीत सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक आहे. कोणत्याही लोकप्रतिनिधींनी एखाद्या अधिकाऱ्यास काम सांगितले अथवा विचारणा केली तर मला वाटते लोकशाही पध्दतीने आणि सामान्य प्रशासन विभागाच्या नियमानुसार विचारलेली माहिती देणे अथवा लोकप्रतिनिधींशी व्यवस्थितपणे बोलणे किंवा त्यांचे काम समजून घेऊन त्यासंबंधी मार्गदर्शन करणे ही अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत आणि अधिकाऱ्यांनी सुध्दा आपले कर्तव्य पार पाडत असताना अशा प्रकारची गैरवर्तवणूक होऊ नये अशीही या निमित्ताने मी भावना व्यक्त करतो. यापुढे कोणतीही कार्यवाही न करता हे प्रकरण थांबविण्यात यावे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----------

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील ग्रामीण, दुर्गम व मागास भागातील लोकांना केंद्र सरकारच्या अन्न सुरक्षा योजनेंतर्गत स्वस्त दरात धान्य उपलब्ध करुन देणे

**मु.शी.**: राज्यातील ग्रामीण, दुर्गम व मागास भागातील लोकांना केंद्र सरकारच्या अन्न सुरक्षा योजनेंतर्गत स्वस्त दरात धान्य उपलब्ध करुन देणे या विषयावर सर्वश्री माणिकराव ठाकरे, सुभाष चव्हाण, हेमंत टकले, शरद रणपिसे, प्रकाश बिनसाळे, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री विक्रम काळे, मोहन जोशी, संजय दत्त, राणा जगजितसिंह पद्मसिंह पाटील, सय्यद मुझफ्फर हुसेन, प्रा.सुरेश नवले, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"लोकांना स्वस्तात धान्य देण्याची लोक कल्याणकारी योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाने माहे जुलै, २०१३ मध्ये जारी केलेला अन्न सुरक्षा अध्यादेश या योजनेमुळे देशातील सुमारे ७० कोटी जनतेला दरमहा रु.३ प्रमाणे ५ किलो तांदूळ, रु.२ प्रमाणे ५ किलो गहु व रु.१ प्रमाणे ५ किलो कडधान्य मिळणार असून, देशातील ६७ टक्के लोकांना अन्नाची सुरक्षितता यामधून मिळणार असणे, माणसाच्या मूलभूत गरजांपैकी अन्न या मूलभूत गरजेचा अधिकार अन्न सुरक्षा अध्यादेश जारी करुन लोकांना देण्यात येणे, केंद्र सरकारने दिलेल्या मुदतीच्या आत ही योजना सुरू करण्यात येणार असणे, महाराष्ट्रातील ७५ टक्के ग्रामीण व ५० टक्के शहरी लोकांना तसेच, शालेय विद्यार्थ्यांना या योजनेतून कमी दरात अन्न पुरवठा होणार असणे, ही योजना राज्यात राबविताना सर्व मूलभूत बाबींची पुर्तता राज्य शासनाला करावी लागणार असणे, त्यात धान्याची वितरण व्यवस्था, धान्य साठविण्यासाठी गोदामांची गरज इत्यादीची व्यवस्था करणे गरजेचे असणे, धान्याच्या वितरणासाठी वाहनांची व्यवस्था, तसेच धान्य उत्पादन ते वितरण या साखळीतील प्रत्येक कच्चा दुवा सुधारण्याची आवश्यकता असणे, राज्यात ग्रामीण, दुर्गम, मागास भागातील लोकांपर्यंत व सर्व लाभार्थ्यांपर्यंत अन्नधान्याचा पुरवठा व्हावा यासाठी सक्षम यंत्रणा उभी करावी लागणार असून, प्रत्येक लाभार्थ्याला या योजनेचा सुलभतेने व वेळेत लाभ मिळावा यादृष्टीने अन्न सुरक्षा योजनेची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना, विचारात घेण्यात यावी."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर 3एफ.1...

श्री. माणिकराव ठाकरे .....

सभापती महोदय, हा प्रस्ताव या सदनात मी आणि माझ्या सर्व सन्माननीय सदस्यांनी आणलेला आहे. या विषयाचा अध्यादेश केंद्र सरकारने काढला आहे. अद्याप पर्यंत हा कायदा लोकसभेत पास व्हावयाचा आहे. या अध्यादेशाच्या संदर्भात या सदनात चर्चा व्हावी की, न व्हावी यासंदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले होते. मला सांगितले पाहिजे की, "अन्न सुरक्षा कायदा" हा ऐतिहासिक असून हा निर्णय केंद्र सरकारने, कॉंग्रेस पक्षाने घेतलेला आहे. आपल्याला कल्पना आहे की, सन 2009 च्या लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळेस कॉंग्रेस पक्षाने जाहीर नामा प्रसिध्द केला होता व त्यामध्ये अन्न सुरक्षा कायदा या देशात आम्ही लागू करणार आहोत असे आश्वासित केले होते. या कायद्याच्या आधारावरच आता गरीब जनतेला रेशन दुकानात स्वस्त दराने धान्य उपलब्ध होईल अशा प्रकारचे स्पष्ट वचन 2009 च्या लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळेला कॉंग्रेस पक्षाने जाहीरनाम्यात दिले होते. त्याच वेळेला इतरही अधिकार जनतेला दिलेले आहेत. प्रत्यक्षात जनतेला हक्क मिळावेत व ते हक्क कायदेशीर रित्या मिळण्यासाठी कायद्याच्या चौकटीत बसून दिले पाहिजे व त्या दृष्टिकोनातून मागच्या काळात अनेक निर्णय कॉंग्रेस पक्षाने, सरकारने घेतलेले आहेत. माहितीच्या अधिकाराच्या संदर्भात त्या वेळेला बरीच मोठी चर्चा झाली होती. सर्व कामकाज पारदर्शकतेने झाले पाहिजे तसेच विभागाकडून जी माहिती मागवली जाईल ती माहिती मिळाली पाहिजे यासंदर्भातील अधिकार जनतेला मिळाला पाहिजे, अधिकार हा कायद्याने मिळाला पाहिजे, कोर्टापर्यंत जाऊन मिळवता आला पाहिजे यासंदर्भात कॉंग्रेस पक्षाने केंद्र सरकारला विनंती केली आणि माहितीचा अधिकार संपूर्ण देशातील जनतेला आश्वासना प्रमाणे देण्यात आला.

सभापती महोदय, शिक्षणाचा अधिकारही सन 2009 च्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात देण्यात आला होता. शिक्षणाला फार महत्व आहे. देशातील सर्व मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे, देशातील कानाकोपऱ्यात राहणाऱ्या गरीब, दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासीलाही शिक्षण मिळाले पाहिजे, नव्हे ते कायद्याने मिळाले पाहिजे अशा प्रकारची जबाबदारी आपण केंद्र सरकारवर, राज्य शासनावर टाकली म्हणून शिक्षणाचा अधिकार या देशामध्ये आणि राज्यामध्ये देण्याचा निर्णय कॉंग्रेस पक्षाने आपल्या जाहिरनाम्यात घेतला आणि तशा प्रकारे केंद्र सरकारने त्या बाबतीतही निर्णय घेतला.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

श्री. माणिकराव ठाकरे .....

सभापती महोदय, मागेल त्याला रोजगार अशा प्रकारची योजना राज्य शासनाने काही कालखंडापूर्वी आणली होती. याच पध्दतीची योजना संपूर्ण देशात असली पाहिजे यासाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून मनरेगा सारखी योजना केंद्र सरकारने आपल्या देशाला दिली. रोजगाराचा अधिकार या देशामध्ये देण्याचा महत्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने कॉंग्रेसच्या धोरणानुसार घेतला आहे. अशा प्रकारचे एक नाही तर अनेक निर्णय कॉंग्रेस पक्षाने घेतलेले आहेत. व त्यामुळेच संपूर्ण देशात चांगली अर्थव्यवस्था उभी राहू शकली आहे. योजना राबवित असतांना अधिकाऱ्याकडून किंवा प्रशासनाकडून पाहिजे तशा प्रकारचे नियोजन होत नाही. नियोजन होतांना ते प्रभावीपणे झाले पाहिजे, त्याला कायद्याचे स्वरुप आले पाहिजे. प्रत्येक माणसाला अधिकार मिळाला पाहिजे व हे सर्व अधिकार कायद्याने देणे हा धोरणाचा भाग असतो व अशा प्रकारचे धोरण कॉंग्रेस पक्षाने सगळया संदर्भात राबविण्याचा निर्णय घेतला.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

अलीकडेच केंद्र शासनाने देशामध्ये अन्न सुरक्षा कायदा आणला. त्याला संपूर्ण जगामध्ये तोड नाही. या देशातील 80 ते 81 कोटी जनतेला तीन रूपये, दोन रूपये, एक रूपया इतक्या स्वस्त दराने धान्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी वितरण व्यवस्था अत्यंत सुरळीत करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. हे धान्य लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे. हे धान्य त्यांना मिळण्यासाठी राज्य शासनावर पूर्णपणाने जबाबदारी टाकण्यात आली आहे. यासाठी कोणालाही आता वेगळी पळवाट काढता येणार नाही. शासनाला, अधिकाऱ्यांना हे धान्य लोकांपर्यंत पोहोचवावे लागणार आहे. ते धान्य मिळाले नाही तर भत्ता दिला गेला पाहिजे अशी तरतूद करण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर या संबंधात त्यांना कोर्टामध्ये जाण्याचा देखील अधिकार या कायद्यामुळे प्राप्त होणार आहे. हे धोरण पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येईल की, प्रशासनावर दबाव ठेवण्याचे व जबाबदारी ठेवण्याचे काम या कायद्यामुळे साध्य होणार आहे. देशात मोठ्या प्रमाणावर अन्न पिकते. ते लोकांपर्यंत गेले पाहिजे.

अनेक दिवसांपासून आपण वेगवेगळ्या विषयां संबंधी चर्चा करतो. कुपोषणासंबंधी चर्चा करतो. धान्य असून देखील पुरेसे पौष्टीक अन्न मिळत नाही. त्यामुळे अनेक आजार निर्माण होतात. त्यासंबंधी आपण सदनामध्ये अनेक वेळा चर्चा करतो. आपल्या देशात, राज्यात उत्पादित होणारे धान्य गरीब, गरजू माणसांपर्यंत पोहोचविण्याचा कायदेशीर अधिकार देण्याचा उल्लेख या धोरणामध्ये आहे. या देशामध्ये अत्यंत महत्वपूर्ण असा कायदा केंद्र शासनाने आणण्यासंबंधी निर्णय घेतलेला आहे. या पावसाळी अधिवेशनामध्ये निश्चितच निर्णय होईल अशी अपेक्षा आहे. या कायद्याला कोणी विरोध केला आहे असे कुठेच दिसत नाही. फक्त मागच्या अधिवेशनामध्ये हा कायदा पुढे ढकलण्याचे काम केलेले आहे. हा कायदा पुढे गेला पाहिजे अशा प्रकारचे प्रयत्न राजकीय दृष्टिकोनातून देखील झाले आहेत. परंतु, या कायद्याला विरोध करण्याची कोणाचीही हिंमत होऊ शकत नाही. तशा प्रकारचे चित्र आज आपल्याला देशामध्ये पहायला मिळत आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

याबाबत शंका उपस्थित करताना काही लोक म्हणतात की, हे अन्नधान्य नेमके कोणाला मिळणार आहे, त्याचा नेमका लाभ कोणाकोणाला मिळणार आहे, यात कोणते लाभार्थी राहणार आहेत ? आमची अंत्योदय योजना आहे. या योजनेचा फायदा जवळ जवळ 90 लाख लोकांना मिळत आहे किंवा त्यामध्ये 24 लाख कुटुंबे येत आहेत. त्यांचे 35 किलोचे धान्य कुठेही कमी केले जाणार नाही. त्यांना 35 किलो धान्य रूपये 3, 2,1, या दरानेच मिळणार आहे. त्यानंतर राहणारा बीपीएल आणि एपीएल वर्ग आहे, त्यांना जे धान्य मिळत होते ते अधिक दराने मिळत होते. राज्यात बीपीएल धारकांसाठी गव्हासाठी रूपये 5 /- इतका दर होता, तर तांदुळाचा दर रूपये 6/- इतका होता. एपीएलसाठी गव्हासाठी रूपये 7.20 पैसे इतका दर होता, तांदुळासाठी रूपये 9.60 पैसे इतका दर होता. अशा प्रकारचे एपीएल धारकांसाठी रूपये 9 ते 10 /- दर होते. या सर्वांना भविष्यामध्ये तीन, दोन आणि एक रूपये या दराने धान्य देण्याची व्यवव्स्था करण्यात आलेली आहे. आता बीपीएल आणि एपीएल अशी वर्गवारी राहणार नाही. बीपीएल आणि अंत्योदय या कॅटेगिरीचा भविष्यात उल्लेख केला जाणार आहे.

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 11 कोटी 24 लाख जनता असून त्यापैकी 8 कोटी जनतेला तीन रूपये, दोन रूपये आणि एक रूपये दराने धान्य मिळणार आहे. त्यामुळे धान्य कोणाला मिळणार आहे हा प्रश्न नाही. जेवढ्यांना मिळते आहे तेवढ्यांना ते मिळणार आहे. परंतु, याची किंमत कमी होईल. शासनामार्फत धान्य वाटले जाते त्याकडे कसे दुर्लक्ष होते हे सर्वांना माहिती आहे. ग्रामीण भागाकडे धान्य कसे पोहोचते, त्याकडे किती दुर्लक्ष होते आहे हे सर्वांना माहीत आहे. भविष्यामध्ये या सर्व गोष्टी टाळल्या जाणार आहेत. लोकांना धान्य हे पुरविलेच पाहिजे अशी प्रत्येकावर जबाबदारी येणार आहे.

यानंतर श्री.बोर्डे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

जर त्यांना धान्य पुरविले नाही तर त्यांना न्यायालयात जाण्याचा आणि अशा प्रकारचा भत्ता मिळविण्याचा अधिकार त्या माध्यमातून प्राप्त होईल. त्यामध्ये जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली आहे. जे दोषी आढळतील त्यांना 5 हजार रुपयांचा दंड भरावा लागेल, अशा प्रकारची व्यवस्था या कायद्यामध्ये करण्यात आली आहे.

महोदय, अन्न सुरक्षा योजना ही अत्यंत महत्त्वाची योजना आहे. या योजनेच्या बाबतीत अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी पैसा कोठून आणणार, असा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आजच्या घडीला संपूर्ण देशात धान्य पोहोचविण्यासाठी 1 लाख हजार कोटी रुपये खर्च येतो. ही व्यवस्था सुरळीत केल्यानंतर त्यामध्ये आणखी 25 हजार कोटी रुपयांची वाढ होणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीमुळे देशातील पैसा कमी होईल अशा प्रकारची शंका विरोधकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. परंतु ती शंका योग्य नाही.

महोदय, अन्न सुरक्षा योजनेची अंमलबजावणी केल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणीचे होईल, धान्य खालच्या स्तरावर पोहोचल्यानंतर अनेक प्रश्न निर्माण होतील, धान्य शासन खरेदी करणार असल्यामुळे धान्याला योग्य भाव मिळणार नाही, खुल्या बाजारातून व्यापारी धान्य खरेदी करणार नाहीत इत्यादी अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, मागच्या वेळी केंद्र सरकारकडून जेवढे धान्य मिळत होते तेवढेच धान्य याही वेळी मिळणार आहे. त्यात थोडीशी वाढ होणार आहे. या निमित्ताने मी सांगतो की, व्यवस्था सुरळीत झाल्यामुळे चांगल्या पध्दतीने धान्य लोकांपर्यंत पोहोचणार आहे, किंबहुना लोकांच्या पोटात जाईल अशी व्यवस्था अन्न सुरक्षा योजनेच्या माध्यमातून करण्यात आली आहे. आपल्याला 58 मिलियन टन पर्यंत धान्य मिळत होते. ते आता 62 मिलियन टन पर्यंत जाणार आहे. म्हणजेच पूर्वीच्या तुलनेत केवळ 4 मिलियन टन धान्याची भर पडणार आहे. त्यामुळे शासनाला शेतकऱ्यांकडून फार मोठ्या प्रमाणावर धान्य घ्यावे लागेल अशी स्थिती नाही. आजही शासन एकूण धान्याच्या 1/3 धान्य शेतकऱ्यांकडून खरेदी करते. या योजनेच्या अंमलबजावणीनंतर सुध्दा राज्य सरकारकडून 1/3 धान्य खरेदी केले जाणार आहे. केंद्र सरकार शेतकऱ्यांकडून फार मोठ्या प्रमाणावर धान्य खरेदी करेल आणि त्याचा विपरित परिणाम होईल, या योजनेवर मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च होईल,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

जादा खर्चामुळे केंद्र सरकार काय उपाययोजना करणार, असे अनेकविध प्रश्न निर्माण केले जात असले तरी त्यात तथ्य नाही. या निमित्ताने मी सांगतो की, शेतकऱ्यांना गहू आणि तांदळाचे भाव वाढवून देण्याचा प्रयत्न युपीए सरकारने मागच्या काळात केल्याचे आपल्याला दिसून येईल.

महोदय, केंद्रामध्ये एनडीएचे सरकार 5 वर्षे होते. 5 वर्षाच्या राजवटीत त्यांनी गहू आणि तांदूळ यांचे भाव कधीही 80 रुपयांपेक्षा जास्त वाढवून दिले नव्हते. परंतु काँग्रेस प्रणित युपीए सरकारच्या काळात गहू आणि तांदळाचे भाव दुपटीने वाढवून देण्यात आले, हे मला या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने सांगावेसे वाटते.

महोदय, या योजनेची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर राज्य सरकार त्याकडे दुर्लक्ष करेल आणि शेतकऱ्यांच्या धान्याला भाव मिळणार नाही अशी जी चर्चा केली जात आहे ती निरर्थक आहे. त्या चर्चेला कसलाही आधार नाही. राज्यात अंत्योदय योजनेचे 25 लाख, बीपीएलचे 40 लाख आणि एपीएलचे 1 कोटी 42 लाख कुटुंबे आहेत. अन्न सुरक्षा योजनेच्या माध्यमातून राज्यातील 8 कोटी जनतेपेक्षा अधिक लोकांना या योजनेचा फायदा मिळणार आहे. जर लोकांना अन्न पुरविले नाही तर, त्यांना अन्न सुरक्षा भत्ता देण्याची व्यवस्था अन्न सुरक्षा विधेयकाच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

महोदय, हे सर्व करीत असताना ही व्यवस्था अधिक चांगल्याप्रकारे राबविली पाहिजे या दृष्टिकोनातून काही तरतुदी करण्यात आल्या आहेत. या कायद्यातील प्रमुख तरतुदींपैकी एक तरतूद म्हणजे राज्यामध्ये राज्य अन्न सुरक्षा आयोग स्थापन करण्यात आला आहे. या आयोगामध्ये एक अध्यक्ष, दोन महिला सदस्य आणि दोन अनुसूचित जाती/जमातीचे सदस्य अशा प्रकारे एकूण 5 सदस्य राहणार आहे.

नंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .....

या योजनेची अंमलबजावणी करणे, त्यावर देखरेख ठेवणे, आढावा घेणे, राज्य सरकारला सल्ला देणे या सर्व बाबी या राज्य अन्न आयोगाकडे सोपविलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर जिल्हा अन्न पुरवठा अधिकाऱ्यांकडे ज्या तक्रारी येतात त्या संदर्भात त्यांनी जे काही निर्णय दिलेले आहेत त्याची तपासणी करणे, त्यामध्ये नेमकी काय परिस्थिती आहे, निर्णय बरोबर दिलेला आहे की नाही हे पाहून निर्णयावर निर्णय देण्याचा अधिकार राज्य अन्न आयोगाला देण्यात आलेला आहे. आयोगाने आर्थिक अहवाल विधिमंडळासमोर सादर करणे, देखरेख समित्या स्थापन करणे याही बाबी यामध्ये आहेत.

सभापती महोदय, जिल्हा स्तरावर अधिकारी आहेत तसेच परंतु तालुका स्तरापर्यंत, गावस्तरापर्यंत देखरेख समित्या स्थापन करणे अशा प्रकारचा उल्लेख यामध्ये करण्यात आलेला आहे. ही योजना राबविण्याच्या संदर्भात शासनाने असे सांगितले आहे की, ही योजना राबवित असताना त्या ठिकाणच्या ज्या स्थानिक स्वराज्य संस्था असतील त्यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त दुकाने चालविली गेली पाहिजेत. जी महिला मंडळे असतील त्यांच्या माध्यमातून दुकाने दिली पाहिजेत आणि जी स्थानिक व्यवस्था आहे त्यांच्या हातामध्ये तो अधिकार असला पाहिजे अशी व्यवस्था करण्याच्या सूचना राज्य सरकारला दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, एकूणच हे जे संपूर्ण विधेयक आहे त्याप्रमाणे ही योजना 5 नोव्हेंबर पर्यंत सर्व राज्यांनी पूर्णपणे अंमलात आणावी अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत. त्या संदर्भात तत्काळ पावले उचलण्याच्या दृष्टीने सुध्दा महाराष्ट्र राज्याने तशा प्रकारची तयारी केलेली आहे. या राज्यामध्ये अत्यंत चांगल्या प्रकारची व्यवस्था आहे. परंतु त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटीही आहेत. आपण योजना राबवित असताना आतापर्यंत धान्य खऱ्या अर्थाने लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे. नाही तर आपण मोठमोठी गोदामे तयार करणार, त्या ठिकाणी धान्य घेऊन जाणार आणि प्रत्यक्षपणे तालुका स्तरावरुन त्या दुकांनापर्यंत जाणारे धान्य मार्केटमध्ये कधी जाते हे आपल्याला कळत नाही. या सर्व गोष्टींवर कायदेशीर बंधने येणार आहेत. त्यामुळे पुढच्या काळामध्ये राज्य शासनाला अधिक जबाबदारी उचलावी लागेल. त्यासाठी आपल्याकडे जी गोदामे आहेत त्यामध्ये काही वाढ करावी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. माणिकराव ठाकरे .....

लागेल. माझ्या माहितीप्रमाणे राज्यात केंद्राची 70 गोदामे आहेत आणि राज्य शासनाची 1072 गोदामे आहेत. राज्य शासन यावर 497 कोटी रुपये शर्च करणार आहे. परंतु यानंतर केंद्र सरकारने असे ठरविले आहे की, केंद्राने राज्याला धान्य द्यावयाचे आणि ते धान्य जर केंद्र सरकारने वेळेवर दिले नाही तर त्यापोटी नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी केंद्र सरकारवर आहे आणि राज्य शासनाची काही चूक असेल आणि खालपर्यंत धान्य पोहोचविले नाही तर ती जबाबदारी केंद्र शासनाने राज्य शासनावर निश्चित केली आहे. त्या दृष्टीकोनातून आपल्याला सतर्क राहावे लागेल आणि ही योजना आपल्या राज्यामध्ये प्रभावीपणे कशी राबवू शकू या संदर्भात काळजी घ्यावी लागेल.

सभापती महोदय, संपूर्ण देशामध्ये तीन चार राज्यांमध्ये अत्यंत चांगल्या प्रकारची वितरण व्यवस्था आहे. त्यामध्ये महाराष्ट्र सुध्दा आहे. त्यामध्ये तामिळनाडू, केरळ ही राज्ये सुध्दा आहेत. या राज्यांमध्ये सर्वात जास्त दुकाने आहेत असे सांगण्यात आले आहे. देशातील एकूण दुकानांपैकी 25 टक्के दुकाने या तीन-चार राज्यांमध्ये आहेत. बाकीची 75 टक्के दुकाने संपूर्ण देशामध्ये आहेत. बिहार, उत्तरप्रदेश या सारख्या राज्यांमध्ये अल्प प्रमाणात दुकाने आहेत. या बाबतीत आपण मोठ्या प्रमाणात प्रगती केलेली आहे परंतु ती प्रगती करीत असताना यात अनेक प्रश्न आपल्या राज्यामध्ये निर्माण झालेले आहेत. त्याला भविष्यामध्ये कशा प्रकारे उत्तर देऊ शकू या दृष्टीकोनातून सुध्दा विचार करावा लागेल.

सभापती महोदय, मिड-डे मिलच्या संदर्भात यामध्ये व्यवस्था करण्यात आलेली आहे. मिड-डे मिलच्या संदर्भात असे सांगितले जाते की, कामराज त्यांच्या राज्यामध्ये बाहेर फिरावयास निघाले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, काही लहान मुले जनावरे पाळत आहेत. त्यांनी जवळ जाऊन त्यांना विचारले की, इतक्या लहान वयामध्ये तुम्ही जनावरे का पाळता, तुम्ही शिक्षण का घेत नाही ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

त्यांनी असे सांगितले की, आम्ही जनावरे पाळली नाहीत, चार पैसे आम्हाला मिळाले नाहीत तर आम्हाला घरी जेवण सुध्दा मिळणार नाही. अशी आमची घरची परिस्थिती आहे. त्यावेळी त्यांना मध्यान्ह भोजनेची कल्पना सुचली होती. प्रथम श्री.कामराज यांनीच राज्यात या योजनेची सुरुवात केली होती. त्यानंतर प्रत्येक राज्यांनी मध्यान्ह भोजन देण्याची योजना सुरु केल्याचे आपण पाहतो.

सभापती महोदय, अंगणवाडीच्या माध्यमातून सहा महिन्यांच्या ते सहा वर्षांच्या मुलामुलींपर्यंत विनामूल्य अन्न देण्याची व्यवस्था केलेली आहे. तसेच जिल्हा परिषदांच्या शाळांमधील सहा वर्षापासून ते सोळा वर्षापर्यंतच्या मुलामुलींना दुपारचे जेवण देण्याची व्यवस्था केलेली आहे. जेवढे दिवस शाळा सुरु राहील तेवढे दिवस त्यांना दुपारचे जेवण दिले जाणार आहे.

गरोदर माता किंवा बाळंत झालेल्या मातांना सहा महिने पूर्वी व नंतर विनामूल्य जेवणाची व्यवस्था या अध्यादेशात केलेली आहे. तसेच गरोदर मातेला किंवा बाळंतीणीला 6 हजार रुपये हप्त्याहप्त्याने देण्याची व्यवस्थाही करण्यात आलेली आहे. या अन्न सुरक्षा अध्यादेशाबाबत संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये निर्णय होईल. त्याबाबतचा कायदा मंजूर होईल अशी संपूर्ण देशाला खात्री आहे. संसदेचे पावसाळी अधिवेशन दिनांक 5 ऑगस्ट, 2013 पासून सुरु होत आहे. तेथेही या विधेयकावर अशीच चर्चा होणार आहे. परंतु त्या विधेयकाबाबत आपल्या पावसाळी अधिवेशनात व्यापक चर्चा व्हावी, प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडावीत अशी अपेक्षा आहे. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या राज्याचा काही हातभार लागू शकतो का यासाठी आपली मते तेथे पोहोचवू शकतो का, असा विचार करुन मी आणि सर्व सन्माननीय सदस्यांनी या सदनामध्ये हा प्रस्ताव आणलेला आहे.

या विधेयकाला कोणीही विरोध करणार नाही असा मला विश्वास वाटतो. मागील काळातील इतिहास आपल्यासमोर आहे. 1997-98 मध्ये बी.पी.एल.खालील लोकांना केवळ 5-7 किलो धान्य दिले जात होते. त्यानंतर 2000 साली त्यात वाढ करुन 20 किलो धान्य दिले जात होते. आपल्या राज्यात दिनांक 1.4.2002 पासून 25 किलो गहू व तांदूळ देण्याची व्यवस्था केली

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

आहे. राज्यातील केसरी कार्डधारकांनाही 15 किलो धान्य देण्याची व्यवस्था केलेली आहे. आपल्या राज्यातील 8 कोटी 39 लाख लोकांना या योजनेचा लाभ मिळत आहे. या योजनेत काही त्रुटी आहेत त्याची प्रत्येकांना जाणीव आहे. हे धान्य लोकांपर्यंत पोहोचावे, लोकांना त्याची माहिती मिळाली, तशा प्रकारचा प्रचार व प्रसार या विधेयकाच्या निमित्ताने होणे जास्त गरजेचे आहे. सदर विधेयक मंजूर झाल्यानंतर दिनांक 5.11.2013 पूर्वी अंमलबजावणी सुरु करण्याची तारीख निश्चित करावी. त्याची आतापासूनच सुरुवात केली तर या विधेयकातील बारकावे माहीत होतील व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊ शकेल. याच उद्देशाने आम्ही ही चर्चा उपस्थित केलेली आहे. या प्रस्तावावरील चर्चा गेल्या आठवड्यात सुरु होईल असे वाटत होते, आज सुरु होईल असे वाटत होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ 16:10

श्री. माणिकराव ठाकरे...

या अन्न सुरक्षा अध्यादेशाच्या माध्यमातून या सदनामध्ये आपण मला चर्चा करण्याची संधी दिली त्या बद्दल मी आपले आभार मानतो. या चर्चेमध्ये भाग घेऊन सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापली मते या ठिकाणी मांडावीत अशी मी त्यांना विनंती करतो. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करु इच्छितो की, या सदनामधील चर्चेतून ज्या ज्या काही सूचना येतील त्या विचारात घेऊन तसेच आमदारांबरोबर बैठका घेऊन, तसेच विविध भागामध्ये चर्चासत्रे घेऊन त्यामाध्यमातून येणा-या सूचना विचारात घेऊन या अन्न सुरक्षा अध्यादेशाची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याच्या दृष्टीने पावले टाकावीत, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, लोकांना स्वस्तात धान्य देण्याची कल्याणकारी योजना राबविण्याच्या संदर्भात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी या ठिकाणी मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मला संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, या देशाच्या दृष्टीने, देशातील गरीब माणसाच्या दृष्टीने, देशातील सर्वसामान्य नागरिकाच्या दृष्टीने युपीए सरकारने अध्यादेशाद्वारे एक क्रांतिकारक निर्णय घेतलेला आहे. या क्रांतिकारक निर्णयाच्या संदर्भात आदरणीय श्री. माणिकराव ठाकरे यांनी नियम 260 अन्वये या ठिकाणी प्रस्ताव मांडला त्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलत असताना मला सुरुवातीला एका गोष्टीचे मोठे आश्चर्य वाटते की, या पुरोगामी महाराष्ट्राच्या सदनामध्ये हा प्रस्ताव चर्चेला येण्याची आम्ही दोन-तीन दिवस वाट पाहिल्यानंतर जेव्हा ही चर्चा सुरु झाली त्यावेळी आमच्या समोरच्या बाकावरील एकही सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये उपस्थित दिसत नाही. निलंबनाच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण झाले. ते प्रश्न आपण सोडविले. परंतु या देशातील 70 टक्के नागरिकाला जेवणाचा आणि अन्नाच्या सुरक्षेचा हक्क मिळत असताना विरोधी पक्षातील एकही सन्माननीय सदस्य या चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी सभागृहामध्ये उपस्थित नाही याचे मोठे आश्चर्य वाटते आणि खेद देखील होतो. या देशातील गरीब नागरिकाला अन्न मिळू नये अशा प्रकारची भावना विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये आहे की काय अशा प्रकारची शंका माझ्या मनामध्ये येते. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांचे एखाद्या बाबतीत मतभेद असू शकतील. निलंबनाच्या बाबतीत सरकारने आपली भूमिका जाहीर केलेली आहे. त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी असे सांगितले होते की, अतिशय महत्वाच्या ठरावावर या सदनामध्ये चर्चा होणार असून आम्हला त्या चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा आहे. अशा प्रकारचे वक्तव्य केल्यानंतर देखील त्यांनी सभात्याग करणे इष्ट नाही. या देशाच्या इतिहासामध्ये अशा प्रकारचा क्रांतिकारक निर्णय पहिल्यांदाच घेतला जात आहे. गरीब माणूस हा उपाशीपोटी झोपू नये यासंबंधीची चर्चा या पुरोगामी महाराष्ट्राच्या सार्वभौम सभागृहामध्ये होत असताना विरोधी बाकावर एकही सन्माननीय सदस्य दिसत नाही याचा मला अतिशय खेद होतो.

..2..



MSS/ KTG/ D/ 16:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

सभापती महोदय, मला आपले लक्ष मुद्दाम एका गोष्टीकडे आकर्षित करावयाचे आहे. या सदनामध्ये विरोधी बाकावरुन सातत्याने अशी विचारणा केली जात असते की, तुमच्या सरकारने काय केले ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

आम्ही तर सांगतो की, आम्ही सर्व अधिकार द्यावयास निघालो आहोत. शिक्षणाचा अधिकार दिला, माहितीचा अधिकार दिला. स्वास्थ्यांच्या बाबतीत निर्णय घेतले. आता आम्ही अन्न सुरक्षेचा अधिकार देवू केला आहे. मुलभूत सर्व अधिकार दिले आहेत. उलटपक्षी माझा देशभरातील सर्व विरोधी पक्षाच्या नेत्यांना प्रश्न आहे की, हे अधिकार सर्वसामान्य गरीब माणसांना द्यावयाचे नाहीत काय ? गेल्या 65 वर्षात केंद्रात सहा सरकार अस्तित्वात आली, एकाही सरकारला किंवा एकाही तत्कालीन पंतप्रधानाना गरिबांच्या बाबतीत अशा प्रकारचा निर्णय घेतला गेला पाहिजे असे का जाणवले नाही ? अशा प्रकारचा निर्णय केंद्रातील तत्कालीन सरकारने घेतला नाही. परंतु सध्याच्या कॉंग्रेस पक्षाच्या सरकारने तो निर्णय घेतला. आम्ही या जनतेचे उत्तरदायी आहोत. त्यांना लागणाऱ्या गोष्टींची पूर्तता करणे हे आमच्या सरकारचे कर्तव्य आहे. त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी लागणाऱ्या गोष्टी असतील, सर्वसामान्यांच्या आरोग्याच्या गोष्टी असतील, सर्वसामान्यांच्या जगण्याच्या गोष्टी असतील, त्या आमच्या सरकारने देऊ केल्या आहेत. या चर्चेच्या अनुषंगाने आमची माफक भावना अशी होती की, या चर्चेत सगळयांनी सहभाग घ्यावा आणि अतिशय मौल्यवान सूचना कराव्यात.

अन्न सुरक्षा विधेयकाच्या बाबतीत लोकसभेत चर्चा व्हावी असे वाटले आणि त्या संदर्भात या विषयीचे विधेयक सभागृहासमोर ठेवण्यात आले. त्यावेळी विरोधी पक्षाच्या बाकांवरील सदस्यांच्या मनात प्रश्न निर्माण झाले होते. त्या सर्व प्रश्नांची उत्तरे या ड्रॉफ्टमध्ये आहेत हे मला मुद्दाम सांगावेसे वाटते. देशासमोर एखादी अडचण असेल अशा वेळी विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून असे अपेक्षित असते की, हे अधिक चांगले परिणामकारक कसे करता येईल. आपण अन्न सुरक्षेचा घाट का घातला, देशातील 70 टक्के जनतेला अन्न सुरक्षेचा अधिकार कशासाठी देतो आहोत, पूर्वी अशा पध्दती नव्हत्या काय ? या बाबतीत माझे असे म्हणणे आहे की, पूर्वी ज्या काही पध्दती होत्या, त्यामध्ये पळवाटा मोठ्या होत्या. त्या पळवाटाच्या माध्यमातून ते धान्य गरिबांपर्यंत किती पोहचत होते, कोणत्या प्रतीचे धान्य पोहचत होते याची सर्वांना माहिती आहे. निकृष्ट प्रतीचे धान्य गरिबांना दिले जाते अशी चर्चा दोन्ही बाजूच्या सदस्यांनी या सभागृहात शेकडो वेळा केलेली आहे. पीडीएसच्या बाबतीत आपण कितीतरी वेळा बोललेलो आहोत. सार्वजनिक धान्य वितरण योजनेच्या बाबतीत दोन्ही बाजूच्या सदस्यांनी कित्येक वेळा नापसंती व्यक्त केलेली आहे. बनावट कार्डांचा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

कधी उल्लेख झाला नाही असे एकही अधिवेशन गेले नसेल. राज्यात लाखो डयुप्लीकेट कार्ड तयार करण्यात आलेली आहेत. त्यासाठी एक नवीन यंत्राणाच तयार झालेली आहे. आपल्याला माहिती आहे की, अधिकारी आणि दलाल यांच्या संगनमताने लाखो बनावट रेशनींग तयार झालेले आहेत. या विधेयकाच्या माध्यमातून या सर्व गैरप्रकारांना आळा बसणार आहे. चोर, लुटेरे गरिबांना मिळणारे धान्य लुटण्याचे काम करीत होते, त्यास प्रतिबंध घालण्याची या विधेयकात तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, आमचे नेते श्री.माणिकराव ठाकरे म्हणाले की, पीडीएसच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य एक क्रमांकावर आहे. ही गोष्ट खरी आहे. गुजरात पीडीएसच्या बाबतीत क्रमांक एकवर नाही. पीडीएसच्या बाबतीत महाराष्ट्र राज्याचाच पहिला क्रमांक आहे. आमचा पीडीएसच्या बाबतीत समज, गैरसमज होता. परंतु तुम्हाला आणि आम्हाला एक गोष्ट नाकारता येणार नाही. गरिबांपर्यंत अन्नधान्य पोहोचविण्याची सिस्टीम सुरु केलेली आहे, जगभरात ही सिस्टीम अयोग्य आहे असे कोणीही म्हणू शकत नाही. ही सिस्टीम हाताळणारी माणसे कदाचित अयोग्य असतील, कदाचित म्हणण्यापेक्षा अशी अयोग्य माणसे आहेतच. त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप........

सार्वजनिक वितरण व्यवस्था योग्यरित्या कशी चालेल, या योजनेमध्ये सर्वसामान्यांचा सहभाग कसा वाढेल, महिला बचत गटांना यामध्ये कसे सामावून घेता येईल हे महत्वाचे ठरणार आहे. आज सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये महिला बचत गटांना सामावून घेण्याचा निर्णय हा क्रांतीकारक निर्णय आहे. शासनाची सध्याची वितरण व्यवस्था ही सर्वसामान्यांना अन्न पुरविणारी आहे. त्यामध्ये महिला बचत गटांना सामावून घेणे हा ऐतिहासिक निर्णय मानला पाहिजे.

सभापती महोदय, पूर्वी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये ठराविक लोकांना रेशन दुकान चालविण्याचा परवाना मिळत होता. त्या बाबतीत मोनोपोली तयार झाली होती. ती आता निकालात निघणार आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये चार ते पाच गट असल्यामुळे मोठया प्रमाणात गोंधळ व्हायचा. केशरी शिधापत्रिका, पिवळी शिधापत्रिका, श्वेत शिधापत्रिका उत्पन्न घटकानुसार दिल्या जात आहेत. नवीन अन्न सुरक्षा योजनेमध्ये जी तरतूद केली आहे त्यानुसार या पुढे दोनच विभाग असणार आहेत. यामुळे ही योजना अधिक पारदर्शक होईल. कोणाला काय लाभ मिळणार आहेत हे सहज लक्षात येईल.

सभापती महोदय, काँग्रेस पक्षाचा प्रवक्ता म्हणून आम्हाला मीडियाकडून अनेक प्रश्न विचारले जातात. यापुढे अंत्योदय योजना बंद होणार का? बीपीएल कार्ड धारकांना लाभ मिळणार की नाही? असे काही होणार नाही. ज्यांचा मिळण्याचा हक्क आहे त्यांना तो मिळणारच आहे. उलट या योजनेमध्ये अधिक लोक सामावले जाणार आहेत. या कायद्यातील तरतुदी व्यवस्थितपणे समजून घेतल्या तर महाराष्ट्र पुढे आहेच, तो अधिक पुढे कसा नेता येईल याबाबत विचार करता येईल. या योजनेंतर्गत ग्रामीण भागामध्ये 75 टक्के आणि शहरी भागात 50 टक्के हा जो क्रायटेरिया निश्चित केला आहे तो महाराष्ट्रासाठी लागू केला तर अस्तित्वात असलेल्या योजनेमध्ये सध्या 8.25 कोटी लोकांना अन्नधान्य पुरविले जात आहे ती लाभार्थ्यांची संख्या कमी होऊन 6.5 कोटीवर येणार आहे. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, देशाच्या दृष्टीकोनातून 75 टक्के ग्रामीण भाग आणि 50 टक्के शहरी भाग हा क्रायटेरिया योग्य असला तरी महाराष्ट्रामध्ये जी प्रणाली सुरु आहे त्या अंतर्गत जेवढे लाभधारक आहेत त्या सगळ्यांचे संरक्षण झाले पाहिजे, ही भूमिका राज्य सरकारला घ्यावी लागेल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 16:20

श्री.भाई जगताप........

सभापती महोदय, या योजनेच्या माध्यमातून किती रुपयाला काय मिळणार आहे याची आकडेवारी मी देऊ इच्छित नाही. मात्र युपीए सरकारने जो जाहीरनामा प्रसिध्द केला होता, त्यात आम्ही जनतेला आश्वासित केले होते. माजी पंतप्रधान स्व.इंदिरा गांधी यांनी गरिबी हटावचा नारा दिला होता, त्या घोषणेची थट्टा करण्यात आली. आज या देशातील 125 कोटी जनतेपैकी 70 टक्के जनतेला अन्न सुरक्षेचा अधिकार देण्याचा जो निर्णय घेण्यात आला आहे त्याचा खरा उगम स्व.इंदिरा गांधी यांच्या गरिबी हटावच्या घोषणेमध्ये आहे असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. आम्ही जे बोलतो ते करतो. बोलल्याप्रमाणे करायला आम्ही या ठिकाणी बसलो आहोत. विरोधकांनी त्यांचे प्रश्न त्या कसोटीवर घासून बघावेत आणि गरिबांना अन्न द्यायचे की गरिबांच्या जीवावर मते मिळवून राजकारण करायचे हे त्यांनी ठरवावे. केंद्रस्थानी त्यांना सत्ता मिळाली होती. राज्यातही एकदा युती सरकार सत्तेवर आलेले होते. परंतु गरिबांच्या संदर्भात किती निर्णय घेतले गेले?

नंतर 3एन.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ...

हे सर्व निर्णय रेकॉर्डवर आहेत. गेल्या चार साडेचार वर्षात युपीए सरकारने गरिबांसाठी जे काही निर्णय घेतलेले आहेत ते क्रॉस चेक करुन पाहिले तर ज्या काही घोषणा जाहीरनाम्यात करण्यात आल्या होत्या त्या काँग्रेस पक्षाने दिलेल्या आहेत हे आपल्याला दिसून येईल. परंतु विरोधकांची सत्ता आल्यानंतर त्यांच्या सर्व घोषणा हवेमध्ये विरुन जातात. यामध्ये 40 लाख लोकांसाठी घरांची योजना असेल किंवा 27 लक्ष तरुणांना नोकरीच्या घोषणा असेल या घोषणांचे काय झाले हे मी येथे सांगण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, काँग्रेस पक्षाने आपला वचननामा प्रत्यक्ष कृतीमध्ये आणण्याची भूमिका पार पाडलेली आहे. आमच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी, माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे मी त्यामुळे अभिनंदन करतो. आज आपल्या देशातील अनेक नागरिकांना एक वेळचे जेवणही मिळत नाही. आज अन्न सुरक्षा योजनेच्या माध्यमातून गरिबांना अन्न सुरक्षेचा हक्क प्रस्थापित होणार आहे. गरीब माणूस या हक्कासाठी कोणाच्या मर्जीवर अवलंबून राहणार नाही. गरिबाला धान्य मिळाले नाही तर तो गरीब माणूस एफआयआर नोंदवू शकतो. एवढेच नव्हेतर यासंदर्भात दंडात्मक कारवाई सुध्दा होऊ शकते तसेच यामध्ये संबंधितांना जेल सुध्दा होऊ शकते. या कायद्यामध्ये जी तरतूद केलेली आहे त्याबाबत मी केंद्र सरकारचे आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मला माननीय मंत्री महोदयांच्या नजरेस एक गोष्ट आणून द्यावयाची आहे की, हे धान्य गरिबाच्या घरापर्यंत पोहचविण्याची आपली भूमिका आहे. हे काम उद्या किंवा परवा पर्यंत होईल असे मी म्हणत नाही. परंतु आमचे उद्दिष्ट पवित्र आहे. या योजनेच्या माध्यमातील अन्न आम्ही गरिबाला देऊ शकलो नाही तर त्याच्या बदल्यात गरिबांना भत्ता दिला जाईल अशा प्रकारचा क्लॉज आहे. त्यामुळे माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती राहणार आहे की, या क्लॉज मध्ये थोडीशी सुस्पष्टता आणण्याची आवश्यकता आहे. या योजनेच्या संदर्भात विरोधक म्हणत आहेत की, देशामध्ये या योजनेसाठी पुरेसा अन्न साठा नाही. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. आज अस्तित्वात असलेल्या अन्नधान्याच्या साठयावर येणारी 40 वर्षे ही योजना चांगल्या पध्दतीने राबविता येईल एवढा आपल्याकडे अन्नधान्याचा पुरवठा आहे याची आम्हाला खात्री आहे. परंतु समजा गडचिरोली सारख्या दुर्गम ठिकाणी आपण धान्य पोहचू शकलो

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ...

नाही तर अन्नधान्याच्या मोबदल्यात पैसे पोहचावे यासाठी आपली काय भूमिका राहणार आहे ? समजा यामध्ये पेसे देण्याची वेळ आली तर मग आम्ही त्या गरिबांना कोणत्या दराने पैसे देणार आहोत ? उद्या जर एखाद्या आदिवासी पाडयावर धान्य पोहचू शकले नाही, यासंदर्भात पैसे देण्याची वेळ आली तर ते पैसे आपण कोणत्या दराने देणार आहोत ? आपण आज 3 रुपये, 2 रुपये व 1 रुपया या दराने गरिबांना धान्य देणार आहोत त्याच दराने आपण रिएम्बर्समेंट करणार आहोत काय ? या दराने रिएम्बर्समेंट करणार असू तर तो अन्याय होईल असे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते. त्यामुळे या गोष्टीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात विरोधकांनी फार मोठया प्रमाणात गदारोळ केलेला आहे. विरोधकांकडे आता दुसरा कोणताच मुद्दा राहिलेला नाही. गरिबाच्या शिक्षणाच्या संदर्भातील सर्व व्यवस्था आपण पूर्ण केलेल्या आहेत. माहितीचा अधिकार देऊन सुसूत्रता व पारदर्शकता यावी यासाठी आपण कायदा केलेला आहे. आता आपण अन्न सुरक्षेचा कायदा करुन सर्वसामान्य गरीब माणसाला अन्न धान्याची हमी देत आहोत. हे सरकार सर्वसामान्यांसाठी आहे हे आपण आपल्या कृतीमधून दाखवून दिलेले आहे. परंतु विरोधक काही तरी मखलाशी करण्याची शक्यता आहे. अन्न सुरक्षेचा जो क्रांतिकारक निर्णय आहे तो वेगळा कसा होऊ शकेल अशा प्रकारचा प्रयत्न विरोधकांकडून होऊ नये यासाठी मी ही सूचना करीत आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

सभापती महोदय, मी आणखी एक गोष्ट निदर्शनास आणून देत आहे. या मागे पवित्र भावना आहे. राज्यात बोगस कार्डांचा सुळसुळाट झालेला आहे. त्याचा धान्य वितरण व्यवस्थेवर परिणाम होत आहे. आधार कार्डाचा रेशन कार्डाशी संबंध जोडला असल्यामुळे मी धन्यवाद देतो. भविष्यामध्ये आधार कार्ड प्रत्येकाचे अस्तित्वाचे कार्ड बनणार आहे. हे अस्तित्व कोणीही घेऊ शकत नाही. याबाबत मी भारत सरकारचे आणि महाराष्ट्र शासनाचे मनापासून आभार मानतो आणि अभिनंदन करतो.

ही अत्यंत क्रांतिकारी योजना असून सर्वसामान्य माणसांच्या हक्कावर गदा येऊ नये यासाठी आपण जी काळजी घेतली त्याबद्दल मी मुद्दाम आभार व्यक्त करतो. असे करीत असताना एका गोष्टीकडे मी आपले लक्ष आकर्षित करीत आहे. त्याचा आपल्या विभागाशी काहीही संबंध नाही. आधार कार्ड रेशन कार्डाशी संलग्न करण्यात आलेले आहे. माझ्या माहिती प्रमाणे 50 टक्क्यांच्यावर लोकांना आधार कार्डाचे वितरण झालेले नाही. मी स्वत: तीन महिन्यांपूर्वी आधार कार्ड काढले. पण अद्याप पर्यंत मला आधार कार्ड मिळालेले नाही. आधार कार्ड लवकर का मिळत नाही हे देखील जाणून घेणे महत्त्वाचे आहे. आधार कार्ड सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचले पाहिजे. आधार कार्ड मिळण्यासाठी सिस्टीमध्ये आपण पारदर्शी तरतूद केलेली आहे याची मला कल्पना आहे. आधार कार्ड योजना राबवित असताना राज्यातील 100 टक्के लोकांपर्यंत कार्ड कशा प्रकारे पोहोचेल याची काळजी सरकारने घेणे आवश्यक आहे. त्याची दखल सरकारने घेणे आवश्यक आहे. आपण मला येथे बोलण्यासाठी संधी दिल्याबद्दल आपल्या व माझ्या सहकार्यांच्या प्रती आभार व्यक्त करतो आणि येथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

.......

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे तो अतिशय महत्त्वाचा आहे.

अन्न सुरक्षा व्यवस्था अध्यादेश काढून केंद्र सरकारने आपण जे बोलतो ते करून दाखवतो हे पुन्हा एकदा सिद्ध करून दाखविले आहे. अन्न सुरक्षा व्यवस्था हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय आहे. तो मला यासाठी महत्त्वाचा वाटतो की, आपल्या देशामध्ये गरिबांची संख्या खूप मोठी आहे. कदाचित याच्या आकडेवारीमध्ये जाणे मला शक्य होणार नाही. कारण यावर देखील खूप विवाद आहेत. कोणी सांगते की, बीपीएल धारकांची संख्या 40 टक्क्यांच्या आत आहे, कोण सांगते की, 37 टक्के आहे. आता परवा जो अहवाल आला आहे त्यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, गेल्या 15 वर्षामध्ये 15 टक्क्यांनी दारिद्र्याचे प्रमाण कमी झाले आहे. ही माणसे दारिद्र्य रेषेकडून वर आलेली आहेत. त्यामुळे मला या वादात जायचे नाही.

मला नेहमी एक प्रश्न पडतो. देशाला स्वातंत्र्य मिळून 64 वर्षे झाली आहेत. या कालावधीत आपण देशाचा चांगला विकास केला आहे. तंत्रज्ञानामध्ये खूप झेप घेतली आहे. आपल्या देशाची तुलना विकसित देशामध्ये होऊ लागली आहे. शहरी किंवा ग्रामीण भागामध्ये आम्ही फिरतो तेव्हा दारिद्र्य रेषेखालील माणसे अत्यंत गरीब असल्याची आढळून येतात. त्यांनी फाटके कपडे घातलेले असतात. त्यांना रोजचे जेवण देखील मिळत नाही. त्यांचा चेहरा केविलवाणा झालेला असतो. अशी माणसे आम्हाला बघायला मिळतात.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

सभापती महोदय, आपल्या देशामध्ये अनेक विद्वान आणि विचारवंत मंडळी आहेत. मला त्यांचा नेहमी अभिमान वाटतो. परंतु आपण गरिबांचे रक्षण करण्यास कमी पडलो आहोत असे मला वाटते. आपल्या देशात गरिबी आहे किंवा नाही यामध्ये वाद घालून आपण त्यामध्ये बराच वेळ घालवितो. आजही मुंबईतील झोपडपट्टयांमध्ये व ग्रामीण भागात गोरगरीब, कष्टकरी, हताश, बेबस, व्याकुळ झालेली माणसे दिसतात. आपले कुटुंब व मुले यांना माठे करण्यासाठी व पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांना अत्यंत कष्ट करावे लागतात. वणवण फिरावे लागते. पडेल ते काम करण्याची तयारी असली तरी सुध्दा त्यांच्या हाताला काम मिळत नाही अशी परिस्थिती आहे. रखरखत्या उन्हामध्ये फिरुन, कष्टाची कामे करुन, घाम गाळून मिळणाऱ्या थोड्या थोडक्या कमाईमध्ये परिवारातील लोकांच्या पोटाची खळगी भरेल इतकी कमाई देखील होत नाही त्यामुळे अनेकांना उपाशी रहावे लागते. हाताला काम नाही, कामाला दाम नाही, डोक्यावर छप्पर नाही, मुलांना शिक्षण नाही अशा अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत दिवस ढकलणे अशी गरिबांची अवस्था आहे. त्यांची ही अवस्था मी रोज उघड्या डोळ्यांनी पाहत असते. झोपडपट्टयांमध्ये तर अतिशय दारुण चित्र पहावयास मिळते. तेथील लोकांना अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत लोकांना रहावे लागत आहे. लहान मुलांच्या पायात चप्पल नसते, पोटात अन्न नसते अशा अवस्थेत ती मुले जगत असतात.

सभापती महोदय, झोपडपट्टयांमध्ये आणि ग्रामीण भागांमध्ये आपणास अनेक ठिकाणी कुपोषित मुले दिसतात. जेथे आईलाच पोटभर जेवण मिळत नाही तिथे पोटच्या बाळाचे कसे पोषण होणार ? यातूनच कुपोषणाचा जन्म होतो.

सभापती महोदय, गेली अनेक वर्षे देशातील गरीब लोक असे हलाखीचे जीवन जगत आहेत. आज अन्न सुरक्षा योजनेच्या माध्यमातून गरिबांच्या अन्नाच्या हक्काचे संरक्षण होणार आहे. त्याबद्दल मला खूप आनंद झाला आहे. माझ्या डोळ्यात पाणी देखील आले आहे. गरीब माणसांना दोन-तीन रुपयांत गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी असे धान्य मिळाल्यास त्याला भाजी किंवा डाळ घेऊन पोटभर जेवण करणे शक्य होईल. या अन्न सुरक्षा योजनेमुळे गरिबांना कुठेतरी आधार मिळेल असे मला वाटते.

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

सभापती महोदय, काही गरीब लोकांकडे गहू, तांदूळ भरण्यासाठी देखील पैसे नाहीत. अशा लोकांना दोन-तीन रुपयांत गहू-तांदूळ मिळाले तर ते पोटभर जेवू शकतील. या योजनेमुळे 70 कोटी लोकांना पोटभर जेवण मिळणार आहे.

सभापती महोदय, अन्न सुरक्षा योजना लागू केल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करते. सरकारने हा धाडशी निर्णय घेतलेला आहे. अन्न सुरक्षा योजनेचा अध्यादेश निघाल्यानंतर त्या संदर्भात खूप उलट सुलट चर्चा ऐकावयास मिळाल्या आहेत. माझे असे मत आहे की, माणसाने नेहमी आशावादी असले पाहिजे. सरकार काही चांगले प्रयत्न करीत असेल त्याला आपण पाठिंबा दिला पाहिजे. अन्न सुरक्षा योजना लागू केल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणावर अनुदानाची तजवीज करावी लागणार आहे. शासन अनेक धोरणे राबवित असते त्याचा चांगल्या प्रकारे परिणाम होण्यासाठी प्रशासनाची भूमिका खूप महत्वाची आहे.

सभापती महोदय, आज सार्वजनिक वितरण व्यवस्था चांगल्या प्रकारे होत असली तरी मुंबई आणि इतर मोठ्या शहरांमध्ये ती बिलकूल समाधानकारक नाही. त्यामुळे बीपीएलखालील 15 टक्के लोकांना सुध्दा धान्य मिळत नाही. अन्न सुरक्षा योजनेमध्ये शहरातील 50 टक्के गोरगरीब जनतेच्या अन्नधान्याचा प्रश्न सुटू शकणार आहे.

सभापती महोदय, मला या निमित्ताने काही सूचना करावयाच्या आहेत. अन्न सुरक्षा योजनेमध्ये देशातील 70 टक्के लोक कव्हर होणार असतील तर जवळपास सर्वच लोकांचे प्रश्न सुटणार आहेत.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

आज बीपीएल कार्डांची जशी अवस्था झाली आहे तशी अवस्था या योजनेची होता कामा नये. या योजनेचा बऱ्याच मध्यमवर्गीय लोकांना सुध्दा फायदा मिळणार आहे. केंद्र सरकार आणि विशेष करुन माननीय श्रीमती सोनिया गांधी यांच्या पुढाकाराने अन्न सुरक्षा विधेयक येत असल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते.

महोदय, ही योजना यशस्वीरित्या कशी राबविता येईल, या योजनेचा शेतकऱ्यांना कसा फायदा मिळेल, त्यांच्या शेती मालाला चांगला भाव कसा मिळेल या दृष्टिकोनातून प्रयत्न करणे आवश्यक आहे. जो शेतकरी, कष्टकरी धान्य पिकवितो त्यांना स्वस्त दरात धान्य विकण्यास भाग पाडता कामा नये. त्या वर्गाच्या हिताचे रक्षण केले पाहिजे. या योजनेच्या अंमलबजावणीमुळे सर्वसामान्य लोकांना त्यांचा हक्क आणि गरिबांना अन्न मिळाले पाहिजे. या सर्व गोष्टी करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करावेत असे मला वाटते.

महोदय, या योजनेच्या निमित्ताने आपल्या देशातील गरिबी कोठे तरी दूर होऊन गरिबांच्या पोटाला आधार मिळणार आहे. या बद्दल मला केंद्र सरकार आणि राज्य सरकारचे अभिनंदन करावेसे वाटते. ही योजना चांगल्या प्रकारे राबविण्यासाठी मी सरकारला शुभेच्छा देते.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानते व माझे भाषण संपविते.

--------

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रस्तावावर आणखी 13 सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. शिवाय या प्रस्तावावरील चर्चेला माननीय मंत्री महोदय आजच उत्तर देणार आहेत. त्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी वेळेचे बंधन पाळून सहकार्य केले तर ही चर्चा विहित वेळेत चांगल्या दर्जाची होऊ शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : आदरणीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देऊन त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी अतिशय महत्त्वपूर्ण अशा विषयावर म.वि.प. नियम 260 अन्वये चर्चा उपस्थित केली आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे ज्या वेळी भाकरीविषयी बोलतात त्या वेळी माझ्यासारख्या गांधीवादी कार्यकर्त्याचे मन मोहरुन येते. भूक मिटविण्यासाठी केंद्र सरकारने अन्न सुरक्षा अध्यादेश काढला आहे. हा अतिशय क्रांतिकारी निर्णय आहे. या देशात कोणीही कुपोषित राहता कामा नये, प्रत्येकाचे पोषण व्हावे किंबहुना उपाशीपोटी एकही व्यक्ती राहता कामा नये, ही प्रामाणिक भावना या अध्यादेशामागील आहे.

महोदय, दिनांक 15 ऑगस्ट, 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. परंतु स्वतंत्र भारतात भूक मिटविण्यात आम्ही अयशस्वी ठरलो. दुर्दैवाने भारताच्या कानाकोपऱ्यात आजही भूकेचे साम्राज्य दिसून येत आहे. दि.26 जानेवारी, 1950 रोजी भारत प्रजासत्ताक म्हणून जाहीर झाला. परंतु देशातील भूकेवर आम्ही सत्ता मिळवू शकलो नाही. अन्न सुरक्षा अध्यादेशाच्या माध्यमातून केंद्र सरकार भूकेवर सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणून मी केंद्र सरकारचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

महोदय, सुदाम्याची संपूर्ण नगरी श्रीकृष्णाने सोन्याची केली असे महाभारत सांगते. अन्न सुरक्षा विधेयक, ही भारतीयांची भूक मिटविणारी अशी एक नवीन संज्ञा या नव भारतात स्थापित होईल. या नव भारताच्या क्षुधा तृप्तीच्या प्रणेत्या माननीय श्रीमती सोनिया गांधी ठरतील म्हणून मी त्यांचेही मन:पूर्वक अभिनंदन करतो.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ...

देशाच्या विविध भागांमध्ये आणि विविध राज्यांमध्ये एकही माणूस उपाशी राहता कामा नये ही श्रीमती सोनिया गांधी यांची आंतरिक तळमळ आहे आणि म्हणून आदरणीय श्रीमती सोनिया गांधी यांनी केंद्र शासनाला हा अध्यादेश काढण्यास भाग पाडले असे जर मी म्हणालो तर ते अतिशयोक्तीपूर्ण ठरणार नाही.

सभापती महोदय, माझ्या दृष्टीने स्वातंत्र्यानंतर दोन निर्णय अतिशय क्रांतिकारक ठरलेले आहेत. एक तर देशातील शेतकऱ्यांवरचे 72 हजार कोटी रुपयांचे कर्ज केंद्र शासनाने माफ केले. भारतीय शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अतिशय महत्वपूर्ण निर्णय होता. अन्न सुरक्षा अध्यादेश हा देशातील 81 कोटी लोकांना लाभ देणारा निर्णय ठरणार आहे. आजही भारतामध्ये अगदी काश्मीर पासून कन्याकुमारीपर्यंत आणि चांद्यापासून बांद्यापर्यंत विविध ठिकाणी दुर्दैवाने लोक उपाशी राहताना दिसतात. भूकबळींची संख्या मोठ्या प्रमाणावर आढळून येते. विविध भागांमध्ये कुपोषण आढळून येते. त्यावर मात करण्यासाठी कदाचित हा निर्णय घेतलेला आहे असे माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटते. या निर्णयाच्या जनक श्रीमती सोनिया गांधी ठरलेल्या आहेत म्हणून मी त्यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो.

सभापती महोदय, या देशामध्ये नवीन संस्कृती उदयास येऊ पहात आहे. चांगल्याला चांगले म्हणण्याची उदार मनस्कता दुर्दैवाने विरोधी पक्षामध्ये दिसून येत नाही. खुज्या विचारांची बुटकी माणसे दुर्दैवाने जागोजागी आढळून येतात. केंद्र शासनाने हा अतिशय योग्य निर्णय घेतलेला आहे. भारताची हजारो वर्षाची परंपरा पाहिली तर प्रत्येक शतकामध्ये, प्रत्येक दशकामध्ये माणसे उपाशी मेलेली आहेत, त्यांनी दुधासाठी टाहो फोडलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये 3 रुपये किलो दराने तांदूळ, 2 रुपये किलो दराने गहू आणि 1 रुपया किलो दराने कडधान्य, डाळी केंद्र शासन देणार असेल आणि संपूर्ण जबाबदारी केंद्र शासन उचलणार असेल तर हा अतिशय स्तुत्य आणि क्रांतिकारक असा निर्णय आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या विषयी काही शंका व्यक्त केल्या जातात. 81 कोटी लोकांना केंद्र शासन अन्नधान्य खरेदी करुन देणार आहे. त्यामुळे शेतकरी आळशी होईल, शेतकरी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

प्रा. सुरेश नवले .....

शेतामध्ये मशागत करणार नाही, शेताकडे दुर्लक्ष करील, ही जी शंका व्यक्त केली जाते ती अप्रस्तुत आणि अनाठायी आहे. उलट या देशातील शेतकऱ्यांच्या धान्याला हमी भाव मिळणार आहे. 81 कोटी लोकांना लागणारे अन्नधान्य केंद्र शासन खरेदी करणार आहे. त्यामुळे शेतकरी सुध्दा मोठ्या प्रमाणावर कष्ट करतील. आपल्या अन्नधान्याला केंद्र शासन हमी भाव देणार आहे म्हणून शेतकरी मोठ्या प्रमाणावर घाम गाळतील. परिणामत: काळी आई ओसंडून वाहणार आणि शेतकऱ्यांच्या आयुष्यामध्ये सुखाचे, समाधानाचे, समृध्दीचे क्षण येणार. त्यामुळे हा निर्णय अतिशय क्रांतिकारक आहे असे मी म्हणालो तर ते अतिशयोक्तीपूर्ण ठरणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

सभापती महोदय, या निर्णयामध्ये महिला प्रमुख असणार आहे. आजही हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या राज्यांमध्ये मातृसत्ताक पध्दती आढळते. त्या मातेच्या हातात संपूर्ण कुटुंबाचा कारभार आहे. केंद्र शासनाने अतिशय विचारपूर्वक घेतलेला हा निर्णय आहे. या योजनेची महिला प्रमुख घटक आहे. तिच्या हातामध्ये कुटुंबाची चावी राहणार आहे. ती या योजनेवर संपूर्ण नियंत्रण ठेवणार आहे. त्यामुळे 'मातृ देवो भव' हा आविष्कार या योजनेमध्ये माझ्या सारख्याला दिसतो. या योजनेचा पुरस्कार करीत असताना मी शासनाला धन्यवाद देतो. स्वस्त दरामध्ये धान्य मिळाल्यामुळे गोरगरीब रोज दिवाळी साजरी करु शकतात. एका व्यक्तीला 5 किलो या प्रमाणे कुटुंबात 5 सदस्य असतील तर दरमहा 25 किलो धान्य मिळणार आहे. त्यामुळे या देशातील गरिबीचे संपूर्णपणे उच्चाटन होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे हा निर्णय विचारपूर्वक घेतलेला आहे. नवभारताची जडणघडण करणारा हा निर्णय आहे. या देशातील सर्वसामान्य माणसांचा विचार करुन त्यांना तृप्तीचा ढेकर देण्यास कारणीभूत ठरणारा हा निर्णय असल्यामुळे मला तो स्तुत्य वाटतो. या निर्णयात शेतकऱ्यांचा, महिलांचा, मुलांचा, किशोरांचा, वृध्दांचा सर्व थरातील लोकांचा विचार केलेला आहे. त्यामुळे या अध्यादेशाचे विधेयकात रुपांतर होईल, त्यानंतर विधेयकाचे कायद्यात रुपांतर होईल. त्याची अंमलबजावणी राज्य सरकार करील. आदिवासींपर्यंत हा निर्णय पाझरत जाईल. कदाचित पुढील अधिवेशनापर्यंत कोणत्याही भागात भुकबळीची बातमी कोणत्याही वर्तमानपत्रात येणार नाही. इतका महत्वपूर्ण हा निर्णय आहे.

सभापती महोदय, मी थोडेसे मागील कालावधीत जाऊ इच्छितो. कारण महाविद्यालयात शिकत असताना 1985 ते 1990 च्या दरम्यान गोरगरिबांच्या कुटुंबांना खायला अन्न मिळत नव्हते. गावातील एखाद्या श्रीमंत व्यक्तीच्या घरचे लग्न असेल तर ते लोक मंडपाच्या बाहेर स्वत:ची ताट, वाटी घेऊन बसत असत. बऱ्यापैकी श्रीमंताच्या घरचे लग्न असेल तर त्या लग्नातील जेवणात बुंदी असे. मराठवाड्यात बुंदीला नुक्ती संबोधले जाते. ती नुक्ती प्रत्येकाच्या ताटामध्ये ओंजळभर दिली जात असे. गरिबा घरचे लग्न असेल तर लापशी, कढी व भात जेवणात असे. लापशी याचा अर्थ असा की, कण्यांमध्ये गूळ टाकून ती शिजविली जात असे. लापशीत साखर टाकली जात

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

नव्हती. आजही खेड्यापाड्यात लापशीत साखर टाकली जात नाही. परंतु मी त्या काळातील वस्तुस्थिती सांगत आहे. ती मूठभर लापशी गरिबांच्या ताटात पडत असे. गोरगरीब जनता तृप्त अंत:करणाने घरी परत जात असे. कारण त्याही वेळेस त्यांचे पोट भरलेले नसे. माझ्या गावापासून शनिचे राक्षस भुवन आहे. तेथे आमच्या गावातील गोरगरिबांची तरुण मुले व वृध्द मंडळी लग्नाला जात असत. कारण तेथे श्रीमंतांची लग्न लागत असत. शनी राक्षस भुवन येथे श्रीमंतांची संख्या अधिक आहे. त्यामुळे ज्यांची लग्ने लागत असत तेथे नुक्तीचे जेवण असे. नुक्तीच्या जेवणासाठी आमच्या गावातील गोरगरीब लोक जात होते. त्यांच्या वाट्याला केवळ ओंजळभर जेवण येत होते. गरिबांच्या घरामध्ये कधीही साखरेचा चहा तयार होत नसे. आता प्रत्येकाच्या घरामध्ये साखरेचा चहा बनविला जातो, गुळाचा चहा फॅशन म्हणून प्यायला जातो. परंतु त्या काळात सर्वसामान्य माणूस असो किंवा श्रीमंतांच्या घरातही गुळाचा चहा बनविला जात असे. 1985 पर्यंत ग्रामीण भागामध्ये इतके दैन्य होते. आजही ते प्रमाण फार कमी झालेले नाही.

सभापती महोदय, आमच्या गावामध्ये एक मणभर धान्य व पोटभर जेवण यावर सालकरी राहत असे. शेतीमध्ये काम करण्यासाठी गड्याला ठेवावयाचे असेल तर त्याला मणभर ज्वारी,एक वेळची न्याहरी व दोन वेळचे पोटभर जेवण दिल्यावर तो गडी वर्षभर काम करीत असे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 16:55

प्रा. सुरेश नवले...

अशा परिस्थिमध्ये अन्न सुरक्षा विधेयक आणण्याचा एक क्रांतिकारक निर्णय केन्द्र शासनाने घेतलेला आहे..

या ओंजळीत माझ्या अन्न आहे
भूक मिटविणारे ब्रह्म आहे
चिंता करु नका भुकेची
तिला जाळणारे हे परब्रह्म आहे
माझ्या ओंजळीत अन्न आहे.

म्हणून हा अन्न विषयक विचार केन्द्र शासनाला, विशेषत: सोनियाजी गांधी यांना सुचावा आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी त्या आग्रही असाव्यात आणि त्यानंतर केन्द्र शासनाने हा अध्यादेश काढावा हे भारतीयासाठी अत्यंत पवित्र असे काम झालेले आहे. ज्यांचे अंत:करण आणि ज्यांचा जठराग्नी भडकलेला आहे त्याला ब्रह्मज्ञान सांगून उपयोग नाही, महमद पैगंबर साहेबांची कलमे सांगून उपयोग नाही आणि भगवान बुद्धांची शांती सांगून उपयोग नाही. तृप्त अंत:करणाने ब्रह्मज्ञान पचनी पडते आणि भगवान बुद्धाचा विचार सुध्दा डोक्यात शिरतो, अतृप्त अंत:करणाने डोक्यात काहीही शिरु शकत नाही. या देशातील प्रत्येक माणसाची क्षुधा तृप्ती झाली पाहिजे, त्याची भूक मिटवली पाहिजे आणि ती मिटवली गेली तर शेवटी माणसे जगतील आणि त्यातून राष्ट्रभक्त निर्माण होतील. पोटामध्ये अन्न नसताना राष्ट्रभक्तीचा विचार हा अप्रस्तुत आणि अव्यवहार्य आहे. त्यामुळे पोटे भरलेली असतील तर राष्ट्रभक्त निर्माण होतील. राष्ट्रभक्तीचा विचार कोणी अतृप्त अंत:करणाने ऐकत असेल तर तो पचनी पडणार नाही. या देशामध्ये राष्ट्रभक्ती जागृत करायची असेल तर या देशातील भूक मिटविली पाहिजे आणि हे भूक मिटविण्याचे काम केन्द्र शासनाने केलेले आहे. म्हणून मी केन्द्र शासन आणि आदरणीय सोनिया गांधी यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आणि आमच्या सहकारी सदस्यांनी महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये या ठिकाणी जो प्रस्ताव आणलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, केन्द्रातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकार ज्याला युपीए-2 म्हटले जाते, त्या सरकारने एक क्रांतिकारक असा अन्न सुरक्षा कायदा अमलात आणण्यासाठी अध्यादेश काढला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मला आठवते, 1968च्या दरम्यान मी लहान होतो. आम्ही तीन भावंडे. आम्ही शिक्षकाच्या घरामध्ये जन्माला आलो. आमचे आई-वडील शिक्षक त्यामुळे घरामध्ये अत्यंत कमी स्वरुपात उत्पन्न असायचे. त्यावेळी अन्नाचा तुटवडा भासला. आपणाला आठवत असेल की त्यावेळी लाल रंगाचा गहू आयात करण्याची पाळी सरकारवर आली होती. आई आम्हाला, ज्या खाणे शक्य नाही अशा प्रकारच्या लाल रंगाच्या चपात्या देत होती. अशा प्रकारची परिस्थिती या देशामध्ये होती. 1968च्या दरम्यान या देशामध्ये डॉ. स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली हरित क्रांतीचा एक नवीन कार्यक्रम राबविण्यात आला. डॉ. स्वामीनाथम यांना हरित क्रांतीचे जनक असे म्हटले गेले. अमेरिकेतील कृषी अर्थतज्ज्ञ नॉर्मन बोरलॉग यांना फादर ऑफ दी ग्रीन रेव्होल्यूशन ऑफ दी वर्ल्ड असे संबोधले जाते. ग्रीन रेव्होल्यूशन म्हणजे त्यांनी नेमके काय केले ? ग्रीन रेव्होल्यूशन म्हणजे धान्योत्पादन वाढेल अशा प्रकारच्या चांगल्या बीबियाणाची निर्मिती करणे, इरिगेशनच्या फॅसिलिटी वाढवणे, किटक नाशकांचा वापर करणे, होल्डिंग वाढवणे, अशा प्रकारचे कार्यक्रम केले.

सभापती महोदय, ..

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

मला माहिती आहे की, कोकणातील लोकांकडे गुंठयामध्ये जागा आहेत. त्या होल्डिंगचे एकत्रीकरण करणे, त्या ठिकाणी लँड रिफॉर्म्स् आणणे, ग्रामीण भागात वाहतुकीसाठी रस्ते, पाण्याच्या सुविधा, इलेक्ट्रीसिटी इत्यादी इन्फ्रास्ट्रक्चर इम्पूव्ह करणे, कृषीसाठी जे आर्थिक पाठबळ लागते ते वाढविणे, केमिकल फर्टीलायझरचा वापर करणे, स्प्रिंकलर, ड्रीप इरिगेशन अशा वेगवेगळया पध्दतीचे मेजर्स त्यांनी त्या ठिकाणी दिले. त्यामुळे या देशात नवीन हरित क्रांती झाली आणि कृषीचे उत्पन्न वाढले. जो देश अन्नधान्याची आयात करीत होता, तो देश आज अन्नधान्याची निर्यात करण्यापर्यंत पोहोचला आहे. केंद्र सरकारने हा अत्यंत चांगल्या स्वरुपाचा निर्णय घेतलेला आहे. जर अन्नधान्याची निर्मिती या देशात झाली नाही तर त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे अशक्य आहे. या देशात डॉ.स्वामीनाथन यांनी हरित क्रांती आणली. तद्नंतर 2004 साली या देशाचे कृषी मंत्री म्हणून महाराष्ट्राचे सुपुत्र आदरणीय श्री. शरद पवार साहेब कार्यभार सांभाळत आहेत. कृषी मंत्री म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळल्यानंतर 11 वी पंचवार्षिक योजनेत 4 टक्क्यांचे टारगेट दिले होते.

सभापती महोदय, टार्गेटच्या अनुषंगाने 3.8 ग्रोथ रेट मेंटेन करुन कृषीचा ग्रोथ केला गेला. मी जी आकडेवारी सांगणार आहे ती अत्यंत महत्वाची आहे. 2004-2005 मध्ये या देशात अन्नधान्य 198.30 मिलियन टन होते आणि आज 2011-2012 मध्ये 2059.29 मिलियन टन एवढे झाले आहे. 2012-2013 या कालावधीत देशातील अनेक राज्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती होती. हा देश अनेक समस्यांना सामोरे जात होता. अशी परिस्थिती असतानाही अन्नधान्याचे उत्पादन 2012-2013 मध्ये 255.36 मिलियन टन्स येण्याची अपेक्षा आहे. अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी अनेक गोष्टी केल्या गेल्या. शेतकरी कृषी उत्पादन करतात, त्यांच्या मालाला चांगला भाव देणे, शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे अशा अनेक गोष्टी केल्या गेल्या. त्याचबरोबर या देशात कृषी उत्पादनासाठी बँकेच्या मार्फत पैसा उपलब्ध करुन द्यावा लागत होता. कृषी उत्पादनासाठी 2003-2004 या वर्षी 86981 कोटी एवढा निधी उपलब्ध करुन दिला जात होता. आज 6 लाख 7 हजार 375 कोटी रुपयांचे अग्रीकल्चर क्रेडीट शेतकऱ्यांना आज मिळते् आहे हे टार्गेट 7 लाख कोटीपर्यंत वाढविण्याचा केंद्र सरकारचा इरादा आहे. हा आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांचा इरादा आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे...

सभापती महोदय, या योजनेच्या माध्यमातून तांदूळ, गहू देण्याचाच इरादा नसून कडधान्ये देण्याचा देखील केंद्र शासनाचा इरादा आहे. कडधान्याचे उत्पादन पूर्वी 1.4 मिलियन टन्स होते. आज कडधान्याचे उत्पादन 18.45 लाख टन होण्याची शक्यता आहे. या देशात आपले राज्य कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात करीत आहे. कापूस उत्पादनाच्या आकडेवारी देखील प्रेरणादायी अशी आहे. पूर्वी आपण कापूस परदेशातून आयात करीत होतो. आज आपण 330 ते 350 लाख बेल्स निर्यात करीत आहोत. तीच परिस्थिती लाईव्हस्टॉकची आहे. मटन, वेगवेगळया प्रकारची फळे, व्हेजीटेबल प्रोडक्शन यांची आपण निर्यात करीत आहोत. व्हेजीटेबलच्या बाबतीत आपला जगात दुसरा क्रमांक आहे. आपण चायनाची बरोबरी करतो. आपण अनेक गोष्टींच्या बाबतीत पहिल्या किंवा दुसऱ्या क्रमांकावर आहोत....

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे....

सभापती महोदय, दुधाच्या उत्पन्नाबाबत आपण जगाच्या तुलनेत पहिल्या क्रमांकावर आहोत. ज्यूट, चहा आपण मोठया प्रमाणात उत्पादित करीत आहोत. चहा उत्पादनामध्ये जगाच्या तुलनेत आपला देश दुसऱ्या क्रमांकावर आहे. हे सर्व घटक उत्पादन करण्यामध्ये आपण आघाडीवर नसतो तर अन्न सुरक्षा कायदा आणण्याची कोणत्याही सरकारची हिंमत झाली नसती. आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांचे प्रामाणिक प्रयत्न आणि त्या प्रयत्नांना आदरणीय पंतप्रधानांची असलेली साथ यामुळे हे शक्य झाले. युपीए सरकार हे एका पक्षाचे सरकार नसून अनेक पक्षांनी एकत्र येऊन स्थापन केलेले सरकार आहे. त्या सरकारकडून एकत्रितपणे निर्णय घेतले जातात. त्या पध्दतीने देशातील कृषी उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढवित असताना केवळ देशातील नागरिकांची पोटाची खळगी भरणे एवढाच उद्देश नसून जगभरात निर्यात वाढवून जगातील नागरिकांच्या पोटाची खळगी भरण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. जवळजवळ 2.32 लाख कोटी रुपयांचा कृषी माल आपल्या देशाने निर्यात केला.

सभापती महोदय, दिनांक 21 फेब्रुवारी, 2013 रोजी या देशाच्या आदरणीय राष्ट्रपतींनी संसदेला संबोधित केले होते. त्यावेळी त्यांनी म्हटले होते की,"...That there are reasons to cheer from agriculture front." कृषी फंडामुळे जी प्रोग्रेस झाली, हरित क्रांतीच्या दृष्टीने जी पावले उचलली गेली, त्या माध्यमातून घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केल्यामुळे माननीय राष्ट्रपतींनी गौरवोद्गार काढले. Current economic survey मध्ये "Indian Agriculture" च्या बाबतीत जे नमूद केले आहे ते मी आपल्याला वाचून दाखवितो. "Indian Agriculture is broadly a story of success" देशाच्या कृषी क्षेत्राचा जो विकास आहे त्याच्या यशस्वीतेची ही कहाणी आहे. अशा प्रकारचे काम करुन आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी कृषी उत्पादन वाढविले म्हणून अन्न सुरक्षा कायदा आणण्याची युपीए सरकारची हिंमत झाली, याचे आपण सर्वांनी भान ठेवले पाहिजे.

सभापती महोदय, या योजनेबद्दल अनेक शंकाकुशंका उपस्थित केल्या गेल्या. एखादी नवीन योजना आणावयाची असेल तर ती निश्चितपणे आणली पाहिजे. महाराष्ट्र राज्याने सर्वप्रथम रोजगार हमी योजना सुरु केली होती. त्याच धर्तीवर या देशात नरेगा योजना सुरु करण्यात आली. राज्याची रोजगार हमी योजना राष्ट्रीय पातळीवर घेऊन जाण्याचे काम केले गेले.

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे....

या देशातील कोणताही प्रशासक नागरिकाने उपाशी राहिले पाहिजे, त्याचा भूकबळी गेला पाहिजे असे म्हणणार नाही. वाजवी भागात अन्न मिळाले पाहिजे, अन्नधान्यावरील खर्च हा त्याच्या उत्पन्नाशी निगडित असला पाहिजे. नवीन योजना आणली असली तरी त्यातील त्रुटी या जसजशी योजना राबविली जाईल तसतशा समोर येतील. शेवटी योजना अधिकाऱ्यांमार्फत राबविली जाणार आहे. योजना राबवित असताना काही अधिकारी सक्षम असतात, काही अकार्यक्षम असतात. परंतु योजनेतील त्रुटींवर मात करुन राज्यात ही योजना अधिक सक्षमपणे राबविणे हे एकप्रकारचे चॅलेंज आहे असे मी समजतो.

सभापती महोदय, सध्याच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये लाभार्थ्यांना तीन महिन्यांचे धान्य एकत्रितपणे पॅकेट्सच्या माध्यमातून दिले जाते. त्याच धर्तीवर या योजनेंतर्गत एकत्रितपणे धान्य दिले गेले पाहिजे. केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्याला मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचा पुरवठा होणार आहे. आज वृत्तपत्रातून धान्य कुजल्याच्या, धान्याच्या पोती अस्ताव्यस्त टाकलेल्या आढळून आल्याच्या बातम्या वाचावयास मिळतात. धान्य साठविण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणात गोडावूनची आवश्यकता भासणार आहे. ज्याअर्थी केंद्र शासनाकडून योजनेचा अध्यादेश निर्गमित केला गेला त्याअर्थी ही योजना लगेच राबविली जाणार आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात गोडावूनची निर्मिती करुन येणाऱ्या धान्याचा प्रत्येक कण ज्यांच्यासाठी द्यायचा आहे त्यांच्या मुखापर्यंत नेण्याचे काम राज्य सरकारने केले पाहिजे.

नंतर 3डब्ल्यू...1.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे ....

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात अनेक गोष्टी आहेत. माझी राज्य सरकारला तसेच या देशातील जे शेतकरी आहे त्यांना एकच विनंती राहणार आहे की, चांगली योजना पुढे राबवायची असेल तर डॉ. स्वामी नाथन यांच्या नेतृत्वाने सुरु झालेली हरित क्रांती व माननीय श्री. पवार साहेब यांच्या प्रेरणेने त्याला मिळालेली ताकद या माध्यमातून या देशाचीच भूक भागविणे नव्हे तर संपूर्ण जगाची भूक भागविण्याची क्षमता आपल्या शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे ती तशीच राहिली पाहिजे किंबहुना ती अधिक वाढली पाहिजे. बीटीच्या बियाण्यांच्या संदर्भात अनेक शंका कुशंका काढल्या जातात. परंतु आपल्याला जगाच्या स्पर्धेत उतरावयाचे असेल, अन्नधान्यामध्ये आपला देश पहिल्या क्रमांकावर घेऊन जावयाचा असेल तर पुरोगामी विचाराने या देशाचे कृषि खाते ज्या पध्दतीने माननीय पवार साहेबांनी चालविले त्याच पुरोगामी विचाराने या देशातील शेतकऱ्यांनी, कामगारांनी तसेच प्रत्येक नागरिकांनी काम केले तर आपला देश अजून फार पुढे जाईल. मला असे वाटते की, या ठिकाणी अन्न सुरक्षेचा जो कायदा आलेला आहे त्या कायद्याच्या माध्यमातून अन्न सुरक्षेची योजना या ठिकाणी तयार झालेली आहे. येणाऱ्या काळात केवळ 2/5 वर्ष नव्हे तर जोपर्यंत भारत देश आहे तोपर्यंत ही योजना या देशात सक्षमपणे राबवली जावी.

यापुढे जाऊन मी सांगू इच्छितो की, या देशाच्या प्रत्येक नागरिकांची आर्थिक सुबत्ता इतकी चांगली झाली पाहिजे की, 5/10 वर्षानंतर केंद्र सरकारला अन्न सुरक्षा योजना राबविण्याची आवश्यकताच भासावयास नको. या पध्दतीने जर आपण देश पुढे घेऊन गेलो तर मला असे वाटते की, अन्न सुरक्षेच्या कायद्यातून आपण काही तरी शिकलो आणि या देशाला काही तरी दिले असे होईल. मी या प्रसंगी युपीए सरकारचे तसेच माननीय श्री. शरद पवार साहेबांचे मनापासून अभिनंदन करतो. माननीय श्री. पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली या देशाने रेकॉर्ड ब्रेक धान्याचे उत्पादन केल्यामुळे त्याची दखल माननीय राष्ट्रपती महोदयांनी, तसेच या देशाच्या इकॉनॉमिक सर्व्हेने घेतली त्याबद्दल पुन्हा एकदा युपीए सरकारचे आणि माननीय श्री. शरद पवार साहेबांचे अभिनंदन करतो. अन्न सुरक्षा योजनेमधील त्रुटी काढून, अन्न सुरुक्षा योजनेची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करुन ही योजना गरिबांपर्यंत पोहचविण्याची काम राज्य सरकार चांगल्या प्रकारे करेल अशी खात्री बाळगून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, आमचे नेते ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी नियम 260 अन्वये अन्न सुरक्षेच्या संदर्भात प्रस्ताव आणला असून त्यावर माझे संक्षिप्त भाष्य करण्यसाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी अतिशय महत्वाच्या विषयाला हात घातल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. मानवाला अन्न, वस्त्र व निवारा या 3 गोष्टींची आवश्यकता असते. या 3 गोष्टींची जबाबदारी राज्य शासनाची असते. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी मानवी जीवनासाठी आवश्यक असणारे अन्न पोषण पुरेशा प्रमाणात व परवडणाऱ्या किंमतीत उपलब्ध करुन देऊन सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणारा हा क्रांतिकारक कायदा आहे. अन्न सुरक्षा विधेयक हे देशातील ऐतिहासिक कायदा आहे. आमचे सर्वे सर्वा अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्षा सन्माननीय श्रीमती सोनिया गांधी यांचा या बाबतीत सिंहाचा वाटा आहे. काँग्रेस पक्षाने 2009 च्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात मनरेगाच्या धर्तीवर अन्न सुरक्षा मिळवून देणारा कायदा आपण आणणार आहोत असे वचन दिले होते, शब्द दिला होता व त्यानुसार वटहुकमाद्वारे तो शब्द त्यांनी पाळून वचन पूर्ती केलेली आहे आणि असे फक्त काँग्रेंस पक्षच करु शकते हे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

काँग्रेस पक्षाने युपीएच्या जाहीरनाम्यात अत्यंत महत्त्वाचे वचन दिले होते. अन्न सुरक्षा अध्यादेश आणून काँग्रेस सरकारने बोलते तसे करते हे दाखवून दिलेले आहे. भारतातील 2/3 नागरिकांना भूक मुक्तीची हमी देण्यासाठी तयार केलेली योजना म्हणजे अन्न सुरक्षा कायदा होय. जगाला प्रेरणादायी ठरणारा हा कायदा असून त्याचे कौतुक संयुक्त राष्ट्र संघाने देखील केलेले आह. हे आपल्या देशाला अभिमानास्पद आहे.

केंद्र सरकारने अन्न सुरक्षा अध्यादेशाला मंजुरी दिलेली आहे. या अध्यादेशामुळे भारतातील 70 कोटी जनतेला कायद्याने सवलतीच्या दरात अन्नधान्य मिळणार आहे. भारत सरकारच्या प्रचलित असलेल्या विविध अन्न सुरक्षा योजनेतील तरतुदींना वैधानिक स्वरूप देणारा असा हा राष्ट्रीय अन्न सुरक्षा वट हुकूम आहे. भारताने केलेला कायदा जागतिक पातळीवर गेला असून जगाच्या इतिहासावर अत्यंत महत्वाचा असा हा कायदा आहे. भारताने अन्नाचा हक्क म्हणून ही चळवळ केली आहे. या निर्णयामुळे देशाला प्रेरणा मिळणार आहे. संयुक्त राष्ट्रांनी ठराव करून भारताचे अभिनंदन केले आहे. त्यांचे विशेष प्रतिनिधी यांनी यासंबंधातील निवेदन केले आहे.

समाज कार्याच्या भावनेतून सरकारकडून एरव्ही अन्नधान्याचे वाटप केले जाते. मात्र या कायद्यामुळे नागरिकांना हक्काने अन्न मिळणार आहे, ही कायद्यातील महत्त्वाची बाब आहे. भारताची लोकसंख्या मोठी असल्यामुळे अन्न सुरक्षा योजना ही जगात मोठी असणार आहे. संपूर्ण जगाच्या इतिहासात ही योजना नाविन्यपूर्ण होणार आहे. या योजनेसाठी मोठा निधी लागणार असला तरी भूकेपेक्षा खर्च महत्त्वाचा नाही. सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे अन्नधान्यांचे वाटप केले जाणार आहे. त्यामुळे या अन्नधान्याची चोरी रोखणे ही महत्त्वाची जबाबदारी माननीय मंत्र्यांना करावी लागणार आहे. आकडेवारीचा विचार केला तर देशातील 81 टक्के लोकांना या योजनेचा फायदा मिळणार आहे. हा जगातील सर्वात मोठा कार्यक्रम आहे. आपल्या देशातील लोकांना देण्यासाठी धान्य साठा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. कल्याणकारी योजना राबविण्यासाठी पुरेशा पायाभूत सुविधा देखील आहेत. तसेच राज्य शासनाकडे पुरेशी साठवणूक क्षमता देखील आहे. धान्याचे पुरेसे उत्पादन आहे. ही योजना राबविण्यासाठी आपली आर्थिक स्थिती देखील चांगली आहे. त्यामुळे चलनवाढीचे संकट ओढवले जाईल अशी काहींनी व्यक्त केलेली भीती ही निरर्थक आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण....

चुकीची आहे. सध्या धान्य सबसिडीसाठी आपण दरवर्षी 90 हजार कोटी रूपये खर्च करीत आहोत. अन्न सुरक्षा विधेयकामुळे 23 हजार कोटी रूपयांचा अतिरिक्त बोजा भारत सरकारवर पडणार आहे. आपण आता विकसित राष्ट्र झालेलो आहोत. आपल्या जनतेची पोषण करण्याची जबाबदारी आपला देश समर्थपणे उचलू शकतो. ही बाब देखील आपल्याला अभिमानास्पद आहे.

सभापती महोदय, एखादे विकसित राष्ट्र आत्मविश्वासाने ही जबाबदारी शिरावर घेऊ शकते आणि लोकांना हक्क मिळवून देऊ शकते. अशा वेळी सहा महिने ते सहा वर्षे वयोगटातील मुला-मुलींना त्यांच्या वयानुसार त्यांच्या गरजा पुरविणारा आहार स्थानिक अंगणवाडीच्या माध्यमातून आपण विनामूल्य देणार आहोत. आठवी इयत्ते पर्यंतच्या विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण विनामूल्य देणार आहोत. या विधेयकामुळे जनतेला मिळणाऱ्या लाभाविषयी योग्य ती सर्व माहिती लोकप्रतिनिधींनी पटवून दिली पाहिजे. आपली भूमिका समजावून सांगितली पाहिजे.

सभापती महोदय, हा राष्ट्रीय कार्यक्रम राबवित असताना या योजनेमुळे देशातील 63 टक्के जनतेला स्वस्तात धान्य उपलब्ध होणार आहे. देशातील 2/3 लोकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजनेमुळे 75 टक्के ग्रामीण आणि 50 टक्के शहरी लोकांना स्वस्तात धान्य उपलब्ध होणार आहे. गरिबातील गरीब कुटुंबाना 35 किलो प्रति कुटुंब धान्य मिळणार आहे. या योजनेमुळे त्यांच्या नशिबी दोन वेळेचे जेवण मिळणार आहे. कोट्यवधी जनतेच्या पोटी दोन घास अन्नाचे जाणार आहेत.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण.....

राज्यात ज्या लोकांमार्फत ही अन्न सुरक्षा योजना पोहोचवावयाची आहे ती यंत्रणा नव्याने आणि स्वतंत्रपणे उभी करणे आपले कर्तव्य आहे. सध्या राज्यात कार्यरत असलेली सार्वजनिक वितरण व्यवस्था ही वादाचा विषय असली तरी त्यात सुधारणा करणे आपल्याला जमले नसले तरी ही व्यवस्था काही ठराविक लोकांच्या हाती गेल्यामुळे त्यावर नियंत्रण राहिलेले नाही. तेव्हा राज्यात ही व्यवस्था चालविणारे सांघिक दुकानदार, पुरवठादार व माफिया यांची टोळी बनली आहे. आपण त्यांचा योग्य बंदोबस्त केला पाहिजे. अन्न सुरक्षा योजना राबविताना या योजनेतील एकाही दुकानदारांचा किंवा वितरकांचा विचार केला जाऊ नये. कारण या व्यवस्थेमुळे स्वस्त धान्य अर्ध्याहून अधिक लोकांपर्यंत पोहोचणार आहे.

सभापती महोदय, राज्यात धान्याची साठवणूक करण्यासाठी स्वतंत्र गोदामाची आवश्यकता आहे आणि राज्य शासनाने तशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. कारण केंद्र सरकारकडून मिळत असणाऱ्या धान्यांपैकी 32 टक्के धान्यांचा वाहतुकीच्या दरम्यान काळाबाजार होतो. त्यामुळे लाभार्थ्यांना धान्य मिळत नाही. तेव्हा राज्य सरकारच्या मालकीची अत्याधुनिक स्वरुपाची गोदामे आवश्यक आहेत आणि त्यासाठी राज्य शासनाने अंमलबजावणी केली पाहिजे.

सभापती महोदय, ही योजना लागू करताना ग्रामीण व शहरी भागातील लोकांचे निकष ठरविण्याची नितांत गरज आहे. अन्यथा गरजू व उपेक्षित जनता मागे राहील. या योजनेसाठी प्रत्येक कुटुंबाच्या आर्थिक सीमारेषा ठरविणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, आमच्या पक्षाच्या सर्वेसर्वा श्रीमती सोनिया गांधी व माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे मी मनापासून अभिनंदन करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे व अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये अन्न सुरक्षा योजने संदर्भात आणलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, देशातील व राज्यातील जनतेला स्वस्त दरात धान्य मिळण्यासाठी संसदेमध्ये अन्न सुरक्षा विधेयक पारीत झाले. या अध्यादेशामुळे राज्यातील जनतेला मोठ्या प्रमाणावर फायदा मिळणार आहे. देशातील 70 कोटी जनतेला दरमहा तीन रुपयात तांदूळ, दोन रुपयांत गहू सवलतीच्या दरामध्ये जीवनावश्यक अन्नधान्य मिळणार आहे. महाराष्ट्रातील जवळपास 75 टक्के ग्रामीण आणि 50 टक्के शहरी लोकांना याचा फायदा मिळणार आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावाला पाठिंबा देत असताना सर्वप्रथम मी युपीए सरकारचे अभिनंदन करतो. युपीएच्या सरकारच्या अध्यक्षा माननीय श्रीमती सोनिया गांधी यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, जगामध्ये उत्पादन होणारे अन्नधान्य आणि भारतामध्ये उत्पादन होणारे अन्नधान्य याची तुलना केली तर मागील काही कालावधीमध्ये भारत देश अन्नधान्य उत्पादनात अग्रेसर राहिला आहे.

सभापती महोदय, मला आठवते की, आठ -दहा वर्षापूर्वी शेतकऱ्यांना 65 हजार कोटी रुपयांच्या कर्जाचे वाटप होत होते. आमचे नेते आदरणीय श्री.शरद पवार साहेब यांच्याकडे कृषी विभागाचा कार्यभार आला त्यावेळी त्यांनी मंत्रिमंडळातील व अन्य नेत्यांना पटवून दिले की, आपल्या देशाची प्रगती करायची असेल तर त्यासाठी आपणास प्रथम शेतकरी वर्गाकडे लक्ष दिले पाहिजे. तेव्हा पहिल्याच बजेटमध्ये शेतकऱ्यांच्या कर्जाची रक्कम 65 हजार कोटीहून 1 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढविली. सन 2009 पासून शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये उत्पन्न होणाऱ्या अन्नधान्याला चांगला दर देण्यास सुरुवात झाली. तेव्हापासून आजपर्यंत आपल्या देशात अन्नधान्याचे उत्पादन अमर्याद वाढले आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

शेतकरी आज इतर व्यवसाय सोडून शेती व्यवसायाकडे वळला आहे. परिणामी, आपल्या देशात जास्तीत जास्त अन्नधान्याची निर्मिती होत आहे. जगातील दोन-चार देश सोडले तर इतर प्रत्येक देशांनी आपल्या देशाकडे मागणी केली आहे की, आमच्या देशात अन्नधान्याचे उत्पादन कमी झाल्यामुळे आम्हाला अन्नधान्याचा पुरवठा करावा. त्यानुसार भारताने काही देशांना अन्नधान्याची मोफत मदत केली आहे आणि काही देशांत अन्नधान्याची निर्यात सुध्दा केली आहे.

महोदय, आपण रेकॉर्ड पाहिले तर आपल्या देशात 257 मिलियन टन अन्नधान्याचे उत्पादन झालेले आहे. हे रेकॉर्ड आहे. काही वर्षापूर्वी आपल्या देशात अन्नधान्याची कमतरता होती. परंतु आज आपल्या देशात इतक्या मोठ्या प्रमाणावर अन्नधान्याचे उत्पादन होत आहे की, त्यामुळे अन्नधान्य ठेवण्यासाठी आपल्याकडे पुरेशी जागा नाही. त्यामुळेच आज भारत देश अन्नधान्याची निर्यात करीत आहे. अन्नधान्याच्या निर्यातीतून आपल्या देशाला 2 लाख 34 हजार कोटी रुपयांचे परदेशी चलन मिळते. आपल्या देशात एवढ्या मोठ्या प्रमाणावर अन्नधान्याचे उत्पादन होत आहे.

महोदय, आपला देश जगातील सर्वात मोठा लोकशाही असलेला देश आहे. आपल्या देशात गरीब वर्ग असल्यामुळे त्या वर्गाला फायदा मिळाला पाहिजे असा विचार युपीए सरकारने केला. त्या अनुषंगाने अन्न सुरक्षा योजनेवर चर्चा झाली आणि त्या योजनेची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली आहे.

महोदय, माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांचे मी अभिनंदन करुन आभार मानतो की, त्यांनी अन्न सुरक्षा योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर देशामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर अन्नधान्याची निर्मिती केली. त्यामुळेच महाराष्ट्र विधिमंडळाचे सभागृह कौतुकासाठी आणि या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी सज्ज झाले आहे. ही योजना राबवित असताना मी सांगू इच्छितो की, आपल्या राज्यात अन्नधान्याचे वितरण करण्यासाठी निरनिराळ्या व्यवस्था आणि योजना आहेत. त्यामध्ये काही त्रुटी असतील तर त्या त्रुटी दूर करण्याची तयारी राज्य सरकारच्या माध्यमातून करण्यात आली असेल.

महोदय, अन्न सुरक्षा योजनेचे कौतुक आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील होऊ लागले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर अशा प्रकारचे कौतुक होत असताना ही योजना आपापल्या देशात कशा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

प्रकारे सुरु करता येईल या बाबतचा अभ्यास जगाच्या पातळीवर सुरु झालेला आहे. अन्य देशात ही योजना राबविण्याचा अभ्यास सुरु झालेला असताना आपल्या देशाबरोबरच आपल्या राज्यात अन्न सुरक्षा योजनेची चांगल्याप्रकारे अंमलबजावणी झाली पाहिजे असा प्रयत्न आपण सर्वांनी केला पाहिजे. मी अगोदरच सांगितले आहे की, आपण 65 हजार कोटी रुपये कर्ज वाटपावरुन 1 लाख कोटी रुपये पर्यंत पुढे गेलो आहोत. मागच्या बजेटचा अभ्यास केला तर हाच पत पुरवठा आणि कर्ज वाटप करण्याची मर्यादा 65 हजारांवरुन 7 लाख कोटी पर्यंत गेली आहे. त्यामुळे अन्नधान्य निर्मितीची आपल्याला चिंता नाही. कारण शेतकरी मोठ्या प्रमाणावर अन्नधान्य निर्माण करणार आहे. या सर्व बाबी होत असताना आपल्या राज्यातील शेतकरी संरक्षित राहिला पाहिजे या दृष्टीने आपण काळजी घेतली पाहिजे. अन्न सुरक्षा योजनेचा फायदा गोरगरिबांना चांगल्याप्रकारे मिळणार आहे. इतरही वर्गांना या योजनेचा फायदा मिळणार आहे.

महोदय, अन्न सुरक्षा योजनेचे उत्तर प्रदेशमध्ये 15 कोटी 24 लाख, बिहारमध्ये 8 कोटी 84 लाख, महाराष्ट्रात 7 कोटी 75 लाख आणि आंध्र प्रदेशमध्ये 5 कोटी 9 लाख लाभार्थी राहणार आहेत. या योजनेची अंमलबजावणी करताना ग्रामीण आणि शहरी असे दोन भाग करण्यात आलेले आहेत. ग्रामीण भागात 75 टक्के आणि शहरी भागात 50 टक्के लोकांना अन्नधान्य पुरविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर महाराष्ट्रात शहरीकरणाचे प्रमाण 45-50 टक्क्यांपर्यंत गेले आहे. शहरी भागातील 50 टक्के लोकांना अन्नसुरक्षा योजनेचा फायदा देणार असाल तर उरलेल्या 50 टक्क्यांतील गरीब लोकांचे काय करणार आहात, हा देखील विचार केला पाहिजे. शहरामध्ये ज्यांना या योजनेची आवश्यकता आहे त्यांच्यासाठी 50 टक्क्यांची मर्यादा न ठेवता 50 टक्के गरिबांना अन्नधान्याचे वाटप केल्यानंतर सुध्दा उर्वरित 50 टक्क्यांमध्ये लाभार्थी असतील तर त्यांना लाभ देण्यासाठी 50 टक्क्यांची मर्यादा वाढवावी लागेल. ही मर्यादा वाढविण्यासाठी या बाबीचा अभ्यास करुन आवश्यकता असेल तर आपण जरुर विचार करावा, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

नंतर श्री.बरवड....

श्री. रमेश शेंडगे ......

सभापती महोदय, 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या 45.23 टक्के लोक शहरात राहतात. आता महाराष्ट्राची लोकसंख्या 11 कोटी 36 लाखावर गेली असून 48 टक्के नागरीकरण झाल्याचा अंदाज आहे. अन्न सुरक्षा कायद्याचे लाभ शहरातील 50 टक्के लोकांना देण्याचे बंधन असल्याने ही बाब आपल्या राज्याच्या दृष्टीने आपण तपासून जास्तीत जास्त लोकांना त्याचा लाभ देता येईल याची सुध्दा आपण काळजी घेतली पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, अन्नधान्य वितरण व्यवस्था हा यातील पाया आहे. म्हणून या वितरण व्यवस्थेमध्ये अन्नधान्य फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या माध्यमातून येत असेल, सेंट्रल वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशनच्या माध्यमातून येत असेल किंवा महाराष्ट्र स्टेट वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशनच्या माध्यमातून येत असेल, अशा ज्या यंत्रणा याच्याशी संबंधित आहेत त्यांच्या माध्यमातून हा माल वॅगनने येणार असेल, वॅगनमधून गोडावूनमध्ये तो स्टॅकींग करुन स्टोअरेज करावयाचा असेल, तो माल परत गोडावूनमधून लॉरीमध्ये भरावयाचा असेल, लॉरीमध्ये माल भरल्यानंतर तालुका पातळीपर्यंत, रेशन दुकानदारापर्यंत त्याची जी वाहतूक होणार आहे, त्याची जी हाताळणी होणार आहे तसेच तो माल गावामध्ये गेल्यानंतर त्या गावातील आमच्या ज्या गरीब लोकांना, समाजबांधवांना मिळणार आहे तिथपर्यंतची यंत्रणा अतिशय काटेकोरपणे आपण उभी केली पाहिजे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी एक महत्वाचा मुद्दा सांगावासा वाटतो. आपण हे सर्व करीत असताना आज मालाची हाताळणी करणारे माथाडी कामगार आहेत. आपल्याकडे कोणत्याही मालाची हाताळणी मशीनव्दारे होत नाही. म्हणून याच्याशी संबंधित जे कामगार आहेत त्यांच्या प्रश्नांकडे सुध्दा आपल्या गांभीर्याने पहावयास पाहिजे. आता आपण 50 किलोच्या गोणी घेतो. पण 100 किलोचे ओझे आपल्या डोक्यावर, आपल्या माथ्यावर घेऊन काम करणारे माथाडी कामगार आहेत त्यांच्या सर्व सोयीसवलतींकडे सुध्दा आपण पाहिले पाहिजे. मग त्यांच्या वेजेसचे प्रश्न असतील, त्यांच्या वेज रिव्हीजनचे काही प्रश्न प्रलंबित असतील त्याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, मला मुद्दाम या ठिकाणी सांगावेसे वाटते की, नागपूर आणि पुण्याच्या बाबतीत वेज रिव्हीजनचा प्रश्न आहे. शासकीय गोदामांमध्ये काम करणारे जे कामगार आहेत,

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

1998 पासून ते माथाडी कामगार अजूनही काम करीत आहेत. 1998 पासून 2008 पर्यंतचे वेज रिव्हीजन झाले. 2008 पासून 2012 पर्यंतचे वेज रिव्हीजन झाले. 2012 नंतर आता तिसरे रिव्हीजन झाले. तीन वेळा रिव्हीजन झाले पण शासनाने अजून त्याबाबतीत निर्णय घेतलेला नाही. परवा पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी मी ही बाब मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली. नागपूरला 54 कामगारांची भरती करावयाची आहे. ते जोपर्यंत शासकीय गोदामांमध्ये माल हाताळणार नाहीत तोपर्यंत आपली माल हाताळणी आणि माल वाहतूक व्यवस्था व्यवस्थित होणार नाही. कारण नसताना आपण ती भरती थांबविलेली आहे. मंत्री महोदयांनी 15 दिवसात भरती करु असे सांगितले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो परंतु हे जे छोटे-मोठे मुद्दे आहेत याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माल हाताळणारे माथाडी कामगार तसेच वाहतूक व्यवस्था या बाबतीत आज सुध्दा काही जिल्ह्यांमध्ये वाहतुकीचे जे ठेके देतो त्या ठेक्यांच्या बाबतीत सुध्दा आपण लक्ष दिले पाहिजे. जे चांगल्या प्रकारचे वाहतूकदार असतील त्यांना चांगल्या प्रकारचा दर दिला पाहिजे. कधीकधी आपण टेंडर काढतो आणि जो लोयेस्ट असेल त्याला ते टेंडर देतो. पण या बाबतीत आपण अभ्यास केला पाहिजे. जर डिझेलचे दर वाढत असतील, वाहतुकीमध्ये त्यांचा तेवढा खर्च होत असेल तर त्यांना आवश्यक तेवढा खर्च आपण दिला पाहिजे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी दोन चार महत्वाचे मुद्दे मांडणार आहे. राज्यात अन्न सुरक्षा कायदा काटेकोरपणे राबविण्याच्या दृष्टीने तालुका स्तरापासून राज्य स्तरापर्यंत अधिकारी कर्मचाऱ्यांची पुरवठा विभागाची स्वतंत्र यंत्रणा उभी करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने काय उपाययोजना केलेली आहे हे मंत्री महोदयांनी सभागृहात विशद करावे. अन्न सुरक्षा कायद्यामध्ये मोठ्या प्रमाणात धान्याची आवक होणार आहे. धान्य साठविण्यासाठी राज्य शासनाची काय तयारी आहे ? आपल्याकडे चांगल्या प्रकारचे गोडाऊन्स असले पाहिजेत, त्या गोडाऊन्समध्ये गळती नसली पाहिजे, योग्य पध्दतीने वायूविजन झाले पाहिजे. त्याची हाताळणी व्यवस्थित झाली पाहिजे. याची राज्य शासनाने काय तयारी केलेली आहे हे सुध्दा या ठिकाणी विशद होणे फार महत्वाचे वाटते.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

सभापती महोदय, अन्न सुरक्षा कायदा राबविताना सुरुवातीस सामान्य जनतेच्या योग्य अंमलबजावणीबाबत अनेक तक्रारी येण्याची शक्यता आहे. या तक्रारीचे निराकरण करण्याच्या दृष्टीने आपण वेगळी काही उपाययोजना करणार आहात का ? आताच अनेक तक्रारी आहेत आणि पुढे सुध्दा मोठ्या प्रमाणात तक्रारी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याचे सुध्दा नियोजन आपण करावे. आपण जुने रेशन कार्ड बदलून नवीन बारकोडेड संगणकीकृत रेशनकार्ड सर्व लाभार्थ्यांना ही योजना लागू होण्यापूर्वी देणार आहात का ? आपण आधार कार्डचा आधार घेणार आहोत. आपण जर बारकोडेड नवीन रेशनकार्ड देणार असाल तर ही योजना सुरु करण्यापूर्वी आपण ते देऊ शकाल का आणि त्या बाबतीत आपले काय नियोजन आहे हे मंत्री महोदयांनी सांगावे.

सभापती महोदय, राज्यातील एकूण लोकसंख्येच्या किती टक्के लोकांना या योजनेचा लाभ होणार आहे हे शासनातर्फे जाहीर करावे. जे अधिकारी ही योजना राबविण्यात कुचराई करतील त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी अधिनियमात काही विशिष्ट तरतुदी आहेत का, नसतील तर त्या तरतुदी करणार का असा माझा महत्वाचा मुद्दा आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण पूर्ण करतो.

---

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, काँग्रेस पक्षाचे आमचे नेते व या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी नियम 260 अन्वये महत्वपूर्ण विषयावर प्रस्ताव मांडलेला आहे. त्या प्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठी व समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने अन्न सुरक्षा विधेयक संसदेत सादर केले होते. परंतु विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांमुळे त्या विधेयकावर संसदेत चर्चा होऊ शकली नाही. या विधेयकाच्या संदर्भात केंद्र सरकारने सर्वच राजकीय पक्षामध्ये एकमत घडविण्याचा प्रयत्न केला होता. तरीही हे विधेयक पारित होऊ शकले नाही. त्यामुळे नाईलाजास्तव केंद्र सरकारला अध्यादेश काढावा लागला. या विधेयकामुळे देशातील 70 टक्के जनतेला लाभ मिळणार आहे हे सर्वच सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे. दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना व मध्यमवर्गीयांना अल्प दरामध्ये म्हणजे एक रुपया, दोन रुपये व तीन रुपये या दरात धान्य व डाळी दरमहा मिळणार आहे. युपीए-2 च्या काळातील सर्वांत महत्वाकांक्षी व अवाढव्य ही योजना आहे. प्रत्येक भुकेल्यांना अन्न देण्याची जबाबदारी केंद्र शासनाने आपल्या अंगावर घेतलेली आहे. युपीए सरकारच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांच्या संकल्पनेतून या योजनेला मूर्त स्वरुप लाभलेले आहे. या विधेयकाला सर्वच राजकीय पक्षांनी पाठिंबा देण्याची गरज आहे. परंतु या योजनेबाबत विरोधी पक्षाकडून वेगळा आरोप केला जात आहे. शेतकऱ्यांमध्ये गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न केला जात आहे. शेती मालाला रास्त भाव मिळणार आहे. परंतु विरोधक मात्र अफवा पसरविण्याच्या प्रयत्नात आहे. तो चुकीचा आहे. या योजनेची अंमलबजावणी करीत असताना शेतकऱ्यांच्या मालाला सुध्दा रास्त भाव देण्याची जबाबदारी केंद्र सरकारने घेतलेली आहे.

या योजनेची अंमलबजावणी यशस्वीपणे करावयाचे असेल तर त्याची वितरण व्यवस्था सक्षम असावयास पाहिजे. महाराष्ट्र सरकारचे माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली या विधेयकाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होईल याबद्दल माझ्या मनामध्ये बिलकूल शंका नाही. राज्यातील शेवटच्या माणसापर्यंत, गोरगरीब माणसापर्यंत ही योजना गेली पाहिजे

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

श्रीमती दिप्ती चवधरी....

अशी शासनाची इच्छा आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था भ्रष्टाचाराने पोखरल्याचे आपण पाहतो. त्यामुळे गोरगरिबांच्या घरी धान्य जाण्याऐवजी ते काळ्या बाजारामध्ये गेल्याचे दिसते. त्यामुळे वितरण व्यवस्था देखील महत्वाची आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या योजनेच्या तयारीबाबत विचारणा केली आहे. परंतु तामिळनाडू, छत्तीसगड व आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये यापूर्वीच ही योजना यशस्वीपणे सुरु आहे. संपूर्ण देशामध्ये ही योजना चालू केल्यावर गोरगरिबांना, भुकेल्यांना दोन वेळा अन्न मिळण्याची मदत होणार आहे. युपीए सरकारच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांच्या निर्णयामुळे या योजनेसंबंधी अध्यादेश निर्गमित झालेला आहे. त्याचे विधेयक मंजूर झाल्यावर योजनेची अंमलबजावणी सुरु होईल. त्यामुळे मी मनापासून या प्रस्तावाला पाठिंबा देते आणि माझे विचार थांबविते.

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आणि आमच्या अन्य सहका-यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर या देशाची जी प्रगती व्हायला पाहिजे होती ती झाली नाही. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले तर महाराष्ट्राला द्रष्टे आणि प्रगतिशिल नेतृत्व मिळाले म्हणून महाराष्ट्रात औद्योगिक क्रांती झाली, सहकार क्रांती झाली, शैक्षणिक क्रांती झाली आणि कृषी क्रांती देखील झाली. परंतु यासाठी महाराष्ट्रातील नेतृत्वाने मग ते विरोधी पक्षातील असो किंवा सत्ताधारी पक्षातील असो, आपली पाठ थोपटून घेता कामा नये. तसेच या अन्न सुरक्षा विधेयकाला कुणाचाही विरोधी असता कामा नये असे माझे आणि माझ्या पक्षाचे मत आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी एक-दोन गोष्टींचे विश्लेषण करु इच्छिते. जेव्हा भारत देश स्वतंत्र झाला त्यावेळची अन्नधान्याची परिस्थिती आणि माणसाचे जीवनमान फार हालाखीचे होते. मी मुंबई शहरामध्ये जन्माला आले आणि मुंबई शहरामध्ये वाढले. त्यामुळे माणसांची गरिबी मी जवळून पाहिलेली आहे. त्यावेळी मिलो मिळत असे. त्यावेळी कोणीही गर्भ श्रीमंत नव्हते. आठआठ माणसाचे कुटुंब चालवताना एकटया माणसाला खूप कष्ट सोसावे लागत होते. महाराष्ट्राला द्रष्टे नेतृत्व मिळाले म्हणून महाराष्ट्राने प्रगतीच्या दिशेने वाटचाल केली आणि ही प्रगती आपणा सर्वांना दिसत आहे. या देशाचे नेतृत्व करणारे मग ते देशाचे पंतप्रधान असतील किंवा युपीएच्या अध्यक्षा सोनिया गांधी असतील किंवा शेतकरी कुटुंबामध्ये जन्माला आलेले आणि शेतीचे ज्ञान असणारे श्री. शरद पवार असतील, या सर्वांनी एकत्र येऊन शेतीमध्ये उत्क्रांती होण्यासाठी, देशाची प्रगती होण्यासाठी एक लेआऊट तयार केला आणि त्यामधून केन्द्र सरकारने हे विधेयक आणले. लोकसभेमध्ये हे विधेयक मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु श्रीमंतांची तळी उचलणा-या विरोधी पक्षाने या विधेयकाला विरोध केला, त्यावर चर्चा होऊ दिली नाही म्हणून केन्द्र सरकारला अध्यादेश काढावा लागला. या कायद्याची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी पावले उचलली पाहिजेत.

सभापती महोदय, या अध्यादेशाला जी मंडळी विरोध करतात त्यांना मी नम्रपणे सांगू इच्छिते की, मी देशाच्या सर्व राज्यांमध्ये फिरले आहे. महाराष्ट्रामध्ये समृद्धी आहे हे मी

..2..

श्रीमती अलका देसाई...

पहिल्यांदाच म्हणाले. 2002 सालामध्ये मी गुजरातमध्ये फिरत होते. त्या ठिकाणी सार्वजनिक वितरण व्यवस्था आहे, परंतु ती फार तोकडी होती. त्या ठिकाणी संध्याकाळच्या जेवणाच्या मेस पहायला मिळाल्या. त्या मेस आज आहेत की नाहीत मला माहीत नाही. आंध्रप्रदेशमध्ये तर फार गरिबी होती. आपण जेव्हा रेल्वेने प्रवास करीत होतो त्यावेळी राहिलेले अन्न मागण्यासाठी लहान लहान लेकरे येत असताना आम्ही पाहिलेले आहे. हे कशाचे द्योतक होते. ज्या राज्यामध्ये औद्योगिक प्रगती झालेली नाही त्या राज्यासाठी हा अन्न सुरक्षा कायदा वरदान ठरणार आहे.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

ज्या ठिकाणी शेती व्यवसायाची प्रगती झालेली नाही, तेथे हा निर्णय वरदान ठरणार आहे. कष्ट करण्याची हिंमत असेल, परंतु कष्टकऱ्याच्या पोटासाठी अन्न मिळत नाही ही गोष्ट युपीए शासनाने आणि आदरणीय श्रीमती सोनिया गांधी यांनी ओळखली. त्यामुळे अन्न सुरक्षा अध्यादेश लोकसभेसमोर मान्यतेसाठी आणला आहे. अन्न सुरक्षा अध्यादेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्राचे द्रष्टे नेतृत्व असणारे सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव सभागृहासमोर आणला आहे. त्या प्रस्तावाचे समर्थन करीत असताना मी फक्त दोनच मुद्यांचा उल्लेख करणार आहे.

सभापती महोदय, या सभागृहास मला नम्रतापूर्वक सांगावयाचे आहे की, या अध्यादेशाची अंमलबजावणी धनवान लोकांच्या हाती देता कामा नये. सर्वसामान्य गरीब माणसाला तांदूळ, गहू, कडधान्य स्वस्तात कसे मिळेल याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. सर्वसामान्य गरिबांना स्वस्त धान्य वितरणासाठी ज्यांच्या नेमणूका केल्या जाणार आहेत, त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यात आले पाहिजे. त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. या गोष्टीकडे शासनाने आवर्जून लक्ष घातले पाहिजे.

सभापती महोदय, योजना आखण्यासाठी किंवा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी आपण कोठे तरी कमी पडतो आहोत की काय असे चित्र निर्माण झालेले आहे. काही वेळा शेतकऱ्यांना सांगितले जाते की, अन्नधान्याचे उत्पादन करु नका. तुमच्या मालाला बाजारभाव मिळणार नाही. अशा प्रकारचा जो विचार मांडला जातो तो कोठे तरी खोडून टाकला पाहिजे. जास्त उत्पादन असेल, त्याचा दर्जा चांगला असेल तर त्या उत्पादनास चांगल्या प्रकारे बाजारभाव मिळतोच अशी माहिती शेतकऱ्यांना समजून सांगण्याची गरज आहे. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेबांची देखील ही योजना राबवितांना जबाबदारी वाढणार आहे. स्वत:च्या शिरावर घेणारे त्यांचे नेतृत्व आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, जे दारिद्रय रेषेखालील लोक आहेत, ज्यांना पोटभर अन्न मिळत नाही. त्यांना या योजनेचा प्रत्यक्षात लाभ उपलब्ध करुन द्यावा अशा प्रकारची सूचना करते आणि माझे भाषण संपविते.

------------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लघु पाटबंधारे योजना चिंचवे (निंबळक), ता.देवळा,जि.नाशिक येथे दिनांक 29 जुलै, 2013 रोजी घडलेली दुर्घटना.

**मु.शी.**: लघु पाटबंधारे योजना चिंचवे (निंबळक), ता.देवळा,जि.नाशिक येथे दिनांक 29 जुलै, 2013 रोजी घडलेली दुर्घटना या संबंधी माननीय जलसंधारण मंत्र्यांचे निवेदन.

डॉ.नितीन राऊत (जलसंधारण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

----------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील ग्रामीण, दुर्गम व मागास भागातील लोकांना केंद्र सरकारच्या अन्न सुरक्षा योजनेंतर्गत स्वस्त दरात धान्य उपलब्ध करुन देणे

**मु.शी.**: राज्यातील ग्रामीण, दुर्गम व मागास भागातील लोकांना केंद्र सरकारच्या अन्न सुरक्षा योजनेंतर्गत स्वस्त दरात धान्य उपलब्ध करुन देणे या विषयावर सर्वश्री माणिकराव ठाकरे, सुभाष चव्हाण, हेमंत टकले, शरद रणपिसे, प्रकाश बिनसाळे, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री विक्रम काळे, मोहन जोशी, संजय दत्त, राणाजगजितसिंह पद्मसिंह पाटील, सय्यद मुझफ्फर हुसेन, प्रा.सुरेश नवले, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम २६० अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या निमित्ताने केंद्र सरकारने काढलेल्या अन्न सुरक्षा अध्यादेशाचे स्वागत होत आहे. खरे म्हणजे महाराष्ट्र सरकार किंवा केंद्र सरकार गोरगरिबांच्या, कष्टकऱ्यांच्या आणि विशेषत: ज्यांना एक वेळचे जेवण मिळू शकत नाही, जे अर्धपोटी उपाशी राहतात अशा लोकांना अन्नधान्य मिळाले पाहिजे, तेही मानसन्मानाने मिळाले पाहिजे असा विचार करुन अन्न सुरक्षा विधेयक आणण्याचा प्रयत्न केला गेला. कायदा आला नाही, परंतु अध्यादेशाद्वारे विशिष्ट वर्गाच्या, गरिबांच्या दृष्टीने इच्छा प्रदर्शित केली गेली त्या दिशेने पावले टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सभापती महोदय, एका बाजूला देशात अन्नधान्याचे प्रचंड उत्पादन व्हावे आणि दुसऱ्या बाजूला दोन रुपये, तीन रुपये किलो दराने धान्य मिळाले नाही तर लाखो लोक उपाशी राहतात. लाखो लोकांना एक रुपया नसल्यामुळे, २ रुपये नसल्यामुळे उपाशी रहावे लागते. या सर्व बाबींचा विचार झाला पाहिजे. त्या दृष्टीने या अध्यादेशाचा विचार करीत असताना Right to Food हा विचार कुठून आला याचा विचार करतो तेव्हा आपण खूप जवळचे पहात असतो, जवळच्या नेत्यांना श्रेय देण्याचा प्रयत्न करतो. मी या अध्यादेशाचे श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना देतो. आपल्या

..२..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड.........

देशाची राज्य घटना त्यांनी तयार केली. त्या घटनेमध्ये Fundamental Rights, जगण्याचा अधिकार आणि माणसाला अन्न मिळाले नाही तर माणूस मरु शकतो, जगू शकत नाही हा विचार डॉ.बाबासाहेबांनी १९४६ साली केला. आपण त्या दृष्टीने या अध्यादेशाकडे पाहिले पाहिजे. याचे श्रेय कोणाला द्यायचे? ज्या व्यक्तीने असाही विचार केला की, या देशामध्ये जगण्याचा अधिकार दिला नाही तर माणूस मरु शकतो म्हणून त्या माणसाला वाचविले पाहिजे याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या माध्यमातून Right to life, Directive Principles दिले. त्यामध्ये राज्यांना निर्देश दिले गेले आहेत.

सभापती महोदय, राज्यामध्ये जर कोणी अन्नावाचून तडफडत असेल, जगणे कठीण झाले असेल तर त्या माणसाला अन्न मिळाले पाहिजे. म्हणून राज्य घटनेतील Right to life हे २१ वे कलम आणि Directive Principles च्या माध्यमातून खऱ्याअर्थाने देशाने विशिष्ट भूमिका घेतली, त्या भूमिकेची राज्य सरकारला दखल घ्यावी लागली. त्या दृष्टीने आपण पावले टाकीत आहोत.

नंतर ४एफ.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड....

पाऊले टाकीत असतांना आपल्या देशाची जी राज्य घटना आहे त्या प्रमाणे आपल्या लोकशाहीची वाटचाल चालू असते व अन्न सुरक्षेच्या संदर्भात मी पहिल्यांदा राज्य घटनेला श्रेय देतो व नंतर ज्यांनी या अन्न सुरक्षेच्या संदर्भात भूमिका घेतली त्या सर्वांनाच श्रेय देतो, युपीए सरकारलाही श्रेय देतो. खरे म्हणजे अन्न सुरक्षा कायद्याच्या संदर्भात कोणत्याही एका पक्षाने श्रेय घेऊ नये. अशा प्रकारे एकाच पक्षाने श्रेय घेतले तर ते बटबटीत होते, उथळपणाचे होते. आपण गरिबांना स्वस्तामध्ये धान्य दिले म्हणून आपण त्यांना म्हणू शकत नाही की, आम्ही तुम्हाला स्वस्तात धान्य दिले त्यामुळे तुम्ही आम्हाला मते द्या. खरे म्हणजे असे आपण म्हणू शकत नाही. परंतु गेल्या एक दीड महिन्यात वर्तमानपत्रात उलट सुलट चर्चा छापून येत आहे. निवडणुकीवर डोळा ठेऊन अन्न सुरक्षा विधेयक आणले जात आहे असेही छापून आलेले आहे.

मी सुरुवातीलाच म्हटले आहे की, निवडणुकीवर डोळा ठेवून नव्हे तर भारतीय राज्य घटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेले राईट टू लाईफ या फंडामेंटल राईटचे आपण खऱ्या अर्थाने इम्पलीमेंटशन करावयास लागलो आहोत. यापूर्वी अन्नावाचून किती तरी पिढया उपाशी मेलेल्या आहेत. त्यावेळेला आपण अन्न सुरक्षा कायदा आणू शकलो नाही याचे वाईट वाटते. मी लहानपणी गरिबीचे दिवस पाहिलेले आहेत, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी गरिबीचे दिवस पाहिले असतील. परंतु भूक नावाची गोष्ट डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना चांगल्या प्रकारे माहिती होती. आज आपला देश सर्जनशील, संवेदनशील झालेला आहे. आमचे नेते, राज्यकर्ते एवढे संवेदनशील झाले की, गरिबातला गरीब जो एक वेळचेही जेऊ शकत नाही अशा माणसाच्या अन्नाचा प्रश्न मिटवावयास आपण निघालो आहोत व याच गोष्टीचा मला सर्वात जास्त आनंद वाटतो.

सभापती महोदय, या देशाने अनेक दुष्काळ पाहिले, तडफडत मरणारी माणसे पाहिली आहेत. आपण अन्न धान्यामध्ये काटकसर केली पाहिजे. लग्नात जास्त खर्च करु नका, लग्न साध्या पध्दतीने करा असाही कालखंड आपण पाहिलेला आहे. परंतु आपल्या देशात आता हरित क्रांती झालेली आहे. माननीय श्री. शरद पवार साहेब कृषि खात्याचे नेतृत्व करीत असतांना हा देश खऱ्या अर्थाने फळा-फुलाने आणि अन्न धान्याने समृध्द झाला. आपल्याला धान्याची कोठारे कमी पडू लागली इतके धान्य आता आपल्या देशात तयार होऊ लागले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

ॲड.जयदेव गायकवाड....

आहे. धान्याची कोठारे कमी पडतात म्हणून विरोधक त्यावर आरडाओरड करु लागले आहेत. अन्न धान्याचे उत्पादन वाढल्यामुळे खऱ्या अर्थाने आपल्या सर्वांना आनंद झालेला आहे. आपल्याकडील अन्न धान्य सडण्यापेक्षा गरिबांच्या पोटात गेले तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. या प्रसंगी मी फार बोलणार नाही. परंतु एवढेच सांगतो की, अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे झ ाली पाहिजे. आपण चांगले निर्णय करीत असतो परंतु त्या सर्व चांगल्या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. काँग्रेस पक्षाने आणीबाणीच्या काळात 20 कलमी कार्यक्रम सुरु केला होता. हा कार्यक्रम फार चांगला होता. या कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीने न झाल्यामुळे 20 कलमी कार्यक्रम बंद पडला.

या ठिकाणी मी कोणावरही टीका करीत नाही तर आपण आत्मपरीक्षण केले पाहिजे. आपण ज्या चांगल्या योजना आणतो त्या चांगल्या योजनांची अंमलबजावणी शेवटपर्यंत चांगल्या पध्दतीने करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. खरे म्हणजे आपण 20 कलमी कार्यक्रम सोडावयास नको होता. 20 कलमी कार्यक्रमाच्या वेळेस 1976 मध्ये मी संपूर्ण महाराष्ट्रात आंदोलने करीत होतो व त्या कार्यक्रमात मी भूमीहीन शेतमजुराला थोडी जमीन मिळाली पाहिजे यासाठी मी मागणी केली होती. महार वतनाच्या ज्या जमिनी गेल्या होत्या त्या पुन्हा त्यांना मिळाल्या पाहिजेत. 20 कलमी कार्यक्रमामध्ये ज्या ज्या सावकारांनी किंवा गुंडानी महारवतनाच्या जमिनी लाटल्या होत्या त्या जमिनी त्या त्या जिल्यातील जिल्हाधिकाऱ्यांनी परत दिल्या पाहिजेत अशा प्रकारचा तो कार्यक्रम होता. आदिवासींच्या हस्तांतरीत झालेल्या जमिनी आदिवासींना परत मिळाल्या त्याच पध्दतीने दलितांच्या जमिनी परत मिळाल्या पाहिजे यासंदर्भात कार्यक्रम सुरु झाला. 20 कलमी कार्यक्रमातील एक कलमी कार्यक्रमाचा आम्ही प्रयत्न केला होता परंतु पुढे त्याला अडथळा आला.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड....

पुढे आणीबाणी उठली. नंतर तो कार्यक्रम देखील संपला. हा वटहुकूम आहे. त्याचे कायद्यात रूपांतर होणे बाकी आहे. या वटहुकूमाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ही गोष्ट युपीए सरकारचे अभिनंदन करण्यास पात्र ठरणारी आहे. आपण बेल वाजविल्यामुळे मी थोडक्यात माझे विचार व्यक्त करणार आहे. अंत्योदय योजने अंतर्गत 35 किलो धान्य देण्यात येत होते.

**उप सभापती** : सदर प्रस्तावावरील चर्चा संपे पर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, अंत्योदय ही देखील चांगली योजना होती. या योजनेची अंमलबजावणी होत आहे काय, नसल्यास ती का होत नाही ? लाभार्थींच्या याद्या अद्ययावत का होत नाही ? अंत्योदय योजनेतील व्याख्येमध्ये असणारी जी कुटुंबे आहेत त्यांना धान्य मिळत नाही. यामध्ये पुष्कळ अपहार होत आहे. याबद्दल मी बोलण्याची आवश्यकता नाही. आमचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे तर अनेक केसेस येतात. अनेक दुकाने रद्द होतात. या दुकानांसंबंधी सुनावणी घ्यावी लागते. त्यात त्यांचा फार वेळ जातो. या सवलतीचा फायदा दुसरेच लाटत असतात हे देखील महत्वाचे आहे. ही योजना चांगली असेल तर ते अन्न गरिबांच्या पोटात गेले पाहिजे याचा देखील विचार केला पाहिजे एवढे बोलून मी येथेच थांबतो.

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी म.वि.प.नियम 260 अन्वये अन्न सुरक्षा विधेयका संबंधी सभागृहा समोर प्रस्ताव आणल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

संसदेमध्ये या विषयावर चर्चा होण्यापूर्वीच या सभागृहाला या विषयावर चर्चा करण्याचा मान मिळालेला आहे. या देशामध्ये राहणाऱ्या नागरिकांना कायद्याने अन्नाचा अधिकार मिळाला पाहिजे ही भूमिका डोळ्या समोर ठेवून 15 वी लोकसभा अस्तित्वात आल्यानंतर युपीए सरकारने हा कार्यक्रम राबविला. सन 2009 मध्ये तत्कालीन राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी दोन्ही सभागृहाच्या सदस्यां समोर केलेल्या भाषणामध्ये याचे सूतोवाच केले होते. आता निवडणुका आल्या आहेत म्हणून अध्यादेश काढला आहे अशातला भाग नाही. संसदेमध्ये काम करीत असताना देखील विरोधी पक्ष गतिरोध करतो व चांगल्या विधेयकांना हाणून पाडतो हे या देशातील जनतेने अनेकदा बघितले आहे. आजही आपण बघितले आहे की, या सभागृहात बसणारा विरोधी पक्ष देखील सभागृहात चांगली चर्चा सुरू असताना सभात्याग करून गेला. कारण त्यांना विरोध केल्या शिवाय राजकारण करता येत नाही. यात पक्षाभिनिवेशाचा भाग नाही. युपीएने चांगला निर्णय घेतला आहे. युपीएच्या प्रमुख श्रीमती सोनिया गांधी आहेत. त्या देशाच्या नेत्या आहेत. त्यांचा आग्रह आहे की, या देशात राईट टु फुड आला पाहिजे. सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी येथे एका गोष्टीचा उल्लेख केला आहे. तो खरा आहे. या विधेयकाच्या हेतुवाक्यामध्ये म्हटले आहे की, "Fundamental right to live". यानंतर जो पुढचा शब्द घातला आहे तो फार महत्त्वाचा आहे, तो असा आहे की, "Fundamental right to live with dignity" त्याला कायद्याने अन्न मिळाले पाहिजे. या देशात जन्माला आलेल्या प्रत्येकाला अन्नाचा अधिकार कायद्याने मिळाला पाहिजे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयप्रकाश छाजेड...

एवढेच नव्हे तर 1949 च्या ह्युमन राईटच्या आर्टीकल 25 मध्ये युनिर्व्हसल डिक्लरेशन ऑफ ह्युमन राईटमध्ये देखील जगामध्ये कायद्याने अन्न मिळाले पाहिजे, जेवण मिळाले पाहिजे याचा उल्लेख केलेला आहे. त्या शिवाय घटनेमध्ये अनेक तरतुदी आहेत. मालन्युट्रेशीअन्सची तरतूद आहे. गर्भवती महिलांच्या संदर्भातील तरतूद आहे. या सर्वांना कायद्याने अधिकार मिळाले पाहिजे हे आम्हाला विसरुन चालणार नाही.

सभापती महोदय, या विषयाच्या अनुषंगाने माननीय राष्ट्रपतींनी भाषण केले त्यावेळी युपीएमधील अनेक घटक पक्षांतील सदस्यांना या योजनेबद्दल साशंकता होती. तेव्हा सर्वांना बरोबर घेतले पाहिजे. या विधेयकाचे अस्तित्व काय आहे ? या विधेयकाकरिता किती खर्च येणार आहे ? या विधेयकामुळे देशातील शेतकऱ्यांपुढे कोणते प्रश्न निर्माण होणार आहेत ? या विधेयकामुळे देशामध्ये सामाजिक परिस्थिती काय होणार आहे या प्रश्नांवर तीन-चार वर्षे सखोल चर्चा झाली.

सभापती महोदय, हे विधेयक आल्यामुळे 1 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च होणार आहे असा आक्षेप घेण्यात आला आहे. या विधेयकाच्या अंतर्गत अनेक योजना आणलेल्या आहेत. त्यामध्ये मालन्युट्रीशनच्या योजना आहेत. आपण रेशनिंगसाठी अनुदान देतो. त्यासाठी 1 लाख 25 हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या विधेयका अंतर्गत ज्या ज्या योजना आणणार आहोत त्या त्या योजनांचा खर्च त्या विधेयकामध्ये अंतर्भूत आहे. त्यासाठी वेगळा खर्च येणार नाही.

सभापती महोदय, आपण अन्नधान्याच्या सबसिडीसाठी 85 हजार कोटी रुपये देतो. मिड-डे मिलसाठी जवळपास 13 हजार कोटी रुपये देतो. चाईल्ड इंटिग्रेटेड कार्यक्रमासाठी जवळपास 17 हजार कोटी रुपये खर्च करतो आणि मॅटर्निटीसाठी 450 कोटी रुपये खर्च करतो. या सर्व योजना या कायद्यामध्ये एकत्रित केलेल्या आहेत. या सर्व योजना कायद्यामध्ये एकत्रित करुन त्यास न्याय देऊन त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी.

सभापती महोदय, राज्यातील एकही व्यक्ती रेशनिंग व्यवस्थेबद्दल समाधानी नाही. मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर बोगस रेशनकार्डस आहेत. राज्यामध्ये रेशनिंग दुकानामार्फत गरिबांना अन्न मिळत नसून ते परस्पर मार्केटमध्ये विकले जाते.

30-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4H-2
AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्री.भारवि... 18:05

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयप्रकाश छाजेड...

सभापती महोदय, राज्यामध्ये कुपोषणाचे प्रकार होत आहेत. मेळघाट, नाशिक, जव्हार, अगदी मुंबईतील धारावी भागात कुपोषण झाल्याचे आढळून आले आहे. याचे कारण सामान्य माणसाला रेशनिंगचे धान्य सुध्दा उपलब्ध होत नाही हे आहे आणि हे वास्तव आपणास नाकारता येणार नाही.

सभापती महोदय, अन्न सुरक्षा योजनेंतर्गत ग्रामीण भागातील 75 टक्के लोक आणि शहरी भागातील 50 टक्के लोक येतील. जर शहरामध्ये अंत्योदय योजनेचे लाभार्थी वाढले तर हा रेशिओ बदलू शकतो. जवळपास 8 कोटी जनतेला याचा फायदा मिळणार आहे.

सभापती महोदय, आपण एक रुपया, दोन रुपये आणि तीन रुपये दराने धान्य देणार आहोत. आपले जे दैनंदिन धान्य आहे म्हणजे मका, ज्वारी, नाचणी हे धान्य एक रुपयामध्ये मिळणार आहे.

सभापती महोदय, राज्यातील कोरडवाहू शेतकऱ्यांना शेती परवडत नाही म्हणून केंद्र सरकारला त्याला आधारभूत किंमत द्यायला लावून कोरडवाहू शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याकरिता प्रयत्न करण्यात आले.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड....

महोदय, न्यूट्रेशन सपोर्ट टू वूमेन ॲण्ड चिल्ड्रेन योजनेमध्ये गर्भवती महिलांना काय सुविधा देणार आहोत, लहान मुलांना काय सुविधा देणार आहोत तसेच मध्यान्ह भोजन योजनेत काय देणार आहोत याचा अंतर्भाव केला आहे. परंतु आता अन्न सुरक्षा विधेयक मंजूर झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्य पुरविले नाही तर त्यांना तक्रार करण्याची संधी कायद्यान्वये देण्यात येणार आहे, हे आपल्याला विसरता येणार नाही. त्यामुळेच या कायद्याचे महत्त्व आपल्याला विसरता येणार नाही.

महोदय, आज महिलांवर उकळते तेल, ॲसीड टाकण्यात येत असल्याच्या घटना घडतात. या देशातील महिलांना कायद्याने कुटुंब प्रमुख मानून तिचे नाव रेशन कार्डवर कुटुंब प्रमुख म्हणून टाकण्याचा क्रांतिकारी बदल या कायद्यामध्ये अंतर्भूत करण्यात आलेला आहे हे देखील आपल्याला विसरता येणार नाही.

महोदय, फुड कमिशन ॲण्ड डीस्ट्रीक्ट ग्रीव्हेन्सेस कमिट्यांबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. मुळात अशा प्रकारचा कायदा आणत असताना केंद्र सरकारला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले आहे, ही बाब आपल्याला कदापि विसरता येणार नाही. माननीय श्रीमती सोनीया गांधी यांचा अन्न सुरक्षा कायद्यासाठी विशेष आग्रह होता. अन्न सुरक्षा कायदा आपल्या देशात झाला पाहिजे असे युपीएच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी वचन दिले होते. शिवाय 2009 मध्ये माननीय राष्ट्रपतींनी देखील अभिभाषणात माझे सरकार काय काय करणार आहे त्यामध्ये या विधेयकाबाबत नमूद केले होते. त्यामुळे राईट ऑफ फुडची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे. यामध्ये कोणत्याही पक्षाचा अभिनिवेष म्हणून नव्हे तर कर्तव्यभावनेने हे काम केले पाहिजे.

महोदय, अन्न सुरक्षा कायदा आपल्या देशात होत असल्यामुळे संपूर्ण जग अचंबित झाले. युनोने म्हटले आहे की, अशा प्रकारचा कायदा करुन भारत देशाने एवढ्या मोठ्या प्रमाणात नागरिकांना अन्न उपलब्ध करुन देणे हा एक चमत्कार आहे आणि भारताचा कायदा जगाला प्रेरणादायी ठरेल.

महोदय, माननीय श्रीमती सोनीया गांधी या नेहरु-गांधी घराण्याच्या लोकशाहीवादी वारसाच्या वाहक आहेत, हे आपल्याला विसरुन चालणार नाही. त्यांनी खटपट केल्यामुळेच अन्न सुरक्षा अध्यादेश काढण्यात आला आहे. मी सभागृहाच्या माध्यमातून सरकारला एवढीच विनंती

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड....

करतो की, या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर होईल तेव्हा तो कायदा स्वीकारणारे महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य असले पाहिजे. महाराष्ट्र राज्याने हा कायदा स्वीकारला पाहिजे एवढी पुनश्च विनंती करतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

---------

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या प्रस्तावावरील चर्चेसाठी एकूण अडीच तास वेळ देण्यात आलेली होती. या प्रस्तावावरील चर्चा दुपारी 3.40 वाजता सुरु झ ााली. या चर्चेची वेळ आता संपलेली आहे. शिवाय या चर्चेवरील माननीय मंत्री महोदयांचे उत्तर होणे बाकी आहे. आता दोन-तीन सदस्य बोलायचे बाकी आहेत. मी त्यांना विनंती करतो की, त्यांनी कृपया कमीत कमी वेळात बोलावे, जेणेकरुन माननीय मंत्र्यांचे उत्तर सुरु करता येईल.

सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी आता भाषणास सुरुवात करावी. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी आपले विचार 5 मिनिटांत मांडावेत.

श्री.हेमंत टकले : महोदय, हा प्रस्ताव अतिशय महत्त्वाच्या विषयावरील आहे. आपण सांगितल्यानुसार कमीत कमी वेळात भाषण संपविण्याचा मी जरुर प्रयत्न करेन. परंतु आपण देखील शिथिल धोरण स्वीकारावे अशी विनंती आहे.

**उप सभापती** : मला आपल्याकडून खात्री हवी आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना सांगतो की, त्यांनी आता भाषणास सुरुवात करावी.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आणि आम्ही सर्वांनी मिळून केंद्र सरकारच्या अन्न सुरक्षा कायद्याच्या अंमलबजावणीच्या अगोदरच्या टप्प्यावरील वटहुकुमाच्या अनुषंगाने सभागृहात चर्चा उपस्थित केलेली आहे. या प्रस्तावावर बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. त्यामुळे इतर सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती होणार नाही या बाबत काळजी घेण्याचा मी जरुर प्रयत्न करीन.

नंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.

सभापती महोदय, या येऊ घातलेल्या विधेयकाची किंवा आता जो अध्यादेश लागू करण्यात आलेला आहे त्याची पार्श्वभूमी काय होती, कशामुळे हा अध्यादेश आला आणि अशा पध्दतीचा कायदा येऊन या देशातील शेवटच्या म्हणजे अंतिम टप्प्यावर असलेल्या माणसाचा खरोखरच अंत्योदय होणार आहे का या प्रश्नांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न जे कोणी पक्ष या देशावर सत्ता करु इच्छित असतील, या राज्यात सत्ता मिळवू इच्छित असतील त्यांनी करावा असाच हा एक प्रश्न आहे. कारण शेवटी या लोकशाही व्यवस्थेमध्ये ज्या वेळेला लोकांकडून आपण मते मागतो त्यावेळी आपण त्यांना काही निश्चित स्वरुपाची आश्वासने देतो की, जर आम्ही राज्यकारभार केला तर हे करु शकतो किंवा आम्ही लोकांचा जीवनस्तर सुध्दा सध्या आहे त्यापेक्षा चांगला घडवू शकू. ही काही सर्व वेळेला स्वप्नवत वाटणारी परिस्थिती नसते. जेव्हा आपल्यासमोर आकडे येतात तेव्हा असे वाटते की, एकूणच अशा प्रकारची काही तरी धाडसी योजना अंमलात आणल्यावर या देशाच्या अर्थव्यवस्थेला फार मोठा तडा जाणार आहे किंवा त्यामध्ये एक प्रकारचा दुष्परिणाम म्हणून या देशाच्या एकूणच कृषी क्षेत्रामध्ये आवश्यक नसलेले बदल होणार आहेत, ही गोष्ट तपासून पाहण्याची आहे.

सभापती महोदय, मुळात आपण या देशाचा आणि राज्याचा विचार करीत असताना नेहमी शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव घेऊन राज्य करीत असतो. त्यामुळे कोणताही संकल्प राबविण्यासाठी त्याच्यामागे आवश्यक असणारी एक सांस्कृतिक जाण नेतृत्वाला आहे की, नाही याचीही कसोटी या निमित्ताने लागत असते. एका संताने असे म्हटले आहे की, जेव्हा आपल्याला भूक लागते तेव्हा आपण जेवण करतो पण आपली जेवढी भूक असते तेवढे जेवण केले तर त्याला आपल्याला प्रकृती म्हणता येईल, आपली भूक भागल्यानंतर सुध्दा जर आपण जेवत राहिलो तर त्याला विक्रृती म्हणता येईल आणि आपली भूक संपूर्णपणे भागली नाही पण दुसऱ्या कोणाची तरी भूक भागविण्यासाठी माझ्यातील काही तरी हिस्सा त्याला देण्याची गरज आहे हे जर आपण ओळखले तर त्याला संस्कृती म्हणता येईल. मला असे वाटते की, या अन्न सुरक्षा विधेयकाच्या निमित्ताने संस्कृतीची जपणूक खऱ्या अर्थाने आपल्यापुढे आलेली आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. हेमंत टकले .....

सभापती महोदय, या गोष्टी आपण समोर आणताना बघत असतो की, एक फार मोठा विरोधाभास आपल्याला यामध्ये दिसतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर आपण विज्ञानाच्या क्षेत्रात कोणत्याही प्रगत राष्ट्राच्या मागे नाही. आज आपण उपग्रह आपले म्हणून अवकाशात सोडू शकतो इतके वैज्ञानिक आपल्या देशात तयार झालेले आहेत. विज्ञानाने सिध्द केलेल्या कोणत्याही प्रकारच्या गोष्टी आपण सहज अंमलात आणू शकू इतकी प्रगती वेगवेगळ्या क्षेत्रात झालेली आहे. पण जेव्हा प्रगती होते त्या वेळेला त्याचे सामाजिक अभिसरण होते की नाही, याचा कोठे तरी विचार होतो की नाही, हे आपल्याला तपासून बघितले पाहिजे. हे जर होत नसेल तर आपण ज्या मार्गावरुन पुढे चाललेलो आहोत त्या मार्गाने आपण कोठे जाणार आहोत याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

सभापती महोदय, आजकाल असे म्हटले जाते की, या देशामध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकरण वाढत आहे. त्या प्रमाणे एक मध्यमवर्गही मोठ्या प्रमाणात वाढत आहेत, ज्यांचे पगार जास्त आहेत. त्या मध्यमवर्गाच्यावर ज्याला फॉच्यून 500 म्हणतात, असाही एक वर्ग आहे. त्याला अतिश्रीमंत म्हणून गणले जाते. या दोन वर्गाचेच भले व्हावयाचे असेल तर त्यादृष्टीने राज्यकर्ते वागू लागले तर नाही रे व आहे रे या वर्गातील दरी अत्यंत वेगाने वाढत जाईल. जो समाज कायमचा तुटेल, जो समाज कायमचा वंचित राहील. अशा समाजाचे पुढे येणे अशक्य होऊन जाईल. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयदेव गायकवाड यांनी म्हटल्या प्रमाणे हा देश स्वतंत्र झाल्यानंतर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला घटना दिली. त्या घटनेतील मूलभूत हक्कांमध्ये आत्मसन्मानाने जगण्याचा मार्ग या देशातील सर्वात शेवटच्या माणसाला तो मिळविता आला पाहिजे. नव्हे तो त्याचा हक्कच आहे. ही धारणा असताना आपण या अन्न सुरक्षा या विषयाकडे राजकीय किंवा पक्षीय दृष्टीकोनातून बघण्याची अजिबात आवश्यकता नाही.

आदरणीय श्री.शरद पवार साहेब हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याचा निर्णय घेतला. त्या निर्णयाच्या राजकीय परिणामांची स्पष्टोक्ती केली होती. त्यावेळी त्यांनी असे म्हटले होते की, राज्य गेले तरी बेहतर, पण मला हा निर्णय घेतलाच पाहिजे. कारण समाजात शेकडो वर्षे दबलेल्या माणसाला त्याची योग्य जागा मिळवून द्यावयाची असेल तर त्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. त्यामुळे मला असे वाटते की, युपीए सरकारने मतपेट्या डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेतलेला नाही.

या योजनेची अंमलबजावणी करीत असताना जरुर अडचणी येणार आहेत. जसे स्व.राजीव गांधी यांनी एकदा म्हटले होते की, शासन एखाद्या योजनेसाठी एक रुपया खर्च करीत असते त्यावेळी लाभार्थ्यांना त्याचा 10 ते 12 टक्के लाभ मिळतो. आपल्या देशामध्ये पाश्चिमात्य देशाप्रमाणे ताशी 500-600 कि.मी.वेगाने रेल्वे धावली पाहिजे असे आपण म्हणतो. तशी रेल्वे पाहिजे असेल तर त्यासाठी ट्रॅक बनवावा लागतो. त्यासाठी सक्षम व्यवस्था व त्या व्यवस्थेमध्ये प्रामाणिकपणा आवश्यक आहे. कोणतीही योजनेला असंख्य पाय फुटल्यामुळे ती योजना अयशस्वी

2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.हेमंत टकले....

होते. लाभार्थ्यांपर्यंत त्याचा लाभ पोहोचत नाही. त्यामुळे एवढ्या मोठ्या योजनेबाबत काळजी घेण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, हल्ली पेट्रोल व डिझेलच्या किंमती प्रत्येक आठ, पंधरा दिवसांची बदलत होत्या. पूर्वीच्या काळात उद्यापासून पेट्रोलच्या दरात वाढ होण्याची बातमी आल्यावर त्या रात्री पेट्रोल पंपावर रांगा लागलेल्या दिसत होत्या. त्यामुळे आवश्यकता नसताना महिन्याभराच्या पेट्रोलचा साठा करुन ठेवला जात होता. त्याप्रमाणे या योजनेद्वारे मिळणारे धान्य साठा करण्यासाठी असणार नाही.

अनेक सन्माननीय सदस्यांनी गोदामांचा उल्लेख केलेला आहे. परंतु त्या गोदामांमध्ये धान्य साठा कमीत कमी दिवस राहील यादृष्टीने यंत्रणा कशी करण्याची गरज निर्माण झाली आहे. वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. मंत्री महोदयांनी यापूर्वीही सांगितले आहे की, वाहतूक व्यवस्थेसाठी टॅंकर्सचे किंवा ट्रक्सचे मॉनेटरिंग करण्याची योजना राबविली जात आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:25

श्री. हेमंत टकले....

आपण या योजना राबविल्या असल्या तरी ही योजना हाणून पाडण्यासाठी अनेक प्रकारचे अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे आणि त्या शक्यतेचा निश्चितपणे विचार केला पाहिजे. एक गोष्ट निश्चित आहे की, आपल्या देशामध्ये जी जी धोरणे राबविली जातात, ज्या ज्या योजना जाहीर केल्या जातात त्यांची कालमर्यादा ठरविली जात नाही. आपण योजना सुरु करतो, ती सुरु केल्यानंतर पुढे ती शाश्वत चालू राहाणार आहे अशा प्रकारचा खोटा विश्वास दिला जातो. आता तुम्हाला 1 रुपया, 2 रुपये, 3 रुपये प्रमाणे अन्नधान्य मिळू लागले की तुमची सर्व चिंता मिटेल अशा प्रकारची वेगळी मानसिकता तयार होईल. या मानसिकतेचा समाजशास्त्राच्या दृष्टीने विचार करण्याची आवश्यकता आहे.

आपण अपंगांच्या बाबतीत असे म्हणतो की, अपंगांना सारख्या सवलती आणि आर्थिक मदत देऊन त्यांच्या अपंगत्वामध्ये आपण भर घालत असतो. त्यापेक्षा त्यांना सक्षमतेकडे कसे नेता येईल यादृष्टीने विचार करण्याची आवश्यकता आहे. काही टक्के लोकसंख्या ही दारिद्रय रेषेखाली आहे. काही अहवाल सांगतात की, यामध्ये सुधारणा झालेली आहे. आपल्याला जर पुढे जायचे असेल तर दारिद्र्य रेषा कायमची कशी मिटविता येईल आणि त्यासाठी काय केले पाहिजे याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

एक चिनी म्हण अशी आहे की, एखादा भुकेला तुमच्या समोर आला तर त्याला ताटलीमध्ये भात देऊ नका, त्याला भाताचे पिक कसे काढायचे याची शिकवण द्या. म्हणजे कर्तेकरविते घडविले जातील, केवळ दयेवर, याचनेवर अवलंबून राहाणार समाज निर्माण होणार नाही तर त्यामधून सक्षम समाज निर्माण होईल, त्यांना चांगले शिक्षण मिळेल आणि ते एखाद्या चांगल्या व्यवसायात किंवा उद्योगात जातील किंवा शेती करतील, शेती किंवा इतर उद्योगधंदे वाढून या देशातील क्रयशक्ती वाढेल. असे झाले नाही तर या महत्वाकांक्षी योजनांवरील खर्च वर्षानुवर्षे वाढत जाईल, दारिद्र्य रेषा हटणार नाही, त्याखालील लोकांची संख्या कमी होणार नाही. हे सर्व वास्तव असून या वास्तवाचा विचार करण्याची आवश्यकता आहे. एवढे सर्व बोलल्यानंतर असा प्रश्न निर्माण होतो की जेव्हा ही योजना देशभर लागू होईल त्यावेळी आपल्या राज्य सरकारची काय भूमिका असेल ? ही योजना आपल्याला चांगल्या प्रकारे कशी राबविता येईल ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, आजच आपल्या अन्न आणि नागरीपुरवठा विभागामध्ये अनेक बदल करण्याची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी वेगवेगळया अडचणी आहेत. अनेक ठिकाणी सक्षमतेने कारवाई होण्याची गरज आहे. दुबळया प्रशासन यंत्रणेकडे इतकी महत्वाकांक्षी योजना आली तर एखाद्याला खूप चांगले विमान द्यावे पण त्याला ते चालवता येऊ नये असा प्रकार होऊ नये अशी अपेक्षा या निमित्ताने मला व्यक्त करावीशी वाटते. या योजनेमुळे खूप मोठा सामाजिक बदल होणार आहे. ग्रामीण भागात गरिबातील गरीब लोक राहातात. मला माहीत आहे की, आपल्या खात्या मार्फत काही चांगल्या योजना निश्चितपणे सुरु झालेल्या आहेत. विशेषत: आदिवासींच्या पाड्यावर महिनाभराचे धान्य मध्ये कुठेही गडप होऊ नये म्हणून तेथील चावडीवर जाऊन दवंडी पिटून आदिवासींना दिले जाते. एकदा अन्नधान्याने त्याला समृद्ध केल्यानंतर त्याला चांगली आरोग्य यंत्रण शासना मार्फत मिळाल्यानंतर, त्याची जगण्याची गरज भागविल्या नंतर त्याला पुढच्या टप्प्याकडील सक्षमतेकडे कसे नेता येईल याचा विचार नंतर करता येईल. परंतु मुळामध्ये हा सगळा स्तर आज अन्नापासून वंचित आहे, भुकेलेला आहे या भुकेलेल्या माणसाची हाक ऐकायची असेल, त्याच्या पोटामध्ये दोन घास जावेत असे वाटत असेल, तहान लागल्यावर त्याला चांगले पाणी प्यायला मिळावे असे वाटत असेल तर आणि तरच तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत नमूद केलेल्या राईट टू लिव्ह विथ डिग्निटी या संज्ञेला प्राप्त होऊ शकेल.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

अशा अंत्योदयोतल्या माणसाचे पुनरोत्थपन करणे, त्याला वरच्या स्तरावर नेणे ही समाजातल्या विशेषत: ज्यांच्यांकडे या देशाची आणि राज्याची सत्ता आहे. त्या सत्ताधाऱ्यांवर ही अधिकची जबाबदारी आहे आणि ती प्रामाणिकपणे, कष्टाने, जिद्दीने, येणाऱ्या संकटांचा सामना करुन जर यशस्वीपणे राबविली गेली तर पुढच्या दशकामध्ये भारत हा देश जगातील महत्वाचे शक्ती केंद्र म्हणून उदयास आल्याशिवाय राहणार नाही. केवळ वैज्ञानिक प्रगती नाही, केवळ भौतिक इतर साधनाची प्रगती नाही, येथील सामान्यातला सामान्य माणूस मोठ्या प्रमाणावर सक्षम झाला तर आणि तरच आपल्याला उद्याच्या जगामध्ये काही निश्चित स्थान मिळेल. म्हणून अन्न सुरक्षा अध्यादेशाचे अतिशय महत्व आहे. ते महत्व जाणूनच राज्य सरकार यापुढची पावले टाकील असा मला विश्वास वाटतो. म्हणून या प्रस्तावाला समर्थन देऊन मी माझे भाषण संपवितो.

--------------

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री. माणिकरावजी ठाकरे यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये अनेक चांगली विधेयके पारित झाली, पुरवणी मागण्या मंजूर केल्या. या अधिवेशनाचे खरे वैशिष्ट काय असेल तर भारतातील सर्वसामान्य नागरिकांना जो मुलभूत अधिकार प्राप्त होणार आहे आणि त्यासंदर्भातील हा प्रस्ताव आहे. मला वाटते या अधिवेशनातला सर्वात महत्वाचा हा प्रस्ताव आहे. अशा वेळेला विरोधकांनी सभागृहात उपस्थित राहून, या प्रस्तावावरील चर्चेत सहभागी होऊन, शासनाला काही उपयुक्त सूचना करणे आवश्यक होते. परंतु या प्रस्तावाचे श्रेय कॉंग्रेस पक्षाला, युपीए सरकारला मिळेल म्हणून विरोधकांनी सभात्याग केलेला आहे असे मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते. शिवसेनेचे नेते श्री. उध्दव ठाकरे हे नुकतेच दिल्ली येथे जाऊन आले. त्यांची दिल्ली येथे फार मोठी पत्रकार परिषद झाली. त्यावेळी पत्रकारांनी त्यांना विचारले की, भाजपने मंदिराचा अजेंडा ठरविलेला आहे. या बाबतीत तुम्हाला काय वाटते ? सभापती महोदय, माझ्याकडे वृत्तपत्र आहे. त्या पत्रकार परिषदेत त्यांनी असे म्हटले आहे की, मंदिरापेक्षा रोजी रोटी महत्वाची आहे. त्यांचे नेते रोजी रोटीची भाषा करतात. रोजी रोटीच्या प्रस्तावाची चर्चा ऐकण्यासाठी अथवा त्यात सहभाग घेण्यासाठी त्यांच्या पक्षाचे सदस्य सभागृहात उपस्थित रहात नाहीत, एवढेच नव्हे तर ते सरकारचा निषेध करतात. खरे तर आज विरोधी पक्षाचा निषेध करण्याची वेळ आलेली आहे असे मी या ठिकाणी मुद्दाम नमूद करु इच्छितो.

सभापती महोदय, या ठिकाणी कॉंग्रेस पक्षाचा उल्लेख करण्यात आला. राज्य घटनेचा उल्लेख करण्यात आला. माननीय श्रीमती सोनिया गांधी यांचा उल्लेख करण्यात आला. या संदर्भात सन्माननीय सदस्य ॲड.जयदेवराव गायकवाड यांनी महत्वाचे मुद्दे उपस्थित केले. राज्य घटनेची अंमलबजावणी करताना कॉंग्रेस पक्षाने कधीही कसूर केली नाही. उलटपक्षी जेव्हा जेव्हा राज्य घटनेमध्ये बदल करण्याचे प्रस्ताव आले, कॉंग्रेस पक्षाने ते बदल मान्य केले नाहीत. स्व.इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या. त्यावेळी झोपडपट्टयांचे प्रश्न निर्माण झाले. "राहील त्याच्या झोपडी खालची मालकीची जमीन" असा सर्वात महत्वाचा कायदा स्व.इंदिरा गांधी यांच्या कारकिर्दीमध्ये झाला. तो कायदा त्यांनी अंमलात आणला...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/ पूर्वी श्री.गिते 18:35

श्री.शरद रणपिसे....

बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे, असे अनेक महत्वाचे निर्णय काँग्रेस पक्षाने घेतले आहेत. त्याच धर्तीवर काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा माननीय श्रीमती सोनिया गांधी यांनी अन्न सुरक्षा विधेयकाचा आग्रह धरला होता. त्यांच्या आग्रहाखातर अन्न सुरक्षा अध्यादेश निघाला हे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, अन्न म्हणजे काय असते, ते जर मिळाले नाही तर काय परिस्थिती निर्माण होते याची अनेक उदाहरणे माननीय सदस्यांनी सांगितली आहेत. परंतु 1972-73 मध्ये तेव्हा दुष्काळ पडला होता त्या वेळेला राज्यामध्ये भयंकर पाणी टंचाई निर्माण झाली होती. अन्न टंचाई निर्माण झालेली होतीच. केवळ महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण देशभर अन्न टंचाई निर्माण झाली होती. त्या काळात आम्ही मिलो खाल्ला होता. अमेरिकेबरोबर करार करण्यात आला. त्या करारानुसार अमेरिकेकडून जो गहू आयात करण्यात आला त्या गव्हाला 'मिलो' म्हटले गेले. इतकेच नव्हे तर विरोधकांनी काँग्रेस पक्षावर टीका केली. मिलोबरोबर एक बियाणे आले आणि हिरवे गवत उगवले. त्या गवताला काँग्रेस गवत म्हणून हिणवले गेले.

सभापती महोदय, 1972 च्या दुष्काळामध्ये स्व.वसंतराव नाईक यांनी जी भूमिका घेतली त्याबद्दल त्यांचे नाव आदराने घ्यावे लागेल. राज्यातील लोकांना या दुष्काळामध्ये ऊसाचा चोथा आणि गूळ मिश्रीत सुकडी नावाचा पदार्थ खायला दिला गेला. तो पदार्थ खाऊन लोक जगले. पुण्याच्या शनिवारवाड्यावर त्यांनी भाषण करताना असे म्हटले होते की, या महाराष्ट्रामध्ये हरित क्रांती झाली नाही तर मला याच शनिवारवाड्यासमोर फाशी द्या. नंतर त्यांनी कृषी क्षेत्रात लक्षणीय प्रगती करुन दाखविली. नवीन संकरित बियाणे तयार करण्यात आले. कापसाचे संकरित बियाणे विदर्भासाठी वरदान ठरले होते. त्यानंतरच्या काळात सातत्याने कृषी क्षेत्रात प्रगती होत गेली आणि मोठया प्रमाणात धान्याची निर्मिती झाली. काही लोकांनी कोर्टात धाव घेतली. त्यांचे म्हणणे होते की, मोठया प्रमाणात धान्याची नासाडी होते, कारण धान्य साठविण्यासाठी पुरेशी गोदामे नाहीत. कोर्टाने केंद्र सरकारला निर्देश दिले की, अन्नधान्याचे गरीब लोकांना वितरण केले पाहिजे. त्या अनुषंगाने माननीय श्रीमती सोनिया गांधी यांनी पुढाकार घेतला. राज्य घटनेला अनुसरुन सर्वसामान्य जनतेला अन्न, वस्त्र व निवारा देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला आणि त्या दृष्टीकोनातून अन्न सुरक्षा अध्यादेश आणण्यामध्ये त्यांचा मोठा सहभाग आहे. त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/ पूर्वी श्री.गिते 18:35

श्री.शरद रणपिसे....

सभापती महोदय, शेतमालाला हमी भाव मिळेल, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल परंतु मजुरांना काम मिळणार नाही या मुद्याकडे जाण्याचे काही कारण नाही. कृषी पत मानांकन संस्थेने या विधेयकाचा सर्वंकष अभ्यास केला आहे. भारताच्या परिस्थितीचा अभ्यास केला आहे. बीपीएल कार्डधारकांना प्रत्येक वर्षाला कुटुंबासाठी धान्य खरेदीकरिता 13082 रुपये खर्च येतो असे त्या संस्थेने म्हटले आहे. ही अन्न सुरक्षा योजना अंमलात आल्यानंतर बीपीएल कार्डधारकांच्या कुटुंबीयांना वर्षाकरिता धान्य खरेदीसाठी 8682 रुपये इतका खर्च येईल. म्हणजे त्या कुटुंबाची 5000 रुपये इतकी वर्षाला बचत होईल ती वाचलेली रक्कम मुलाबाळांच्या शिक्षणासाठी किंवा अन्य कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी वापरता येणार आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी महिला सक्षमीकरणाबद्दल सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी मुद्दा मांडला आहे. मूल जन्माला येण्यापासून मानवी जीवनाच्या अंतापर्यंत त्याला लागणाऱ्या आवश्यक अन्नधान्याची जबाबदारी सरकारने घेतली आहे हे या विधेयकाचे फार महत्वाचे वैशिष्ट्य आहे. संयुक्त राष्ट्र संघाने भारताचे कौतुक केले आहे.

नंतर 4ओ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे...

युनोने असे म्हटले आहे की, ब्राझीलने "Zerp Hunger Programme" राबविला, मेक्सीकोने "Human Development Programme" च्या अंतर्गत अन्न धान्य देण्याचा प्रयत्न केला परंतु हे सर्व सामाजिक जाणीवेतून होत असते. भारत सरकारने "अन्न सुरक्षेला" कायद्याचे स्वरुप देऊन सरकारची जबाबदारी जी काही आहे ती देण्यामध्ये आम्ही सर्वसामान्य जनतेला बांधील आहोत यासंदर्भात जो कायदा केला तो खऱ्या अर्थाने महत्वाचा आहे हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलत असतांना माहितीचा अधिकार,शिक्षणाचा अधिकार या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले असल्यामुळे त्यावर मी बोलणार नाही. परंतु मला खात्र्री आहे की, आपले महाराष्ट्र सरकार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री सक्षम आहेत, राज्याचे मुख्यमंत्रीही सक्षम आहेत. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी तर पंतप्रधान कार्यालयात काम केलेले आहे. त्यामुळे केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकार याचा त्यांना अनुभव आहे. केंद्र सरकार आणि जगातील विविध राष्ट्र यांचा कसा कारभार चालतो याबद्दलही त्यांना अनुभव आहे. ज्या काही शंका आणि ज्या काही सूचना असतील त्या विचारात घेऊन माननीय मंत्री महोदय त्या त्रुटी भरुन काढतील आणि देशामध्ये महाराष्ट्र राज्याने "अन्न सुरक्षा कायद्याची" एक नंबरने अंमलबजावणी केली असे चित्र भविष्य काळात निर्माण होईल.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला मनापासून समर्थन देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फ़र हुसेन (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष आदरणीय श्री. माणिकराव ठाकरे यांनी मांडलेल्या नियम 260 च्या "अन्न सुरक्षा" प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी व त्यास समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, भारतीय घटनेच्या अनुच्छेद 21 प्रमाणे "Protection of life and personal liberty" संदर्भात असे स्पष्टपणे म्हटले आहे की, "No person should be deprived of his life and personal liberty except according to the procedure established by law."

सभापती महोदय, अनुच्छेद 47 मध्ये असे म्हटले् आहे की, पोषणमान व राहणीमान उंचावणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य आहे.

सभापती महोदय, अन्न सुरक्षेच्या संदर्भात जो अध्यादेश आपल्या समोर आलेला आहे तो या देशातील सर्व घटकांचे राहणीमान व अन्न सुरक्षा उपलब्ध करुन देणे एवढेच नव्हे तर ज्या पध्दतीने आज आपला देश जगाच्या पाठीवर वाटचाल करीत आहे त्या दृष्टीने सुध्दा हा अध्यादेश येणे अतिशय गरजेचे होते.

सभापती महोदय, आपल्याकडे कुपोषण, गरिबी, उपासमारी आहे परंतु त्याला तोंड देणे व त्यातून मार्ग काढणे गरजेचे आहे. परंतु आपण हे सुध्दा विसरता कामा नये की, जगाच्या धरतीवर सन 2011 मध्ये 100 कोटी लोक कुपोषित होते व त्यामध्ये लहान मुलांचा सर्वात जास्त समावेश होता.

सभापती महोदय, सर्वात जास्त 98 टक्के कुपोषित लोक हे डेव्हलपींग कंट्रीमधील असून आशिया खंडात 57.8 कोटी लोक आहेत.

सभापती महोदय, जगामध्ये उपासमारी होऊ नये म्हणून युरोपियन युनीयनने सुध्दा पुढाकार घेतला. एवढेच नव्हेतर सन 2010 मध्ये "EU Policy to help developing countries address longer term policy food security challenges" अशी एक पॉलिसी तयार करण्यात आली.

..3/-



श्री. मुझफ्फ़र हुसेन.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, युनायटेड नेशनचा या विषया संबंधातील भुमिकेचा मी उल्लेख करु इच्छितो. "The United nation high level task force on the global food security crisis was set up to enhance co-ordination within UN the global partnership on Agriculture, Food Security and Nutrition was launched and G8 leaders agreed a comprehensive agenda on food security at the summit in L'Aquila in 2009." अशाप्रकारे 2009 मध्ये एक अजेंडा ठरविण्यात आला.

यानंतर श्री. भारवि....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन...

सभापती महोदय, Food Insecurity : A growing threat in Asia written by Shri Amitava Mukharji या पुस्तकामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, अफगाणिस्तान, भारत, बांगलादेश, पाकिस्तान, तझाकिस्तान व अन्य काही देशात विविध प्रकारच्या उपासमारी आहेत. आपण फक्त गरीब लोकांसाठी, बीपीएल, एपीएल किंवा अंत्योदय धारकांसाठी अन्न उपलब्ध करून देणार आहोत. आपण खूप मोठे कार्य करतो त्यावेळी श्रेय लाटण्याचा प्रकार सुरू होतो. एवढेच नव्हे तर विरोध करण्याचा देखील प्रयत्न सुरू होतो. या पुस्तकामध्ये नमूद केले आहे की, "There are some countries where large scale hunger and Nutrition can persist unless food aid flows to these countries and there are possibilities that food may be used as a weapon against some countries." आपण फक्त कुपोषण, उपासमारी या मुद्यांचाच विचार करतो. परंतु, या पुस्तकात नमूद केले आहे की, देशाच्या विरोधात सुद्धा अन्नाचा वापर केला जाऊ शकतो.

कुपोषण व उपासमारीचा परिणाम माणसांवर विविध प्रकारे होत असतो. कुपोषण व उपासमारीमुळे High mortality, Impared mental, Increased risk of adult chronic disease, Reduced capacity, Frequent infection, Reduced mental capacity, Reduced physical capacity, Higher maternal mortality अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे आजार होतात.

सभापती महोदय, हे बिल काँग्रेसच्या अध्यक्षा आदरणीय श्रीमती सोनिया गांधी यांच्या विचारधारणेतून आणलेले आहे. या आधी सुद्धा श्रीमती इंदिरा गांधी यांनी या देशात गरीबी हटावचा नारा देऊन तशा प्रकारची योजना आणून देशातील गोरगरीब जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केला आहे.

केंद्र शासनाने आणलेला हा अध्यादेश अतिशय महत्त्वाचा आहे. यात सर्व आवश्यक व गरजू जनतेला समाविष्ट करून देशात व राज्यात कोणीही उपासमारी व कुपोषित राहता कामा नये याची दक्षता घेण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2/-



श्री.मुझफ्फर हुसेन...

सर्वसाधारण मानवी जीवनासाठी आवश्यक असणारे अन्न पुरेशा प्रमाणात व परवडणाऱ्या किंमतीत उपलब्ध करून देऊन त्यांना सन्मानाने जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून देणारा हा अध्यादेश आहे.

ग्रामीण भागातील 75 टक्के लोकसंख्येला व शहरी भागातील 50 टक्के लोकसंख्येला या योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजने अंतर्गत तांदूळ 3 रूपये, गहू 2 रूपये व इतर धान्य 1 रूपये दराने उपलब्ध होणार आहे.

6 महिने ते 6 वर्षे वयोगटातील मुला-मुलींचा, 6 वर्षे ते 16 वर्षे वयोगटातील मुलांचा, आठव्या इयत्तेतील विद्यार्थ्यांचा, 6 महिन्यांपर्यंतच्या अर्भकंचा, कुपोषणग्रस्त बालकांचा त्याच बरोबर दारिद्र्य रेषेखालील व अंत्योदय योजने अंतर्गत असलेल्या कुटुंबांचाही समावेश या योजने अंतर्गत करण्यात आलेला आहे.

ही योजना केवळ कागदापुरती लागू करता कामा नये. सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता, देखरेख करण्याकरिता राज्य अन्न आयोगाची स्थापना करण्यात येणार असून जिल्हा स्तरीय तक्रार निवारण नेमणूक करण्यात येणार आहे. त्याच बरोबर सामाजिक लेखा परीक्षणे देखील करण्यात येणार आहे.

आपण आयोग स्थापन करतो पण त्यांना कोणतीही ज्युडिशियल पॉवर नसते. अन्न आयोगाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार नोंदविली तर ती तक्रार किंवा प्रकरण आयोग मॅजिस्ट्रेटकडे चालविण्यासाठी पाठवू शकतात. सदरचे प्रकरण कोड ऑफ क्रीमिनल प्रोसिजर सेक्शन 346 अंतर्गत मॅजिस्ट्रेट समोर चालविण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन...

सभापती महोदय, राज्यांना धान्य उपलब्ध करुन देण्याची तसेच राज्यांच्या गोदामांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी केंद्र सरकारची राहणार आहे. कोणत्याही कारणाने केंद्र सरकार राज्य सरकारला धान्य पुरवठा करु शकले नाही तर त्याबदल्यात राज्य सरकारला निधी देण्याची जबाबदारी केंद्र सरकारची राहणार आहे.

सभापती महोदय, या योजनांची अंमलबजावणी झाल्यानंतर लोकांची भूक मिटविणारा सर्वोत्कृष्ट धोरणात्मक निर्णय म्हणून हा कायदा सिध्द होईल असा आम्हाला विश्वास वाटतो. देशाचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग, आमच्या नेत्या आदरणीय श्रीमती सोनिया गांधी आणि श्री.राहुल गांधी यांचे अभिनंदन करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, अन्न सुरक्षा कायदा हा अत्यंत क्रांतिकारी कायदा होणार आहे. या क्रांतिकारी कायद्याच्या अंमलबजावणीकरिता नियम 260 चा प्रस्ताव सभागृहाचे ज्येष्ठ नेते व काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री.माणिकराव ठाकरे यांनी व अन्य सन्माननीय सदस्यांनी आणलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मागील पाच-सहा वर्षामध्ये केंद्रामध्ये असणाऱ्या युपीए सरकारने अनेक क्रांतिकारी निर्णय घेतलेले आहेत. कल्याणकारी शासन म्हटल्यावर देशातील सर्वसामान्य माणसाला डोळ्यासमोर ठेवून कायद्याची निर्मिती केली पाहिजे म्हणून युपीए सरकारचे आणि युपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांचे मला मनापासून अभिनंदन करायचे आहे.

सभापती महोदय, या देशातील सर्वसामान्य लोकांना घटनेतील मूलभूत गोष्टींना कायद्याचे स्वरुप देऊन शिक्षणाचा अधिकार दिला, पारदर्शी कारभार व्हावा म्हणून माहितीचा अधिकार कायदा आणला. देशातील कष्टकरी माणसाला सन्मानाने जगता यावे म्हणून रोजगाराची हमी देणारा "नरेगा" कायदा आणला. आता या देशामध्ये क्रांतिकारी कायदा होत आहे. जो जगामध्ये खऱ्या अर्थाने अतिशय अद्‌भूत आणि अतिशय भव्यदिव्य असा असून लोकांना अन्नाची सुरक्षा देणारा आहे.

सभापती महोदय, या देशाने अनेक दुष्काळ पाहिले आहेत. या देशातील गरिबांसाठी त्यांची भाकरी हाच त्यांचा ईश्वर आहे. तेव्हा गरिबांची भूक भागविणारा हा कायदा आहे, त्याला कायद्याने संरक्षण देण्याचे काम झालेले आहे.

सभापती महोदय,या देशामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून अनेक योजना राबविण्यात आल्या. परंतु त्यामध्ये दारिद्र्यरेषेखालील अनेक गरिबांचा समावेश होत नाही. ग्रामीण भागातील 75 टक्के आणि शहरी भागातील 50 टक्के लोकांचा समावेश व्हावा म्हणून ही मोठी योजना आखलेली आहे.

सभापती महोदय, आपणास माहीत आहे की,मुंबई शहरामध्ये 50 टक्के लोक झोपडपट्टीत राहतात. ते सर्व लोक दारिद्र्यरेषेखाली आले आहेत काय ? आपण त्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा फायदा देतो काय ? आकडेवारीनुसार 25 हजार लोकांना दारिद्र्यरेषेखालील कार्डाचा फायदा मिळत आहे. ही व्यापकता वाढविण्यासाठी शहरी भागातील 50 टक्के लोकांचा यामध्ये समावेश झाला पाहिजे यासाठी केंद्र सरकारने हे तत्व घालून दिलेले आहे आणि ते खूप महत्वाचे आहे असे मला वाटते.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

सभापती महोदय, देशातील अनेकांनी या कायद्याविरुध्द आक्षेप नोंदविले आहेत. ते आक्षेप या देशातील गरिबांची थट्टा करणारे आहेत. काहीजण असे म्हणाले की, या कायद्यामुळे लोक आळशी बनतील. सर्वांची चांगले जीवन जगण्याची महत्वाकांक्षा असते. त्याप्रमाणे सर्वसामान्यांची देखील चांगले जीवन जगण्याची महत्वकांक्षा असते. त्यांची काही स्वप्ने असतात. आपण त्यांना अन्न सुरक्षेच्या माध्यमातून अधिकार दिल्यास तो आपल्या अन्नाची गरज भागल्यानंतर उरलेल्या पैशातून आपल्या मुलांना चांगले शिक्षण, आरोग्य किंवा अन्य काही चांगल्या गोष्टी देण्याचा प्रयत्न करील. तेव्हा या विधेयकावर आक्षेप घेणे अत्यंत आक्षेपार्ह आहे. देशातील गरिबांची अशाप्रकारे थट्टा करु नये असे मला या निमित्ताने सांगायचे आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने सांगण्यात आले की, शेतकऱ्यांना मजूर मिळणार नाहीत. हा कायदा येण्यापूर्वीच आपल्या देशामध्ये अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. जेव्हा एखादे राष्ट्र प्रगतशील राष्ट्राकडून प्रगत राष्ट्र बनते तेव्हा हलकी आणि कष्टाची कामे करायला माणसे उपलब्ध नसतात. हा जगाचा इतिहास आहे. आपले राष्ट्रसुध्दा प्रगत राष्ट्र होत आहे. तेव्हा या कायद्यामुळे मजूर मिळणार नाहीत हा आक्षेप अत्यंत चुकीचा आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे....

या निमित्ताने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या देशात ज्या ज्या वेळी क्रांतिकारी निर्णय घेण्यात आले त्या त्या वेळी त्या निर्णयांची वा कायद्यांची थट्टा करण्यात आली. या पूर्वी जागतिकीकरणाचा निर्णय घेण्यात आला त्या वेळी विरोधकांकडून भीती व्यक्त करण्यात आली की, आता देशातील उद्योगधंदे बंद पडतील आणि आपल्या देशातील उद्योगधंद्यांचा ताबा विदेशी लोक घेतील. तसेच जेव्हा अणु करार किंवा थेट गुंतवणुकीचा कायदा आणला त्या वेळी सुध्दा विरोधकांकडून सर्वसामान्य लोकांमध्ये अशाच प्रकारची भीती निर्माण केली गेली.

महोदय, स्वर्गीय राजीव गांधी यांनी संगणकीकरण करण्याचा घेतलेला निर्णय असेल. असे अनेक निर्णय काळाच्या ओघात अत्यंत सूज्ञ होते, हेच सिध्द झाले आहे. ते निर्णय विरोधकांनी नंतरच्या काळात मान्य देखील केले आहेत. स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे अत्यंत बोलके उदाहरण आहे. त्यांनी सांगितले होते की, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी घेतलेल्या निर्णयांना आम्ही त्या वेळी विरोध केला. त्यांनी घेतलेले निर्णय भविष्याच्या दृष्टीने अतिशय योग्य होते असे त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले होते.

महोदय, अन्न सुरक्षेबाबतचा क्रांतिकारी निर्णय होत असताना विरोधक सांगत आहेत की, निवडणुका समोर आल्यामुळेच अन्न सुरक्षेबाबतचा अध्यादेश काढला आहे. विरोधकांचे म्हणणे आहे की, संसदेचे अधिवेशन सुरु होण्यापूर्वीच तडकाफडकी अध्यादेश का काढण्यात आला. मी त्यांना सांगू इच्छितो की, अन्न सुरक्षा कायदा आणण्यासाठी युपीए सरकारने प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. यापूर्वी ज्या वेळी अशा प्रकारचे विधेयक आणण्याचा सरकारने प्रयत्न केला त्या वेळी विरोधकांनी त्यास विरोध केला. महिलांना आरक्षण देण्याबाबतचे विधेयक असेल किंवा लोकपाल विधेयक असेल, त्या विधेयकांना विरोधकांनी विरोध केला. विरोधक संसदेमध्ये अन्न सुरक्षा कायदा संमत होऊ देत नसल्यामुळे शासनाने गरिबांसाठी अन्न सुरक्षा अध्यादेश काढून एक क्रांतिकारी योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

महोदय, अन्न सुरक्षा विधेयक अत्यंत चांगले आहे. आज सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये तामिळनाडू, केरळ आणि छत्तीसगड ही राज्ये सोडली तर अनेक राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गळती होते. महाराष्ट्रात सार्वजनिक वितरण व्यवस्था चांगली असल्याचे आपण म्हणतो. परंतु

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे....

त्याच वेळी राज्यातील वितरण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर गळती आहे हे देखील आपण मान्य केले पाहिजे. राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील धान्य चोरुन ते बाजारात विकले जाते. त्यामुळे वितरण व्यवस्थेतील गळती थांबविण्याची आवश्यकता आहे. रॉकेलवरील सबसिडी आता सामान्य ग्राहकांना थेट त्यांच्या बँक खात्यावर देण्यात येते. त्यासाठी शासन निधी देण्यास तयार आहे. त्यामुळे राज्यातील काही जिल्ह्यांत वा तालुक्यात अन्न सुरक्षा योजनेचे पैसे सामान्य ग्राहकांच्या खात्यावर वर्ग केले तर या योजनेमध्ये गळती होणार नाही. असे केल्यास भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर थांबेल आणि लाभार्थ्यांना या योजनेचे संपूर्णपणे फायदे मिळतील, असे मला वाटते.

महोदय, ज्या प्रमाणे पिवळे रेशन कार्ड आहे त्याच प्रमाणे नारंगी रेशन कार्ड आहे. अनेक श्रीमंत लोकांच्या नावावर नारंगी कार्ड आहेत. या ठिकाणी माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख बसलेले आहेत. मी त्यांना विनंती करु इच्छितो की, जे लोक इन्कम टॅक्स भरतात त्यांना नारंगी कार्ड मिळणार नाही असा निर्णय केला तर चुकीच्या लोकांना नारंगी कार्ड मिळणार नाहीत. असे केल्यास ही योजना लाभार्थ्यांपर्यंत नेता येईल. किंबहुना भविष्यात ही योजना चांगल्या प्रकारे राबविता येईल.

महोदय, अन्न सुरक्षा योजनेत कडधान्य आणि तेलाचा समावेश करण्यात आलेला नाही. या आवश्यक वस्तूंचा अन्न सुरक्षा योजनेमध्ये समावेश करता येईल या दृष्टीने विचार करावा, असे मला वाटते.

महोदय, या क्रांतिकारी प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये सर्वश्री माणिकराव ठाकरे, सुभाष चव्हाण, हेमंत टकले, शरद रणपिसे, प्रकाश बिनसाळे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सर्वश्रीमती विद्या चव्हाण, दिप्ती चवधरी, सर्वश्री विक्रम काळे, मोहन जोशी, संजय दत्त, राणा जगजितसिंह पाटील, सय्यद मुझफ्फर हुसेन, प्रा.सुरेश नवले यांनी अतिशय महत्त्वाचा प्रस्ताव चर्चेला आणल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

महोदय, या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, भाई जगताप, श्रीमती विद्या चव्हाण, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, रमेश शेंडगे, सर्वश्रीमती दिप्ती चवधरी, अलका देसाई, ॲड.जयदेव गायकवाड, सर्वश्री जयप्रकाश छाजेड, हेमंत टकले, शरद रणपिसे, सय्यद मुझफ्फर हुसेन आणि डॉ.सुधीर तांबे अशा एकूण 15 सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेताना सर्वच सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत.

महोदय, अन्न सुरक्षा योजनेच्या बाबतीत प्रींट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाच्या अनुषंगाने अनेक चांगल्या सूचना केल्या आहेत.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख ...

खरोखरच युपीए सरकारने अतिशय ऐतिहासिक आणि क्रांतिकारक निर्णय घेतला. ज्या निर्णयाला लोककल्याणकारी निर्णय म्हणता येईल असा निर्णय युपीए सरकारने घेतला त्याबद्दल माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह, युपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी, माननीय श्री. शरद पवार साहेब या सर्वांचे मी मनापासून अभिनंदन करतो. हे करीत असताना सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या अन्न सुरक्षा कायद्याच्या अंतर्गत राष्ट्रीय स्तरावर ग्रामीण भागातील 75 टक्के लोकांना आणि शहरी भागातील 50 टक्के लोकांना या अन्न सुरक्षा कायद्याचा फायदा होणार आहे. देशातील 81 कोटी लोकसंख्येला याचा फायदा होणार आहे आणि यावर 1 लाख 30 हजार कोटी रुपये केंद्र शासन खर्च करणार आहे.

सभापती महोदय, हा महत्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेतल्यानंतर आज इतक्या महत्वाच्या प्रस्तावावर चर्चा होत असताना मला अतिशय दुःख होते की, विरोधी पक्षाचे मित्र सभागृहात उपस्थित नाहीत. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य जर सभागृहात थांबले असते आणि त्यांनी जर या प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेतला असता तर ही चर्चा आणखी चांगल्या पध्दतीने होऊ शकली असती. दिल्लीमध्ये सुध्दा ज्यावेळी अन्न सुरक्षा कायदा मंजूरीसाठी मांडण्यात आला त्यावेळी ते बिल कशा पध्दतीने मंजूर होणार नाही याची काळजी विरोधी पक्षांनी घेतली आणि शेवटी नाईलाजास्तव युपीए सरकारला अध्यादेश काढावा लागला. त्या ठिकाणी सुध्दा याची चर्चा होऊ शकली नाही. आतापर्यंत दिल्लीमध्ये सुध्दा या कायद्याची चर्चा झाली नाही. आज आपल्या विधान परिषदेमध्ये या संदर्भात चर्चा होत आहे ही आपल्यासाठी अतिशय आनंदाची आणि महत्वाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, आज महाराष्ट्राची लोकसंख्या जवळजवळ 11 कोटी 23 लाख आहे. त्यापैकी जवळजवळ 7 कोटी 17 लाख लोकांना या योजनेचा फायदा होणार आहे. म्हणजे महाराष्ट्रातील जवळजवळ 62 टक्के लोकांना या योजनेचा फायदा होणार आहे. त्यामध्ये ग्रामीण भागातील 76.32 टक्के आणि शहरी भागातील 45.34 टक्के इतक्या मोठ्या प्रमाणात म्हणजे एकूण 7 कोटी 17 लाख लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे. आज सार्वजनिक वितरण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/ KTG

श्री. अनिल देशमुख .....

व्यवस्थेमध्ये अंत्योदय योजना, बीपीएलची योजना, एपीएलची योजना अशा वेगवेगळ्या योजनेचे वेगवेगळे लाभार्थी आहेत. आज अंत्योदय योजनेमध्ये महाराष्ट्रातील जवळजवळ 9 टक्के लाभार्थी आहेत आणि अंत्योदय योजनेतील या 9 टक्के लाभार्थ्यांना ज्या किंमतीमध्ये धान्य देतो, 2 रुपये किलो, 3 रुपये किलो दराने धान्य देतो त्या दरामध्ये आता महाराष्ट्रातील 62 टक्के लाभार्थ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे, ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे. यासाठी दरमहा जवळजवळ 3 लाख 88 हजार मे.टन धान्य लागणार आहे आणि त्याची दरमहा किंमत जवळजवळ 900 कोटी रुपये होईल. 900 कोटी रुपयांचे धान्य अतिशय सवलतीच दरामध्ये 62 टक्के लोकांना पुरवठा करणार आहोत. अशा या क्रांतिकारक योजनेची अंमलबजावणी संपूर्ण भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये करणे ही आनंदाची बाब आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे आणि अन्य अनेक सन्माननीय सदस्यांनी धान्य उत्पादनाचा विषय मांडला. आज आपल्याकडे जर धान्य नसते तर ही योजना आपण राबवू शकलो नसतो. आपल्याकडे पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये म्हणजे 1951-1952 मध्ये लोकसंख्याही कमी होती पण लोकसंख्या कमी असताना सुध्दा त्यावेळी आपल्याजवळ मुबलक धान्यसाठा नव्हता. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी 50 दशलक्ष टन धान्य उत्पादन होते. स्वातंत्र्य मिळून 50-60 वर्षात जी सरकारे आली मग युपीएचे सरकार असो किंवा एनडीएचे सरकार असतो, त्यांनी भारतामध्ये धान्याचे उत्पादन वाढले पाहिजे यासाठी सातत्याने प्रयत्न केला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख.......

श्री.अटलबिहारी वाजपेयी हे 2004 साली पंतप्रधान होते. त्यांच्या काळात जाणीवपूर्वक प्रयत्न झाला होता. परंतु गेल्या 50-60 वर्षात अन्नधान्याचे उत्पादन 110-115 दशलक्ष टनाच्यावर गेले नव्हते. अनेक वर्षे देशातील अन्नधान्याचे उत्पादन तेवढेच होते. त्यानंतर डॉ.मनमोहनसिंग यांचे सरकार आल्यानंतर प्रयत्न करण्यात आले. परंतु त्या काळातही भारताला अन्नधान्याची आयात करावी लागत होती. श्री.अटलबिहारी वाजपेयींच्या काळातही देशाला धान्य आयात करावे लागत होते. गेली 50-60 वर्षे पोटाची भूक भागविण्यासाठी बाहेरच्या देशातून आपण धान्याची आयात करीत होतो. परंतु सन 2010 व सन 2011 मध्ये अन्नधान्याच्या बाबतीतील चित्र पालटले आहे. डॉ.मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए-2 सरकारमध्ये या देशाचे कृषी मंत्री म्हणून आदरणीय श्री.शरद पवार साहेब यांनी अन्नधान्याचे उत्पादन वाढण्यासाठी प्रयत्न केले. यापूर्वी देशातील धान्याचे उत्पादन 115 दशलक्ष मे.टनाच्या वर जात नव्हते. परंतु त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्यामुळे सन 2011-12 मध्ये 257 दशलक्ष मे.टन धान्याचे उत्पादन झाले. तेव्हापासून या देशात 260 दशलक्ष मे.टनापर्यंत धान्याचे उत्पादन होत आहे. यापूर्वी आपल्या देशाला धान्याची आयात करावी लागत होती. आता आपला देश धान्याची निर्यात करीत आहे. उत्पादित माल ठेवण्यासाठी जागा नाही अशी स्थिती काही राज्यात निर्माण झाली आहे. मधल्या काळात बाहेरच्या देशातून मिलो किंवा पीएल-480 असो अशा अनेक प्रकारच्या धान्याची आयात केली होती. आज परिस्थिती बदलेली आहे. माननीय डॉ.मनमोहनसिंग आणि माननीय श्री.शरद पवार साहेब यांनी युपीए सरकारमधील कृषी विभागाचे यशस्वी धोरण राबविण्याचे काम केलेले आहे.

अन्न सुरक्षा कायद्यामध्ये केंद्र सरकारने निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये राज्यातील 62 टक्के लाभार्थी म्हणजे 60 कोटी 17 लाख लोकांना धान्य दिले जाणार आहे. माणसी 5 किलो व 5 सदस्यांच्या कुटुंबाला 25 किलो धान्य दिले जाईल. सहा सदस्य असतील तर 30 किलो धान्य दिले जाईल. अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना फिक्स 35 किलो धान्य दिले जाणार आहे. पिवळे, केसरी, पांढरे रेशनकार्ड रद्द केली जाणार आहेत. आता प्रायोरिटी सेक्शन व नॉन प्रायोरिटी सेक्शन असतील. प्रायोरिटी सेक्शनमधील लोकांना धान्य द्यावयाचे आहे, नॉन प्रायोरिटी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.अनिल देशमुख.......

सेक्शनच्या लोकांना शासन धान्य देणार नाही. त्याबाबतची पुढील कार्यवाही चालू आहे. अन्न सुरक्षा अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर होणार आहे. कायद्यानुसार त्याला धान्य मिळाले नाही तर लाभार्थ्याला राज्य शासनाच्या माध्यमातून नुकसान भरपाई म्हणून अन्न भत्ता दिला जाणार आहे. या संदर्भात केंद्र सरकारची मार्गदर्शक तत्वे शासनाकडे आलेली नाहीत. ती आल्यानंतर ज्या लाभार्थ्याला धान्य मिळणार नाही त्याला हा भत्ता दिला जाणार आहे.

आज प्रत्येक कुटुंब प्रमुख म्हणून पुरुषाचे नाव असते. परंतु युपीए सरकारने एक महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार कुटुंब प्रमुख म्हणून महिलेचे नाव राहणार आहे. नवीन बारकोडेड रेशनकार्डस् इश्यू केली जाणार आहेत त्यामध्ये महिलेचे नाव कुटुंब प्रमुख म्हणून राहणार आहे.

संपूर्ण सार्वजनिक वितरण व्यवस्था राबवित असताना ज्या तक्रारी येतील त्याची दक्षता घेण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा तक्रार निवारण समितीची स्थापना केली जाणार आहे. त्यासाठी वर्ग-1 च्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल. त्यांच्याकडे आलेल्या तक्रारींची ते दक्षता घेतील. त्यांच्याकडे लाभार्थ्याला न्याय मिळाला नाही तर मुंबईच्या ठिकाणी राज्य स्तरावरील स्टेट फूड कमिशनकडे अपील करता येईल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख...

यामध्ये जर कोणी शासकीय अधिकारी दोषी आढळला तर त्याला 5 हजार रुपये दंड करण्याचीही तरतूद केलेली आहे. केन्द्र सरकारने आणलेल्या या योजनेची राज्यामध्ये चांगल्या प्रकारे अंमलबजावणी व्हावी या दृष्टीने आम्ही तयारी केलेली आहे. अन्न सुरक्षा कायदा आणण्याची चर्चा भारतामध्ये मागील तीन वर्षापासून सुरु आहे. राज्य शासनाने 5 जुलैला अध्यादेश काढला.त्यानंतर या योजनेची अंमलबजावणी राज्यामध्ये प्रभावीपणे कशी करता येईल यासाठी दुस-या दिवशी म्हणजे दिनांक 6 जुलै रोजी नाशिक येथे सर्व संबंधित अधिका-यांची बैठक घेऊन विचारविनिमय केला.

सभापती महोदय, राज्यामध्ये 50 वर्षापूर्वी बांधलेली गोडाऊन्स आहेत. त्यानंतर महाराष्ट्रामध्ये कुठेही गोडाऊन्स बांधली गेली नाहीत. परंतु या अन्न सुरक्षा योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्रामध्ये करावी लागेल हे आधीच माहीत असल्यामुळे महाराष्ट्रामध्ये गोडाऊन बांधण्याचा कार्यक्रम एक वर्षापासून हाती घेतलेला आहे. राज्यामध्ये साडेपाच लाख मे.टन धान्य साठविण्याची क्षमता होती. पण वर्षभरामध्ये 2 हजार कोटी रुपये खर्च करुन गोडाऊन बांधण्याचे काम हाती घेतलेले आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर साडेतेरा लाख मे.टन धान्य साठविण्याची क्षमता निर्माण होईल आणि राज्यामध्ये एकूण 19लाख मे.टन धान्य साठविण्याची क्षमता निर्माण होईल. यामध्ये राज्य शासन, सेंट्रल वेअरहौसिंग कार्पोरेशन, एफसीआय, या सर्वांनी नियोजन केलेले आहे. गोडाऊन बांधण्याचे 70 टक्के काम झालेले आहे. उर्वरित 30 टक्के काम दोन-तीन महिन्यामध्ये होईल. अन्न सुरक्षा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने हे काम राज्य शासनाने केलेले आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्याची सार्वजनिक वितरण व्यवस्था फार मोठी आहे. या सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये महाराष्ट्रामध्ये जवळ जवळ 1 लाख 10 हजार दुकाने आहेत. ही व्यवस्था अधिक चांगली करण्याच्या दृष्टीने संगणकीकरणाचा कार्यक्रम एक वर्षापासून हाती घेतलेला असून त्याचे 85 टक्के काम झालेले आहे. केवळ 15 टक्के काम राहिलेले आहे. या संगणकीकरणामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता येईल आणि हा अन्न सुरक्षा कायदा राज्यामध्ये प्रभावीपणे राबविता येईल. या संगणकीकरणाच्या कार्यक्रमाचा 103 कोटी





श्री. अनिल देशमुख....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रुपयाचा प्रस्ताव राज्य शासनाने केन्द्राला सादर केला. अशा प्रकारचा प्रस्ताव केन्द्राला सादर करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. हा प्रस्ताव सादर केल्यानंतर केन्द्र सरकारने संगणकीकरणाच्या कार्यक्रमासाठी 74 कोटी रुपये मंजूर केले.

...नंतर श्री. गिते...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ D/ प्रथम श्री.शिगम 19:15

श्री.अनिल देशमुख...

संगणकीकरण करण्यासाठी निधी देखील प्राप्त झालेला आहे. अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर प्रथमत: सर्व रेशन कार्ड रद्द करुन बारकोडेड स्मार्ट कार्ड वितरण शासनातर्फे करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने आमची तयारी झालेली आहे. अतिशय कल्याणकारी योजना महाराष्ट्रामध्ये राबविणार आहोत, त्या योजनेची प्रसिध्दी आपल्याला कशा प्रकारे करता येईल, या बाबतीत सुध्दा आम्ही नियोजन करीत आहोत. या योजनेची माहिती राज्यातील सर्वसामान्य लोकांना झाली पाहिजे. गरिबांपर्यंत ही योजना पोहचली पाहिजे. आमच्याकडे ग्राहक संरक्षण निधी आहे, त्याच्या माध्यमातून या योजनेला प्रसिध्दी देण्याचे नियोजन आम्ही करीत आहोत.

सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभागात एक मोठी अडचण निर्माण आहे. आमच्या विभागात अधिकारी नेमले गेले आहेत ते महसूल विभागाचे आहेत. अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे 8 हजार कर्मचारी कार्यरत आहेत, त्यातील 350 अधिकारी आणि कर्मचारी आमच्या विभागातील आहेत. उर्वरित सर्व अधिकारी व कर्मचारी महसूल विभागाचे आहेत. यंत्रणा सक्षम करण्याचा देखील आम्ही प्रयत्न करणार आहोत. यंत्रणा सक्षम झाली तर ही योजना संपूर्ण महाराष्ट्रात चांगल्या प्रकारे राबविता येईल.

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या अनुषंगाने अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. आधार कार्डच्या बाबतीत या ठिकाणी काही सदस्यांकडून तक्रार करण्यात आली. आधार कार्डच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात तक्रारी आहेत ही गोष्ट मला मान्य आहे. परंतु महाराष्ट्रातील अनेक जिल्हयात आधार कार्डचे काम अतिशय चांगले झालेले आहे. मधल्या काळात निर्णय घेतला की, गॅसची सबसिडी लाभार्थ्यांच्या खात्यात कशा पध्दतीने जमा करता येईल, याचे लिंक-अप आधार कार्ड बरोबर केले आहे. गॅसची सबसिडी लाभार्थ्याच्या खात्यात जमा करण्याची सुरुवात वर्धा जिल्हयात केली आहे. वर्धा जिल्हयात आधार कार्डच्या माध्यमातून गॅसची सबसिडी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करतो आहोत. वर्धा जिल्हयात ही योजना प्रायोगिक तत्वावर सुरु केलेली आहे. गॅसची सबसिडी आधार कार्डच्या माध्यमातून देण्याची योजना राज्यातील सर्व जिल्हयात टप्प्या टप्प्याने करणार आहोत.

महोदय, त्याच प्रमाणे केरोसिनची सबसिडी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात कशा पध्दतीने जमा करता येईल या बाबतीत आम्ही गांभीर्याने विचार करीत आहोत. आपणाला माहिती आहे की,

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख...

केरोसिनच्या बाबतीत अनेक जिल्हयात, अनेक तालुक्यात भ्रष्टाचार होतो. त्यामुळे केरोसिनची सबसिडी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा कशी करता येईल याचा गांभीर्याने विचार करुन वर्धा, अमरावती आणि नंदुरबार असे तीन जिल्हे आम्ही निवडलेले आहे. या तीन जिल्हयात पुढच्या दोन महिन्यात या तीन जिल्हयात पुढच्या दोन महिन्यामध्ये प्रायोगिक तत्वावर केरोसिनची सबसिडी आधार कार्डच्या माध्यमातून लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करता येईल यासंबंधी प्रयत्न करणार आहोत.

महोदय, अन्न सुरक्षा कायदा झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला बाजारभाव मिळणार नाही, या कायद्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होईल अशा प्रकारची शंका अनेक वृत्तपत्रातून वाचावयास मिळते. या कायद्यामुळे शेतकऱ्यांचे मुळीच नुकसान होणार नाही. शेतकऱ्यांचा उत्पादित माल राज्य शासन, केंद्र शासन हमी भावाने खरेदी करणार आहे. आधारभावाने खरेदी करणार आहे, त्यामुळे शेतकऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही एवढे मी या निमित्ताने सांगतो.

महोदय, राज्य शासनाने धान्य हमी योजना चालू केली आहे. तीन महिन्यांचे धान्य चौकात जाऊन लाभार्थ्यांना वाटप करतो. त्यामुळे लाभार्थ्यास हक्काचे धान्य मिळतेच. या योजनेची संरुवात दोन वर्षापासून केली आहे. महाराष्ट्रात 13500 गावांमध्ये तीन महिन्यांचे धान्य गावातील चौकात जाऊन त्याचे लाभार्थ्यांना वाटप करतो आहोत. प्रत्येक जिल्हयात ही योजना कशी राबविता येईल यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत.

महोदय, मी या प्रसंगी एवढेच सांगू इच्छितो की, यूपीए सरकारने अतिशय महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. राज्य शासन ही योजना अतिशय प्रभावीपणे राबविल अशी मी या खात्याच्या मंत्री म्हणून ग्वाही देतो. केंद्र शासनाने राज्य सरकारला सांगितले आहे की, दिनांक 5 जुलै, 2013 रोजी या संबंधी नोटिफिकेशन काढलेले आहे. प्रत्येक राज्याने ही योजना दिनांक 5 जुलै पासून सहा महिन्यांच्या आत राबविली पाहिजे अशा केंद्र सरकारने सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे ही योजना डिसेंबर महिन्यापासून राबविण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न राहील. ही योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी सर्वांचे सहकार्य मग सत्ताधारी पक्षाचे सदस्य असो, विरोधी पक्षाचे सदस्य असो, सर्व पक्षाचे सदस्य असो....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख........

अतिशय महत्वाची ही योजना राबविण्यासाठी सर्व लोकांचे सहकार्य आम्हाला लाभेल अशी आशा व्यक्त करतो आणि आपण मला याठिकाणी उत्तर देण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अन्न सुरक्षा अध्यादेशाबाबतच्या प्रस्तावावरील चर्चेत अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आणि आपले महत्वपूर्ण विचार मांडले आहेत. मंत्री महोदयांनी देखील या प्रस्तावावरील चर्चेला सविस्तरपणे उत्तर दिले आहे.

अन्नधान्य साठविण्याच्या दृष्टीने अधिक गोदामे बांधणे आणि योजनेचे संगणकीकरण करणे या दृष्टीने पावले उचलण्यात आली आहेत असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. त्यात कशा पध्दतीने आणखी सुधारणा करता येईल आणि अन्न सुरक्षा कायदा अंमलात आल्यानंतर त्या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होईल या संदर्भात देखील ऊहापोह करण्यात आला आहे.

सभापती महोदय, छत्तीसगढ आणि उत्तराखंड राज्यांनी नवीन पध्दत विकसित केली आहे. धान्य वाटप करण्याच्या दृष्टीकोनातून संगणकीकरण पध्दत विकसित करुन लाभार्थ्यांच्या आंगठ्याचा ठसा नोंदवून घेऊन प्रत्यक्ष त्याच लाभार्थ्याला धान्य मिळेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. या शिवाय कुपन पध्दत सुरु करुन जो लाभार्थी स्वस्त धान्य दुकानावर कुपन घेऊन येईल त्याला कुपनवर नमूद केले असेल तेवढे धान्य द्यायचे आणि जेवढी कुपने वापरली गेली आहेत तेवढ्या प्रमाणात धान्य उपलब्ध करुन द्यायचे अशी पध्दत काही राज्यांनी सुरु केलेली आहे. सध्याच्या स्वस्त धान्य योजनेंतर्गत ज्या शिधापत्रिका देण्यात आल्या आहेत त्यामध्ये अनेक प्रकारचे गैरप्रकार केले जात आहेत. त्याचा विचार करता कुपनद्वारे किंवा आंगठ्याचा वा बोटाचा ठसा नोंदवून घेऊन त्या आधारे लाभार्थ्याला स्वस्त धान्य देण्याची व्यवस्था केली गेली तर चुकीच्या व्यक्तीला धान्य दिले जाणार नाही. ही पध्दत अंमलात आली तर सध्या स्वस्त धान्य योजनेतील माल खुल्या बाजारात विकण्याचा जो प्रकार घडतो त्याला पायबंद घालता येईल. याकरिता काही प्रमाणात कर्मचारी वर्ग देखील उपलब्ध करुन द्यावा लागेल. त्यासाठी सक्षम यंत्रणा उभी करावी लागेल. अन्न व नागरी पुरवठा विभागाने अशी यंत्रणा उभी करावी आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत अशा प्रकारची विनंती करतो.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रात संगणकीकरण करण्यात येत आहे. 85 टक्के काम पूर्ण झाले असून 8 कोटी लोकांची आई, वडील, मुले, मुली, वय, पत्ता आदी माहिती गोळा केली आहे. फक्त बारकोडेड स्मार्ट कार्ड तयार करावयाचे काम पूर्णत्वाला जायचे आहे. बारकोडेड स्मार्ट कार्ड दिल्यानंतर ज्यांना स्वस्त धान्य

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख......

दुकानामार्फत धान्य खरेदी करायचे आहे त्यांनी स्मार्ट कार्ड घेऊनच खरेदीसाठी जावे लागेल. जो लाभार्थी आहे त्याचे स्मार्ट कार्ड सर्व्हरमध्ये इनसर्ट केल्यानंतर त्याच कुटुंबाला धान्य मिळेल. एखाद्या कुटुंबाचे धान्य दुसरी कोणी व्यक्ती स्मार्ट कार्ड घेऊन आली तर त्या व्यक्तीला मिळणार नाही. ज्या कुटुंबाच्या नावावरील स्मार्ट कार्ड आहे त्याच कुटुंबाला धान्य मिळेल.

श्री.माणिकराव ठाकरे : एखादा दुकानदार त्या गावातील सर्व लाभार्थ्यांची स्मार्ट कार्ड गोळा करेल आणि त्या माध्यमातून धान्याचा काळाबाजार करु शकेल. आज प्रत्येक तालुक्यात सेतू केंद्र उभारण्यात आले आहे. त्याच धर्तीवर प्रत्येक गावात सेतू केंद्राकडे ही जबाबदारी सोपवावी. त्यांच्याकडे कुपने देऊन त्यांनी ती लाभार्थ्यांना वितरित करायची आणि तेवढ्या प्रमाणात धान्य द्यायचे.

नंतर 4 एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

एक व्यवस्था असेल तर कंट्रोलधारकाकडे जाऊन धान्य घेता येईल. परंतु दोन व्यवस्था असल्या तर त्यामध्ये हेरफार होणार नाही असे मला वाटते.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, कुपनच्या बाबतीतील रोहयोचा अनुभव आपल्या सर्वांना आहे. कुपन ही फूल फिल सिस्टम नाही. त्यामुळे बार कोडेड स्मार्ट कार्ड सिस्टीम फूल फिल आहे. यामध्ये ज्या कुटुंबाचे धान्य असेल ते त्याच कुटुंबाला मिळेल. संपूर्णपणे संगणीकरण झ ााल्यानंतर मोठया प्रमाणात पारदर्शकता येईल असा शब्द मी या माध्यमातून आपल्याला देतो.

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. बुधवार दिनांक 31 जुलै, 2013 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीमध्ये सकाळी 10.00 ते 11.45 या वेळेत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 7 वाजून 26 मिनिटांनी, बुधवार दिनांक 31 जुलै, 2013 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही